
पाठलाग
अनिकेत समुद्र

# पाठलाग

## अनिकेत समुद्र

ई साहित्य प्रतिष्ठान

पाठलाग (कादंबरी)

लेखक :अनिकेत समुद्र

Phone no. 9604602448

Email: aniket.com@gmail.com

ब्लॉग 'डोक्यात भुणभुणणारा मराठी भुंगा'

(http://manaatale.wordpress.com)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२ नोव्हेंबर २०१६



©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# पाठलाग

लेखक - अनिकेत समुद्र

# प्रस्तावना

'दिपक कुमार', सैन्यातील लेफ्टनंट पदावरून तीन महीन्यांची सुट्टी घेऊन आला आ्हे. त्याची पत्नी जेनी गरोदर आहे आणि महीन्याभरात कधीही त्या दोघांच्या प्रेमाचा अंकुर ह्या जगात येणार असल्याने दिपक जेनीच्या सोबतीला परतला आहे.

सुखी जीवनाची स्वप्न पहाणाऱ्या दोघांच्या जीवनात काहीतरी अनपेक्षीत घडते आणि दिपक तुरुंगात येऊन पडतो. संतापलेला, उद्वीग्न झालेला दिपक महाकठीण अशी तुरुंगातील कैद तोडून बाहेर पडतो खरा आणि तेथुनच सुरु होतो एक जिवघेणा पाठलाग. एका बाजुने ससाण्यांप्रमाणे पाळतीवर असलेले पोलिस तर दुसऱ्या बाजुने गिधाडांसारखे चिवट माफीया दिपकचे जगणे अशक्य करु लागतात.

अश्यातच दिपकची भेट 'माया'शी घडते. संकटात सापडलेले दिपक आणि माया नकळत एकमेकांच्या जवळ येतात. दोघांमध्ये प्रेम फुलत असते. भाजलेल्या आयुष्यात दिपकला पुन्हा एकवार आशेचा किरण दिसु लागतो.

परंतु.........

सुरुवातीपासून शेवटापर्यंत उत्सुकता, थ्रिल, रोमान्स आणि ट्विस्ट्सने भरलेली नविन कथा 'पाठलाग'

# पाठलाग

जून महीन्यातील ती एक संध्याकाळ होती. दोन चार आठवड्यांपुर्वी येऊन गेलेली पावसाची एखादी बारीकशी सर सोडली तर पावसाने टांगच दिली होती. मुंबईच्या त्या दमट वातावरणात उष्णता अधिकच जाणवत होती. चर्चगेट स्टेशनमधून बाहेर आल्या-आल्या मुंबईचा तो टिपीकल फिल दिपकच्या अंगावर आला. रस्ता भरून वाहणारी वाहनांची गर्दी, स्टेशनच्या आतबाहेर करणारे माणसांचे लोंढे, फेरीवाले, पदपथावरील छोटेमोठे स्टॉल्स, भिकारी.. सगळं अगदी जस्संच्या तस्सं होतं. त्यात काहीच फरक पडला नव्हता.

दिपक.. अर्थात लेफ्टनंट दिपक कपूर.. तीन वर्षांपासून काश्मीरच्या खोऱ्यात तैनात होता. गेल्याच वर्षी तो सुट्टीवरून परतला होता. पण आता... आता त्याला मुंबईला सुट्टी काढून लगेच परतणे अत्यंत गरजेचे होते नाहीतर जेनीने आणि तिच्या पोटात वाढणाऱ्या पोराने त्याला घराबाहेरच काढले असते. ७-८ महीने जेनीने दिपकशिवाय कसेबसे काढले पण आता तिला दिपकची.. त्याच्या प्रेमाची.. जास्ती गरज होती. तारीख जवळ जवळ येत चालली होती आणि म्हणूनच दिपक शेवटी तीन महीन्यांची सुट्टी टाकून आला होता.

स्टेशनवरून खरं तर घरी जाणं त्याला जास्ती सोयीस्कर होते परंतु त्याने आणि त्याची पत्नी जेनीने भेटण्याचे ठिकाण ठरवले होते ते त्यांच्या कॉलेजच्या बाहेर असलेले छोटे टपरीवजा हॉटेल. ते हॉटेल जेथे त्यांची सर्वप्रथम ओळख झाली होती. ते हॉटेल जेथे त्यांच्यामधील प्रेम फुलले होते. ते हॉटेल ज्याने त्या दोघांमधील रुसवे-फुगवे, लटके राग पाहीले होते.

दिपकने एकवार सभोवताली नजर टाकली. मिलीटरी वेषातील रुबाबदार दिपककडे येणारे-जाणारे लोक आदबीने पहात होते. दिपकला त्याच्या कामाचा, त्याच्या वर्दीचा अभीमान होता.. त्याच्या व्यक्तीमत्वाला त्याचा वेष अधिकच शोभून दिसायचा. लोकांकडून मिळणाऱ्या ह्या कौतुकाच्या नजरांची दिपकला सवय होती. क्षणभर तो स्वतःशीच हसला आणि मग त्याने टॅक्सी थांबवली. वळकटीत भरलेले सामान दिपकने टॅक्सीच्या डीकीत फेकले आणि तो मागच्या सिटवर जाऊन बसला.

टॅक्सीने वेग पकडला आणि दिपकचे मन भुतकाळात धावु लागले. एकाच कॉलेजमधून दिपक आणि जेनी ग्रॅज्यएट झाले. कॉलेजच्या दुसऱ्याच वर्षात दोघांचे जमले. कॉलेजचे ते भारलेले दिवस दोघांनी एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडूनच घालवले. कॉलेज संपले आणि निधड्या छातीच्या दिपकने एन.डी.ए जॉईन केले. हुशार, तडफदार आणि बिंधास्त दिपकने एन.डी.ए ची सर्व वर्ष गाजवली आणि मिलीट्रीमध्ये जॉईन होताच लगेचच त्याचे पोस्टींग सिमावर्ती भागात झाले.

दिपक आणि जेनीचा विवाह थाटात पार पडला आणि लगेचच दिपक सैन्यात रुजु झाला. पहाता पहाता त्या घटनेला दोन वर्ष उलटून गेली आणि मग मात्र दोघांना वेध लागले पुत्रप्राप्तीचे. ती गोड बातमी कळाली तेंव्हा दोघांना कोण आनंद झाला होता.

दिपक म्हणाला होता.. “आमच्या सैन्यात स्मार्ट आणि सुंदर लेडी डॉक्टर्सची कमतरता आहे.. आपल्याला कन्याच हवी..” तर जेनी म्हणायची..”तु असतोस सदा सर्वकाळ सीमेवर.. मला तर तुझ्यासारखाच एखादा मुलगा हवा जो मला तुझी आठवण येऊ देणार नाही…”

दिपकला आज टॅक्सीत बसल्या बसल्या त्या गोष्टी आठवून हसु येत होते. त्याने त्या खटाऱ्या प्रिमीयर पद्मीनीचे हॅन्डल फिरवून खिडकी उघडली. खिडकीतून येणाऱ्या समुद्रावरच्या खाऱ्या वाऱ्याने दिपकचे मन उचंबळून आले. त्याने खिडकीबाहेर नजर टाकली.

दूरवर वरळी सी-लिंकवरील दिवे लुकलुकत होते. सुर्यास्ताच्या वेळी आकाशात पसरलेल्या लालीची जागा आता निळसर करड्या रंगाने घेतली होती.

दिपकने घड्याळात नजर टाकली आणि तो ड्रायव्हरला म्हणाला.."जरा जल्दी चलो भैय्या.. बिवी इंतजार कर रही होगी.."

टॅक्सीवाल्याने आरश्यातून मागे बसलेल्या दिपकला एकवार न्हाहाळले, त्याच्या चेहऱ्यावर एक मंद हास्य उमटले आणि त्याने गाडी थर्डमध्ये टाकून ओव्हरटेकींगला सुरुवात केली.

दिपक कॅफेजवळ पोहोचला तेंव्हा सांजवेळ टळून गेली होती आणि अंधाराने आपले जाळे विणायला सुरुवात केली होती. कॅफेच्या निऑन दिव्यांच्याखाली पायरीवर जेनी दिपकची वाट पहात बसली होती.पांढऱ्या रंगाचा, गुलाबी फुलांची नक्षी असलेला मिडी जेनीने घातला होता. फिक्कट हिरव्या रंगाच्या रीबिनेने तिचे लांबसडक केस बांधलेले होते. जादूच्या पोतडीप्रमाणे भासणारी केशरी रंगाची मोठ्ठी पर्स पायाशी लोळत होती.

"चायला ह्या बायका मिड थर्टीमध्ये किंवा प्रेग्नंट असताना इतक्या सुंदर कश्या दिसतात हे एक न उलगडलेले कोड आहे..", दीपक स्वतःशीच बोलला..

दिपकला पहाताच जेनी उठून उभी राहीली. दोघेही सावकाश पावलं टाकत एकमेकांकडे जाऊ लागले. त्यात कुठेही प्रेमाचा दिखाउपणा नव्हता, कुठेही मर्यादा ओलांडून वाहणारे कृत्य नव्हते, कुठेही भावनांचा अतिरेक नव्हता.

दिपकने एकवार जेनीच्या मोठ्या पोटाकडे कौतुकमिश्रीत नजरेने पाहीले आणि मिश्कील स्वरात म्हणाला…"मी सांगतोय तुला जेनी, मुलगीच असणार…"

जेनीने एक स्मितहास्य केले आणि ती दिपकला बिलगली.

दिपकने एकदा कॅफे कडे बघितले आणि तो म्हणाला.. “इतकी वर्ष झाली पण सगळं कसं जसंच्या तसं आहे नाही?”

“हम्म खरं आहे, पण इथे येणारी लोक बदलली.. बघ न आजूबाजूला.. कोणीच ओळखीचे नाही.. सगळे नवीन चेहरे..”, जेनी म्हणाली..

दिपकने कारच्या डिकीतून आपले सामान काढले आणि तो जेनीचा हात धरून कॅफे च्या पायऱ्या चढू लागला..

“एय. ते बघ अंकल आंटी आपल्या कॅफे मध्ये..”.. तेवढ्यात मागून एक आवाज आला..

“आयला हो रे.. प्रौढ साक्षरता वर्ग वगैरे चालू केले का काय?’, दुसरा आवाज म्हणाला..

दिपकने मागे वळून पाहिले.. थोड्या अंतरावर पोरांचे एक टोळकं दंगामस्ती करत उभ होत.

“ए.. गप्प बसा… सोल्जर चिडला बर का…” तिसरा आवाज म्हणाला..

दीपक रागाने मागे फिरला, परंतु जेनीने त्याला थांबवले..

“सोड न.. कश्याला त्यांच्या नादी लागतोस? कॉलेज मधली पोर ती, असला पोरकटपणा ते नाही करणार तर कोण करणार?”, जेनी..

“अगं पण…”

“चालतं रे.. त्यांच्या दृष्टीने आपण अंकल ऑन्टीच तर आहोत ना.. सोड ना.. नको मुड खराब करुस.. चल..”

दिपकने एक रागाने आवंढा गिळला आणि तो जेनीचा हात धरून कॅफे मध्ये गेला..

बाहेरून हसण्या-खिदळण्याचे, कमेंट्सचे आवाज येत होते, परंतु दिपकने मोठ्या कष्टाने तिकडे दुर्लक्ष केले..

दिपकने कॅफे मधली एक कोपऱ्यातली जागा पकडली. दीपकला बघताच कॅफे मधला जुना वेटर दीपक समोर येऊन उभा राहिला आणि त्याने खाडकन एक सलाम ठोकला..

“अरे महादेव!!”, त्याला पहाताच दिपक म्हणाला.. “तु अजून आहेस होय…” “मग? मी कुठं जातोय? तुमच्यासारखं थोडंच इथं तीन वर्षांपुरता आलोय…” आणि मग जेनीकडे वळून.. “काय आणु? नेहमीचीच अंडा भुर्जी, बन मस्का, स्पेशल चहा?”

“मग काय महादेव काका! दुसरीकडं कुठंही काहीही खाल्ल तरी इथल्या ह्या पदार्थांची चव येणार नाही त्याला…नेहमीचीच ऑर्डर…”, जेनी

महादेव हसून ऑर्डर आणायला गेला…

“सो??”, जेनी…

“सो!.. शेवटी आलो मी…”, दिपक..

“आय मिस्ड यु सोsssss मच…”, जेनी..

दिपकने हसून जेनीचा हात हातात घेतला..

"आऊच..", जेनी एकदम पोटावर हात ठेवत म्हणाली..
"काय झालं?? यु ऑलराईट?", दचकत दिपक म्हणाला..

"लाथ मारली बाळानं.. सो सॉरी.. वुई मिस्ड यु सोssssssss मच..", पोटाकडे बोट दाखवत जेनी हसत म्हणाली...
"ॲन्ड मी टु....", जेनीच्या पोटावरून हात फिरवत दिपक म्हणाला...

एकदम काही तरी आठवले तसं जेनीने पर्समधून एक कागद काढून दिपक कडे दिला..

"हे काय?" दिपक

"बघ तरी.. बाळाचा फोटो आहे.. काल शेवटची सोनोग्राफी होती ना.. तेंव्हा तेथे प्रिंट काढून दिला...", जेनी हसत हसत म्हणाली..

दिपकने तो कागद उत्सुकतेने काढून घेतला आणि तो पाहु लागला... तेवढ्यात महादेवने ऑर्डर आणून ठेवली होती.

"अगं कसला फोटो आहे हा? काहीच कळत नाहीये..", दिपक
"अरे हे बघ ना..", पुढे सरकत जेनी म्हणाली, "हे बघ असं.. हे बाळाचं डोकं आहे वरच्या बाजुने... हा.. इकडे दिसतो आहे तो बाळाचा हात.. हे इथं हार्ट आहे.." जेनी सांगत होती आणि दिपक आपलं माना डोलावत होता.

".. आणि हे नाक बघ अगदी तुझ्यासारखं आहे लांब....", जेनी दिपकचे नाक ओढत म्हणाली..

दिपक आणि जेनी गप्पांमध्ये अगदी रंगून गेले होते.. बाहेर विजा चमकल्या तसे दोघं गप्पांमधून बाहेर आले..

“ओह माय गॉड.. पाऊस येणार आहे जोरात.. ९.३० वाजून गेले आहेत.. चलं जाऊ यात…”, दिपक

“ए.. काय रे.. सैनिक ना तु? पावसाला कसला घाबरतोस तु? कित्ती मस्त हवा पडली आहे..”, जेनी..

“मॅडम.. टॅक्सी मिळणार नाही.. परत ट्रॅफीक जाम होतं.. आपल्याला जपलं पाहीजे आता म्हणून बाकी काही नाही..” दिपक काऊंटरला बिलाची खुण करत म्हणाला…

जेनीने चहा संपवला आणि बिल पे करून दोघं बाहेर पडले.

एव्हाना जोराचा वारा सुटला होता.. कुठल्याही क्षणी जोरदार पाऊस कोसळणार होता..

दिपक आणि जेनी कॅफेमधून बाहेर आले….

“ए.. आले रे.. अंकल आन्टी आले बघ…” परत मगाचचाच आवाज आला.. “सोल्जर सोल्जर.. मिठी बाते बोलकर…”, दुसरा आवाज

“तेरी मा की…”, स्वतःशीच पुटपुटत दिपक मागे वळला, परंतु जेनीने त्याला पुन्हा थांबवले…

“दिपक.. जाऊ देत रे.. ते बघ कोपऱ्यावर टॅक्सी आहे.. नको चिडुस एव्हडा.. जाऊ देत चल…”, जेनी

दिपक नाईलाजानेच मागे वळून टॅक्सीच्या दिशेने जाऊ लागला..

“तुझ्यायला.. बायकोच्या पदराखालचं मांजर दिसतेय हे सोल्जर.. गेला लगेच घाबरुन..”, परत एक आवाज

“काय माहीत खराच सैनिक आहे का बहुरुपीया आहे.. दिवसभर घरोघरी फिरून पैसे गोळा करून आला असेल इथं…” दुसरा आवाज..

सगळे जण एकमेकांना टाळया देत जोरजोरात हसत होते..

प्रत्येक शब्द.. प्रत्येक आवाजाबरोबर तापट स्वभावाच्या दिपकची मेंदुची शिर ताणली जात होती. त्याच्या संतापाचा पारा चढत चालला होता. केवळ जेनीखातर तो शांतपणे चालला होता..

“मी सांगतो हा बहुरुपीच असणार…”

“कश्यावरुन??”

“अरे त्याच्याबरोबरच्या त्या आयटमचे पोट बघ ना.. हा सैनिक असता तर ही गेम झालीच नसती.. तो तिकडे सेवेत असताना तिला प्रेग्नंट कसं करणार? अं?” “का? त्यात काय अवघड आहे? तो तिथं असताना त्या आयटमचा दुसरा कोण तरी असणार इथं.. तोच डल्ला मारून गेला असणार…”

दिपक स्वतःबद्दल बोललेले एकवेळ सहन करु शकत होता.. पण जेनीबद्दल… नो वे..! आणि त्यांच्या होणाऱ्या बाळाबद्दल..

“धिस इज इट..”, जेनीचा हात सोडून दिपक माघारी फिरला.. जेनीला त्याला थांबवायला वेळ सुध्दा मिळाला नाही…

दिपक ताड ताड पावलं टाकत त्यांच्यापाशी गेला..

टोळक्यातली पोरं टोरं बेसावध होती.. त्यांच्या दृष्टीने फार तर फार तो वादा-वादी करणार होता आणि त्याने मारामारीचा प्रयत्न केलाच असता तरी तो एकटा विरुध्द ते सहा

सात जण होते.. पण दिपकने त्यांचा अंदाज चुकीचा ठरवला, दिपक सरळ त्या टोळक्यात घुसला, एकाची कॉलर धरून त्याला पुढे ओढला आणि त्याच्या हनुवटीवर एक जोरदार ठोसा लगावून दिला.

अनपेक्षीत अश्या त्या प्रहाराने तो तरुण धडपडत खाली कोसळला.

भांबावलेल्या बाकीच्यांनी एकदमच दिपकवर धाव घेतली. पण दिपक सावध होता. त्याने खाली वाकून सर्वांचे ठोसे चूकवलेच पण त्याचबरोबर एक दो्घांच्या पोटात अश्या काही फाईट्स लगावल्या की त्यांच्या डोळ्यासमोर अंधेरीच आली.

समोरून दिपकशी दोघ जण झुंजत असताना एक जण गोल फिरून दिपकच्या मागून त्याला पकडायला आला आणि तिच त्याची मोठ्ठी चूक ठरली, पुर्णपणे सावध असलेल्या दिपकने सण्णदिशी एक लाथ त्याच्या तोंडावर मारली. मिलीटरी जाड, लेदर सोलच्या त्या शुजचा प्रवाह त्या तरुणाच्या जबड्यावर बसला. तो प्रहार इतका जोरदार होता की त्या तरुणाचा जबडाच फाटला आणि त्यातून रक्त वाहु लागले.

मुसळधार पावसाला सुरुवात झाली होती, पण दिपक थांबण्याच्या मुडमध्ये नव्हता. त्याच्या डोक्यातला संताप अजूनही भडकत होता. त्याने खाली कोसळलेल्याला पुन्हा उठवले आणि एक थोबाडावर आणि दोन-चार पोटात ठोसे लगावले. तो तरुण कोणताही प्रतिकार न करता मार खात राहीला. एव्हढ्यात दिपकच्या सैनिकी नजरेने उजव्या बाजुच्या कोपऱ्यात काहीतरी चमकताना पाहीले. इतर कोणत्याही इसमाच्या दृष्टीने ती गोष्ट टिपली नसती, पण दिपक सावध होता. उजव्या कोपऱ्यातून त्याच्यावर चालुन येणाऱ्या तरुणाच्या हातातील चाकु विजांच्या प्रकाशात त्याला दिसला होता. दिपकने तो वार सहज चूकवला. वेगाने केलेला वार चूकल्याने तो तरुण हेलपांडत खाली झुकला त्याचवेळी दिपकने आपल्या गुडघ्यांचा वार त्याच्या तोंडावर केला.

त्या तरुणाचा नाकाचा घोळणा फुटला आणि त्यातून रक्त वाहु लागले.

एव्हाना सुरुवातीला कोसळलेले ते दोन तरुण झाल्या प्रकारातून सावरले होते. एकुण प्रकरण आपल्या हाताबाहेरचे आहे हे लक्षात येताच ते सावकाश आपल्या गाडीत परतले. त्यांनी गाडी सुरु केली आणि तेथून सटकु लागले.

पण दिपक.. त्यांना सहजा सहजी असा थोडच जाऊ देणार होता. गाडीचा आवाज येताच तो त्यांच्या मागे धावु लागला. दिपक गाडीच्या मागे धावत येतो आहे हे आरश्यात दिसताच दोघेही घाबरून मागे मागे पाहु लागले आणि त्याच वेळी... त्याच वेळी समोर असलेली जेनी.. वेगाने तिच्या दिशेने येणारी जिप दिसत असुनही पटकन बाजुला होऊ शकली नाही. जिपच्या बंपरची एक जोरदार धडक तिच्या पोटाला बसली.

जेनी हवेत उंच फेकली गेली आणि क्षणार्धात खाली कोसळली.

“जेनीsssssssssss”, दिपक ओरडला.. पण जे व्हायला नको होते तेच घडले होते.

जिप न थांबता निघून गेली.

जेनीच्या भोवती लोकांच कोंडाळं जमु लागलं होतं. दिपक संतापाने बेभान झाला होता. त्याने मागे वळून बघीतले. हातात सुरा घेतलेला तो तरुण अजूनही नाकातून वाहणारे रक्त थांबवण्याचा प्रयत्न करत होता.

दिपक त्वेषाने त्याच्याकडे धावत गेला. दिपकला येताना पाहून तो तरुण पुन्हा सरसावला. परंतु दिपक वेगाने त्याच्याजवळ पोहोचला. उगारलेल्या सुऱ्याचा हात त्याने हवेतल्या हवेत पकडला आणि पिरगाळला.

‘कड.. कड्ड कड्ड’ हाड मोडण्याचा आवाज येत तो हात खाली आला. दिपकने त्याच्या हातातील सुरा काढून घेतला आणि त्या तरुणाच्या पोटात खुपसला...

एक.. दोन.. तीन.. चार.. सपासप तो सुरा त्या तरुणाच्या पोटातून आतबाहेर येत राहीला.....

दुरून पोलिसांच्या सायरनचा आवाज येत होता जेंव्हा रक्तबंबाळ अवस्थेतील निर्जीव पडलेल्या जेनीला दिपक मांडीवर घेऊन जागं करण्याचा प्रयत्न करत होता.

“ऑर्डर ऑर्डर...!!”

न्यायमुर्तींनी टेबलावर आपला लाकडी हाथोडा आपटला आणि पुन्हा एकवार न्यायालयात शांतता पसरली.

न्यायालयात केस उभी राहिल्यापासून असलेल्या गर्दीने आज उच्चांक गाठला होता. खरं तर निकाल काय लागणार आहे हे स्पष्टच होते, पण तरीही निकाल ऐकायला लोकांनी गर्दी केली होती.

“पब्लीक प्रॉस्येक्युटर.. यु मे कंन्टीन्यु...”... आणि केसच्या शेवटच्या दिवसाचे न्यायालयीन कामकाज सुरु झाले.

आरोपीच्या पिंजऱ्यात उभ्या असलेल्या दिपकचे मन मात्र अजूनही भूतकाळातच घुटमळत होते.

“जेनी.. वेक अप जेनी... कमऑन जेनी..डोन्ट गिव्ह अप ऑन मी..”, निस्तेज पडलेल्या जेनीला हलवत दिपक जिवाच्या आकांताने ओरडत होता.

पोलिसांच्या दोन जिप सायरन वाजवत घटनास्थळी येऊन थबकल्या. मुंग्याच्या वारुळातून जश्या मुंग्या बाहेर पडतात तसे पटापट पोलिस इन्स्पेक्टर आणि हवालदार उतरले. दोघं जण धावत जाऊन त्या तरुणापाशी गेले. तो तरुण अगदी मंदपणे हालचाल करत होता. पैकी एका हवालदाराने एक मोठ्ठे कापड काढले आणि त्या तरुणाच्या जखमेला बांधले जेणेकरून रक्तप्रवाह थांबेल. इन्स्पेक्टर तार स्वरात वॉकी-टॉ्कीवर कुणाशीतरी बोलत होते. काही वेळातच वेगाने एक ॲम्ब्युलन्स आली. त्यातून दोन वॉर्डबॉय धावतच त्या तरुणापाशी आले. त्याला स्ट्रेचरवर घालुन त्याला ॲम्ब्युलन्समध्ये न्हेले. आतमधील डॉक्टर तयारच होते. लगेच त्यांनी त्या तरुणाला ऑक्सीजन मास्क लावला आणि प्रथमोपचार चालु केले.

बाकीचे पोलिस दिपकभोवती जमले. एकाने जेनीचा हात हातात घेउन तिची नाडी तपासली, मग नाकपुड्यांखाली हात धरला आणि मग सावकाशपणे तो उठून उभा राहीला.

पोलिस इन्स्पेक्टरने भुवया उंचावून “काय?” अशी खुण केली, तेंव्हा त्याने माने नकारार्थी हलवली.

इन्स्पेक्टरने ॲम्ब्युलन्सकडे पाहून हातानेच जाण्याची खुण केली. क्षणार्धात ॲम्ब्युलन्स ज्या वेगाने आली होती त्याच्या दुप्पट वेगाने घोंगावत तेथून निघून गेली.

पोलिसांनी दिपकला धरून जिपमध्ये बसवले आणि दुसऱ्याला ॲम्ब्युलन्स बोलावून जेनीची ‘बॉडी’ घेउन जायला सांगीतले.. हो बॉडीच.. कारण जेनी जागेवरच गतप्राण झाली होती...

दिपक हताशपणे पोलिसांसमोर बसला होता.

इन्स्पेक्टर हवालदाराला म्हणाला..”३०२ लागतो साल्याला.. गेलं ते पोरगं हॉस्पीटलमध्ये पोहोचायच्या आधीच..”

“इन्स्पेक्टर.. प्लिज ट्राय टु अन्डरस्टॅन्ड.. माझ्या हातून प्रतिकार करताना खुन झालेला आहे… माझ्या बचावासाठी प्रयत्न करताना त्याचा मृत्यु झालाय.. आय एम नॉट अ मर्डरर.. आय एम अ लेफ्ट्नंट.. तुमच्यासारखाच एक देशाचा सेवक आहे मी…”, दिपक बोलत होता..

“हे बघा मि.दिपक.. आम्ही घटनास्थळी असलेल्या लोकांचे जवाब नोंदवले आहेत.. त्यांच्या म्हणण्यानुसार.. तुम्ही सर्वप्रथम त्यांच्या अंगावर धावून गेलात.. हल्ला प्रथम तुम्ही केलात…”, इन्स्पेक्टर…

“अहो पण.. ते माझ्याबद्दल.. जेनीबद्दल.. आमच्या… …. आमच्या बाळाबद्दल नको नको ते बोलत होते….”, दिपक

“म्हणून काय खुन करायचा??”, इन्स्पेक्टर…”इथे जो तो पोलिसांबद्दल वाट्टेल ते बोलत असतो. म्हणून काय आम्ही प्रत्येकाला मारत सुटतो का काय?”

“मी तो खुन जाणून बुजून केलेला नाहीये इन्स्पेक्टर.. तो केवळ एक अपघात होता.. मान्य आहे मी त्यांच्या अंगावर धावून गेलो होतो.. पण सुरा त्याने काढला होता..”, दिपक..

“अपघात? अपघातात एखादा वार समजू शकतो. पाच-सहा नाही.. मयताच्या शरीरावर भोसकल्याच्या ५-६ खुणा आहेत.”

“………”

“तुम्ही तुमचे म्हणणे न्यायालयात सांगा दिपक..आमचे हात बांधलेले आ्हेत..”, इन्स्पेक्टर

"…………………………"

जेनीच्या आठवणीने, बाळाच्या आठवणीने दिपकचा कंठ दाटून आला होता. काही क्षण तो कोठडीच्या त्या दमट कोपऱ्यात पडून राहीला. आठवणींच्या सरींवर सरी कोसळून जात होत्या. दिपक कोमेजून एका कोपऱ्यात बसून राहीला.. आज पहील्यांदा तो स्वतःला इतका एकटा समजत होता. त्याची बाजु ऐकून घेणारे.. त्याला समवून घेणारे.. त्याला धिर देणारे.. कोणी कोणी सुध्दा नव्हते त्याच्याबरोबर.. अगदी सिंग सर…

"येस्स.. सिंग सर.. हाऊ कॅन आय फरगेट हिम..", दिपकला स्वतःच्याच मुर्खपणाची लाज वाटली. तो ताडकून उठून उभा राहीला.

"इन्स्पेक्टर.. कॅन आय मेक अ कॉल..", दिपकने विचारले..

इन्स्पेक्टरने एकवार दिपककडे पाहीले आणि मग हवालदारला दरवाजा उघडण्याची खुण केली…

दिपकने भराभर नंबर फिरवला…

"हॅलो.. हॅलो.. सिंग साब… मै दिपक.. दिपक कुमार…"

"बोलो दिपक.."

"सर.. मुझे मदत चाहीये.. मै…."

"हा.. मै जानता हु.."

"आप.. आप जानते है?"

"…"

“फिर..आपने कुछ किया क्यु नही..? सर मै बेकसुर हु..”

“देखो दिपक..बात हदसे आगे बढ गयी है.. फौज को इस हादसे से दूर रखा गया है..”

“क्यु सर..??”

“क्यु?? जानते हो तुम्हारे हाथ से जिसकी मौत हुई है वोह कौन था? गृहसचिवजी का बेटा था वो…”

“……”

“देखो दिपक चाहते तो हम भी है की हम कुछ करे.. लेकीन तुम तो जानते हो.. उपरसे ऑर्डर आये तो हम कुछ नही कर सकते…”

“पर सर…”

फोन केंव्हाच बंद झाला होता..

दिपकने हताशपणे रिसीव्हर खाली ठेवला.

काही क्षण शांततेत गेल्यावर..”इन्स्पेक्टर साहेब.. जेनी…”

“सरकारी इस्पीतळाच्या मॉर्ग्यु मध्ये ठेवले आहे…”

“मला दफनविधी करावा लागेल इन्स्पेक्टर साहेब…”

“हे बघा मि.दिपक.. त्यासाठी तुम्हाला आधी जामीन मिळवावा लागेल, त्याकरता तुमच्या विरोधात न्यायालयात केस उभी रहावी लागेल आणि त्याकरता ढिगभर कागदं आम्हाला जमा करावी लागतील. पंचनामा, साक्षीदारांचे जवाब, डॉक्टरांचे रिपोर्ट्स एक ना

दोन. अर्थात साहेबांचे पोर असल्याने ही काम पटापट होतीलच.. पण नाही म्हणलं तरी दोन दिवस तरी तुम्हाला थांबावं लागेल…"

"दोन दिवस??? इन्स्पेक्टर साहेब.. दोन दिवस माझी जेनी त्या बर्फाच्या लादीत पडून रहाणार.. त्या.. त्या बेवारस….." दिपकला पुढे बोलायला शब्दच सुचेनात…..

---

दिपकने कोर्टात जमलेल्या लोकांवरून एक नजर फिरवली. सर्वच चेहरे अनोळखी, परके होते. ज्यांना आपल म्हणावं ते त्याला केंव्हाच सोडून गेले होते.

"सबुतोंको मद्दे नजर रखते हुए………"

न्यायमुर्तींनी आपला निकालनामा फिल्मी स्टाईलमध्ये वाचायला सुरुवात केली होती..

"दिपक कुमार को दोषी पाया जाता है.. दिपक कुमार जो की अपने दिमाख को गुस्से मै संभाल नही पाते है, ऐसी हालत मै, आर्मी ट्रेन्ड अफसर दिपक कुमार, सिव्हीलीयन्स को एक खतरा बन चुके है. इसीलिये ये अदालत दिपक कुमार को दोषी करार देते हुए उमरकैद की सजा सुनाती है…

बिफोर द स्टेट पोलीस टेक कस्टडी ऑफ मि. दिपक कुमार, आर्मी विल डु द प्रोसिडीन्ग्स ऑफ कोर्ट मार्शल..

द कोर्ट इज अड्जर्न्ड..”

---

निकाल ऐकल्यानंतर कोर्टात एकच कुजबुज पसरली..प्रत्येकजण आपापसात बोलू लागला..

“मला वाटते बायस्ड निकाल आहे हा…दिपकची बाजू ऐकून घायला हवी होती.”

“बायस्ड पेक्षा, दबावाखाली येऊन दिलेला निकाल आहे.. मंत्र्यांचा मुलगा मेलाय न.. ह्याला असा सहज थोडे न सोडणार..”

“नाहीतर काय.. कसली लोकशाही हि.. त्यापेक्षा कम्युनिस्टांची सत्ता परवडली…”

बहुतेक लोकांची दिपकला सहानभूती होती. पण त्याने फरक काय पडणार होता? निकाल झाला होता.. दिपक कुमार.. आपले उर्वरित आयुष्य तुरुंगात खितपत घालवणार होता…

---

कोर्ट-मार्शलचा अनुभव दिपकच्या दृष्टीने अत्यंत वेदानादायी होता. लेफ्टनंट पदाची शपथ घेताना त्याला कधीही वाटले नव्हते कि अश्याप्रकारे कोर्ट-मार्शलला सामोरे जावे लागेल. अभिमानाने खांद्यावर बाळगलेले वर्दिवरील स्टार गळून पडताना पाहून त्याला मेल्याहून मेल्यासारखे झाले होते.

ले.दिपक कपूर आता फक्त दिपक कपूर राहिला होता… किंबहुना फक्त कैदी नं. ७२८……………………

पोलीस कोठडीतून दीपकची कारागृहात रवानगी करण्यात आली. कारागृहाच्या त्या कातळ भिंतींमध्ये जायच्या आधी दीपक लहान मुलासारखा पोलीस व्हैनच्या जाळी लावलेल्या खिडकीतून वाकून वाकून बाहेर बघत होता. न जाणो हे बाहेरचे जग परत केंव्हा पहायला मिळेल???

---

अनपेक्षितपणे दीपकला ज्या लॉक-अप मध्ये ठेवले होते ते इतरांच्या तुलनेत बरेच बरे होते. झोपायला छोटासा का होईना बेड होता, कोपऱ्यात पिण्याच्या पाण्याचा माठ होता, पांघरून होती. पण त्याचे उत्तर दीपकला दोन दिवसातच मिळाले. कारण कारागृहात आल्यावर त्याची मुलाखत घ्यायला मिडिया प्रतिनिधींची झुंबड उडाली होती. अनेक जण दिपकची बाजू पुन्हा ऐकून घ्यायला जमले होते.

“हमे बताईये दिपक, उस रात क्या हुआ था…”

“……………”

“मि.दिपक, क्या आप बता सकते है की जिस बंदे का आपने कत्ल किया उसने ऐसी कोन्सी बात कही थी…”

*“मैने उस्का कत्ल जान बुझके नही किया…वो .. वोह एक हादसा था…“*

“दिपक, क्या ये बात सच है की आप आपके गुस्से को कंन्ट्रोल नही कर सकते..क्या येह् सच है की इसी वजहसे आपके और आपके बिवी के बिचमै कुछ अनबन चल रही थी…”

“……………”

“दिपक, आपको लगता है की आपपे जाय्ती हुई है? आपकी बात सुनी नही गई है??”

“……………”

एक ना दोन.. असंख्य प्रश्न…..

जाताना प्रत्येक जण ह्याविरुद्ध आवाज उठवू, तुला न्याय मिळवून देऊ वगैरे वल्गना करत गेला परंतु सर्व काही आठवड्याभरात शांत झाले. पुन्हा काही दीपकला भेटायला कोणी फिरकले नाही आणि दिपक काय समजायचे ते समजून गेला.

अपेक्षेपेक्षा दिपक लवकर तुरुंगातील वातावरणात रुळला. शेवटी काही झालं तरी तो हाडाचा सैनिक होता. तुरुंगातील वातावरणापेक्षा कितीतरी खडतर वातावरणात रहायचे ट्रेनिंग त्याला मिळाले होते. जेनीच्या आठवणी त्याने मनाच्या कोपऱ्यात दडपून टाकल्या होत्या. जेनी आता परत कधीच आपल्याला भेटणार नाहीये हे कटु सत्य त्याने स्विकारले होते.

दिपकच्या बाजुला विवीध प्रकारचे कैदी होते. कोणी खिसेकापु, कोणी जबरी दरोड्यात अडकलेला.. कोण दुचाकी/साखळी चोर, कोण बलात्कारी, कोण हिंसाचारी तर कोणी खुनी…

दिपक कोण होता? ह्यापैकी कोणीच नाही. त्याने पैश्यासाठी, स्वार्थासाठी किंवा इतर कुठल्याही कारणासाठी खुन केला नव्हता. जे काही घडलं तो केवळ एक अपघात होता आणि तो इतर कुणाच्याही बाबतीत घडु शकला असता. दिपकच्या हातून घडला तो गुन्हा.. नक्कीच होता, पण त्यासाठी देण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा मात्र नक्कीच जाचक होती.

तुरुंगातील दिवसाची सुरुवात सकाळी ५.३०लाच होई. सर्व कैद्यांना आंघोळी करून ७ वाजेपर्यंत मुख्य पटांगणात असणाऱ्या छोट्या देवळासमोर जमणे बंधनकारक असे. ७.३० वाजेपर्यंत प्रार्थना चाले. त्यानंतर व्यायामासाठी वेळ दिला जाई. ९ वाजता नाश्ता असे. तो उरकला की १० वाजता खऱ्या अर्थाने दिवसाला सुरुवात होई. प्रत्येक कैद्याला त्याच्या अंगी अवगत असलेल्या गुणांनुसार काम देण्यात आले होते. अगदी क्षुल्लक वस्तु बनवण्यापासून ते सुतारकाम, लोहकाम, किरकोळ इमारतीची डागडुजी वगैरे शारीरीक कष्टाची काम असत.

दुपारी १-२ जेवणाची वेळ उरकली की ४ वाजेपर्यंतचा वेळ हा झोप, अवांतर वाचन, गप्पा वगैरेंसाठी राखुन ठेवलेला असे. ४-६ पुन्हा एकवार नेमुन दिलेली काम. ६.३० ते ७.३० भेटायला आलेल्या व्यक्तींसाठी वेळ, ७.३० वाजता प्रा्र्थना, ९ वाजता जेवण आणि १० वाजता सर्व सामसुम असा ठरलेला कार्यक्रम असायचा.

दिपक फारसा कुणाशी बोलत नसे. ‘आपण बरे आपले काम बरे’ हे एक सुत्र मनाशी पक्क करुनच तो वागत होता.. एक महीना असाच पार पडला.

'तो' दिवसही इतर दिवसांसारखाच होता. संध्याकाळी मात्र अचानकपणे दिपकच्या बराकीतील बाकीच्या दोन कैद्यांना दुसऱ्या बराकीत स्थलांतरीत करण्यात आले. दिपक त्या लॉक-अप मध्ये एकटाच होता. असं नाही की त्याच्या बरोबरच्या इतरांशी त्याची मैत्री जडली होती. पण निदान त्याला कुणाची तरी सोबत होती. आज मात्र तो एकटा होता... दहा वाजून गेले तसे सर्वत्र सामसुम पसरली. बहुतांश दिवे नेहमीप्रमाणे बंद करण्यात आले होते.

दिपकला आज काही केल्या झोप येत नव्हती. एकटेपणा त्याला खायला उठला होता. जेलच्या त्या काळयाकुट्ट भिंती भकासपणात अधिकच भर घालत होत्या. दिपक कुस बदलुन बदलुन झोपण्याचा प्रयत्न करत होता. शेवटी कशी-बशी १.३० च्या सुमारास त्याचा डोळा लागला.

सर्व काही सुरळीत चालु आहे असे वाटत असतानाच त्या रात्री.........................

दिपकला झोप लागली असली तरी त्याच्या संवेदना जागृत होत्या. सैनिकी प्रशिक्षणाचा परीणाम म्हणा किंवा त्याचा सिक्स्थ सेन्स म्हणा परंतु दिपकला अचानक जाग आली. आपल्याला अशी अचानक जाग का आली असावी ह्याचा विचार करत तो जागेवरच पडून आजुबाजुला घडणाऱ्या घटनांचा वेध घेउ लागला. काही क्षण शांततेत गेल्यावर त्याला लॉकअपच्या बाहेर हलकीशी हालचाल जाणवली. किमान ३-४ व्यक्ती हलक्या आवाजात एकमेकांशी कुजबुजत होत्या.

दिपक कानोसा घेत पडून राहीला.

थोडा वेळ शांततेत गेल्यावर त्याच्या लॉकअपचे दार हळुच उघडले गेल आणि बाहेर थांबलेल्या त्या व्यक्ती आतमध्ये आल्या. दिपक अजूनही स्तब्ध पडून होता. हळु हळु त्या व्यक्ती दिपकच्या भोवती जमा झाल्या.

त्यांच्यातील एक व्यक्ती दिपकच्या अगदी जवळ आली होती. त्या व्यक्तीचा जोरजोराचा श्वासोश्वास दिपकला ऐकु येत होता. त्या व्यक्तीची हालचाल दिपकला जाणवत होती. जणु काही दिपकला मारण्यासाठी त्याने एखादी जड वस्तु उगारली होती.

दिपकने अजून काही क्षण वाट पाहीली आणि मग तो अचानक पाठीवर भार देउन गोल फिरला आणि एक लाथ अंदाजाने त्या व्यक्तीच्या दिशेने फिरवली.

बेसावध असलेल्या त्या व्यक्तीच्या तोंडावर दिपकची ती लाथ बसली आणि ती व्यक्ती हेलपांडत मागे पडली. त्या व्यक्तीच्या हातातील वस्तु खाली पडली आणि खण्णण.. असा आवाज आला. आवाजावरून ती वस्तु लोखंडी रॉड असावी हे दिपकने ताडले. दिपकने क्षणाचाही विलंब न करता बाकीच्या व्यक्तींवर हल्ला चढवला. दिपक चपळ होता, ताकदवान होता, पण ते तिघेही कमी नव्हते. त्यातील एकाची लाथ वेगाने दिपकच्या पोटात बसली आणि दिपक क्षणभर का होईना पोटावर हात धरून खाली कोसळला.

त्या तिघांनीही वेळ न घालवता दिपकला पकडले. एकाने त्याचे हात घट्ट धरले, दुसऱ्याने एक जाड सेलोटेप दिपकच्या तोंडाभोवती बांधला तर तिसऱ्याने पोत्यासारखे एक जाड कापड दिपकच्या तोंडावर टाकून घट्ट आवळले.

दिपकचा श्वास कोंडला गेला, त्याची शक्ती कमी पडु लागली. तो त्याच्या परीने शक्य तेवढा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत होता तोच मगाचचा तो लोखंडी रॉड कुठुनतरी वेगाने दिपकच्या मानेवर बसला तसा दिपक थाड्कन खाली कोसळला. दुसऱ्या एकाने दयामाया न दाखवता दोन चार ला्था वेगाने दिपकच्या पोटात लगावल्या.

दिपकच्या डोळयापुढे अंधारी येऊ लागली. शेवटचे त्याला आठवले तेंव्हा त्याला गाडीच्या मागच्या डिक्कीत फेकण्यात आले होते आणि ती गाडी खडबडीत रस्त्याने वेगाने धावत होती. त्यानंतर मात्र दिपकला ग्लानी आली आणि तो बेशुध्द झाला.

——————————————————————————-

दिपकला जाग आली तेंव्हा त्याचे सर्वांग ठणकत होते, मुख्यतः मानेचा भाग जेथे लोखंडी रॉडचा जोरदार फटका बसला होता. त्याने डोळे उघडले तेंव्हा आजुबाजुला मिट्ट काळोख होता. डोळे चोळून चोळून पाहीले तरीही आजुबाजुचे काहीच दिसत नव्हते. तो आता गाडीच्या डिक्कीत नक्कीच नव्हता.

दिपक सावकाश उठून  बसला. सार्वजनीक मुतारी गृहात असतो तसला घाणेरडा वास सर्वत्र पसरला होता. जमीन गार आणि ओलसर होती. डासांचे साम्राज्य सर्वत्र पसरले होते. दिपकने हाता-पायावरून हात फिरवला. डास चावून  चावून  मोठ्ठाल्ले फोड आले होते. नक्की कोणती जागा असावी ह्याचा कोणताही अंदाज दिपकला येत नव्हता.

ठणकणारे डोके घट्ट धरून तो भिंतीला टेकून बसला.

नक्की किती वेळ गेला असेल कुणास ठाऊक पण दिपकला शेवटी आजुबाजुला हालचाल जाणवली. दिपक आवाजाचा अंदाज घेऊ लागला तोच त्या जागेतला एक प्रखर दिवा लागला. बऱ्याच काळाने उजेड बघत असल्याने दिपकचे डोळे त्या प्रकाशाने दिपले गेले. दिपकने घट्ट डोळे मिटून  घेतले. तो एका छोट्याश्या १०x१० च्या खोलीत बंद होता. हिरवट रंगाची ती एक खोली होती. भिंतीचा रंग उडला होता तर काही ठिकाणी रंगाचे मोठ्ठाल्ले पोपडे निघाले होते. भिंतींमधून पाणी पाझरत होते. जमीनीवर नावापुरत्या फरश्या होत्या ज्या बहुतांश ठिकाणी तुटलेल्या होत्या. समोर मात्र एक लोखंडी भक्कम दार होते.

दिपक खोलीतून नजर फिरवत होता तेंव्हा ते दार उघडले गेले आणि आतमध्ये पोलिसी वेशातला एक ६ फुटी उंच, मजबुत बांध्याचा, सावळा, टकला माणूस आत आला. सावकाश पावलं टाकत तो दिपकपाशी येउन थांबला.

दिपक जागेवरून उठला आणि म्हणाला, “मला इथे अश्याप्रकारे आणण्याचे कारण….”

त्याचे वाक्य पुर्ण होण्याच्या आधीच त्या पोलिसाने दिपकच्या एक थाड्कन मुस्काटात लावून  दिली. ती थप्पड इतकी जोरदार होती की दिपक मागच्या भिंतीवर जाउन आपटला. आधीच ठणकणारे त्याचे डोके त्या भिंतीवर आपटले गेले.

“इथे प्रश्न फक्त मी विचारतो…” वेगाने श्वास घेत तो म्हणाला…

“साल्या, सायबाच्या पोराला मारतोस काय? तुझी गेम झाली आता.. असा सडशील ह्या तुरुंगात की.. फाशीची शिक्षा का मिळाली नाही म्हणून तुला पश्चात्ताप होईल. सायबाने फक्त एक फोन केला आणि तुझी उच्चलबांगडी झाली ह्या काळगृहात..” “…………………..”

"तुला संपवायला ५ मिनीट पण लागली नसती, पण त्यामुळे ते मेलेलं पोरं थोडं न परत येणार आहे! तुला असा तडपवून  तडपवून  मारला पाहीजे.. एक एक क्षण तू निराशेत घालवला पायजेल.. ह्या इथे अंधार कोठडीत.. आजुबाजुला काहीच नाही.. तुझा भुतकाळ तुला खायला उठेल.. ह्या भिंती तुझं जगणं नकोसं करतील. तुझी विचार करण्याची शक्ती मंदावत जाईल. दिवस-रात्रीच गणीतच तुझ्या हिशोबी बिघडून जाईल. इथली चिलटं, डास, माश्या तुला झोपुनही देणार नाहीत.

दिवसांतून एकदाच तुला जेवायला मिळेल.. कोपऱ्यात ठेवलेलं हे पाणी तुरुंगाबाहेरच्या नाल्यातून आणलं जात जिथं डुक्कर रोज सकाळ संध्याकाळ डुंबत असतात.

दोन दिवसांतून फक्त एकदाच.. तीन तासासाठी तुला बाहेर येता येईल...." एवढं बोलुन तो गलेलठ्ठ पोलिस जाण्यासाठी वळला.

काही पावलं पुढे गेल्यावर त्याला काहीतरी आ्ठवले तसा तो माघारी वळला.

"...आणि अरे हो.. तुझं स्वागत करायचं तर राहुनच गेले.. असं म्हणून त्याने कमरेचा पट्टा काढला आणि बक्कलाची बाजु पुढे करून तो दिपकला बदडत राहीला....."

----------------------------------------------------------------

जाग आली तेंव्हा मगाचचा तो पोलिस निघून गेला होता. खोलीतला दिवा अजूनही चालु होता. समोर एका वाकड्या तिकड्या झालेल्या ताटात थोडास भात आणि पाण्याचा जास्त अंश असलेला डाळसदृश्य पदार्थ होता. दिपक कण्हत पुढे सरकला तसा त्या ताटातून एक उंदराचे छोटे पिल्लु पटकन बाहेर आले पळत पळत खोलीच्या कोपऱ्यातील एका बिळात घुसले.

दिपकने ते ताट दूर सरकवले आणि तो पुन्हा भिंतीला टेकून बसला. पट्ट्याच्या त्या बक्कलाने दिपकच्या मानेवर, पाठीवर, हातावर जखमा झाल्या होत्या आणि त्यावर माश्या, चिलटं बसून त्या अजूनच झोंबत होत्या.

दिपक एका कोपऱ्यात गुडघ्यात डोकं खुपसून बसून राहीला.

वेळेचे काही गणितच राहिले नव्हते. आत्ता दिवस आहे का रात्र? सोमवार आहे का शनिवार? काहीच काळात नव्हते.. कधी डोक्यात विचारांची गर्दी होत होती तर कधी अगदीच रिकामेपणा जाणवत होता. बसून बसून हात पाय आखडले होते, अंग सणकून दुखत होत.

कित्येक तास उलटले परंतु जणू काही सर्व काही स्तब्ध झाले आहे असेच वाटत होते. नाही म्हणायला कोनाड्यातील बिळात घुसलेला तो उंदीर एव्हाना निर्ढावला. दीपक निरुपद्रवी आहे ह्याची त्याला खात्री पटली होती आणि म्हणूनच तो बिळातून बाहेर येऊन इकडे तिकडे फिरत होता.

दीपक बराच वेळ त्या उंदराची हालचाल टिपत राहिला. बराच वेळ म्हणजे किती हे कोणीच सांगू शकत नव्हते. कदाचित एखादा तास? कदाचित ४-५ तास? कदाचित अक्खी रात्र किंवा दिवस?

जेंव्हा जेवणाचे ताट आले तेंव्हा दिपकने अंदाज बांधला एक तर आत्ता दुपार आहे किंवा रात्रीची जेवणाची वेळ.. आणि त्याप्रमाणे तो दिवसांचे गणित जुळवू लागला.

दुसऱ्या दिवशी साधारण त्याच वेळेस जेवणाचे ताट घेऊन पांढरा कैद्याचा शर्ट आणि पिवळी पॅन्ट घातलेला वॉर्डन आला. त्याने दिपकचे पहीले भरलेले ताट पाहीले आणि तो बाहेर निघून गेला. थोड्या वेळाने तो गलेलठ्ठ पोलिस आत आला.

“भेंन्चोx..माजला का रे.. गिळायला मिळतय फुकट तर गिळता येत नाही का?”

"...."

"गांx..आवाज फुटायचा बंद झाला का?"

"तुझ्या आय ने तुला असंच जेवायला घातलं होतं का?", क्षीण स्वरात दिपक म्हणाला.

त्या पोलिसाचा चेहरा रागाने लालबुंद झाला. वॉर्डनच्या हातातील रॉड त्याने काढून घेतला आणि तो दिपकवर धावून गेला. दिपक इंचभरही हालण्याच्या अवस्थेत नव्हता. त्या पोलिसाचा मार आधीच बधीर झालेल्या शरीरावर तो झेलत राहीला.

निपचीत, प्रतिकार न करणाऱ्या, लोळा-गोळा झालेल्या दिपकमधला इंटरेस्ट निघून गेला तसा तो पोलिस अधिकारी मारायचा थांबला आणि आपला वाढलेल्या श्वासावर नियंत्रण मिळवत तो तेथून निघून गेला.

---

अंदाजे तीन दिवसानंतर दीपकच्या कोठडीचे दार उघडले गेले. बाहेर उभ्या असलेल्या हवालदाराने आतमध्ये वाकून दीपकला बाहेर यायची खुण केली. दीपक जागेवरून उठला तेंव्हा त्याच्या डोळ्यासमोर अचानक अंधेरीच आली. तीन दिवसांत त्याच्या अंगात अतिशय अशक्तपणा आला होता. दीपक भिंतींचा आधार घेत बाहेर आला आणि बाहेरच्या प्रखर उन्हाने त्याचे डोळे दिपले गेले. दिपकने घट्ट डोळे मिटून घेतले.

त्या हवालदाराने एव्हाना दीपकच्या हातात साखळी वजा हातकडी घातली होती, त्याला धरून ओढत दीपकला तो काही अंतर घेऊन गेला, आणि तेथील एका भिंतीला टेकवून दीपकला उभे केले.

दीपक भिंतीकडे तोंड करून काही क्षण उभा राहिला आणि मग अचानक गार पाण्याचा एक जोरदार प्रवाह त्याच्या अंगावर येऊन थडकला. बराच वेळ तो हवालदार एखादी

गाडी धुवावी तसा दीपकला लांबूनच धूत होता. नंतर त्याने एक बऱ्याच लोकांनी वापरून बुळबुळीत झालेला एक साबण दिपाक्कडे फेकला आणि कोपऱ्यात ठेवलेल्या कपड्यांकडे आणि फाटक्या टॉवेल कडे बोट दाखवून तो लांब जाऊन थांबला..

---

आंघोळ झाल्यावर दीपकला थोडेफार फ्रेश वाटू लागले. बाहेरच्या पटांगणात दुपारच्या जेवणाची तयारी चालू होती. दीपक प्रमाणेच अजून काही कैदी तेथे वावरत होते. शाळेत आलेल्या नवीन मुलाला जसे सर्व पाहतात तसे अनोळखी दिसणाऱ्या दीपककडे सगळेजण वळून वळून बघत होते.

थोडीफार रिकामी जागा पाहून दीपक तेथील एका खांबाला टेकून बसला.

दिपकने सभोवताली नजर टाकली. त्याच्या कोठडीप्रमाणेच आजूबाजूला पोलादी दरवाज्याच्या अनेक खोल्या होत्या. त्या बंद दरवाज्याच्या आत अजून कित्येक कैदी असण्याची शक्यता होती. कदाचित.. त्यांचा बाहेर येण्याचा तिसरा दिवस होऊन गेला होता.. किंवा यायचा होता..

दूरवर उंच भिंतीचे कुंपण घातले होते आणि प्रत्येक कोपऱ्यात त्याहून उंच टेहळणी मनोरे उभारले होते, ज्यावर एक एक पोलीस अधिकारी बंदूक घेऊन उभा होता. कुठल्याही वाहनांचा किंवा रहदारीचा आवाज येत नव्हता, ह्यावरून हा तुरुंग नक्कीच कुठल्यातरी निर्जन भागी असावा हे दिपकने ताडले.

दिपकने बाकीच्या कैद्यांवरून नजर फिरवली. सर्वजण आपल्याच विश्वात मग्न होते. कुणीच कुणाशी काही बोलत नव्हते.. किंवा कदाचित कुणाशी बोलण्याची परवानगी नव्हती.

पटांगणाच्या मधोमध तो जाड-जुड गलेलठ्ठ पोलीस सर्वांवर नजर ठेवत फिरत होता. त्याला बघताच दिपकच्या डोक्यात संतापाची एक तडक उठली, कपाळावरच्या आणि मानेच्या शिरा ताणल्या गेल्या. दिपक ताडकन उठून  उभा राहीला.

"वेडेपणा करु नकोस.. खाली बस. तुझी वेळ पण येईल, पण आत्ता नाही..शांत रहा.. संधी येईल.." कोणीतरी खुसफुसल्या स्वरात बोलले.

तो आवाज इतका हळु होता की खरंच कोणी बोललं की आपल्याला भास झाला असं क्षणभर दिपकला वाटून  गेले. त्याने आजुबाजुला पाहीले. त्याच्यापासून काही अंतरावर एक कैदी बसला होता. दिपकची आणि त्याची नजरानजर झाली. त्याने अगदी इंचभर मान हलवून नाही अशी खुण केली आणि तो परत दुसरीकडे पाहु लागला.

दिपक पुन्हा खाली बसला.

थोड्यावेळाने एक बझर वाजला आणि सर्व कैदी उठून  आपल्या आपल्या कोठडीत जाऊ लागले. दिपकही उठून  उभा राहीला, जाताना त्याने त्या मगाचच्या त्या कैद्याकडे पाहीले. पण तो कैदी न बघताच निघून गेला. दिपकने त्याची कोठडी बघून ठेवली. दिपकच्या कोठडीपासून डावीकडे ३ कोठड्या सोडून त्याची कोठडी होती.

दिपक पुन्हा आपल्या अंधारलेल्या जगात परतला तसा बाहेरचा दरवाजा बंद झाला.. तीन दिवसांसाठी.

ह्या तासा-दोन तासांच्या ‘आऊटींगने’ दिपकला एक उभारी दिली होती. तो पहिल्यापेक्षा बरंच फ्रेश फिल करत होता. आणि निदान म्हणण्यापुरता का होईना त्याचे हित चिंतणारा त्याला कोणीतरी भेटला होता. त्या एका वाक्याने दिपकच्या मनात आत्मविश्वास भरला होता.

ह्या वेळचे ते तीन दिवस पट्कन गेले. ह्या वेळेस फक्त एकदाच त्या गुबगुबीत पोलिसांकडून लाथा-बुक्यांचा प्रसाद दिपकने झेलला होता. बाहेर आल्या आल्या दिपकची नजर ‘त्या’ कैद्याला शोधत होती. आणि त्याला ‘तो’ दिसला. काही अंतरावर तो दिपककडेच बघत उभा होता. दिपक सहजच फिरत फिरत त्याच्या जवळ काही अंतर ठेवून  बसला.

थोड्या वेळाने तो कैदीही खाली बसला. दिपक त्याच्याशी बोलायची संधी शोधत होता तेवढ्यात त्याचे लक्ष त्या कैद्याच्या हाताकडे गेले. सहज हालचाल करावी तश्या अविर्भावात तो कैदी जमीनीवरील मातीत काहीतरी लिहीत होता.

"no say", फाटक्या तुटक्या इंग्लीशमध्ये त्याने वाळुत लिहीले होते.

"k", दिपकने कडेला लिहीले

"when?", पुन्हा दिपकने लिहीले

"३ + ३", त्या कैद्याने लिहीले आणि लगेच ते पुसून तो तेथून निघून गेला.

प्रथम त्याचा अर्थ दिपकला उमगलाच नाही. दिपक बऱ्याच वेळ त्याचा विचार करत बसला आणि मग त्याच्या लक्षात आले की पुढच्या च्या पुढच्या वेळेस जेंव्हा दिपक पुन्हा कोठडीतून बाहेर येईल..अर्थात अजून तीन+तीन दिवसांनी.... कदाचीत तेंव्हा....

पण तेंव्हा काय?.... तेंव्हा काय???????????????????

दिपक आपल्या कोठडीत परतला खरा, पण तो विचार त्याच्या डोक्यातून काही केल्या जात नव्हता.

काय आहे ६ दिवसांनी? कोण आहे तो कैदी? तो आपल्याला का मदत करत आहे? ह्यात काही काळ-बेर तर नसेल ना? कश्यावरून हा पोलिसांचाच एखादा डाव नसेल? कश्यावरून मला इथून पळून जायला भाग पाडतील आणि मग पळून जात होता म्हणून जाताना गोळया घालतील? चार दिवसांच्या ओळखीवर ह्या कैद्यावर भरवसा ठेवावा का?

अनेक प्रश्न दिपकच्या डोक्यात जमा झाले होते. पण त्यामुळे निदान त्याला काही काळापुरता का होईना जुन्या दुःखद गोष्टींचा विसर पडला होता. सुस्त झालेला त्याचा मेंदु विचार करु लागला होता आणि नकळतच ‘ह्या कैद्याच्या साथीने इथून पळून जाता आले तर?..’ असा विचार डोक्यात येऊ लागला होता.

दिपक उठून  खोलीत येरझाऱ्या घालु लागला. दिपकमधला हरवत चाललेला सैनिक जागा झाला होता. पुर्वी तासासारखे वाटणारे मिनीट अचानक सेकंदाहुनही कमी वाटु लागले होते. वेळ कसा भराभर निघून चालला होता. ह्या काळात दिपक जेलच्या अंतरंगाचा विचार करत होता परंतु अधिक विचार करता त्याच्या लक्षात येउ लागले की त्याने फारसे आजुबाजुला पाहीलेच नव्हते. जेल किती मोठ्ठ आहे, सेक्युरीटी किती आहे? लुप-होल्स काय आहेत.. काही म्हणजे काहीच माहीती नव्हते.

दिपकला स्वतःचाच अतीशय राग आला.

पुढचे दोन दिवस पट्‌कन गेले. दिवस रात्र केवळ एकच विचार दिपकच्या डोक्यात घोळत होता…

तीन दिवसांनी दिपक बाहेर आला तेंव्हा व्हरांड्याच्या दुसऱ्या कोपऱ्यात कैद्यांची रांग लागलेली होती. दिपकची नजर 'त्या' कैद्याला शोधत होती. त्याच्या कोठडीबाहेरील खांबाला टेकून 'तो' उभा होता. दिपकला पहाताच तो दिपकच्या दिशेने चालत आला. दिपककडे बघून त्याने एक सुचक खुण केली आणि तो कैद्यांच्या त्या रांगेच्या दिशेने जाऊ लागला.

दिपकसुध्दा काहीही न बोलता त्याच्या मागोमाग गेला.

दोघंही रांगेत जाऊन थांबले. रांगेच्या शेवटी एक पोलिस टेबल टाकून बसला होता. प्रत्येक कैदी टेबलावरील कागदावर काहीतरी खुण करत होता. रांग हळु हळु पुढे सरकत होती.

थोड्यावेळाने त्या कैद्याचा नंबर आला. त्याने त्याच्या नावापुढे असलेल्या अनेक चौकोनांपैकी एका चौकोनात खुण केली. दिपक त्याच्या खांद्यावरून तो कुठे खुण करतो आहे ते पहात होता. त्या कैद्याने खुण करून झाल्यावर एकवार पुन्हा दिपककडे काही क्षण पाहीले आणि तो निघून गेला.

दिपक त्या कागदाकडे बघत होता. एका बाजुला कैद्यांचे नाव-नंबर होते तर दुसऱ्या बाजुला काही कॉलम होते आणि त्याच्या खाली खुण करण्यासाठी चौकोन बनवलेले होते.

तो कागद जेलमध्ये करावयाच्या कामांचा चार्ट होता. प्रत्येक कैदी आपल्या आवडीप्रमाणे काम निवडत होता. दिपकने त्या कैद्याने कुठे खुण केली आहे ते पाहीले. त्याने 'गटार स्वच्छता' निवडली होती. दिपकने तोंड वाकडे केले. आपण कुठे खुण करावी ह्याचा विचार तो करु लागला. 'त्या' कैद्याने सुचकपणे दिपकला सुध्दा तेथेच खुण करायला सुचवले होते, परंतु गटार स्वच्छता दिपकला खचितच आवडणारे नव्हते. तो इतर कामं कोणती आहेत ते पाहु लागला.

'क्या देख रहा है बे.. सनी लिऑन का फोटो है क्या? जल्दी कर चल..', समोरचा पोलिस खेकसला.

दिपकने एकवार मागे वळून पाहीले. दूर अंतरावरून 'तो' कैदी दिपककडे बघत होता. दिपकने शेवटी 'गटार स्वच्छता' समोर खुण केली आणि तो रांगेतून बाहेर पडला.

काही वेळातच सर्वांना आवश्यक असणारी साधन-सामग्री पुरवण्यात आली. 'गटार स्वच्छता' विभागात फक्त दिपक आणि तो कैदी दोघंच होते. बाकी कोणीच ते काम पत्करले नव्हते आणि त्याचे कारण दिपकला लगेचच समजले.

दिपक आणि त्या कैद्याला घेउन दोन पोलिस जेलच्या मागच्या बाजुस गेले. मागे मोठ-मोठ्ठाल्ले पाईप्स टाकले होते त्याच्या आतून वाकत थोडे अंतर आत गेल्यावर घाणेरड्या वासाचा भपकारा आला. चौघांचेही हात नकळत नाकावर गेले.

"थांबा.." एक पोलिस मागून म्हणाला..

दिपक आणि तो कैदी थांबून माघारी वळले. ते दोन्ही पोलिस नाकावर रुमाल दाबून उभे होते.

"तुम्ही दोघं पुढे जा आणि पटापट कामं उरका.. आम्ही इथेच थांबतो.." दुसरा पोलिस म्हणाला..

त्या कैद्याने मानेनेच होकारार्थी खुण केली आणि काहीही न बोलता तो पुढे निघून गेला. दिपक त्याच्या मागोमाग चालु लागला. अजून पुढे गेल्यावर रस्ता अरुंद होत गेला. जमीन ओलसर झाली होती आणि वातावरणातील कुबट वास अधिकच वाढला होता. त्या कैद्याने एक कापड खिश्यातून काढले आणि त्याचे दोन भाग केले. एक भाग स्वतःच्या नाकाभोवती गुंडाळला आणि दुसरा दिपककडे दिला.

दिपकनेही त्याचे अनुकरण केले.

एव्हाना गटार सुरु झाले होते. दोघांचेही पाय गुडघ्याएवढ्या गटारात बुडले होते. त्या कैद्याने हातानेच दिपकला थांबायची खुण केली. बऱ्याच वेळ तो कानोसा घेउन त्या

पोलिसांची काही हालचाल जाणवते का ते पहात राहीला. थोड्यावेळाने त्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.

खांद्यावरचे फावडे काढून तो गटारात साठलेला गाळ बाजुला काढु लागला. दिपकनेही लगोलग त्याचे अनुकरण चालु केले. 'त्या' कैद्याशी बोलायची दिपकची खुप इच्छा होती, पण त्याला खात्री होती की योग्य वेळ आली की तो कैदी स्वतःहुनच बोलले. शेवटी त्याचीच इच्छा होती की इथे दिपकने त्याच्याबरोबर यावे.

थोडा वेळ गेल्यावर तो कैदी कुजबुजल्यासारखा बोलला, "मी युसुफ.."

दिपकने त्याच्याकडे पाहीले, मात्र तो कुठेही न बघता आपलं काम करण्यात मग्न होता.

"मी…", दिपक

"दिपक.. ले.दिपक कपूर.. माहीती आहे मला.. आणि तुझ्यावर झालेला अन्याय सुध्दा", युसुफ

"इथे.. ह्या घाणीत येण्याचे कारण?"

"पोलिस इथल्या घाणीमुळे जवळ थांबत नाहीत.. साले… लांब थांबतात तिकडे.. आपल्याला बोलता येईल.. शिवाय हे काम सहसा कोणी घेत नाही.."

दिपकच्या चेहऱ्यावर नकळत हास्य पसरले.. "स्मार्ट.."

"ह्या तुरुंगातले माझे शेवटचे तीन दिवस..", युसुफ

युसुफच्या त्या वाक्याने दिपक दचकलाच. त्याने चमकून युसुफ कडे पाहीले. गेले काही दिवस त्याने वेगळाच विचार केला होता. युसुफच्या रुपाने त्याला एक साथीदार मिळु पहात होता आणि म्हणूनच त्याला थोडाफार आनंद वाटत होता. पण युसुफच्या त्या वाक्याने त्याचे सगळे मनसुबे गळून पडले..

“ओह.. अभिनंदन”, दिपक

“माझा ह्या तुरुंगातला शेवटचा दिवस..शिक्षेचा नाही. माझी रवानगी दुसऱ्या तुरुंगात होत आहे..”

“पण का?”

“हे लोकं एकाच तुरुंगात सहा महीन्यांपेक्षा जास्त ठेवत नाहीत.. खास करून तुझ्या-माझ्यासारखे ‘गंभीर’ गुन्ह्यात अटक झालेले असतील तर..”

“का?”, काहीच न समजल्याने दिपक म्हणाला..
“कदाचित एकाच जागेची सवय होऊ नये म्हणून.. कदाचीत पळून जाण्याचा प्रयत्न करु नये म्हणून..”

“….”

“हा माझा तिसरा तुरुंग.. पण ह्यावेळेस मी सावध होतो.. पहील्या दिवसापासुनच मी तुरुंग निरखुन पहायला सुरुवात केली. प्रत्येक गोष्ट, प्रत्येक जागा माझ्या डोक्यात फिक्स आहे. ह्या तुरुंगातील प्रत्येक विभागात मी काम केले आहे. किचेन, प्लंबीग, गटार, बांधकाम, साफ-सफाई, वेल्डींग सर्व काही..”

“मला चौथ्या तुरुंगात नाही जायचे आहे दिपक.. मी इथून पळून जायचा विचार करतोय.. आणि मला तुझी मदत हवी आहे…”, युसुफने अचानक बॉम्ब टाकला.

दिपकने मान वर करून पाहीले. युसुफ त्याच्याकडेच बघत होता.

“मला नाही पळून जायचे आहे.. मी नाही मदत करु शकत तुझी..”, दिपकने सावधगीरीचे पावुल टाकले.

“हे बघ दिपक.. मला चर्चा करायला वेळ नाहीये. तुझा माझ्यावर विश्वास नसेल तर तसे सांग. वेळ कमी आहे.. तयार असशील तर लवकर सांग म्हणजे मला प्लॅन सांगायला..”

दिपकने साधारण अंदाज केला होताच. परंतु तरीही त्याच्या मनात चलबिचल सुरु झाली. काय करावं? विश्वास ठेवावा का ह्याच्यावर? हा कितपत तयारीचा आहे? बाहेर सुखरुप पडु शकु का? पकडलं गेलो तर? आगीतून फुफाट्यात पडल्यासारखं होईल.

“कसला विचार करतो आहेस दिपक? हे बघ रिस्क आहेच, पण ती घ्यायलाच हवी. तुला तुरुंगात येउन फार तर ३-४ महीने झाले असतील. मला ५ वर्ष झाली आहेत तर असं वाटतंय ५० वर्ष उलटली. मला नाही वाटत असल्याप्रकारे कोणी १० वर्षांपेक्षा जास्ती कोणी जगु शकेल. आज मी आहे.. नंतर कोणी भेटेल की नाही.. सांगु शकत नाही.. उद्या तू सुध्दा दुसऱ्या तुरुंगात जाशील. कदाचीत तो याहीपेक्षा वाईट्ट असेल.. शेवटी निर्णय तुझा आहे..”, युसुफ बोलत होता.

---

दिपक स्वतःशीच विचार करत होता. जेनीच्या जाण्यानंतर तसेही त्याच्या आयुष्यात काही राहीले नव्हते. सैन्यातील नोकरी गेलीच होती, आणि असे इथून पळून गेल्यावर बाहेर नोकरी मिळण्याची शाश्वतीही जवळ जवळ नव्हतीच.

इथे तुरुंगात राहून शिक्षा पुर्ण केल्यावर कदाचीत बाहेर संधी असु शकत होती. पण कितपत? तुरुंगातून बाहेर पडलेल्या कैद्यावर कोण आणि किती विश्वास ठेवणार? तुरुंगातून बाहेर पडल्यावर निम्याहून जास्त आयुष्य संपल्यातच जमा होते... आणि तो पर्यंत तुरुंगात काढलेले हे जिवघेणे हाल????

दिपकने स्वतःशीच निश्चय केला आणि तो युसुफला म्हणाला.. “मी तयार आहे, काय प्लॅन आहे?”

युसुफने एकवार दिपकला निरखुन पाहीले आणि मग तो हळु आवाजात बोलु लागला.

“आपण जेथे बंद असतो तो तुरुंगाचा मागचा भाग आहे, इथून जी लांब भिंत दिसते ती नाही म्हणलं तरी एक किलोमीटर अंतरावर आहे. दिवसा तर इथून बाहेर पडणं केवळ अशक्यच.. पण रात्री अगदी धुसर संधी आहे. हा जो जाड्या गिड्डा पोलिस आहे तो इन्चार्ज आहे ह्या तुरुंगाचा. दिवसा आणि रात्री दोन्ही वेळच्या सुरक्षेची जबाबदारी त्याचीच आहे.

ह्या ढोल्याला झोप फार प्रिय आहे आणि रात्र झाली की हा झोपून जातो. अर्थात पोलिसांचा इतरत्र बंदोबस्त असतोच. शिवाय ह्याने काही शिकारी कुत्री पाळलेली आहेत. ती कुत्री इतकी भयंकर आहेत की अजून तो सुध्दा त्या कुत्र्यांना घाबरून असतो. दोन फुट लांब थांबूनच रिमोट च्या सहाय्याने तो कुत्र्यांच्या पिंजऱ्याचे दार उघडतो.

एकदा का कुत्री बाहेर पडली की मग ड्युटीवर असलेले पोलिससुध्दा इकडे तिकडे फिरत नाहीत. भिंतीच्या कोपऱ्यात असलेल्या उंच मनोऱ्यांवर दोन दिशांना दोन पोलिस असतात तेवढेच. सर्चलाईट चालु असतो आणि तुरुंगात लावलेल्या सि.सि.टी.व्ही कॅमेऱ्यातून होणारे चित्रण इमारतीच्या पुढच्या बाजुला असलेल्या एका खोलीतून नियंत्रण केले जाते.

ह्या कुत्र्यांना चकवून  जाणे केवळ अशक्य आहे. असं ऐकून आहे की एक-दोनदा काही कैद्यांनी तसा प्रयत्नही केला होता. पण त्या कुत्र्यांच्या तावडीत सापडल्यावर गस्तीवर असलेल्या पोलिसांनीसुध्दा मध्ये पडून त्या कुत्र्यांना बाजुला करण्याची हिंमत केली नाही.

त्या कुत्र्यांनी जागेवरच म्हणे त्या कैद्यांना फाडला. समजा त्या कुत्र्यांना चकवून बाहेर पडलो तरी सि.सि.टी.व्ही.चा धोका कायम आहे. अनधिकृतपणे येथील पोलिसांना ‘शुट ॲट साईटच्या’ ऑर्डर्स आहेत. रात्री कोणी पळून जायचा प्रयत्न केलाच आणि सर्चलाईटमध्ये तो दिसला तर मनोऱ्यावरील पोलिसांच्या गोळीच्या टप्प्यात नक्कीच येईल.

समजा सर्चलाईटमधून कसेबसे सुटलोच तरी ह्या उंच भिंतीपार करणे अशक्य आहे. भिंत कमीतकमी २५ फुटी तरी असेल त्यावरून चढुन, मनोऱ्यावरील पोलिसांच्या नजरेतून सुटलोच तर पुढे नदी आहे.

आणि एक छोटे जंगल आहे. एकदा का त्या जंगलात घुसलो की काही दिवस लपून रहाण्यास वाव आहे. तेथे शोध घेणं पोलिसांच्या दृष्टीने कठीण काम आहे. काही दिवस जंगलात लपून राहून मग बाहेर पडलो की हायवे लागतो. तेथुनच कायमचे बाहेर पडु शकतो. पण त्यापुर्वी हे मधले अडथळे पार करण्याचे दिव्य कर्म आहे मित्रा....”

युसुफ बोलताना दिपकचा चेहरा न्ह्याहाळत होता. पण दिपकच्या चेहऱ्यावरील भाव यत्किंचीतही बदलले नाहीत. तो शांतपणे, लक्षपुर्वक युसुफचे बोलणे ऐकत होता.

“काय झालं दिपक. इतके सगळे अडथळे ऐकून विचार बदलला तर नाही?”, युसुफने विचारले.

“नाही..”, थोडावेळ विचार करून दिपक म्हणाला, “ज्या अर्थी तुला एव्हढी सगळी माहीती आहे आणि तरीही तू पळून जायचा विचार करत आहेस, त्या अर्थी ह्या सगळया

गोष्टींचा विचार तू केलेला आहेस आणि त्यातूनच तुला सुटकेचा मार्ग दिसला आहे... नाही का?"

युसुफच्या चेहऱ्यावर हास्य पसरले.

तो पुढे म्हणाला, "ह्या प्लॅनमध्ये माझ्या आणि तुझ्याशिवाय अजून एक व्यक्ती सहभागी आहे.."

दिपकचा सिक्स्थ सेन्स अचानक जागा झाला. "तिघं जणं? कोण आहे तिसरा?"

"इस्माईल शेख...", युसुफ म्हणाला..

"इस्माईल.. यु मीन तो माफीया डॉन शेख जिंदालचा छोटा भाऊ?"

"हम्म तोच...", युसुफ..

"नो वे..", दिपक चिडून म्हणाला.. "त्याला इथून पळून जायला मी मदत करणार नाही. तो देशाचा दुश्मन आहे, आणि आपल्या ह्या प्लॅनमुळे तो इथून पळून जाऊ शकला तर ती माझ्या दृष्टीने देशाशी केलेली गद्दारी होईल.."

"कोणत्या जमान्यात रहातो आहेस तू दिपक? अरे देशाशी गद्दारी वगैरे असे काही नसते. आजकाल जो तो स्वतःचा स्वार्थ बघतो.. आपले नेते मंडळी काय करतात? आणि कोणत्या देशाची गोष्ट करतोस तू? तुला वाचवायला आले का कोणी तुझ्या बाजुने. पडलासच ना इथे येऊन सामान्य कैद्यांसारखा?", युसुफ

"अरे पण...", दिपक

"हे बघ दिपक.. आत्ता ह्या क्षणाला इथून बाहेर जाणं माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाच आहे आणि त्या कामात मला कोणाची मदत होतेय हे माझ्या दृष्टीने क्षुल्लक आहे.."

दिपक काहीही न् बोलता गप्प राहीला.

“आज आपण कोठडीत गेलो की पुन्हा तीन दिवसांशिवाय बाहेर येण्याची शक्यता नाहीच. आणि तीन दिवसांनंतर मला इथून दुसऱ्या तुरुंगात न्हेतील. ते कधी न्हेतील... सांगता येत नाही. कदाचीत सकाळी.. कदाचीत दुपारी.. तर कदाचीत एकदम रात्री. त्यामुळे जे काही करायचे ते आज रात्रीच.”, युसफ.. “आता माझा प्लॅन निट ऐक..” असं म्हणून.. युसुफने आपला प्लॅन सांगायला सुरुवात केली.

“ठिक आहे तर, मी सांगतो तसं कर. थोड्यावेळाने मला मारायला सुरुवात कर. इतकं मार की रक्त निघालं पाहीजे. अर्थात तुलाही थोडा मार खावा लागेलच, पण..”

“अरे पण का? कश्यासाठी”, दिपक मध्येच म्हणाला. “सांगतोय.. ऐक आधी.. ते एवढ्यासाठी की एकदा का आपण कोठडीत गेलो की परत बाहेर येणं शक्य होणार नाही.

त्यामुळे आपल्यापैकी कुणालातरी कोठडीच्या बाहेर रहाणे आवश्यक आहे. तुरुंगाची मला जास्ती माहीती आहे त्यामुळे मी बाहेर राहीलो तर तुमची सुटका करु शकेन.

आपल्या मारामारीत मी जखमी झाल्यावर मला येथीलच एका छोट्या दवाखान्यात भरती करतील मलम-पट्टीसाठी. तेथून बाहेर पडणे ह्या कोठडीपेक्षा नक्कीच सोपे आहे.

तेथून बाहेर पडलो की इथल्या चाव्या मी मिळवेन.. ती जबाबदारी माझी. त्या चाव्या घेउन मी तुमची सुटका करु शकेन.

कोठडीतून बाहेर पडलो की आपण भटारखान्यात पोहोचायचे. तेथून खाण्याचे जेवढे बरोबर घेता येईल तेवढे घ्यायचे. कारण इथून बाहेर पडल्यावर मोठ्ठे जंगल आहे जेथे आपल्याला कित्येक दिवस लपून रहावे लागेल. शिवाय आपल्याला त्या कुत्र्यांचा बंदोबस्त करायचा आहेच..”

“तो कसा काय करणार?”, दिपकने विचारले.

“गेल्या काही आठवड्यात मी जेलमध्ये ठेवलेल्या रॅट-किलच्या गोळया जमा करून ठेवलेल्या आहेत. भटारखान्यातून आपण जे अन्न घेउ त्यामध्ये रॅट-किलच्या गोळया आणि फिनाईल मिसळून त्या कुत्र्यांना खायला फेकायचे. ती कुत्री अलर्ट आणि आक्रमक रहावीत म्हणून त्यांना २-२ दिवस खायला घालत नाहीत. आपण त्यांना खायला फेकले की क्षणाचाही विलंब न करता ते खाऊन टाकतील आणि १५-२० मिनीटांत ते आपल्या मार्गातून बाजुला होतील.

एकदा कुत्री बाजुला झाली की मग तुझं काम सुरु होतं. तेथून आपल्याला लपत छपत, स्पॉटलाईट चूकवत जायचे आहे. मला माहीती आहे तुमच्या आर्मी ट्रेनींगमध्ये अश्या गोष्टी प्राधान्याने शिकवल्या जातात.बरोबर?”

दिपकने काही न बोलता होकारार्थी मान डोलावली.

“गुड..फक्त ह्यात थोडं कष्टाचं काम आहे.. आपल्याला जाताना ३ गॅस सिलेंडर्स घेऊन जायचे आहेत..”

“गॅस सिलेंडर्स? कश्यासाठी?”, दिपकने आश्चर्याने विचारले.
“एकदा का आपण भिंतीपाशी पोहोचलो की पुढे आपला रस्ताच खुंटतो. सपाट भिंत असल्याने भिंतीवर चढणे शक्य नाही. आपल्याला भिंतीमध्ये खिंडारच पाडावं लागेल. आपण गॅस सिलेंडर्सचा भिंतीपाशी स्फोट केला की भिंतीला भगदाड पडेल त्यातूनच सुटकेचा मार्ग आहे..”, युसुफ बोलत होता.

“अरे पण.. त्याचा आवाज होणार नाही का?”, दिपक
“होईल, पण काय झालं आहे हे समजेपर्यंत आपण बाहेरच्या जंगलात शिरलो असु. ते जंगल इतके दाट आहे की आपल्याला न पकडले जाण्याचे चान्सेस ७०% तरी नक्कीच आहेत.. पुढे अल्लाह भरोसे..”, युसुफ..

“पण युसुफ.. आधीच तो स्पॉटलाईट चूकवत भिंतीपर्यंत जाणं अवघड आहे, आणि त्यात ते अवजड सिलेंडर्स घेउन जायचे म्हणजे…”, दिपक

“रिस्क आहे.. मान्य आहे.. आवाज होऊ न देता आपल्याला हे काम करायचं आहे.. पण रिस्क घ्यावीच लागेल.. इथं सडत मरण्यापेक्षा पोलिसाच्या गोळीने मरणं मंजूर आहे मला…”, युसुफ..

बाहेरचा उजेड कमी कमी होत चालला होता..

“लवकर ठरव दिपक.. वेळ कमी आहे.. थोड्याच वेळात आपल्याला परत आपल्या कोठडीकडे न्हेतील.. आणि एकदा का आपण आत गेलो की मग मात्र…..”, युसुफ

“ठिक आहे.. रिस्क घेऊ आपण.. बोल काय करु?”, दिपक
“काय करु? चल बघु आज तू किती मार खातोस माझ्या हाताचा आणि तू मला किती तुडवतोस.. कर सुरुवात..”, असं म्हणून युसुफने हातातील फावड्याच्या मागील दांडका दिपकच्या जबड्यावर हाणला..

दिपकच्या जबड्यावर तो दंडुका असा काही बसला की त्याच्या तोंडातून एक रक्ताची धार बाहेर आली..

दिपक उठून बसेपर्यंत युसुफ पुन्हा त्याच्यावर धावून आला. गटाराच्या त्या गाळातून उठून उभा राहीपर्यंत युसुफने रबरी बुटांची एक जोरदार लाथ दिपकच्या तोंडावर

मारली. दिपकने चूकवायचा प्रयत्न केला परंतु बुटांचा निसटता फटका दिपकच्या भुवईवर बसला आणि तेथे जोरात खरचटले गेले.

दिपक एव्हाना सावध झाला होता. खाली वाकल्या वाकल्या त्याने त्याच्यावर धावून आलेल्या युसुफच्या हनुवटीवर स्वतःचा गुडघा जोरदार मारला. सैनिकी तालीमीत तयार झालेल्या दिपकचा प्रवाह इतका जोरदार होता की युसुफची हनुवटी कट्कन तुटल्याचा आवाज आला आणि रक्ताची एक चिळकांडी बाहेर उडली.

एव्हाना युसुफने स्वतःचा जोर कमी केला होता. दिपकला जेवढे लागलेले दिसणे आवश्यक होते तितके झाले होते. उगाच त्या नादात दिपकला काही गंभीर इजा होणे त्यांच्या दृष्टीने सोयीचे नव्हते. दिपकही घाव वर्मी बसणार नाही ह्याची काळजी घेत.. पण त्याचबरोबर जखम दिसेल अश्या हिशोबाने युसुफला मारत होता.

दोघांच्या हाणामारीचा आवाज ऐकून बाहेरचे ते दोन हवालदार धावत आत आले. चरफडतच ते गटारात शिरले आणि दोघांना धरून फरफटत बाहेर काढले.

---

“काय झालं शिंदे? काय प्रकार आहे हा?”, तो जाड्या पोलिस-इन-चार्ज हवालदारला युसुफ आणि दिपककडे पहात विचारत होता.

“माहीत नाही सर.. ह्या दोघांना काय झालं अचानक.. पार चढलेच एकमेकांवर....”, शिंदे हवालदार म्हणाला.

“घेऊन जा साल्यांना कोठडीत.. आणि ह्याला न्या दवाखान्यात.. जबडा तुटलाय साल्याचा..”, युसुफकडे बोट दाखवत तो म्हणाला..”बरं झालं दोघांनीच एकमेकांना बडवले, माझे काम कमी झाले..काय???”

सगळे पोलिस एकमेकांना टाळ्या देत हसु लागले.

युसुफने एकवार दिपककडे पाहीले. “आपले काम झाले.. आता भेटु रात्री..” असेच जणु काही त्याला म्हणायचे होते.

---

दिपक पुन्हा कोठडीत येउन पडला. त्याचं सर्वांग ठणकत होते.

त्याच्या जबड्यातून अजूनही रक्त ठिपकत होतं. शर्टाच्या बाहीने त्याने तोंड पुसले आणि तो भिंतीला टेकून पडून राहीला. आधीच त्या गटारात केलेले शारीरीक कष्ट आणि त्यानंतरची ही हाणामारी ह्यामुळे त्याला थकवा आला होता.

“प्लॅनला सुरुवात तर झाली होती, पण पुढे सगळं ठरल्याप्रमाणे होईल ना??”, दिपकच्या मनात विचार चालु होते..”युसुफ दवाखान्यातून बाहेर पडुच शकला नाही तर?.. पण छे.. असं कसं होईल, त्याला खात्री असल्याशिवाय त्याने पुढचा प्लॅन आखलाच नसता.. पण कश्यावरून तो दिपकला सोडवायला येइल? कश्यावरून त्याने दिपकचा दवाखान्यात भरती होण्यापुरत्या कामासाठी उपयोग करून घेतला नसेल? आणि समजा नाहीच आला तो सोडवायला, तर दिपक त्याचं काय वाकडं करु शकणार होता?”

एक ना अनेक.. असंख्य विचार दिपकच्या मनात रुंजी घालत होते. सध्यातरी दिपकला युसुफवर विश्वास ठेवण्याव्यतीरीक्त दुसरा कोणताच मार्ग दिसत नव्हता. रात्र फार मोठ्ठी आणि कष्टाची होती आणि दिपकला थकून चालणार नव्हते.

दिपकने स्वतःला त्या थंडगार फर्शीवर लोटून  दिले. काही क्षणातच तो निद्रेच्या आहारी गेला.

---

किती वेळ गेला असेल कुणास ठाउक. दिपकला जाग आली तसा तो खडबडून जागा झाला. आजुबाजुला सर्वत्र काळोख पसरला होता.

दिपक पटकन कोठडीच्या दरवाज्यापाशी गेला आणि त्याने दरवाज्याच्या छोट्याश्या खिडकीतून बाहेर डोकावून  पाहीले. अजूनतरी बाहेर सामसुम झालेली नव्हती. व्हरांड्यातील सर्व दिवे चालु होते. दिपकचे रात्रीचे जेवण सुध्दा अजून आलेले नव्हते म्हणजे रात्र उलटली नव्हती.

दिपकने स्वतःशीच हुश्श... केले. आणि तो पुन्हा जागेवर बसून बाहेरच्या हालचालींचा कानोसा घेऊ लागला. मनाचा एक कोपरा बाहेरच्या हालचाली टिपत असतानाच दुसरा कोपरा मात्र रात्रीच्या घटनांचे प्लॅनींग करत होते. युसुफने सांगीतलेल्या प्रत्येक गोष्टीचा तो बारकाईने विचार करत होता. त्यात, काही असतीलच तर त्रुटी शोधण्याचा प्रयत्न करत होता. एखादी बारीकशी चूकही सर्व प्लॅन उधळु शकत होती. परंतु वरवरदर्शी तरी त्याला तसं काही आढळलं नाही.

युसुफने सांगीतलेल्या घटना योग्य रितीने घडत गेल्या तर काही तासांतच दिपकची ह्या जाचातून सुटका होणार होती.

दिपक स्वतःशीच बाहेर गेल्यावर काय करायचं ह्याची स्वप्न पाहु लागला. स्वतःला अवगत असलेल्या कलांचा वापर करून काय करता येऊ शकेल ह्याचे आडाखे बांधुन पाहु

लागला. परंतु काही क्षणच.. नंतर त्याने ते विचार मनातून काढून टाकले आणि पुन्हा एकदा रात्री काय काय करायचे हे ठरवण्यात तो मग्न होऊन गेला.

त्याची तंद्री भंगली ती दरवाज्याबाहेरच्या हालचालीने. थोड्यावेळाने त्याचा दरवाजा उघडला गेला, जेवणाची एक थाळी आत ढकलण्यात आली आणि दरवाजा पुन्हा बंद झाला.

“रात्रीला सुरुवात झाली तर...”, दिपकने विचार केला.. ह्यावेळी त्याने कसलाही विचार न करता ते निरस, बेचव जेवण समोर ओढले आणि पटापट खाऊन टाकले. न जाणो पुढच्या वेळी काय आणि कुठे खायला मिळेल... शेजारच्या माठातले थंडगार पाणी त्याने घश्याखाली ढकलले आणि उरलेले पाणी चेहऱ्यावर ओतून तो फ्रेश झाला.

दुपारच्या त्या चांगल्या ३-४ तास झोपेने त्याला आता हुशारी जाणवु लागली होती. अंग ठणकणे सुध्दा जरा कमी झाले होते. हात पाय ताणून त्याने अंग मोकळे केले आणि मग तो अंधारातच येरझाऱ्या घालु लागला.

---

हळु हळु बाहेरचे आवाज कमी कमी होऊ लागले. वेळ अतीशय हळुवारपणे पुढे सरकत होता. दिपकची अस्वस्थता वाढत चालली होती. अगदी अंत पाहील्यावर एकदाचे व्हरांड्यातील दिवे बंद झाले.

दिपकला खात्री होती की युसुफ अजून एक तास-दीड तास तरी नक्कीच काही हालचाल करणार नाही. वाट बघण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय दिपककडे नव्हता.

बराच वेळ गेल्यावर शेवटी एकदाची बाहेर पुर्ण सामसुम पसरली होती. दूरवर स्पॉटलाईटचे हालणारे प्रकाशाचे झोत दिपकला दिसत होते.

दिपकने दिव्यांच्या हालचालीची वेळ नोंदवायचे ठरवले. एक प्रकाशझोत एका दिशेने दुसऱ्या दिशेला गेल्यावर फक्त काही सेकंद मध्ये अंधार होता आणि पुन्हा दुसऱ्या दिशेने येणारा प्रकाशाचा झोत तो अंधारलेला भाग उजळवून  टाकत होता.

एक.. दोन.. तीन.. चार.. पाच आणि तो अंधारलेला भाग पुन्हा प्रकाशमान होत होता. कशी बशी पाच सेकंद प्रत्येक हालचालीला मिळत होती. त्या वेळेत एका अंधारलेल्या भागातून दुसऱ्या अंधाऱ्या भागात जाणे क्रमप्राप्त होते.. आणि ते सुध्दा भरलेले ते जड सिलेंडर्स घेउन…

दिपक पुन्हा पुन्हा वेळेचा अंदाज घेत होता. दिपकच्या अनुभवानुसार ४-५ सेकंद खुपच कमी वेळ होती. इतक्या कमी वेळात एका सेक्शनमधून दुसऱ्या सेक्शनमध्ये कुणाच्याही नजरेस न पडता जाणं अशक्य होतं.

“शिट्ट… थोडा अजून वेळ मिळाला असता तरी चाललं असतं.. किंवा निदान युसुफने त्याचा प्लॅन मागच्याच आठवड्यात सांगीतला असता तरी दुसरं काही प्लॅन करता आला असता… पण आता वेळ निघून गेली होती. एव्हाना कदाचीत युसुफ दवाखान्यातून बाहेर पडला असेल आणि कोठडीच्या चाव्या मिळवून  तो येतच असेल…”, दिपकचे विचार चालु होते..

पण युसुफ येतच नव्हता. अपेक्षेपेक्षा अधिक वेळ उलटून  गेला होता. एव्हाना युसुफला येणं भाग होतं पण अजूनतरी कोणतीच हालचाल दिपकला बाहेर जाणवत नव्हती.

“काय झालं असेल? युसुफला तेथून सुटताच आलं नसेल? का सुटका झाली असेल आणि तो आपल्याला सोडून निघून गेला असेल?”.. दिपकच्या डोक्यात संशयाचा भुंगा सतत भुणभुणत होता.

सेकंदामागून सेकंद, मिनीटा मागून मिनीट जात होती पण युसुफचा काहीच पत्ता नव्हता. दिपकची चलबिचल वाढत चालली होती. इतकं अस्वस्थ, इतकं हतबल त्याला यापुर्वी कधीच वाटले नव्हते. पिंजर्‍यात ठेवलेल्या

एखाद्या हिंस्त्रपशुसारखा तो इकडून तिकडे येरझार्‍या घालत होता. इतक्यात त्याला बाहेर हालचाल जाणवली.

दिपक सावध झाला. हळुवारपणे त्याच्या कोठडीच्या कुलुपात एक किल्ली सरकवली गेली होती आणि अत्यंत सावकाशपणे ती किल्ली फिरवून  दरवाजा उघडण्याचा प्रयत्न होत होता. थोडावेळ खुटपुट झाल्यावर एकदाचे

ते दार उघडले गेले. दारामध्ये युसुफ उभा होता.

युसुफला बघताच दिपकचा जिव भांड्यात पडला.

“चल लवकर..”, युसुफ म्हणाला..

क्षणाचाही विलंब न करता दिपक बाहेर पडला. व्हरांड्यात युसुफच्या मागे अजून एक कैदी उभा होता. तो ‘इस्माईल शेख’ असावा हे दिपकने ताडले. त्याला पहाताच दिपकची

मस्तकाची शिर ताणली गेली. शेवटी काही झालं तरीही तो एक टेररीस्ट होता, एका माफीयाचा भाऊ.. एक देशद्रोही.

युसुफने दिपकच्या चेहऱ्यावरील भाव हेरले तसा तो म्हणाला.. “चला लवकर चला, आपल्याकडे फार वेळ नाहीये.. आधी भटारखाना...”

पुढे युसुफ, त्याच्यामागे इस्माईल आणि सगळयात शेवटी दिपक. व्हरांड्यातील अंधाराचा फायदा घेउन तिघं जण एका मागोमाग एक जात होते. लपत छपत सर्वजण शेवटी एकदाचे सर्वजण भटारखान्यात पोहोचले.

युसुफने खिश्यातून रॅटकिलच्या गोळया आणि एका छोट्या बाटलीत भरलेले फिनाईल काढले. इस्माईलने एव्हाना चिकनचे काही पिसेस पातेल्यात काढून ठेवले होते. युसुफने त्या गोळया बारीक बारीक करून त्या पिसेसवर टाकल्या आणि त्यावर फिनाईल होतले व ते सर्व मिश्रण एकजिव केले.

“युसुफ.. पण हे पिसेस त्या कुत्र्यांना देणार कसे... आधीच त्या चिकनचा वास आणि त्यात आपला अनोळखी वास.. ती कुत्री सतर्क होऊन लगेच आपल्याकडे धाव घेतील...”, दिपकने शंका उपस्थीत केली.

“नाही आपण त्यांच्या जवळ नाही जायचे. आपल्याला अंधारातच हे खाद्य फेकावे लागेल.. दुसरा पर्याय नाहीये...”, युसुफ म्हणाला.

तिघंही जणं ते पातेलं घेउन अंगणात आले. दिपकला जणु आपण नग्न होऊन चालले आहोत असंच वाटत होतं. सर्व बाजुने मोकळं पटांगण होतं. कुणाचीही नजर पडली असती तरी त्यांना हे तिघं जण सहज दिसले असते. लपायला काहीच जागा नव्हती.

झपझप चालत तिघंही कुत्र्यांच्या पिंजऱ्याजवळ पोहोचले. पिंजरा रिकामाच होता ह्याचाच अर्थ ती कुत्री त्यांच काम करत होती.

“दहा कुत्री आहेत एकुण..”, युसुफ हळुच कुजबुजला.. “कुत्री कसली..कोल्हेच ते.. एक कुत्र आपल्या तिघांना भारी पडेल....”

“युसुफ भाय.. जो भी करना है.. जल्दी करो.. मुझे साला ये मामु लोग, और कुत्ता लोगोंसे बहोत डर लगताय..”, इस्माईल पहील्यांदाच बोलला. त्याचा आवाज फार जड होता आणि बोलताना त्याला धाप लागत होती.

युसुफने एकदा मान डोलावली आणि मग एक चिकन पिस घेऊन जोरात अंधारात दूरवर भिरकावला..

दूरवर कुठेतरी धप्प असा आवाज आला आणि परत शांतता.... कसलीच हालचाल जाणवत नव्हती..

युसुफने अजून एक पिस उचलला आणि आधी फेकला होता त्याच्यापासून थोडा लांब अजून एक पिस भिरकावला.. आणि परत अजून एक करत करत साधारण वेगवेगळया दिशेने ते तुकडे फेकून दिले. आता वाट बघण्याशिवाय त्यांच्या हातात काहीच उरले नव्हते.

प्राण कानात आणून तिघेही जण हालचालींचा अंदाज घेऊ लागले.

इस्माईल काहीतरी बोलणार एव्हढ्यात दिपकने त्याला खुणेनेच शांत केले आणि दूरवर कुठेतरी तो बोट दाखवु लागला.

दूरवरून कुत्र्यांच्या गुरगुरीचा आवाज ऐकु येत होता. मधूनच चमकून जाणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशात कुत्र्यांच्या सावल्या आणि त्यांच्या भांडणात उडणारी धुळ दिसत होती. मच्चक.. मच्चक्क आवाज करत ते चिकनचे तुकडे गपागप ओरबाडून खात होते.

युसुफने आपले दोन्ही हात पुढे केले आणि इस्माईल आणि दिपकने हळुवारपणे त्याला एक एक टाळी दिली.

“दस्स मिनीट और..”, युसुफ इस्माईलकडे पहात बोलला..

हळुहळु कुत्र्यांच्या गुरगुरीचा आवाज कमी होत गेला आणि काही वेळाने पुर्ण शांतता झाली. परंतु धोका पत्करण्यात अर्थ नव्हता. तिघंही जण पुढची १० मिनीटं कानोसा घेत बसून राहीले परंतु कुत्र्यांच्या हालचालीचा कोणताही आवाज आला नाही.

“चलो… शो टाईम..”, पुन्हा माघारी वळत युसुफ म्हणाला..

तिघंही सरपटत पुन्हा इमारतीत आणि तेथून भटारखान्यात आले. पुढची १० मिनीटांत तिघांनीही मिळेल ते खाण्याचं सामान पिशव्यांमध्ये भरून घेतले आणि मोर्चा सिलेंडर्सकडे वळवला.

सिलेंडर्स पुर्ण भरलेले होते त्यामुळे ते आवाज न करता ओढत न्हेण्याची कसरतीत काही क्षणांतच तिघांची दमछाक झाली. घामाने निथळत तिघंही जण पुन्हा पुर्वीच्या ठिकाणी येऊन पोहोचले. तेथून काही पावलांवरून पुढे स्पॉटलाईटच्या प्रकाशाचा झोत येत होता. मनोऱ्यांवर बंदुक घेऊन उभे असलेल्या पोलिसांची करडी नजर त्या उजळलेल्या प्रकाशातून फिरत होती.

“युसुफ..”, दिपक हळु आवाजात म्हणाला.. “दोन प्रकाशांमध्ये फक्त ५ सेकंदांचा डिले आहे. इतक्या कमी वेळात एका सेक्शनमधून दुसऱ्या सेक्शनमध्ये जायचे.. थोडे अवघड वाटतय…”

“फक्त ५ सेकंद.. तू वेळ नक्की मोजली आहेस?”, युसुफ..

“येस्स..नक्की.. पाहीजे तर परत मोजु..”, दिपक

दिपक आणि युसुफने पुन्हा एकवार वेळ मोजली.. जेमतेम ५ सेकंद होत होते.

“मग आता?”, युसुफ

“मला वाटतं, आपल्याला सिलेंडर्समधला गॅस थोडा कमी करावा लागेल. पुर्ण भरलेले असल्याने हे फारच जड आहेत..”, दिपक

“पण गॅस कमी करुन, आपल्याला तो कमी पडला तर? भिंत फुटलीच नाही तर?”, युसुफ..

“पुढचं पुढे, पण आत्ता हे नक्की आहे की हे जड सिलेंडर्स आपण तेथपर्यंत न्हेऊ शकणार नाही..”, दिपक

युसुफने काही क्षण तो सिलेंडर उचलुन पाहीला आणि मग त्याने होकारार्थी मान डोलावली.

तिघांनीही सिलेंडर्सवरचा नॉब हलवून  लुज केला आणि त्यातून गॅस बाहेर जाऊ लागला.

पाच-एक मिनीटांनंतर तिघांनीही सिलेंडर्स बंद केले. दिपकने एकदा सिलेंडर उचलुन बघीतला आणि मग त्याने समाधानदर्शक मान डोलावली.

“ऑन अ काऊंट ऑफ़ फ़ाइव्ह....वन.. टु.. श्री.. फ़ोर.. फाईव्ह.. गो..”

तिघांनीही आपले सिलेंडर्स उचलले आणि काही काळापुरत्या निर्माण झालेल्या अंधारातून ते पुढे सरकले.

“१..२..३..४..५.. स्टॉप..”, दिपकने सगळ्यांना थांबायला सांगीतले.

प्रखर प्रकाशाचा एक झोत तिघांच्या अगदी जवळून निघून गेला. तिघांनीही पुन्हा एक दीर्घ श्वास घेतला आणि सिलेंडर्स उचलुन पुढच्या अंधाऱ्या भागाकडे धाव घेतली. हळु हळु करत तिघं जण पुढे सरकत होते. तिघांनाही चांगलाच दम लागला होता, पण इस्माईल.. तो तर अक्षरशः धापा टाकत होता..

"युसुफ भाय.. मै अब और नही उठा सकता..."

दिव्याचा प्रखर प्रकाश तिघांच्या जवळून निघून गेला.. त्या मंद प्रकाशात इस्माईलचा घामेजलेला चेहरा दोघांनी पाहीला. त्याला श्वास पुरत नव्हता. नाका-तोंडाने तो जोरजोरात श्वासोश्वास करत होता.

"नाही म्हणजे??", दिपकने विचारले...

"मुझे.. हाय बि.पी. है.. मैने इसे और उठाके चला तो मेरा दिल फट जायेगा.. और नही चल पाऊंगा मै.."

"अरे पण हे आधी सांगायचं ना... आपण तुझा सिलेंडर घेतला नसता आणि आमचे सिलेंडर्स फुल्ल ठेवले असते..", युसुफ

"युसुफ.. आपले सिलेंडर्स अर्धे आहेत.. भिंत फोडायला हे नक्कीच खुप कमी आहेत.. आपल्या दोघांनाच त्याचा सिलेंडर न्हावा लागेल..", दिपक

"पण कसा? आपली काय कमी दमछाक झाली आहे का? एक न्हेतानाच इतका त्रास, दोन कसे न्हेऊ शकु?", युसुफ

"हे बघ.. आपण त्याच्या सिलेंडर आत्ता इथेच ठेवून  एक सेक्शन पुढे जायचे.. मग आळीपाळीने दोघांपैकी एकाने मागे येऊन त्याचा सिलेंडर घेऊन परत पुढे यायचे.. मग परत एक सिलेंडर मागे ठेवून  नेक्स्ट सेक्शन.. परत एकाने मागे.. असंच करावं लागेल..", दिपक

"पण वेळ खुप जाईल.. आत्ताच माझ्या हिशोबाने ३.३० वाजत आले असतील. आपल्याला उजाडायच्या आतच जंगलात शिरावे लागेल..", युसुफ

"पर्याय नाहीये दुसरा.. लेट्स गो..", दिपक

आणि अश्या रीतीने तिघं जण पुढं मागं.. पुढं मागं करत करत एक एक टप्पा ओलांडत जाऊ लागले. मिट्ट काळोखात पुढे काय आहे, भिंत अजून किती दूर आहे ह्याचा काहीच अंदाज येत नव्हता. क्षणभरासाठी का होईना प्रकाशझोत जवळून गेला की छातील चर्र होत असे. कधी कुठून  पोलिसाची गोळी येऊन छातीचा वेध घेईल हीच भिती मनात बाळगत तिघांचा प्रवास सुरु होता.

अखेर अथक प्रयत्नांनंतर तिघंही जण भिंतीपाशी येऊन पोहोचले. सिलेंडर्स खाली ठेवून  तिघही जण भिंतीच्या कोपऱ्यात मट्कन बसले. शारीरीक आणि मानसिक कसोटी पहाणारा हा तासाभराचा प्रवास चांगलाच दमछाक करणारा होता. विश्रांती अत्यावश्यक होती, परंतु वेळ जास्ती नव्हता.

दम खाता खाताच युसुफने खिश्यातून कपड्यांचे एक मोठ्ठे भेंडोळे काढले आणि इस्माईलकडे दिले. बहुतांश कपडे हे कैद्यांचे होते तर काही सटर-फटर फडकी होती. तिघांमध्ये इस्माईलच त्यातल्या त्यात कमी दमलेला होता कारण त्याच्याकडे सिलेंडर नव्हता. त्याने ते कपडे एकमेकांमध्ये गाठ मारून बांधायला सुरुवात केली. थोड्याच वेळात त्याची एक मोठ्ठी लंबुळकी शेपटासारखी दोरी तयार झाली. त्याने तिन्ही सिलेंडर्स एकत्र ठेवले, त्याच्या टोकाला ह्या दोरीचे एक टोक बांधले आणि युसुफकडे पाहून थम्ब्स अप केले.

युसुफ आणि दिपक लगेच जागेवरून उठले आणि त्या दोरीचे दुसरे टोक घेउन भिंतीच्या आधाराने लांब जाऊन उभे राहीले. मागोमाग इस्माईलही त्यांच्याबरोबर जाऊन थांबला.

“धिस इज इट...”, दिपक म्हणाला.. तसे युसुफने खिश्यातून काड्यापेटी काढली आणि एक काडी पेटवून  कपड्यांच्या त्या दोरीला लावली.

कपडे पेटत पेटत पुढे जाउ लागले तसे तिघंही अजून थोडे लांब सरकले आणि कान झाकून डोकं गुडघ्यात घालुन बसून राहीले. कपडे पेटत पेटत सिलेंडर्सच्या दिशेने जात होते.

तिघांनीही कान घट्ट झाकून घेतले. ‘सुर्र..सुर्र’ आवाज करत आग सिलेंडर्सच्या जवळ पोहोचली आणि काही क्षणातच ‘धडाम्म’ असा आवाज आला. प्रकाशाचा आणि धुराचा एक लोळ हवेत उसळला. भिंतीचा काही भाग नक्कीच तुटला होता कारण सिमेंट आणि विटांचे तुकडे तिघांच्या अंगावर येउन आदळले होते.

विजेच्या वेगाने तिघेही जण उठले आणि भिंतीकडे धावले.

त्या मोठ्या धमाक्याने सगळेच जागे झाले होते. पहीले काही क्षण काय झाले हे शोधण्यात गेल्यानंतर त्यांना कारण उमगायला वेळ लागला नाही. जेथे विस्फोट झाला होता त्या दिशेने अजूनही धुर निघत होता. क्षणार्धात धोक्याचे सायरन वाजु लागले. शिट्या वाजवत पोलिसांनी त्या दिशेने धाव घेतली.

तिघंही जण् एव्हाना भिंतीजवळ पोहोचले होते. तिघांनीही भिंत पाहीली आणि त्यांना एक धक्का बसला. त्यांच्या दृष्टीने भिंतीला एखादे खिंडार पडलेले असणे अपेक्षीत होते, पण वास्तवदर्शी भिंतीचा वरवरचा थर निघाला होता आणि आतील विटा दिसत होत्या.

तुरुंगाच्या इमारतीत होणारी हालचाल त्यांना दिसत होती. सायरनचा आणि शिट्यांचा आवाज त्यांच्या कानावर येत होता. हातावर हात धरून बसण्यात अर्थ नव्हता. तिघांनीही तत्परतेने लाथा मारून उरलेली भिंत पाडायला सुरुवात केली. पहीले काही आघात सहन केल्यावर डचमळीत झालेली भिंत पडायला सुरुवात झाली. परंतु ह्यात वेळ जात होता. धावत येणाऱ्या पोलिसांनी एव्हाना गोळीबार सुरु केला होता. त्या गोळया त्यांच्यापासून काही अंतरावर येऊन पडत होत्या. फार वेळ हातात नव्हता. काही क्षणातच ते पोलिस जवळ येतील आणि त्यांच्या गोळया तिघांपैकी कुणाच्या अंगात घुसण्याची शक्यता होती.

तिघांनीही आपला जोर आणि वेग वाढवला. भिंतीत निर्माण झालेल्या फटींमधून आता तिघांनीही विटा ओढून काढायला सुरुवात केली आणि काही क्षणातच कसेबसे जाता येईल इतपत खिंडार निर्माण झाले. तिघंही पट्कन त्यात घुसून बाहेर पडले आणि त्यांनी जंगलाच्या

दिशेने धाव घेतली. पोलिसांच्या शिट्यांचा आवाज जवळ जवळ येत चालला होता. पोलिस भिंतीतून बाहेर पडायला सुरुवात झाली तेंव्हा तिघंजण सुरुवातीच्या विरळ जंगला शिरले होते.

पहाट व्हायला सुरुवात झाली होती आणि वातावरणात मंद प्रकाश पसरला होता.

“आपण तिघंही वेगवेगळया दिश्यांनी जाऊ या, त्यामुळे एकाच दिशेने येण्याऐवजी पोलिस तीन दिश्यांमध्ये विभागले जातील”, दिपक म्हणाला..

“नको नको.. आपण एकत्रच राहु.. पोलिसांचा एकत्रीत मुकाबला करता येईल..”, इस्माईल..

“नाही.. दिपक म्हणतो ते बरोबर आहे.. एकत्र रहाण्यात धोका आहे..”, युसुफ

इस्माईलने काहीश्या नाराजीनेच दोघांकडेच बघीतले. इकटे रहाण्याच्या विचारानेच त्याला घाम फुटला होता पण त्याच्याकडे दुसरा पर्याय नव्हता.

पोलिसांचा आवाज जवळ जवळ येत होता. अंधारात तिर मारल्याप्रमाणे ते कुठेही बेछुट गोळीबार करत होते.

दिपकने कुणाकडेही लक्ष न देता अंधारात धाव घेतली. युसुफ आणि इस्माईलही मिळेल त्या वाटेने धावत सुटले.

दिपकचा अंदाज बरोबर होता. तिघंही वेगवेगळया दिशेने गेल्यामुळे पोलिस काही क्षण गोंधळले आणि मग तीन गट करून तिघंही त्यांच्या मागे धावले.

दिपक वेडा-वाकडा कसाही धावत सुटला होता. परंतु त्याला फायदा होता त्याच्या सैनिकी ट्रेनिंगचा. मोकळया जागा शक्यतो टाळत तो झुडपांच्या आणि दाट झाडीच्या आधाराने वेगाने धावत होता. परंतु तेथे तैनात असलेले पोलिससुध्दा मुरलेले होते. त्याच भागातले

असल्याने त्यांना तेथील परिस्थितीचा अंदाज होता. दिपक आणि त्याच्या मागे असलेल्या पोलिसांमधील अंतर वेगाने कमी होत होते.

दिपकने एका घनदाट झाडीची जागा पाहून त्या झुडुपात उडी घेतली आणि तेथेच आडोश्याने तो लपून राहीला. त्याला त्या झुडुपांच्या आडून दूर अंतरावर खाकी वर्दीतील एक पोलिस दिसत होता. दिपक त्याच्या नजरेआड झाला तसा त्याचा धावण्याचा वेग मंदावला. तो आता हळु हळु चालत चालत दिपक लपला होता त्या दिशेने येत होता.

दिपक श्वास रोखुन कसलीही हालचाल न करता गप्प बसून त्याची हालचाल टिपत होता.

तो पोलिस सावध पवित्र्यात हातातील बंदुक रोखुन धरत पुढे पुढे सरकत होता.

दिपकच्या कपाळावर घर्मबिंदु जमा झाले होते. त्या पोलिसाला जरा जरी संशय आला असता तरी अंदाजाने का होईना त्याने दिपकच्या दिशेने गोळीबार करायला मागे पुढे पाहीले नसते.

नुसते बसून रहाणे अशक्य होते. दिपकने त्या पोलिसावर हल्ला चढवायचे ठरवले. हलक्या हताने जोर देऊन तो तळव्यांवर उठून  बसला. तो पोलिस अजून जवळ आला की त्याच्यावर उडी घ्यायची ह्या उद्देशाने तो तयारीत होता. त्याची नजर त्या पोलिसावर रोखलेली होती. इतक्यात त्या पोलिसाच्या मागे झुडुपात झालेली हालचाल त्याने टिपली. पोलिसाच्या मागून इस्माईल हळु हळु पुढे सरकत होता. त्याची नजर पोलिसाच्या पाठीवर होती. दिपकला त्याने खचीतच पाहीलेले नव्हते.

दिपक श्वास रोखुन दोघांच्या हालचाली पहात होता. इस्माईल हळु हळु पोलिसाच्या जवळ आला आणि त्याने अचानक पोलिसावर उडी घेतली. तो पोलिस बेसावध होता. इस्माईलच्या अनपेक्षीत हल्याने तो खाली कोसळला. त्याची बंदुक फेकली गेली. इस्माईलने दोन्ही हातात त्याची मान पकडली आणि पुर्ण जोर देऊन तो पिरगळु लागला.

त्या पोलिसाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण गळाच आवळला गेला असल्याने त्याची शक्ती कमी कमी होत गेली आणि काही वेळातच तो गतप्राण होऊन खाली कोसळला.

इस्माईलने इकडे तिकडे पाहीले आणि मग खाली उचलुन त्या पोलिसाची बंदुक उचलली आणि जाण्यासाठी मागे वळला एवढ्यात 'धाड्ड' असा आवाज आला.

कुठून  तरी दुरून आलेल्या पोलिसाच्या एका गोळीने इस्माईलच्या डोक्याचा वेध घेतला होता. त्याचे डोके फुटले आणि तो दिपकच्या समोरच कोसळला. गरम रक्ताचा एक शिडकावा दिपकच्या अंगावर उडाला. क्षणार्धात घडलेल्या त्या घटनेने दिपक भांबावून  गेला. क्षणभर तो जागेवरून उठणार होताच, पण त्याने स्वतःला सावरले आणि तो जागेवरच बसून राहीला. पोलिसाची ती बंदुक त्याच्या समोरच पडली होती. सावकाशपणे त्याने ती बंदुक ओढून त्याब्यात घेतली आणि ज्यादिशेने इस्माईलवर गोळी झाडण्यात आली होती त्या दिशेने तो पाहु लागला.

थोड्यावेळाने तिकडून तो जाड्या गिड्या पोलिस लांब पल्ल्याचा वेध घेणारी, दुर्बीण लावलेली बंदुक घेऊन सामोरा आला. अंदाज घेत घेत तो पुढे सरकत होता.

दिपकने हातातील बंदुक लोड केली आणि त्या पोलिसावर नेम धरला. त्याचे डोके दिपकच्या निशाण्यावर होते. एकामागून एक आठवणी दिपकच्या मनात जाग्या झाल्या. आजवर त्याने कुत्र्यासारखा मार त्या गिड्याकडून खाल्ला होता. लाथा-बुक्या त्याच्या शरीरावर दिवस-रात्र बरसल्या होत्या त्याची भरपाई करण्याची वेळ येऊन ठेपली होती. बस्स एक चाप ओढायचा आणि तो गिड्डा पोलिस जमीनदोस्त होणार होता.

दिपकने ट्रिगरवर बोट ठेवले........

"गुड बाय धोंड्या..." दिपक स्वतःशीच पुटपुटला.

मनगटावर जोर देऊन त्याने खांदा वर उचलला आणि बंदुकीची नळी बरोब्बर सेट केली. तो कुठल्याही क्षणी ट्रीगर दाबणार इतक्यात त्याच्या काहीतरी लक्षात आले. तो परत सावकाश पहील्यासारखा गवतात खाली झोपला. त्याने बंदुक आपल्या कानाशी आणली आणि हलकेच हलवली. आतून बारीक किण-किण आवाज आला.

इस्माईल खाली कोसळला तेंव्हा त्याची बंदुक शेजारच्या खडकावर पडली होती आणि त्यामुळे बंदुकीच्या आतील स्प्रिंग लुज झाली होती. दिपकने सैन्यात असताना अश्या कित्येक बंदुका हाताळल्या होत्या आणि असे अनेक बारीक-सारीक प्रॉब्लेम त्याला माहीत झाले होते.

आत्ता जर त्याने ट्रीगर दाबले असते तर गोळी सुटली नक्की असती, पण तिने अपेक्षीत वेध नक्कीच घेतला नसता. काही मिटरपर्यंत जाऊन ती गोळी पडली असती, परंतु आवाजाने दिपकचे लपण्याचे ठिकाण मात्र त्या गिड्याला कळले असते. पुढे त्याने काय केले असते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाहीच.

दिपकने बंदुक ठेवून  दिली आणि तू सरपटत सरपटत मागे सरकला. काही मिटर्स तो उलटा कसलाही आवाज न करता जात राहीला आणि दाट झाडीत शिरल्यावर हळुच उठून  तो धावत सुटला.

पुढील कित्येक सेकंद, मिनिट्स, तास दिपक वेड्यासारखा धावत होता. जरा कुठं खुट्ट वाजलं की तो सावध होई. जवळपासच्या झाडामागे किंवा गवतामध्ये लपून परिस्थितीचा अंदाज घेई आणि सर्व काही ठिक आहे ह्याची खात्री पटल्यावर दिशा बदलुन पुन्हा धावत सुटे.

कित्येक वेळानंतर.. जेंव्हा हे जंगल जगाच्या अंतापर्यंतच आहे की काय असे दिपकला वाटु लागले होते.. तेंव्हा त्याला दुरून रहदारीचा आवाज येऊ लागला होता.

गाड्यांच्या वेगावरून जवळपास एखादा हाय-वे असावा असा दिपकने अंदाज बांधला.

रस्ता दिसु लागला तसा दिपक लपून पुन्हा अंदाज घेउ लागला. १५-२० मिनीटं अंदाज घेतल्यानंतर दिपकला संशयास्पद असे काही आढळले नाही. रस्त्यावरून नेहमीचीच तुरळक वाहतुक होते. माल वाहून न्हेणारे ट्रक्स, प्रवासी बसेस आणि कार्स, क्वचीत एखाद्या जवळपासच्या गावातील मोटारसायकलवरून जाणारे रहीवासी वगैरे.

दिपकने मोकळा रस्ता पाहून पटकन ओलांडला आणि पलीकडच्या विरळ झाडीत शिरला. दूरवर दिपकला एक पत्र्याची शेड आणि एक झोपडीवजा घर दिसत होते. दिपक दबकत-दबकत त्या शेडच्या दिशेने जाऊ लागला.

त्या शेडमधून रेडीओवर लागलेल्या जुन्या गाण्यांचे आवाज येत होते.

दिपकने शेडच्या खिडकीतून आत डोकावून  पाहीले आतमध्ये कोणी दिसत तरी नव्हते. एकुण परिस्थितीवरून तरी ते एखाद्या मटण विक्रेत्याचे घर वाटत होते. एक टीपीकल वास वातावरणात भरून राहीला होता. आतमध्ये सोललेले ४-५ बोकड उलटे टांगले होते.

दिपक अर्धवट लोटलेले दार उघडून आतमध्ये शिरला तसा एक उग्र दर्प त्याच्या नाकात घुसला. दिपकने नाक घट्ट दाबून धरले. जमीनीवर ताज्या रक्ताचा पाट वाहात होता. नुकतेच हलाल केलेले एक बोकड तेथे पाय झाडत तडफडत प्राण जाण्याची वाट पहात पडले

होते. बोकडाला चिरून हात-पाय धुवायला तेथील माणूस जवळपास गेला असावा असा दिपकने अंदाज बांधला. अर्थात दिपकलाही तेथे फार वेळ थांबण्याची इच्छा नव्हती. सर्वात प्रथम आ्वश्यकता होती ती कपड्यांची. तुरुंगातील कैद्यांचे कपडे घालुन दिपकला उघड्यावर फिरणे केवळ अशक्य होते आणि मिळालेच तर थोडेफार पैसे.

दिपक सर्वत्र शोधाशोध करु लागला. इतक्यात शेडचे दार उघडण्याचा आवाज झाला. दिपक चपळाईने शेजारील एका पिंपाच्या मागे दडून बसला. सर्वत्र माश्या मोठ्या प्रमाणात घोंगावत होत्या. जंगलातून पळताना हाता-पायाला खरचटण्याने जखमा झाल्या होत्या त्यावर माश्या येऊन बसत होत्या. आधीच ठणकणारे त्याचे हात पाय, माश्यांमुळे अजूनच चुरचुरत होते. दिपक शक्य तितक्या हळुवारपणे माश्या हकलावत होता, परंतु त्या माश्या फिरुन-फिरून पुन्हा त्याच्या जखमांवर येऊन बसत होत्या.

“कौन छुपा है वहां .. बाहर आओ नहीं तो मै पोलिसको फोन करुंगा..”, अचानक त्या शेडमध्ये आलेल्या व्यक्तीचा दिपकला आवाज ऐकू आला.

उगाच नशीबाची परीक्षा पहाण्यात अर्थ नव्हता. दिपक तेथे लपून बसला आहे हे त्या व्यक्तीला नक्कीच कळाले होते. उगाच त्याने पोलिसांना फोन केला असता तर नसते संकट ओढवले असते.

दिपक सावकाशपणे बाहेर आला. त्याच्या समोर एक साठीतला हडकुळा बऱ्यापैकी वृध्द गृहस्थ उभा होता. चौकटी-चौकटीची लुंगी, अंगात मळलेला बनीयन, खुरटी दाढी आणि हातात बोकड कापायचा मोठ्ठा सुरा.

अर्थात दिपकला त्याच्या सुऱ्याचे भय नव्हते. शेवटी तो वृध्द गृहस्थ होता आणि दिपक कधीही निशस्त्र असला तरी त्याला भारी पडू शकला असता. दिपकला केवळ त्याचा विश्वास संपादन करायचा होता. परंतु कैद्याचे कपडे, वाढलेली दाढी आणि अस्ताव्यस्त केस, अंगावर जखमा असा अवतार असताना समोरचा माणूस त्याच्यावर कितपत विश्वास ठेवु शकेल ह्याची मात्र त्याला खात्री वाटत नव्हती.

“चाचाजी..”, दिपक खंबीर परंतु हळुवार आवाजात म्हणाला, “देखीये, प्लिज गलत मत समजीये, मै यहा किसी गलत इरादेसे नही आया.. मै तो बस..”

“पुलिससे छुपना चाहते हो?”, समोरची व्यक्ती म्हणाली.

“जी.. जी.. हां.. नहीं.. मतलब.. मै यहा रुकके आपको और परेशानी मै नही डालना चाहता.. मै चला जाऊंगा यहासे, लेकीन ये कपडे..”, दिपक कैद्याच्या कपड्यांकडे बोट दाखवत म्हणाला.

त्या व्यक्तीने हातातला सुरा टेबलावर ठेवला आणि तो आतल्या खोलीत गेला.

दिपकला ते काही क्षण विलक्षण साशंकतेचे गेले. “आतमध्ये जाऊन त्यांनी पोलिसांना फोन केला तर?”, एक विचार त्याच्या मनात चमकून गेला.

टेबलावर ठेवलेला सुरा त्याला खुणावत होता. परंतु दिपक हालचाल न करता एका जागेवरच उभा राहीला.

थोड्यावेळाने तो माणूस बाहेर आला. त्याच्या हातामध्ये काही कपडे होते ते त्याने दिपककडे दिले.

एक चुरगळलेला गंजी आणि जीर्ण झालेली एक लुंगी होती.

“बस्स येही है मेरे पास..”, असे म्हणत त्या इसमाने त्याच्या बनीयानच्या खिश्यातून पन्नास-पन्नासच्या दोन नोटा काढून दिपकच्या हातात दिल्या.

“चाचाजी मै…”

“बातोमै वक्त जाया ना कर.. रेडीओमें तुम्हारे बारेमे बता रहे है... पोलीस जगह-जगह ढूंढ रही है...” दीपकला थांबवत तो इसम बोलला.

दिपकने पटकन आपले कपडे बदलले.

त्या इसमाने टेबलाच्या खणातून एक काजळाची डबी काढून दीपकला दिली. दिपकने एक जाड काजळाचा थर बोटावर घेऊन ते डोळ्यातून फिरवले.

मग त्या इसमाने कडेच्या टेबलावर पडलेला एक वस्तारा उचलून दीपककडे दिला आणि म्हणाला..”दाढी निकाल दो अपनी.. तुम्हारा हुलीया थोडा तो बदल जायेगा..”

दिपकने तो वस्तारा घेतला. त्याला त्या बोकडाचे केस चिकटले होते. दिपकने पटकन तो साफ केला आणि वाढलेली दाढी कापून टाकली. मिश्यांना थोडा कट देऊन चीनी लोकांसारख्या त्या हनुवटीपर्यंत येतील अश्या ठेवल्या आणि मग त्याने आरश्यात एकवार स्वताला न्ह्याहाळले.

त्या छोट्याश्या बदलणे त्याचा चेहरा एकदमच वेगळा दिसू लागला होता. दीपक एखाद्या मुसलमानासारखा दिसत होता.

दाराबाहेर पडण्यापूर्वी तो म्हणाला..”चाचाजी, मै कौनसे इलाके मै हु? बाजूमै कौनसा गाव है?”

“ये कोल्हापूर जिला है.. तुम याहासे ३-४ कि.मी. दूर जाओगे तो तुम्हे बहोत सारे ट्रक दिखेंगे जो खेतोमैसे गन्ना निकालकर दुसरे गावोमै जाते है. मुझे लगता है, तुम उनमेसे कोई भी ट्रक मै छुपकर दूर तक जा सकते हो..”, तो इसम म्हणाला.

दिपकने त्याचे पुन्हा एकदा आभार मानले आणि तो त्या पत्र्याच्या शेड बाहेर पडला.

"सर, कोण म्हणताय इस्माईलला पोलिसांनी मारले...इस्माईलला तर त्या दिपकने मारले सर..", तो गिड्या इन्स्पेक्टर म्हणत होता.

"काय बोलताय तुम्ही? अहो आत्ताच तर तुम्ही म्हणालात ना...", कमिशनर.. "सर मी काय म्हणालो हे तुमच्या आमच्यात...बाहेरील जगासाठी इस्माईलला दिपकनेच मारले. माफियाला जर कळले तो पोलिसांच्या हातून मारला गेला तर आपला काय खरं नाय.. लागू देत त्या माफियाला दीपकच्या पाठी, एक वेळ दीपक आपल्याला सापडायचा नाही.. पण डॉनच्या भावाला मारणाऱ्याला माफिया सोडणार नाही सर.. काट्याने काटा निघेल..", तो गिड्डा इन्स्पेक्टर बोलत होता..

"हम्म ठीक आहे.. द्या तशी बातमी मिडीयाला.., पण तुम्ही गाफील राहू नका. युसुफ आणि दीपक दोघेही पकडले गेले पाहिजेत, पण मृत.. खोटा एन्कौन्टर करून टाका..", असं म्हणून कमिशनर ताड-ताड पावल टाकत बाहेर पडले, तर तो गिड्डा इन्स्पेक्टर पोटावरून खाली घसरणारी पेंट सावरत मिडिया रूम च्या दिशेने गेला..

--------------

दीपक लपत छपत कुठे पोलीस नाहीत न हे पाहत चालला होता.. पण त्याला ह्याची बिलकुल माहिती नव्हती कि पोलिसांच्या आधी माफियाची टोळी त्याच्या मागावर निघाली आहे..

त्या गजबजलेल्या वस्तीतील एका मोडक्या मेंन्शन मध्ये जमलेल्या त्या तिघा-चौघांच्या नजरा दरवाज्याकडे वळल्या जेंव्हा दरवाज्यातून एक चिकना तरुण आतमध्ये आला. त्याच्या चालण्यात एक विलक्षण आत्मविश्वास होता. आरमानी जिन्स आणि स्पायकर जिन्सचा अर्धा खोचलेला निळा जिन्सचा शर्ट त्याने घातला होता. हातामध्ये एक स्टीलचे ब्रेसलेट होते, शर्टची वरची दोन बटणं उघडी होती आणि त्यातून यु.एस.ए चे मराईन्स सोल्जर घालतात तसले एक लॉकेट डोकावत होते. डोळयावर गडद रंगाचा गॉगल होता.

जॉनी आतमध्ये आला तसे सर्वांच्या नजरा त्याच्याकडे वळल्या. आणि अर्थात त्याचे इथे येणे अपेक्षीतच होते. बॉसच्या मर्जीतला आणि शार्प शुटर जॉनीला बोलावणं धाडण्यात आलं होतं. बॉसचा भाऊ, इस्माईल मारला गेला होता.. माफीया डॉनचा भाऊ.. आणि माफीया शांत बसणं शक्यच नव्हतं.. बॉसच्या इज्जतीचा प्रश्न होता.

जॉनी कुणाशीही न बोलता सरळ खोलीचं दार उघडून आत गेला. खरं तर किती साधी गोष्ट.. खोलीचं दार उघडून आत जाणं, पण ते दार उघडायला त्याला दारावर नॉक करायची गरजच पडली नाही. इतर कोणी नॉक न करता आत जायचं धाडस सोडा, विचार सुध्दा करु शकत नव्हतं. ह्यावरुनच जॉनी बॉसच्या किती मर्जीतला होता हे स्पष्ट होत होतं.

जॉनी आतमध्ये गेला. समोरच्या टेबलावर काळ्या कोटातला, सिगार फुंकणारा माफीयाचा सर्वेसर्वा मकबुल खान बसला होता. जॉनी आत आल्यावर टेबलाच्या कोपऱ्यात ठेवलेली ब्रिफकेस त्याने जॉनीकडे ढकलली.

जॉनीने एका हाताने त्या बॅगेचा खटका उघडला आणि बॅग उघडली. काही क्षण त्याने आत नजर टाकली आणि परत झाकण बंद करून टाकले.

“एच-एस प्रिसिजन प्रो सिरीज २००० एच.टी.आर... इस्त्राईल डिफेन्स फोर्स मध्ये मोठ्या प्रमाणात वापरात असलेली लॉंग रेंज स्निपर रायफल..” बॉसच्या नजरेला नजर देत जॉनी म्हणाला...

“गुड...”, बॉसच्या चेहऱ्यावर एक मंद हास्य पसरले..”बस..”, समोरच्या खुर्चीकडे हात दाखवत मकबुल खान म्हणाला..

जॉनीने खुर्ची मागे सरकवली आणि तो त्यावर बसला...

“दीपक..”, मकबुल खान सिगारचा धुर हवेत सोडत म्हणाला..

जॉनी काही क्षण शांत बसला आणि मग तो म्हणाला.. “मला नाही वाटत इक्बालला दिपकने मारले असेल.. त्याची बॉडी मी पाहीली आहे, गोळी खुप लांबून मारली आहे, नक्कीच लॉंग रेंज रायफल असणार. मला नाही वाटत दिपककडे अशी रायफल असावी. ते फायर पोलिसांनीच केलेले आहे..”

मकबुल खान डोळे मिटून  सिगारचा धुर काही क्षण हवेत सोडत राहीला. मग त्याने उरलेला सिगार टेबलावरच्या अ‍ॅश-ट्रे मध्ये विझवला आणि तो म्हणाला, “आय नो दॅट.. पण आपल्याकडे पुरावा नाहीये. शिवाय आता तर दिपकनेच इक्बालला मारल्याचे प्रसारीत झाले आहे, अश्या स्थितीत दिपकला जिवंत ठेवणे आपल्या इज्जतीला शोभणारे नाही.

डझंट मॅटर इफ़ ही रिअल्ली किल्ल्ड इक्बाल ऑर नॉट... किल हिम...”

जॉनीने मान हलवली आणि ती ब्रिफकेस उचलुन तो बाहेर पडला.

दिपक भरभर चालत त्या ट्रक्सच्या जवळ गेला. एखाद्या ट्रकमध्ये चढून उसांमध्ये चढून बसणे सहज शक्य होते. क्षणभर दिपक सर्वात मागच्या ट्रकजवळसुध्दा पोहोचला होता. परंतु तो पुन्हा माघारी वळला आणि शेजारच्या झाडीत शिरला.

शत्रुच्या प्रदेशात असताना कुठलाही दुवा मागे सोडायचा नाही हे तो सैन्यात शिकला होता. चुकून माकून पोलिस त्याला शोधत त्या मटण-विक्रेत्या चाचांच्या घरी पोहोचले असते आणि त्या म्हाताऱ्या चाच्याला मारून मुटकून चौकशी केली असती तर शक्यता होती की त्याने उसांच्या ट्रक्सबद्दल आपल्याला दिलेली माहीती पोलिसांना सांगीतली असती आणि त्यानंतरच्या काही तासात इथून गेलेले ट्रक्स आणि त्यांचे नंबर पोलिसांनी जकात नाक्यावरून मिळवले असते. मग दिपकला पकडणे केवळ एक औपचारीकताच होती.

दिपकला आपल्या हुशारीचे कौतुक वाटले आणि त्याने स्वतःचीच पाठ थोपटून घेतली आणि तो अधिक दाट झाडीत जाऊ लागला.

काही अंतर आत गेल्यावर हळु हळु रहदारीचे आवाज कमी होत गेले, दाट झाडीमुळे सुर्याचा प्रकाशसुध्दा विरळ झाला होता. दिपक झपझप पावलं टाकत चालत होता.

दिपकचा स्वतःशीच विचार चालु होता. कोल्हापुरच्या जवळ दाजीपुरचे जंगल होते हे तो ऐकून होता. कदाचीत हेच ते जंगल असावा असा त्याने अंदाज बांधला. जर तो बरोबर दिशेने चालला असेल तर त्याच्या उजव्या बाजुला राधानगरी होते तर डाव्याबाजुने बाहेर पडला तर बेळगाव-गोवा हायवे लागणार होता.

दिपकने आपली दिशा बदलली आणि तो डावीकडे वळला. संध्याकाळ टळून गेली होती आणि आधीच अंधारलेल्या जंगलात आता बऱ्यापैकी काळोख दाटला होता. अंधारात चालत रहाणे अशक्य होत होते. शिवाय चुकून एखाद्या मोठ्या खड्यात पडून हात-पाय मोडण्याची शक्यता होती. तसे झाले असते तर दिपकचे शक्य तितक्या दूर जाणे अवघड झाले असते आणि म्हणूनच त्याने रात्रीपुरता थांबण्याचा विचार केला.

एक मोठ्ठे झाड बघून तो त्याच्या आडोश्याला बसला. भल्या पहाटेपासून तो नुसता धावतच होता. तो सर्व प्रसंग एका-मागोमाग एक करत त्याच्या डोळयासमोरून सरकला. भटारखान्यातून उचललेले ते अवजड सिलेंडर, भुकेल्या हिंस्त्र कुत्र्यांची ती गुरगुर आणि नंतर कमी होत जाणारा त्यांचा आवाज, दिव्यांचे प्रकाशझोत चूकवत केलेला तो जीवघेणा आणि दमवणारा प्रवास, घामाने डबडबलेला इस्माईलचा चेहरा, कानठळया बसवणारा सिलेंडरचा तो विस्फोट, पोलिसांच्या शिट्या, भिंत फोडताना झालेली गडबड आणि पोलिसांच्या गोळया चूकवत जंगलाच्या दिशेने घेतलेली धाव, रक्ताच्या थारोळयात पडलेला इस्माईल.. सर्व काही..

“युसुफ कुठे असेल?”, एक विचार त्याच्या डोक्यात तरळून गेला? “सुखरूपपणे निसटला असेल? कि पोलिसांनी पकडले असेल? कि तो पण इस्माईलसारखा…….”

दीपकच्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता, सकाळपासून धावून धावून हात-पाय दुखून आले होते. दिपकने डोळे मिटून घेतले. जेनीचा हसरा चेहरा त्याला दिसत होता. वात्सल्यपूर्ण नजरेने आपल्या वाढलेल्या पोटावरून ती हात फिरवत होती. दीपकला बघताच पेंग्विन सारखी डुलत डुलत चालत ती दीपकला येऊन बिलगली. तिने दीपकचा हात तिच्या पोटावर ठेवला आणि लगेच पोटातल्या बाळाने लाथ मारली. दीपकला ती लाथ गुद्गुल्यांसारखी वाटली. दीपक स्वतःशीच हसला. “कर्नल साब..” जेनीच्या पोटातील बाळाला तो लाडाने म्हणत होता..”अब जल्दी आजाइये.. पुरी पलटन आपका इंतजार कर रही है!!!..”

असेच काहीसे प्रसंग, काही घडलेले काही न घडलेले त्याला दिसत होते, एक प्रकारचे सुख, आत्मा शांती तो अनुभवत होता आणि अचानक कुठून तरी वेगाने एक जीप आली आणि त्याची धडक बसून जेनी दूरवर फेकली गेली… खूप दूर.. सर्वत्र अंधार होत गेला.. जेनीची किंकाळी क्षीण होत गेली.. आणि सिनेमा संपल्यावर जसा काही क्षण अंधार पसरतो तसा अंधार पसरला…

दीपकची शुध्द हरपली होती…

सकाळी दीपकला जाग आली तेंव्हा उन्हं बऱ्यापैकी वर आली होती. रात्रीच्या त्या गाढ झोपेने त्याचे ठणकणारे हात पाय बरे झाले होते. सैन्यात राहून दीपकचे शरीर एक मशीन बनले होते. तापलेले मशीन जरा थंड केले कि पुन्हा नव्यासारखे. शरीरातील इम्युनिटी सिस्टीम ने काम चोख बजावले होते.

दीपक उठून चालायला लागला. वाटेत झाडाला लागलेली काही कंद-फळे विषारी नाहीत ना? ह्याची खात्री करून तो तोंडात टाकत होता.. खूप वेळ चालल्यावर अखेर त्याला गाड्यांचे रहदारीचे आवाज येऊ लागले. दीपक सावध झाला. दबकी पावला टाकत तो पुढे सरकत होता.. दूरवर त्याला एक मळकट पिवळया रंगाची, पोपडे उडलेली छोटी खोली दिसली. दिपकने आडोशाला राहून चाहूल घेण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणतीच हालचाल दिसत नव्हती. १५-२० मिनिट थांबून कोणी नसल्याची खात्री झाल्यावर दीपक पुढे सरकला.

`दाजीपुर फोरेस्ट डीपार्टमेंट..', एका मोडक्या पाटीवर लिहिलेले होते. दाराला कुलूप नव्हते म्हणजे इथे नक्कीच कुणाचातरी वावर होता. दीपकने उघड्या खिडकीतून आत डोकावून पहिले.

खोली रिकामीच होती.

हलक्या हाताने दार ढकलून दीपक आतमध्ये आला.

टेबलावर काही फाईल्स अस्ताव्यस्त पडल्या होत्या. शेजारच्या कपाटातून काही कागद पत्र डोकावत होती. भिंतींवर दाजीपुर-फेमस बायसनचे फोटो लावलेले होते. बाकी इतर ठिकाणी वन्य जीवांची माहिती देणारे फलक जळमट परिधान करून भिंतीना लटकत होते.

दिपकने एक दोन कपाट उघडली आणि त्याच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. एका कपाटात एका फोरेस्ट ऑफिसरचा युनिफॉर्म होता. दिपकने लगेच तो अंगात चढवला. अगदी फिटिंगचा नसला तरी त्याला तो बऱ्यापैकी बसत होता. खरं तर तो युनिफॉर्म चोरी करून जाणे

म्हणजे एखादा क्ल्यू सोडण्यासारखेच होते. परंतु इलाज नव्हता. लुंगी-बनियन घालून तो रस्त्यावरून फिरू शकत नव्हता. दिपकने ते कपडे घातले आणि तो बाहेर पडला.

दीपक लवकरच हाय-वे ला येऊन थांबला. कुणाकडून तरी लिफ्ट घेता आली तर बघावी असा विचार त्याच्या डोक्यात होता.

फोरेस्ट-ऑफिसर च्या पेहरावात त्याला खूप सुरक्षित वाटत होते. ती वर्दी त्याला त्याच्या लष्करातील दिवसांची आठवण करून देत होती. शेवटी वर्दी ती वर्दी.. लष्कराची असो नाहीतर अजून कुठली, एक आत्मविश्वास त्याच्या अंगात बळावला होता.

फारसा वेळ न दवडता तो ट्रक्सना लिफ्ट साठी खुण करू लागला. ३-४ प्रयत्नानंतर एक ट्रक थोडा पुढे जाऊन थांबला.

दीपक कसलीही घाई न करता सावकाश त्या ट्रकपाशी गेला आणि त्याने केबिनचे दार उघडले त्याबरोबर आतून गरम हवेचा एक झोत बाहेर आला. ट्रक चा ड्रायवर साधारण चाळीशीचा, गुबगुबीत अंगाचा होता. ट्रक च्या त्या तापलेल्या केबिन मध्ये बसून तो घामाघूम झाला होता. खांद्यावर टाकलेल्या नैप्कीन ने तो सतत चेहरा पुसत होता.

“कुठे जायचे आहे?’, त्याने दीपकला विचारले..

“गोवा..” दीपक म्हणाला..

“मी गोव्याला तर नाही चाललो, मी गोकर्णला चाललोय, पाहिजे तर वाटेत सोडतो..”, तो ड्रायवर दीपकला म्हणाला.

दीपक फारसा विचार न करता आत जाऊन बसला.

“तुमी फारेस्ट हफिसर दिसताय..”, ड्रायवर दीपकच्या वर्दीकडे बघत म्हणाला....

“हम्म…, माझ नाव दीपक..”

“मी थोंमस कुक…”, ड्रायवर म्हणाला…

खर तर त्याच नाव काहीही असू शकत होत, पण `थोंमस कुक’ नाव ऐकून दीपकला हसू आवरले नाही…

“म्हणजे.. माझ नाव थोंमस, पण गोकर्ण ला मी आणि माझी बायको एक छोटे हॉटेल चालवतो.. मी आणि बायको दोघेही तेथे कुक आहोत.. आम्हीच स्वयंपाक करतो म्हणून.. थोंमस कुक….”, थोंमस म्हणाला.

“मागे हॉटेलचाच माल का?”, दीपाने विचारले..

“हो..कोल्हापूर मार्केट मधून एकदमच आणतो… स्वस्त पडते.. शिवाय जाताना गोकार्नेचा कुणाचे न कुणाचे काही सामान कोल्हापूर ला न्यायचे असतेच.. सो जातानाचे पैसे पण निघतात…”

केबिन मध्ये भयानक गरम होत होते.. इंजिनमुळे सीट्स सुद्धा खूपच तापल्या होत्या… शिवाय तो जुनाट ट्रक ४०-५०च्या वर वेग पकडायचे काही नाव घेत नव्हता. आपण असला खड-माड ट्रक पकडून चूक केली कि काय असे दीपकला वाटून गेले.

थॉमस-कुक तसा गप्पीस्ट होता. बहुतेक वेळा तोच बोलत असे. त्याचे हॉटेल, तेथील गिऱ्हाइक..जे बहुतेक वेळा हिप्पीच असत, ह्याबद्दलच तो सांगत होता.. एव्हाना संध्याकाळ होऊ लागली होती.

“साहेब, तुम्ही एक काम करा..”, थॉमस म्हणाला…”आज तुम्ही गोकर्णलाच चला.. रात्री इथे हाय-वे वर तुम्हाला गोव्यासाठी लिफ्ट नाही मिळणार.. रात्रीचा सहसा कोणी ट्रक

लिफ्टसाठी थांबत नाही.. आज रात्री तिकडेच राहा, उद्या तुम्हाला परत हाय-वे वर आणून सोडतो.. रात्रीचे जेवण आमच्या हॉटेल-मध्ये… माझ्याकडून…काय बोलता…?”

त्याचे म्हणणे बरोबर होते, रात्री हायवेवरून पुढे लिफ्ट मिळणे अवघड होते.. शिवाय खाण्याचे वांदे होतेच.. इथे जेवायची पण सोय होत होती.. फारसे आढेवेढे न घेता दीपक ने संमती दर्शवली…

“ठरले तर मग..फिश खाता ना तुम्ही? मग आज अशी फिश-करी बनवतो कि तुम्ही बोट चाटत रहाल…”, खुश होत थॉमस म्हणाला…

पुढच्या इंटरसेक्ट वरून थॉमसने गाडी वळवली आणि तो गोकर्णच्या दिशेने निघाला.

संध्याकाळच्या वेळी हाय-वेवरून येणारा बेभान गार वारा आता कमी झाला होता आणि समुद्र-किनारी असतो तसा दमट, खार वारा खिडकीतून आत येत होता. दीपकला मुंबईची, आपल्या घराची आठवण झाली. त्याने तो खारावारा दीर्घ श्वास घेऊन छातीत भरून घेतला..

“काय साहेब, समुद्राचा वास आवडतोय का?.. मला पण लई आवडतो.. खरं सांगू तर मला हे हॉटेल मध्ये इतका रस नाही.. समुद्रावर रहाणे हे माझे स्वप्न आहे.. मस्त मासेमारी करायची, रातच्याला नांगर टाकून समुद्राच्या मध्यभागी… अहा हा..मस्त…” स्वप्नात बोलल्यासारखा थॉमस बोलत होता…

थोडे पुढे गेल्यावर एक अतिशय छोटा आणि कच्चा रस्ता लागला जेथून थॉमसनें गाडी आत वळवली.

“साहेब इथून आपण आपल्या हॉटेल कडे चाललोय.. त्या भागाला `हाल्फ मून बीच’ म्हणतात. चंद्राच्या अर्धाकृती आकारासारखा एक डोंगर दोन्ही बाजूनी समुद्राच्या खूप आत

पर्यंत गेला आहे, त्यामुळे त्या आकाराचा हा बीच तयार झाला आहे. बऱ्यापैकी हा प्रायव्हेट भाग आहे, फार कमी लोकांना माहितेय.. दोन्ही बाजूंनी डोंगर असल्याने हा भाग पटकन लक्षात येत नाही…" थॉमस सांगत होता…

थोड्या वेळाने समुद्राच्या लाटांचा आवाज येऊ लागला. एव्हाना पूर्ण अंधार झाला होता.. दूरवर थॉमस च्या हॉटेलचे लुकलुकणारे दिवे दिसत होते. बारीक बारीक गाण्यांचा, टाळया वाजवण्याचा, गिटार-बेंजो चा आवाज येत होता…

"बोललो होतो ना तुम्हाला.. इकडे हिप्पी लोक खूप येतात.. आता तुम्ही आलाच आहात ना तर बघा मज्जा काय असते..".. स्वतःवर खुश होत थॉमस म्हणाला.

एक छोटे गेट ओलांडून थॉमसने ट्रक हॉटेल बाहेर थांबवला आणि दोनदा होर्न वाजवला.."माझी खुण आहे हि.. बायकोसाठी.. मी आल्याची…, तुम्ही एक काम करा, आत मध्ये जाऊन बस.. मी जरा हा माल अनलोड करून येतो…" अस म्हणून थॉमस खाली उतरला.

दिपकने मान डोलावली आणि तो हॉटेल मध्ये शिरला… आतमध्ये खाद्य पदार्थांचा मस्त सुवास येत होता.. परतलेल्या कांद्याचा वास तर त्याची भूक चाळवत होता…. भुकेल्या पोटावरून हात फिरवत तो त्या छोट्याश्या हॉटेलच्या लोबिमध्ये येऊन बसला..

दिपकने खिडकीतून डोकावून  बाहेर पाहीले. समुद्रकिनारी शेकोटी पेटलेली दिसत होती. शेकोटी भोवती काही तरुण-तरुणी फेर धरून नाचत होत्या. ठेका धरायला लावणाऱ्या संगीताचे स्वर ऐकु येत होते.

दिपकने हॉटेलच्या अंतरंगातून नजर फिरवली. अगदी चकाचक नसले तरी अगदीच शॅबी पण नव्हते. बसायची आसनं आरामदायक होती, दिव्यांची मांडणी आल्हाददायक होती, वॉलपेपर, टेक्श्चर पेंट, मॉडर्न आर्ट पेन्टींग्स वापरून भिंती सजवलेल्या होत्या. कुठेही भडकपणा नव्हता, कुठेही दिखाऊ-वृत्ती नव्हती. एकुण वातावरण उत्साहवर्धक होते. थकून आलेल्या कुठल्याही प्रवाश्याला इथेच रहावे असे वाटेल असेच सर्व काही होते.

दिपकची नजर फिरत फिरत लॉबीच्या समुद्राच्या बाजुला उघडणाऱ्या दरवाज्याकडे गेली. तेथे साधारण एक तिशीतली तरुणी कमरेवर हात ठेवून  उभी होती. काळपट-लाल रंगाचा पायघोळ स्कर्ट, नाभीच्या थोड्यावर पर्यंत पांढऱ्या रंगाचा आणि केशरी, निळया, पिवळया रंगाच्या मोठ्या फुलांचा पॅटर्न असलेला शॉर्ट-शर्ट तिने घातला होता. डाव्या हाताचे मनगट रंगेबीरंगी लेसचे ब्रेसलेट्सने भरलेले होते. नाकात चमकत्या खड्याची नोज-रिंग, फिक्कट पर्पल रंगाने हायलाइट केलेल्या केसांच्या बट, निळसर छटा असलेले डोळे आणि साधारण साडे-पाच फुट उंच अशी ती तरुणी बघताच दिपकच्या हृदयाचा एक ठोका जणु चूकलाच...

दिपक तिच्याकडे पहातच राहीला. तिच्या डोळयात एक अनामिक ओढ होती. कुणीही तिच्याकडे क्षणार्धात आकृष्ट व्हावे असा तिचा कमनीय बांधा होता.

तिने एकवार दिपककडे बघीतले आणि ती कमरेला नाजुक झटके देत त्याच्यासमोरून निघून गेली. दिपक तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहीला. त्याची तंद्री भंगली ते थॉमसच्या येण्याने.

“जा, तू फ्रेश होऊन ये, मग आपण मस्त फिरून येऊ, तुला मी हॉटेल दाखवतो. तो पर्यंत जेवण तयार होईल..”, थॉमस

दिपकने पुन्हा एकदा ती तरुणी ज्या दिशेने गेले होते पाहीले आणि मग निराश होऊन तो उठला.

बेसिनला गरम आणि गार पाण्याचे नळ होते. दिपकने कढत पाण्याने हात, पाय, तोंड धुतले. गरम पाण्याचा स्पर्श होताच त्याच्या शरीराचे आखडलेले स्नायु मोकळे झाले. सुगंधीत साबणाने तोंड धुतल्याने दिवसभराचा शिकवा कुठल्या्कुठे पळून गेला.

बाथरुममधून दिपक बाहेर आला तेंव्हा थॉमस त्याची वाट पहातच उभा होता. दिपकला त्याने एक राखाडी रंगाची शॉर्ट आणि निळया रंगाचा टी-शर्ट दिला. कपडे बदलल्यावर दिपकला जरा मोकळे मोकळे वाटले.

दिपकला घेउन तो समुद्र किनाऱ्यावर आला. मधूनच येणारी वाऱ्याची झुळुक आणि पायाल जाणवणाऱ्या समुद्राच्या थंडगार वाळुचा स्पर्श मनाला सुखावणारा होता. थॉमसने त्याला बाहेरून हॉटेलची माहीती सांगीतली. हॉटेलच्या दोन्ही बाजुला रहाण्याच्या खोल्या होत्या. उजव्या कोपऱ्यात स्वयंपाकघर होते. जेथून दिपक आला होता तो भाग हॉटेलच्या लॉबीचा होता. तेथेच कडेला एक छोटेखानी पण सुसज्ज बार होता.

हॉटेलच्या दोन्ही बाजुने एक भला मोठ्ठा डोंगरकडा समुद्राच्या अंतरंगात आतपर्यंत गेला होता त्यामुळे थॉमस म्हणाला त्याप्रमाणे हा भाग खरंच प्रायव्हेट बीचसारखा झाला होता. ह्या बिचवर येण्याच्या एकच रस्ता होता आणि तो म्हणजे हॉटेलच्या लॉबीतुन. चंद्राचा प्रकाश समुद्रांच्या लाटांवर चमकत होता. समुद्राची पांढरीशुभ्र वाळु अधिकच रुपेरी भासत होती.

वाळुवर मध्यभागी शेकोटी पेटवून  हिप्पींचा एक ग्रुप आपल्याच मस्तीत गुंग होता. गिटार-बेंजो एकसुरात कुठलेसे गाणं वाजवत होते आणि बाकीचा घोळका त्याच्या तालावर थिरकत होता. अनेक तरुण-तरुणी आपल्या मित्र-मैत्रीणींच्या मांडीवर डोकं ठेवुन, कुणी एकमेकांच्या अलिंगनात तर कुणी कश्याचीही पर्वा न करता बेफिकीर होऊन लिप-लॉक किसींग मध्ये मग्न होते.

दिपक त्यांच्याकडे पहातोय हे पाहून अभिमानाने थॉमस म्हणाला, “एकदम फ्रि कल्चर आहे इथे. इथं सहसा फॅमीलीज येत नाहीत. हिप्पी, परदेशी नागरीक, फुट-लुज ट्रॅव्हलर्स जास्ती येतात. एकदम तारुण्य सळसळतं इथं. त्यामुळे मस्त फ्रेश वाटतं. हे किसींग बिसींग तर

कुछ नही.. उद्या सकाळी लवकर उठून  बघं, डोळे बाहेर येतील...” दिपकच्या पाठीवर थाप मारत थॉमस म्हणाला.

“हो खरंच एकदम फ्रेश वाटतं आहे इथं”, दिपक म्हणाला..

“मग! म्हणलं ना, तुम्हाला जंगलात राहून कसं काय काम करता येतात? कंटाळत नाही का?”, थॉमस

“जंगलात??”, दिपक म्हणाला..

“हो मग? फॉरेस्ट ऑफीसर ना तुम्ही, तुम्हाला बाहेरच्या जगातली ही मजा काय कळनार..”, थॉमस म्हणाला

दिपक विसरुनच गेला होता की तो एक फॉरेस्ट ऑफीसर म्हणून थॉमसला भेटला होता.

“हो हो.. खरं आहे ते.. आम्हाला आपलं जिकडं बघावं तिकडं जंगल..” सावरत दिपक म्हणाला.

चालत चालत दोघं खुप दूरपर्यंत आले. अचानक थॉमसचे लक्ष हॉटलच्या लॉबीकडे गेले. तेथे एक तरुणी थॉमसला हात करत होती. थॉमसने हात हलवून  तिला इशारा केला आणि मग दिपकला म्हणाला, “चला जेवण तयार आहे, जेवून  घेऊ आणि मग सावकाशीत गप्पा मारत बसु.”

दिपकला सुध्दा कडकडून भुक लागली. तो केंव्हाचा जेवायची वाट बघत होता. क्षणाचाही विलंब न करता तो माघारी वळला.

दोघंजणं हॉटेलमध्ये परतले. थॉमस दिपकला घेऊन कॅन्टीनमध्ये गेला. एका कोपऱ्यात मेणबत्या लावून  टेबल सजवले होते. टेबलाच्या मध्यभागी दोन टवटवीत गुलाबाच्या फुल ठेवली होती. झाकून ठेवलेल्या भांड्यांमधून सुग्रास भोजनाचा वास दरवळत होता.

दिपकला खुर्चीवर बसवून  थॉमस म्हणाला, “बसं, मी फिशकरीला खास थॉमस-कुक टच देऊन येतो. हा गेलो.. आणि हा आलो...” असं म्हणून थॉमस स्वयंपाकघराच्या दिशेने निघून गेला.

दिपकला तो खाण्याचा वास आता सहन होत नव्हता. कधी एकदा सगळी झाकणं उघडून ताटात वाढतोय असं त्याला झालं होतं. त्याची प्रचंड चलबिचल चालु होती. शेवटी न रहावून  तो समोरच्या भांड्यावरचे झाकण उघडणार एव्हढ्यात त्याला पाठीमागे हालचाल जाणवली तसे त्याने मागे वळून बघीतले.

मागे ती मगाशी हॉटेलच्या लॉबीत भेटलेली तरुणी होती. तिला बघताच दिपक सावरून बसला.

ती तरुणी त्याच्या टेबलापाशी येऊन बसली. एक एक करत तिने भांड्यांवरील झाकणं काढून ठेवली आणि तीन ताटांमध्ये वाढायला सुरुवात केली.

“थॉमस कधी कधी अती करतो. प्रचंड भुक लागलेली असते आणि ह्याचं मात्र खास टच देणंच चालु असतं. प्रचंड चुझी आहे तो कुकींगच्या बाबतीत. एखादी गोष्ट करायचीच तर ती परफेक्टच झाली पाहीजे असं त्याचं म्हणणं असतं.”, अचानक ती तरुणी बोलली.

दिपक कसनुसं हसला, एव्हढ्यात थॉमस हातात एक गरम पातेलं घेऊन आलाच. त्याने ते पातेलं टेबलावर ठेवलं आणि म्हणाला, “ऐश करो.. अशी फिशकरी तू कध्धीच खाल्ली नसशील दावा आहे माझा..”, असं म्हणून त्याने पातेल्याचे झाकणं उघडले तसा एक मसालेदार फिशकरीचा सुगंध दिपकच्या नाकात शिरला. त्याची भुक अधिकच चाळवली गेली.

थॉमस आणि त्या तरुणीने भराभर जिन्नस ताटामध्ये वाढले आणि दोघंही जेवायला बसले.

दिपकने बटर-रोटीचा एक तुकडा फिशकरीमध्ये बुडवून  तोंडात टाकला आणि अतीवसुखाने त्याने डोळे मिटून  घेतले. थॉमस अतीरेक करत नव्हता. खरंच ती फिशकरी आऊट ऑफ द वर्ल्ड होती.

“काय? कशी झालीय?”, थॉमसच्या आवाजाने दिपक भानावर आला. “अरे जेवु देत तरी निट त्यांना आधी..”, ती तरुणी म्हणाली.

“मस्त.. खुपच छान.. खरंच अशी करी कध्धीच खाल्ली नव्हती”, दिपक म्हणाला.. “ओह.. बाय द वे.. ओळख करून द्यायचीच राहीली”, थॉमस म्हणाला, “ही स्टेफनी..माझी बायको..”, त्या तरुणीकडे बघत तो म्हणाला.

दिपकला एक क्षण ठ्सकाच लागणार होता, पण मोठ्या मुश्कीलीने त्याने आवंढा गिळला.

*ह्या असल्या गल्लेलठ्ठ, चिपचिप्या, ट्रक-ड्रायव्हर कम हॉटेलचालकाची बायको इतकी सुंदर??* दिपक विचारात बुडून गेला.

---

थॉमसची फिशकरी तर अप्रतीम होतीच, पण एकुणच स्वयंपाक मस्तच झाला होता. खुssssप दिवसांनी असं जेवण दिपकच्या नशीबी आलं होतं आणि दिपकने त्याचा पुरेपुर आस्वाद घेतला होता. जेवताना अनेकदा त्याची नजर स्टेफनीकडे जात होती. एक-दोनदा

त्यांची नकळत नजरानजर सुध्दा झाली तेंव्हा तर दिपकला मेल्याहून मेल्यासारखे झालं होतं. शेवटी उरलेले जेवण त्याने खाली मान घालुनच संपवले.

जेवण उरकल्यावर थॉमस आणि दिपक खुर्च्या टाकून समुद्रकिनारी बसले होते. मधूनच एखादी समुद्राची लाट त्यांच्या पायाला स्पर्श करून माघारी जात होत्या. स्वयंपाकघरातले आवरल्यावर सपोर्ट-स्टाफला बाकीच्या सुचना देऊन स्टेफनी सुध्दा त्यांच्याबरोबर येऊन बसली.

“दिपक फॉरेस्ट ऑफीसर आहे..”, थॉमस स्टेफनीला म्हणाला, “..आणि दिपक स्टेफनी पोर्तुगलची नागरीक आहे. ८ वर्षांपुर्वी तिच्या मित्रांबरोबर इथे आली होती. आम्ही दोघं इथे प्रेमात पडलो आणि मग स्टेफनी इथेच राहीली.

“फॉरेस्ट ऑफीसर? म्हणजे तुम्हाला वाघ किंवा इतर जंगली जनावरं नित्याचीच असतील नाही?”, स्टेफनीने दिपकला विचारले

“ओह नो.. नो.. मी साधाच फॉरेस्ट ऑफीसर आहे.. बेसिकली अनाधीकृत जंगलतोड, रानडुक्कर किंवा जंगली म्हशींची अवैध शिकार रोखण्याचे काम प्रामुख्याने माझ्याकडे असते….”, दिपक म्हणाला..

“ओह.. ओके…”, स्टेफनी..

“हम्म.. म्हणजे तसं कंटाळवाणंच काम आहे, ते काम सोडून दुसरं एखादं, काहीतरी डॅशींग, काही तरी साहसी करण्याचा खरं तर माझा विचार आहे”, दिपक

तिघांच्या गप्पा चालु होत्या इतक्या दोन हिप्पी झोकांड्या खात त्यांच्या दिशेने आले.

“हे स्टेफनी.. गिव्ह अस टु टकीलाज..”, एक हिप्पी अडखळत म्हणाला..

“प्लिज गो टु बार मिस्टर…”, बारकडे बोट दाखवत स्टेफनी म्हणाली.. “जोसेफ इज देअर, आस्क हिम..”

“नो.. नो जोसेफ.. यु गिव्ह…”, स्टेफनीशी लगट करत दुसरा हिप्पी म्हणाला…

“चार्ज अस मोर, इफ़ यु वॉन्ट.. बट यु कम विथ अस…”, पहीला म्हणाला..

दोघं जण तिच्या अधिकच जवळ आले तसं थॉमस उठून  उभा राहीला, पण तो काही बोलणार इतक्यात एकाने त्याला जोरात धक्का दिला, तसा थॉमस तोल जाऊन खाली पडला.

थॉमसला पडलेले पहाताच दिपक विजेच्या चपळाईने उठला. दोघेहीजण बेसावध होते. दिपकने उजव्या हाताची एक बुक्की दोघांच्या ही पोटात मारली. दोघंही जणांच्या डोळ्यासमोर काजवे चमकले. दिपकने त्यांना सावरायची संधी न देता खाली वाकलेल्या दोघांच्या तोंडावर आपल्या तळपायाने एक-एक लाथ लगावली. पायात बुट नसले तरी त्याचे तळपाय इतके राकट होते की दोघांच्याही तोंडावर झिणझीण्या आल्या.

फारसा प्रतिकार न करता दोघेहीजण पळून गेले.

“यु टॉट देम लेसन दॅट दे विल रिमेंबर टिल द टाईम दे आर हिअर..”, स्टेफनी म्हणाली..

तो पर्यंत कपडे झटकत, थॉमस उठून  उभा राहीला होता. “गुड वन दिपक. मला वाटलं नव्हतं तू इतका स्ट्रॉंग असशील…”

“यु बेटर बी सेफ.. ह्या लोकांचा काही भरवसा नाही, परत येतील सुध्दा”, दिपक म्हणाला..

“नो नो.. दे वोंन्ट.. सहसा असं होतं नाही, पण कधी कधी असे प्रसंग उद्भवतात. मोकळी हवा, एकांत, शराब, शवाब.. आणि त्यात ही स्टेफनी.. आहेच अशी की लोकं घायाळ होतात…”, थॉमस म्हणाला.

काही वेळ शांततेत गेला आणि मग थॉमस म्हणाला, “दिपक तू इथेच आम्हाला जॉईन का नाही करत? तसेही आम्ही कुणाच्यातरी शोधात होतोच. अश्या आगाऊ लोकांना ताळ्यावर आणणारं कोण तरी पाहीजेच इथं..”

“म्हणजे बाऊन्सर? अरे माझी शरीरयष्टी बघ, शोभतो तरी का मी?”, दिपक हसत हसत म्हणाला

“नाही रे, अगदीच काही बाऊन्सर नाही. मी म्हणलं ना, नेहमीच इथे असे प्रॉब्लेम नाही होत, बट यु न्हेवर नो. अगदीच काही तुला पाहीजे तसं काम नाहीये पण तरीही… फॉरेस्ट ऑफीसरपेक्षा वाईट नाही. पगार तर देईनच मी, शिवाय रहायची आणि जेवायची सोय आहेच.. गिव्ह इट अ ट्राय. आवडलं तर बघ..आदरवाईज यु आर फ्रि बर्ड…”, थॉमस

दिपकला तसेही दुसरं काही काम नव्हतं. इथं फारसं काही न करता रहायची, जेवायची सोय होत होती. शिवाय, हे हॉटेल तसे जगापासून थोडं दूरच होते. दिपकला निदान काही दिवस तरी लपून रहायला जागा हवी होती, ति इथे त्याला मिळणार होती. शिवाय गाठीला काही पैसेही जमणार होते.

दिपकने थोडा विचार करून आपला होकार कळवला.

---

इकडे जेंव्हा तिघांच्या गप्पा पुन्हा एकदा नेहमी सारख्या सुरु झाल्या होत्या, जेंव्हा दिपक नजर चोरून हळुच स्टेफनीकडे बघत होता तेंव्हा दूर एक निळ्या रंगाचा स्पायकर

जिन्सचा शर्ट घातलेला, काळा गॉगल आणि हातात ब्रिफकेस घेतलेला इसम, एका मटणविक्रेत्याला दिपकचा फोटो दाखवून  काही प्रश्न विचारत होता.

सर्व प्रश्नांची उत्तर मिळाल्याचे समाधान झाल्यावर तो इसम माघारी वळला. त्याने हळुवारपणे खिश्यातून एक ६” चाकु काढला आणि अचानक माघारी वळून त्या मटणविक्रेत्याच्या गळ्यावरून सपकन फिरवला आणि तेथून बाहेर पडला.

तो मटणविक्रेता मेला का हे बघायची जरुरतच त्याला पडली नव्हती. त्याला त्याच्यावर पुर्ण विश्वास होता. हाती घेतलेले काम पुर्णत्वास न्हेणारा म्हणून उगाचच तो माफीया डॉनचा आवडता जॉनी नव्हता...

पाठलाग केंव्हाच सुरु झाला होता......

दुसऱ्या दिवसाची सकाळ प्रसन्न होती. दिपक अगदी गाढ झोपला होता, जणु कित्येक दिवसांची झोप तो पुर्ण करत होता. खिडकीतून उबदार सुर्याची किरण अंगावर आली आणि खाऱ्या वाऱ्याचा एक झोक नाकात शिरला तसा दिपक जागा झाला.

त्याला पहील्यासारखेच फ्रेश वाटत होते. तो खोलीचे दार उघडून बाहेर आला. हॉटेलमधील वेटर्सची नेहमीप्रमाणे लगबग चालु होती. केसांवरून हात फिरवत तो व्हरांड्यात आला तोच थॉमसही तेथे आला. उघडाबंब आणि लाल रंगाची बर्म्युडा घातलेला थॉमस अजूनच अवाढव्य भासत होता.

“गुड मॉर्नींग दिपक, कशी झाली झोप?”, त्याने दिपकला विचारले. “मस्त.. खुप मस्त. हवेत गारठा असुनही समुद्राच्या दमटपणामुळे मस्त उबदार वाटत होते. खुपच वेळ झोपलो खरं तर..”, खजील होत दिपक म्हणाला

“असु दे.. असु दे, अजून फार काही उशीर नाही झाला, चल तुला गंमत दाखवतो..”,असं म्हणून थॉमस जवळ जवळ ओढतच त्याला बाहेर घेउन गेला.

काही अंतर चालुन गेल्यावर एक बांबुचा छोटा पुल लागला आणि तेथुनच पुढे एक चौकोनी बसण्यासाठी जागा केलेली दिपकला आढळली. ती जागा थोड्या आतपर्यंत समुद्रात गेली होती, जणु पाण्यात सुर मारायला केलेली सोयच. खाली पाण्यात अनेक हिप्पी डुंबत होते.

“काय, आली का मज्जा?”, थॉमसने दिपकला डोळे मिचकावत विचारले.

दिपकला प्रथम त्याच्या बोलण्याचा अर्थ कळाला नाही, परंतु त्याने पुन्हा एकदा पाण्यात डुंबणाऱ्या त्या तरुण-तरुणींना पाहील्यावर त्याला थॉमसची ‘मज्जा’ कळाली. ते सर्व हिप्पी, विवस्त्रावस्थेमध्ये पाण्यात पोहत होते.

"इथे सर्व फ्रि आहेत.. एकदम रॉ.. नैसर्गीक. इथं कुणाला कश्याची लाज, भिती वाटत नाही. सर्वजण इथे मोकळेपणाने विवस्त्र होतात. म्हणजे तसे गोव्याला न्युड बिच आहेतच की. पण इथे मिळणाऱ्या प्रायव्हसी मुळे एक प्रकारचा मोकळेपणा मिळतो.." थॉमस म्हणत होता.

आणि तो बोलत होता ते खरंच होतं. दिपक प्रथमच तेथे आला होता, पण त्याच्या तेथे असण्याची कुणीच दखल घेतली नव्हती.

दिपक थोड्यावेळ उन्हात पडून राहीला आणि मग तो परत आतमध्ये आला. स्टेफनीने एव्हाना सगळयांचा ब्रेकफास्ट मांडून ठेवला होता. दिपक आणि थॉमस टेबलावर येऊन बसले तसे स्टेफनी थॉमसला म्हणाली, "तुमचं चालु द्या.. मी थोडं स्विम करून येते..."

आणि आपल्या कंबरेला हेलकावे देत स्टेफनी निघून गेली.

दिपक अजूनही ती गेली त्या दिशेला पहात होता. नकळत त्याच्या मनात विचार डोकावून  गेला, "स्टेफनी सुध्दा इतरांसारखीच विवस्त्र पोहत असेल....??"

आपण उगाचच तेथून उठायची घाई केली असे त्याला वाटून  गेले. पण थोड्याचे वेळात त्याला स्वतःचीच लाज वाटली आणि तो थॉमसशी गप्पा मारत ब्रेकफास्ट करण्यात मग्न होऊन गेला.

---

दिपक आंघोळ करून त्याच्या खोलीच्या बाहेर आला तेंव्हा थॉमस हातामध्ये मोठ्ठाले रिकामे क्रेट्स घेऊन त्याच्या ट्रक्सच्या दिशेने निघाला होता.

दिपक घाई-घाईने त्याच्याजवळ गेला आणि त्याच्या हातातील काही सामान घेऊन त्याने ट्रकच्या मागच्या बाजुला ठेवले.

“चला दिपकशेठ.. आमचा दिवस सुरु झाला.. आज कोल्हापुर, निपाणीचा दौरा आहे, यायला थोडा उशीर होईल.. तुझा कामाचा पहीला दिवस.. सो... शुभेच्छा..”

असं म्हणून थॉमसने ट्रक सुरु केला आणि काही वेळातच धुळ उडवत त्याचा ट्रक वळणावरून दिसेनासा झाला. धुळ खाली बसेपर्यंत दिपक ट्रकच्या दिशेने पहात राहीला आणि मग तो पुन्हा हॉटेलमध्ये परतला.

दिपक आतमध्ये आला तेंव्हा स्टेफनी स्वयंपाकघरात काम करत होती. दिपक क्षणभर दरवाजात घुटमळला. शेवटी विचार करून तो माघारी वळला तोच स्टेफनीने विचारले,

“काही हवे होते का?”

दिपक माघारी वळला तेंव्हा स्टेफनी त्याच्याकडे निरखुन बघत होती. तिचे निळसर डोळे त्याला आकर्षीत करत होते. दिपकचा श्वास क्षणभर अडकला.

स्वतःला सावरत तो म्हणाला, “काही काम आहे का विचारायचे होते” “अं..म्हणजे थॉमसने तसं सगळं हॉटेल काल दाखवलेले आहेच, पण तरी एकदा मला वाटतं तू सर्व पुन्हा फिरून ये. प्रत्येक सेक्शनमध्ये काम करणाऱ्या लोकांना भेट, त्यांची ओळख करून घे. तुला काही हवं असेल तर बिंधास्त मागून घे.. आपलंच हॉटेल आहे.. फिल फ्रि..”

स्टेफनीने त्याचा एकेरी केलेला उल्लेख दिपकला नकळत सुखावून गेला. मान डोलावून तो निघून गेला.

दिपक दुपारच्या जेवणाच्या वेळापर्यंत हॉटेलमध्येच फिरत होता. तेथील वेटर्स, सुपरव्हायझर्स, इतर स्टाफ ह्यांच्याशी त्याने ओळखी करून घेतल्या. हॉटेलच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने काही किरकोळ बाबी त्याने नोंदवून  ठेवल्या. खरं तर त्या त्रुटींशिवायही इतके दिवस हॉटेल चालु होतेच. परंतु काही तरी काम केले हे दाखवण्यासाठी का होईना त्या गोष्टी त्याने थॉमसशी बोलण्याचे ठरवले.

दुपारच्या उन्हाच्या प्रकाशात समुद्राचे पाणी चमकत होते. सकाळी थंडगार पडलेली पांढरी शुभ्र वाळु आता पाय भाजवत होती. दिपक भरभर चालत पुन्हा स्वयंपाकघरापाशी आला. त्याने हळुच आत डोकावून  पाहीले. आत स्टेफनी नव्हती.

दिपक पुन्हा माघारी वळला आणि आपल्या खोलीत आला.

“ह्या थॉमसने स्टेफनीला कसं काय गटवलं असेल?”, राहून राहून एकच विचार दिपकच्या डोक्यात येत होता.

थॉमस कुठे आणि स्टेफनी कुठे. दोघांमध्ये काहीच साम्य नाही. बरं म्हणावं तर बक्कळ पैसाही नाही. म्हणायला हे हॉटेल आहे, पण तेवढ्यावरून स्टेफनीला त्याची भुरळ पडली असेल असं वाटत नाही.

काही वेळांतच तळलेल्या माश्यांचा वास दिपकच्या नाकात शिरला तसा दिपक खोलीच्या बाहेर आला. स्टेफनी टेबलावर डीश लावतच होती.

दिपक काही न बोलता टेबलावर जावून  बसला.

स्टेफनीने काही न बोलता दोघांच्या प्लेट्स भरल्या आणि त्याच्या समोर येऊन बसली.

दोघंही काही न बोलता जेवले. जेवतांना अनेक वेळा स्टेफनीची आणि दिपकची नजरानजर झाली. पण तेवढ्यापुरतीच.

जेवणं उरकल्यावर दिपकने प्लेट्स उचलुन स्वयंपाकघरात न्हेऊन ठेवल्या आणि तो पुन्हा आपल्या खोलीत परतला.

दिपकने स्टेफनीचा विचार पुन्हा काढून टाकायचा प्रयत्न केला. त्याने जेनी बरोबर घालवलेले शेवटचे काही दिवस आठवले. जेनी.. आज जेनी असती तर कदाचीत त्यांचे बाळ एव्हाना ह्या जगात आले असते. जेनी दिवसरात्र त्या बाळाचे करण्यात बुडून गेली असती. त्याचे रडणे, त्याचे हसणे, त्याचे गुरगुटी मारून झोपणे, जेनीच्या चेहऱ्यावरील बाळंतपणानंतरचे थकवा असुनही असलेले प्रसन्न हास्य.. सारे काही त्याने अनुभवण्याचा प्रयत्न केला.

स्टेफनी त्याच्या मनातून गेलीच होती तोच खोलीचा दरवाजा उघडण्याचा आवाज आला.

दिपक उठून  बसला. दरवाज्यामध्ये स्टेफनी होती.

“पोलिस अजूनही तुला शोधत आहेत दिपक..”, थंड आवाजात स्टेफनी म्हणाली.

दिपकच्या डोळयांवर हळुवार उतरणारी झोप खाड्कन उतरली.

“पोलिस?? मला समजलं नाही!”, दिपक म्हणाला.

स्टेफनी खोलीमध्ये आली आणि तिने दरवाजा बंद केला.

“यु आर ए सेलेब्रेटी दिपक. मी पाहीलं तुला टी.व्ही. वर. काय आहे ना, थॉमस दिवसभर बाहेर असतो. मला टि.व्ही बघण्याशिवाय वेळ घालवण्याचा पर्यायही नाही. खुप टी.व्ही बघते मी..”, चेहऱ्यावर मिस्कील हास्य आणत स्टेफनी म्हणाली.

“हे बघ.. माझ्यावर विश्वास ठेव, तो खुन माझ्याहातून नकळत घडला आहे… मी.. सगळं सांगतो तुला.. प्लिज.. ऐक माझं..”, दिपक म्हणाला..

“त्याची काही आवश्यकता नाही. आय डोन्ट केअर तू तो मर्डर खरंच केला होतास का नाही. ॲन्ड डोन्ट वरी, मी पोलिसांनासुध्दा फोन करणार नाही जोपर्यंत….”

“जोपर्यंत?? जोपर्यंत काय?”, दिपक म्हणाला…

“सोड ना ते.. कामाचं नंतर बोलता येईल. बट बिफ़ोर दॅट, आय निड अ मॅन.. आय एम अ हंन्ग्री टायग्रेस यु सी. थॉमस कान्ट प्लिज मी…. लेट्स मेक लव्ह आणि मग बोलु..”, स्वतःच्या शर्टाची बटणं काढत स्टेफनी म्हणाली…

---

दिपकला जाग आली तेंव्हा स्टेफनी खोलीत नव्हती. दिपकने कपडे घातले आणि तो बाहेर आला. स्टेफनी लाऊंज मध्ये हेड शेफशी काहीतरी बोलत होती. दिपक तेथेच घुटमळत उभा राहीला. स्टेफनीने त्याला पाहून न पाहील्यासारखे केले.

शेफला काही सुचना दिल्यावर तो निघून गेला तसा दिपक तिच्या जवळ गेला.

“तु कामाचं काही तरी बोलत होतीस..”, दिपक म्हणाला..

“अरे हो..हो.. सांगते.. घाई काय आहे? तू ही इथेच आहेस, मी सुध्दा इथेच आहे.. डोन्ट वरी. योग्य वेळ आली की मी सांगेनच.. आणि हो, प्लिज डोन्ट ट्राय टु रन अवे. निदान सध्या पोलिसांना नक्की तू कुठे आहेस हे माहीत नाही. मी एक फोन केला तर तुला ह्या भागात पकडायला फारसा वेळ लागणार नाही..” असं म्हणून स्टेफनी तेथून निघून गेली.

अनपेक्षीतरित्या दिपक अडकला होता. असं काही होईल ह्याचा त्याने विचारसुध्दा केला नव्हता. तो स्टेफनीच्या हातातील खेळणं बनला होता आणि स्टेफनीचे जे काही काम होते त्यासाठी ती दिपकचा वापर करून घेणार होती. आणि दिपकची इच्छा असो किंवा नसो, दिपक ते काम करण्यास बांधील होता.

दिपकला हे असं स्वतःचे आयुष्य दुसऱ्याच्या मर्जीवर जगणं मान्य नव्हते. कसंही करून ह्यातून बाहेर पडणं महत्वाचे होते आणि त्यासाठी त्याने स्टेफनीची पाळं-मुळं खणून काढायचे ठरवले. जसा दिपकला काही इतिहास होता, तसाच काहीसा इतिहास स्टेफनीचा असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. तसं नसतं तर ती ह्या गचाळ थॉमसबरोबर कश्याला राहीली असती.

स्टेफनी दिपकला काही करायला भाग पाडायच्या आधीच स्टेफनीला जाळ्यात पकडण्याचे दिपकने ठरवले. आणि त्यासाठी मुख्य दुवा होता थॉमस.

दिपकने खुप वेळ विचार केला आणि शेवटी त्याच्या डोक्यात एक प्लॅन तयार झाला…

थॉमस शिवाय खरं तर दीपककडे दुसरा कोणताच पर्याय नव्हता. हॉटेल मधील स्टाफशी असं अचानक स्टेफनी बद्दल बोलणे योग्य ठरले नसते. शिवाय उगाच तिला संशय आला असता तर सगळेच काम बिघडले असते.

थॉमसशी संबंध चांगले करायचे आणि हळू हळू बोलता बोलता थोडी थोडी माहित काढत जायची असा ढोबळ प्लान त्याने आखला होता.

रात्री थॉमस आल्यावर तिघेही नेहमीप्रमाणे खुर्च्या टाकून समुद्र किनारी बसले. थॉमसने येताना चीवाज-रिगलचे ३-४ बॉक्स हॉटेल मधील संपत आलेला स्टोक भरायला आणले होते, त्यातील २ बाटल्या घेऊन तो बसला होता.

गप्पांचा नेहमीचाच विषय चालला होता इतक्यात दीपकला एक कल्पना सुचली.

अचानक गंभीर होत तो म्हणाला..”थॉमस, मला तुला माझ्याबद्दल काही सांगायचे आहे. मला वाटते आपण एकत्र काम करणार तर तुझ्यापासून काही लपून राहावे असे मला वाटत नाही”

दीपकचे हे वाक्य ऐकताच स्टेफनी ताठ होऊन बसली.

“बोल ना यार.. बोल..”, दीपकच्या मांडीवर हात मारत थॉमस म्हणाला. “थॉमस, आय एम अ क्रिमिनल.. पोलिस माझ्या मागावर आहेत माझ्यावर खुनाचा आरोप आहे....”, एका दमात दीपक म्हणाला..

“काय???”, थॉमस जवळ जवळ दोन फुट खुर्चीतून उडालाच.. “हो थॉमस.. मी कोणी जंगलातील वन-अधिकारी नाही.. मी सैन्यात होतो…”, असं म्हणून दिपकने आपली सगळी हकीकत हाताचे काहीही राखीव न ठेवता थॉमसला सांगून टाकली.

बोलताना एकवार त्याने स्टेफनीकडे पाहिले. तिच्या मनातला संताप तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता

दीपकचे बोलणे झाल्यावर थॉमसने हातातला ग्लास रिकामा केला आणि तो काही क्षण डोळे मिटून शांत बसून राहिला तो प्रत्येक क्षण दीपकला युगासारखा वाटत होता. थॉमस कसा रिॲक्ट करतो ह्यावर सर्व काही अवलंबून होते.

काही वेळ शांततेत गेल्यावर थॉमस म्हणाला..”गुड दॅट यु टोल्ड मी…. दुसऱ्या कोणाकडून कळालं असतं तर कदाचीत फारसा विचार न करता मी सरळ पोलिसांनाच फोन केला असता…

मला वाटते तू योग्य तेच केलेस. आणि शेवटी तो खून तू जाणून बुजून नाही केलास.. तुझ्या हातून तो खून घडला होता.. आणि खरं तर ह्या असल्या पैश्याचा माज असणाऱ्या लोकांना कुणीतरी सरळ करायलाच हवे होते…डोन्ट वरी यु आर सेफ हिअर..”

थॉमसने पुन्हा आपला ग्लास भरून घेतला, बर्फाचे दोन मोठ्ठे खडे टाकून त्याने ऑन द रॉक्स तो ग्लास रिकामा केला आणि पुढे तो म्हणाला…”खरं तर हा गुन्हा होऊच शकत नाही. तू स्वतःला वाचवताना केलेल्या झटापटीत तो मारला गेला, तू खुनी नाहीस.. आणि जसा तू खुनी नाहीस, तशीच स्टेफनी सुध्दा खुनी नाही…”

थॉमसला हळू हळू दारू चढू लागली होती.

थॉमसच्या त्या वाक्याने स्टेफनी आणि दीपक दोघही ताडकन उडालेच..

"म्हणजे...", दीपकला अनपेक्षीतरित्या जे पाहिजे होते ते घडत होते.. "थॉमस.. इनफ, तुला जास्ती झालीय.. मला वाटते आपण आता जेऊन घेऊ.. तुला उद्या परत सकाळी जायचे असेल ना.." स्टेफनी थॉमसला थांबवत म्हणाली..

"हो.. जसा तुझ्या हातून घडला तसाच गुन्हा स्टेफनीच्या हातून सुद्धा घडला होता... मी.. मी होतो म्हणून ती वाचली, नाहीतर आज कुठल्यातरी तुरुंगात खितपत पडली असती..." थॉमस स्टेफनीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत म्हणाला.

दीपक लक्षपूर्वक थॉमसचे बोलणे ऐकू लागला.

"स्टेफनी इथे तिच्या एका हिप्पी मित्राबरोबर आली होती. मला अजूनही आठवतेय ती रात्र. मी त्या तिथे पायऱ्यांवर बसून हिशोब तपासात होतो. त्या तिथे कोपऱ्यात स्टेफनी आणि तिच्या मित्राची काहीतरी बाचा-बाची चालू होती. बहुतेक तिच्या मित्राला सुद्धा दारू चढली होती. नशेतच त्याने स्टेफनीला मारायला सुरुवात केली.

मी त्यांच्यातील भांडणे सोडवायला धावलो तो पर्यंत स्टेफनीने कडेला पडलेली बिअरची एक बॉटल फोडून हातात धरली होती. झोकांड्या खाणारा तो तिचा मित्र पुन्हा तिच्या अंगावर धावून गेला. स्टेफनीने ती बाटली त्याच्यावर उगारायला आणि तो तोल जाउन तिच्या अंगावर पडायला एकाच वेळ आली. फुटलेल्या बाटलीचे टोक त्याच्या नरडीत घुसले.. आणि.. आणि..."

थॉमसने पुन्हा आपला भरलेला ग्लास ओठाला लावला.

"ॲन्ड हि ब्लीड टू डेथ..." शांतपणे स्टेफनी म्हणाली..

काही काळ शांतता पसरली.

“मी आणि स्टेफनीने मिळून त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावली. मी ह्या प्रकरणाची कुठेही वाच्यता केली नाही. ह्या सगळया प्रकार सावरता सावरता स्टेफनी माझ्या प्रेमात पडली आणि नंतर मी आणि स्टेफनीने लग्न केले…” थॉमस

“खोट कश्याला सांगतोस थॉमस.. यु ब्लॅक्मेल्ड मी.. तू म्हणालास मी तुझ्याशी लग्न केले तर तू ह्याबद्दल कुठे बोलणार नाहीस..” जळफळत स्टेफनी म्हणाली.

“सो व्हॉट डीअर.. यु लव्ह मी.. नाही का..”, स्टेफनीच्या गोऱ्या उघड्या मांडीवरून हात फिरवत निर्लज्जासारखा थॉमस म्हणाला..

स्टेफनी ने त्याचा हात झटकला आणि ती उठून उभी राहत म्हणाली.. “मी जेवायचे घेतीय.. प्लीज फिनिश अ‍ॅन्ड कम इन्साईड…”

स्टेफनी हॉटेल मध्ये निघून गेली..आणि दीपकच्या चेहऱ्यावर एक हास्य उमटले. त्याने अपेक्षाही केली नव्हती इतक्या सहजपणे त्याला हवी असलेली गोष्ट मिळाली होती..

“लक अजून काय..” दीपक स्वतःशीच पुटपुटला.

---

दुसऱ्या दिवशी सकाळी दिपक उठला तेंव्हा थॉमस ट्रक घेउन गेला होता. दिपकने खिडकीतून बाहेर पाहीले तेंव्हा अजूनही काहीसा अंधारच होता. दिपकने शर्ट घातला आणि तो बाहेर आला.

स्टाफची सकाळची कामं चालु होती. दिपक बिचवर गेला. त्याचं अंग काहीसं आखडलं होतं. त्याने हात-पाय ताणून एक मोठ्ठा आळस दिला. निटसा व्यायाम करून त्याला

कित्येक दिवस उलटले होते. सैन्यात असताना रोजचा जो व्यायाम होता तसा बऱ्याच दिवसांत घडलाच नव्हता.

दिपकने आखडलेली मान दोन्ही बाजुंना हलवून  मोकळी केली आणि त्याने बिचवरून धावायला सुरुवात केली. समुद्रावरून येणारा खारा दमट वारा सुखावत होता. काही क्षणांतच थंडी पळून गेली. चांगली ४ कि.मी. एक मोठ्ठी राऊंड मारून तो पुन्हा हॉटलपाशी आला. समुद्राच्या लाटा जेथे किनाऱ्यापाशी येऊन माघारी फिरत होत्या तेथे जाऊन दिपकने आपले हात वाळुवर टेकवले आणि पुश-अप्स मारायला सुरुवात केली. १..२..३..५..१०.. पुर्ण मग्न होऊन दिपक पुश-अप्स मारत होता. सहज त्याच लक्ष हॉटेल्सच्या रुम्स कडे गेले तेंव्हा तेथील एक पडदा अचानक हलल्यासारखा वाटला.

“स्टेफनी??” दिपकच्या मनात विचार डोकावून  गेला.

काही वेळ त्याने अजून थोडा व्यायाम केला आणि मग तो हॉटेलमध्ये गेला.

स्टेफनी हॉटेलच्या लॉबीमधून हातात कपडे घेऊन स्विमींगसाठी जाताना त्याला दिसली. तिने मात्र दिपककडे पाहून न पाहील्यासारखे केले. जणु काही त्या दोघांची काहीच ओळख नव्हती. जणु काही त्या रात्री त्या दोघांत दिपकच्या रुममध्ये जे घडले तो खरोखरच एक ‘वन-नाईट-स्टॅंड’ होता.

दिपकने खांदे उडवले आणि तो आपल्या रुममध्ये आंघोळीसाठी गेला.

त्यानंतर दिवसभर त्याला स्टेफनी दिसलीच नाही. मग तो सुध्दा आपल्या कामात मग्न होऊन गेला.

पुढील ५-६ दिवस हाच प्रकार चालु होता. स्टेफनी आणि दिपकची फारशी भेट होतच नसे आणि झालीच तरी स्टेफनी त्याला नजरेआड करून निघून जाई.

थॉमसच्या नजरेतुनही हा प्रकार सुटला नाही. एकदा त्याने दिपकला विचारलेसुध्दा,

“काय रे, तुझं आणि स्टेफनीचं काही बिनसलं आहे का? नाही म्हणजे काही चावटपणा तर नाही ना केलास तिच्याबरोबर???”

परंतु दिपकने त्याचं म्हणणं हसण्यावारी न्हेलं.

पुढचे काही दिवस कामातच घालवले. आपल्या फावल्या वेळात आपल्या सैनिकी शिक्षणाचा अनुभव लावून त्याने अप्लाईन टॉवर, आर्मी ऑब्स्टॅकल्स, रोप ब्रिज, रॅप्लींग सारख्या काही फन ॲक्टीव्हीटी बिचवर तयार केल्या. त्यासाठी लागणारं साहीत्य त्याने जवळच असलेल्या झाडांची लाकड, हॉटेल मध्ये पडून असलेले रोप्स वगैरे वापरून तयार केले. त्याला असलेल्या ज्ञानाचा वापर करून इतर सेफ्टी हार्नेससुध्दा बनवले. पडून असलेले जुनाट टायर्स, लोखंडी पाईप्स त्याने ब्राईट रंग देऊन नव्यासारखे बनवले.

अर्थातच हा नविन प्रकार हिप्पी लोकांना भलताच पसंद पडला. सर्वजण मोठ्या प्रमाणात त्याचा आनंद घेऊ लागले.

थॉमस अर्थातच ह्या प्रकारांमुळे अधिकच खुश झाला.

---

थॉमस गेल्यावर एकदा सकाळी दिपक किचनमध्ये स्वतःसाठी चहा बनवत होता. गरम चहा कपात ओतून तो माघारी वळला आणि क्षणभर दचकलाच.

किचनच्या दारामध्ये स्टेफनी त्याच्याकडे रोखुन पहात उभी होती. तिने केशरी रंगाची स्लॅक पॅन्ट आणि पांढऱ्या रंगाचा डेनीम शर्ट घातला होता. शर्टाच्या दोन उघड्या बटनांमधून ख्रिश्चनालिटीवर तिची श्रध्दा दर्शवणारा डायमंडचा क्रॉस चमकत होता.

काही क्षण शांततेत गेली आणि अनपेक्षीतपणे स्टेफनीच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. दिपक तिच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून अचंबीतच झाला.

त्याच्याकडे दुर्लक्ष करून स्टेफनी म्हणाली, “मला वाटतं झालं गेलं आपण विसरून जावू. शेवटी दोघांनाही इथेच, एकत्र काम करायचे आहे..सो उगाच ही अढी कश्याला नाही का?”

दिपकने काही न बोलता मान डोलावली.

“बाय द वे, हे अॅडव्हेंचर गेम्स मला खुप आवडले. माझ्याकडे अजून काही आयडीया आहेत ज्या मला तुझ्याशी डिस्कस करायच्या आहेत. व्हाय डोंन्ट यु अॅन्ड मी टेक अ जकुझी बाथ इन माय बाथरुम अॅन्ड देन डिस्कस मोर ऑन धिस?”

दिपकच्या उत्तराची वाट न पहाता स्टेफनी तिच्या रुममध्ये निघून गेली.

दिपकने कसलीही घाई न करता हातातील चहा सावकाश घोट घेत संपवला.

“इफ़ शी हॅज टु वर्क विथ मी, देन धिस बिच शुड लर्न तो बिहेव्ह फर्स्ट...”, दिपक मनातल्या मनात म्हणाला आणि मग सावकाश पावलं टाकत तो स्टेफनीच्या रुममध्ये गेला.

दिपक स्टेफनीच्या केसांमधून हात फिरवत तिच्या अलिशान बेडवर पहुडला होता.

“माझा इतिहास तर तुला माहीती आहे.. पण तुझ्याबद्दल मला काहीच माहीत नाही..”, दिपक स्टेफनीला म्हणाला..”आय मीन यु अ‍ॅन्ड थॉमस…”

“माझं आणि थॉमसचं लग्न कसं झालं हे तर तुला माहीतीच आहे. त्या प्रकरणानंतर एकदा गोड बोलुन थॉमसने माझा पासपोर्ट-व्हिसा काढून घेतला. आजपर्यंत तो त्याने कुठे लपवून  ठेवला आहे हे मला माहीत नाही. त्याला सोडून पळून गेले तर नविन पासपोर्ट यायच्या आत तो मला पोलिस कोठडीत पाठवायची व्यवस्था करेल हे नक्की.

फ़ेक पासपोर्ट कसा कुठून  काढायचा हे सर्व मी शोधुन ठेवलं आहे. पण त्याला पैसे खुप लागतील. थॉमस माझ्या हाती एक रुपया लागून देत नाही. पैश्याचे सर्व व्यवहार तोच बघतो. त्याच्या हातातील एक बाहुली बनुन राहीली आहे मी…”.स्टेफनी सांगत होती.

“पण मग आता? तुला माझी काय मदत हवी आहे?”, दिपकने विचारले.

स्टेफनीने काही क्षण त्याच्याकडे रोखुन पाहीले आणि मग ती म्हणाली, “थॉमसकडे खुप पैसा आहे जो त्याने इथेच हॉटेलमध्ये कुठेतरी लपवून  ठेवला आहे.

थॉमसचे एक स्वप्न आहे.. बोटीतून जगप्रवास करायचा. तो जे काही कमावतो ते सगळं हेच स्वप्न पुर्ण करण्यासाठी..”

“बोटीतून जगप्रवास….”, दिपक स्टेफनीच वाक्य तोडत हसत म्हणाला..”मला वाटतं त्याला त्याची ४-५ आयुष्यं तरी खर्ची करावी लागतील तितका पैसा जमवण्यासाठी..”

“..म्हणजे?? थॉमसने तुला काहीच सांगीतले नाही तर…” स्टेफनी म्हणाली.. “नाही.. कश्याबद्दल बोलते आहेस तु??”, दिपक

“दिपक.. थॉमस इज अ ड्रग डिलर..तो ह्या ज्या ट्रकने फेऱ्या मारत असतो तो सगळा दिखावा आहे. खरं तर त्याच्या आडून तो ड्रग्सचे ट्रॅफीकींग करतो... उगाच नाही हे हॉटेल सदैव हिप्पींनी तुडूंब भरलेले असते...”, स्टेफनी म्हणाली.

“आय डोन्ट बिलीव्ह धिस..” बेडमधून उठत दिपक म्हणाला

“तुझा विश्वास असण्या, नसण्याचा प्रश्नच येत नाही.. आस्क मी.. मी इथे का आले? कारण मला माहीती होतं की इथे ड्रग्सची विक्री होते म्हणून.. आजही मला ड्रग्स थॉमसकडुनच मिळतात दिपक..”

“पण.. पण हे इतकं ओपनली माहीती आहे तर पोलिसांनी कसं काही केलं नाही”, आश्चर्यचकीत होत दिपक म्हणाला..

“कुठल्या जमान्यात आहेस तू दिपक? वरपासून खालपर्यंत सर्वांना हप्ते पोहोचतात.. कश्याला कोण काय करेल? थॉमसकडे निदान २-४ कोटी रुपये कॅशमध्ये आहेत हे मी शपथेवर सांगु शकते. उगाच एन्क्वायरी नको म्हणून तो हे पैसे बॅंकेत भरत नाही..

जर.. जर ते पैसे मला मिळाले ना दिपक.. आपल्याला मिळाले ना...”

शुन्यात नजर लावून  स्टेफनी बोलत होती..

“तर काय स्टेफनी??”

“आपण.. आपण दोघंही नकली पासपोर्ट काढून इथून पळून जावु.. माझ्या देशात... कसं ते तू माझ्यावर सोड.. तेथे तुझ्या मागे कुणाचाही ससेमिरा नसेल.. जेथे माझ्यावर कोणतेही बंधन नसेल.. बोथ ऑफ अस विल बी फ्री बर्ड्स.. फ्रि लव्ह बर्ड्स... वुई विल लिव्ह आवर लाईफ.. द वे वुई वॉन्टेड.. द वन वुई अल्वेज ड्रिम्ड ऑफ.. बोल करशील मला मदत?” स्टेफनी आशाळभुत नजरेने बोलत होती.

***दोन आठवड्यांनंतर.......***

पहाटेची ५:३०ची वेळ होती. इतक्यात दिपकच्या दारावर जोरजोरात थापा वाजल्या. दिपक खडबडून जागा झाला. त्याने खोलीतला दिवा लावला आणि दार उघडले. बाहेर स्टेफनी उभी होती. तिचा चेहरा घामाने डबडबला होता.. भितीने तिचा चेहरा पांढराफटक पडला होता..

“स्टेफनी?? काय झालं?”, दिपकने विचारले..

“काय झालं? यु स्टुपीड, इडीयट.. मोरॉन... आरे आधी सांगायचेस तरी मला.. इथे.. इथे करायची काय गरज होती?”, स्टेफनी शब्द जुळवीत म्हणाली..

“काय बोलते आहेस तु? जरा निट सांगशील का?”, दिपक आवाज चढवत म्हणाला..
“श्शु sss.. मुर्खा थॉमसचा खुन कश्याला केलास????”, स्टेफनी दबक्या आवाजात म्हणाली..

दिपकचे डोळे तिच्या वाक्याबरोबर विस्फारले गेले....

“काय??? थॉमसचा खुन???.. मी कश्याला करु थॉमसचा खुन??”, दिपक पुन्हा ओरडत म्हणाला..

स्टेफनीने त्याच्या तोंडावर हात ठेवला..

“हळु बोल म्हणलेले कळत नाहीये का तुला?..” स्टेफनीने इकडे तिकडे पाहीले. बाहेर अजून सामसुमच होती.

“चल माझ्या बरोबर..”, दिपकचा हात ओढत ती त्याला म्हणाली.

दिपक बधीरावस्थेत तिच्यामागोमाग थॉमसच्या रुम मध्ये गेला.

स्टेफनीने पुन्हा एकवार कोणी नाहीये याची खात्री करून घेतली आणि दिपकला घेउन ती खोलीत गेली.

खोलीत मिट्ट काळोख होता. स्टेफनीने दार लावून घेतले आणि मग खोलीतला दिवा लावला.

थॉमसचा उघडाबंब अवाढव्य देह त्याच्या बेडवर अस्ताव्यस्त पडला होता. त्याच्या छातीमध्ये पार आतपर्यंत खुपसलेला एक भला मोठ्ठा सुरा तसाच रुतलेला होता.

भुत बघीतल्यासारखा दिपक त्या दृश्याकडे पहात राहीला.

“मुर्ख आहेस तु.. आता ह्याची विल्हेवाट कशी लावायची. इतकी काय घाई झाली होती तुला?”, स्टेफनी म्हणाली.

“मुर्ख तू आहेस. मी कश्याला मारु थॉमसला. उलट त्याने मला इथे लपून रहायला जागा दिली. मला पोलिसांपासून संरक्षण दिले. मी कश्याला माझ्याच पायावर कुऱ्हाड मारून घेऊ?”, दिपक

“कश्याला म्हणजे.. पैश्यासाठी.. तुला पैश्याचा मोह सुटला होता.. तुला माझ्याबरोबर दुसऱ्या देश्यात पळून जायची घाई झाली होती म्हणून..”, स्टेफनी..

“मग हिच कारणं तुझ्यासाठी सुध्दा लागु पडतात स्टेफनी..”, चिडून दिपक म्हणाला..”कश्यावरून तुच हा खुन नाही केलास???”

“खुन करायचाच असता तर मी ७-८ वर्ष कश्याला थांबले असते.. केंव्हाच त्याला मारून पळाले असते.. आणि हे बघ..” थॉमसच्च्या छातीकडे बोट दाखवत स्टेफनी म्हणाली..”हा सुरा बघ किती आतपर्यंत घुसला आहे. तुला वाटतं इतकी ताकद माझ्यामध्ये आहे? नक्कीच हा खुन करणारा कोणीतरी ताकदवान असणार…”

“म्हणून मी?.. बिनडोक आहेस.. मी हा खुन केलेला नाहीये. आधीच एका खुनापासून वाचण्यासाठी मी ठिकठिकाणी लपतोय.. त्यात अजून एक खुन डोक्यावर घ्यायला मी काय च्युx आहे का??”, दिपक

“हा खुन तू नाही केलास, मी सुध्दा नाही केला.. मग केला कोणी???”, स्टेफनी
“हे बघ.. तो विचार करायची ही वेळ योग्य नाही.. आधी थॉमसला इथून हलवायला हवे…”,

दिपक थॉमसच्च्या बॉडी शेजारी जाऊन उभा राहीला.. छातीतून ओघळणारे रक्त पोटावरून बेडशिटवर येऊन साकळले होते.

“साधारण ३-४ तासांपुर्वी हा खुन झाला असावा…हे रक्त बघ.. बऱ्यापैकी वाळलं आहे..”, दिपक

“व्वं.. ते जाऊ देत.. आधी ह्याचं काय करायचे ते सांग..”, वैतागून स्टेफनी म्हणाली.

“तीन-चार दिवस थॉमस नाही दिसला तर लोकं नक्की विचारतील.. थॉमस कुठेतरी बाहेर गावी गेला आहे आणि किमान महीनाभर तरी परतणार नाही अस्ंच काहीसं सांगावं लागेल…”, दिपक म्हणाला..

“अरे पण एक महीना खुप वेळ आहे.. आणि तो पर्यंत हॉटेलचे भागवायचे कसे? सामान आणायला, लोकांचे पगार, इतर किरकोळ खर्च.. पैसे लागणारच की. आणि बॅंकांचा सगळा व्यवहार फक्त थॉमसच्या सहीनेच होतो.. पैसा आणायचा कुठुन?”, स्टेफनी..

“हे बघ.. ते बघु नंतर सध्या तरी मला हा एकच पर्याय सुचतो आहे.. तुला दुसरे काही सुचत असेल तर सांग..”, दिपक

स्टेफनीला दुसरे काहीच सुचत नव्हते..

“अरे पण महीनाभर? असं कुठलं काम असेल ज्यासाठी थॉमसला महीनाभर जावं लागेल?… आणि ड्रग्स? त्याचं काय ड्रग्स नाही मिळाले तर ही लोकं सैरभैर होतील.. उगाच काहीतरी नाटकं व्हायची…”, स्टेफनी

“दुसरा पर्याय नाही स्टेफनी.. सांगायचं काही तरी कारण…”, विचार करत दिपक म्हणाला.. “सांगायचं की कुठे तरी एक हॉटेल विकायचे आहे त्याचा व्यवहार करायला गेला आहे… मे बी.. कुठे तरी नॉर्थ साईडला.. सो त्याला यायला वेळ लागेल. एक महीना भरपुर वेळ आहे.. सगळं स्थिरस्थावर व्हायला. आपल्याला तो पर्यंत पुढे काय ह्याचं उत्तर शोधता येईल..” दिपक

“गुड आयडीया.. पण ह्याचं”

“तु म्हणाली होतीस तुमच्याकडे एक छोटी लॉंच आहे म्हणून..”

“हो आहे…”

“मग ह्याला जलसमाधीच द्यावी लागेल.. कारण रस्त्यावर कुठेही टाकून हा सापडला तर प्रकरण नव्याने उगवेल.. समुद्राच्या तळाशी पडलेला थॉमस कुणाला सापडणार नाही..”

“ठिक आहे.. चल तर मग..”, स्टेफनी आपले विस्कटलेले केस बांधत म्हणाली. “आत्ता? वेडी आहेस का? बाहेर बघ.. पहाट व्हायला आली आहे.. लॉंच काही खोलीच्या दारापर्यंत येणार नाहीये.. सपोर्ट स्टाफची गडबड चालु आहे. आपल्याला नक्की कोण तरी पाहील..”, दिपक

“मग????”

“मला विचार करायला थोडा वेळ हवाय.. मी करतो काही तरी प्लॅन..”, दिपक “अरे पण तेवढ्यात कोणी आतमध्ये आलं तर??”

“नाही येणार… तू जो पर्यंत काही प्लॅन ठरत नाही तो पर्यंत इथेच थांब.. आणि बाहेर फोन करून सांग की तुझी तब्येत ठिक नाहीये… सो कोणी तुला डिस्टर्ब करु नये..”

“काय? नाही मी इथे.. इथे एकटी नाही थांबणार..” स्टेफनी थॉमसच्या प्रेताकडे पहात म्हणाली..

“एकटी कुठे आहेस तू स्टेफनी.. थॉमस आहे ना बरोबर.. हे बघ वेळ फार थोडा आहे.. डोन्ट वरी.. तू दार बंद करून घे.. मी पटकन काही तरी ठरवतो..”

स्टेफनीला बोलायचा चान्सच न देता दिपक खोलीबाहेर पडलासुध्दा..

स्टेफनीने खोलीचे दार लावून घेतले. तिची माघारी वळून थॉमसच्या प्रेताकडे बघायची हिम्मतच होत नव्हती. ती तेथेच खोलीच्या दाराशी गुडघ्यात मान घालुन बसली.

दिपक आपल्या खोलीत परतला. झालेल्या घटनांवर त्याचा अजूनही विश्वास बसत नव्हता. ‘थॉमसचा खुन कोणी केला असेल??’ एकच प्रश्न त्याच्या डोक्यात राहून राहून येत होता.

स्टेफनीने स्वतःहून हा खुन केला असेल असे त्याला वाटत नव्हते. ज्या प्रकारे आणि ज्या ताकदीने तो सुरा थॉमसच्या छातीत घुसला होता त्यावरून स्टेफनीसारखी नाजुक स्त्री हे काम करु शकेल असे त्याला वाटत नव्हते.

कदाचीत स्टेफनीने दुसऱ्या कुणाच्यातरी मदतीने हे केले असण्याचीच शक्यता अधिक होती.

अर्थात हा विचार नंतरही करता येण्यासारखा होता. सर्वात प्रथम थॉमसच्या प्रेताची विल्हेवाट कशी लावायची ह्याचा विचार करणे अधिक महत्वाचे होते.

विचार करून करून दिपकचे डोकं फुटायची वेळ आली होती. अनेक पर्याय त्याने तपासून पाहीले परंतु कुठलाच पर्याय त्याला पसंद पडत नव्हता. त्यात थॉमस म्हणजे अगडबंब देह, तो सहजासहजी न्हेणं मुश्कीलीच होतं.

घड्याळात दहा वाजून गेले तसं दिपक खोलीच्या बाहेर पडला. स्टेफनी त्या बंद खोलीत थॉमसच्या प्रेताबरोबर कसा वेळ घालवत असेल असा एक विचार त्याच्या डोक्यात येऊन गेला.

दिपक लॉऊंजमध्ये आला. सहजच म्हणून त्याने एका वेटरला विचारले.. “स्टेफनी मॅडम कुठे आहेत? थोडं काम होतं माझं..”

तो वेटर म्हणाला.. “मॅडमची तब्येत बरी नाहीये.. त्या खोलीतच झोपून आहेत.. कुणी डिस्टर्ब करु नये म्हणून सांगीतले आहे…”

दिपकने मान डोलावली आणि तो बाहेर आला.

स्टेफनीला एकटं खोलीत सोडून ४ तास होऊन गेले होते. तिची परिस्थिती दिपकला समजत होती म्हणून एक तिला धावती भेट देऊन यायचं ठरवले आणि तो तिच्या खोलीकडे गेला. दारावर एकदा वाजवताच स्टेफनीने दार उघडले. दारात दिपकला बघताच तिने त्याला घट्ट मिठी मारली.

बावचळलेल्या दिपकने तिला आत ढकलुन दार लावून  घेतले.

“काय करते आहेस तू स्टेफनी…??”

“प्लिज.. मला इथून बाहेर काढ दिपक.. वेड लागेल मला इथे..”

“हो.. हो.. माहीती आहे मला.. पण काही योग्य मार्ग तर सापडला पाहीजे..” दिपक तिला समजवत म्हणाला..

“आय डोन्ट केअर… चल पळून जाऊ इथुन.. राहु देत ही बॉडी इथेच.. जो पर्यंत कळेल तो पर्यंत आपण इथून खुप लांब निघून गेलो असु..”, इंपेशंट होत स्टेफनी म्हणाली..

“डोन्ट ॲक्ट स्ट्युपीड.. आपण लगेच पकडले जाऊ….”.. दिपक थॉमसच्या डेड बॉडी जवळ जात म्हणाला. त्याने थॉमसचा हात दाबून बघीतला आणि म्हणाला..” तसंही आपल्याला जास्त वेळ घालवून  चालणार नाहीये.. बॉडी कडक व्हायला लागली आहे.. आधीच ह्याला हलवणं कठीण. बॉडी कडक आणि जड झाली तर अजून प्रॉब्लेम्स वाढतील…”

स्टेफनी अजूनही दरवाज्याकडेच तोंड करून उभी होती. दिपक तिच्या जवळ गेला..

“हे बघ.. मला अजून एक तास दे.. त्याच्या आत नक्कीच काही ना काहीतरी मार्ग काढेन..” असं म्हणून तो खोलीतून बाहेर पडला. स्टेफनीने दार लावले आहे ह्याची त्याने एकदा खात्री केली आणि तो बाहेर बागेत आला.

दिपकचा धीर आता सुटत चालला होता. स्टेफनी म्हणत होती तसं सकाळीच बॉडी हलवली असती तर बरं झालं असतं असं त्याला वाटायला लागले होते. रिस्क होती.. पण उलटणाऱ्या वेळेबरोबर रिस्क अधिकच वाढत चालली होती. बॉडी कुजायला लागली आणि त्याचा दुर्गंध बाहेर आला तर पंचाईतच होणार होती.

दिपक आपल्याच विचारात मग्न होता इतक्यात मागून एक हाक ऐकु आली.. “एस्क्युज मी…”

दिपक मागे वळला आणि समोर उभ्या असलेल्या त्या व्यक्तीला पाहून त्याच्या पायाखालची जमीनच सरकली…

“तु???”.. दिपक त्या व्यक्तीकडे पहात म्हणाला…..

युसुफला समोर बघून दिपकला आश्चर्याचा धक्काच बसला होता. खुप दिवसांनी एखादा जुना मित्र भेटावा तसं दिपकने युसुफला कडकडून मिठी मारली. त्या दिवशी जंगलात चुकामुक झाल्यावर दोघंही एकमेकांना भेटलेच नव्हते. युसुफचं पुढे काय झालं? तो पोलिसांच्या हाती लागला?, का त्यांच्या गोळीने मारला गेला?, का तो सुध्दा दिपकसारखा पळून जाण्यात यशस्वी झाला ह्याची काहीच कल्पना त्याला नव्हती.

“कहा था यार तु?”, दिपक युसुफला म्हणाला..

“दुनिया छोटी है भाई!! वाटलं नव्हतं परत तुला भेटेन म्हणून..”, हसत हसत युसुफ म्हणाला..

“खरंच, मलाही वाटलं नव्हतं की इतक्या लवकर तुला भेटु शकेन..”, दिपक म्हणाला..

“अरे पण तू इथं कुठे?”, युसुफने मॉटेलकडे हात दाखवत विचारले, तसं दिपकला स्टेफनी, थॉमसची आठवण झाली. युसुफला बघून काही क्षण का होईना, तो सगळं विसरला होता. तो ज्या प्रसंगात सापडला होता त्याची आठवण होताच दिपकच्या चेहऱ्यावरील भाव अचानक बदलले..

“काय रे? काय झालं? काही प्रॉब्लेम आहे का?”, युसुफने विचारले. “हम्म.. चल आतमध्ये चल, तुला सगळं सांगतो”, असं म्हणून दिपक युसुफला त्याच्या खोलीमध्ये घेउन गेला.

युसुफला काय सांगावे ह्यावर दिपकच्या मनामध्ये काही क्षण चलबिचल झाली. शेवटी युसुफ एक कैदी होता. आणि त्याच्यावर कितपत विश्वास ठेवावा असा काहीसा विचार त्याच्या मनात येऊन गेला. पण त्याच्याकडे दुसरा पर्यायसुध्दा नव्हता. ह्या बिकट प्रसंगात कोणी त्याला मदत करु शकत होता तर तो फक्त युसुफच होता.

पुढच्या १०-१५ मिनिटांमध्ये दिपकने घाई-गडबडीमध्ये जितके सांगता येईल तितके युसुफला ब्रिफ केले..

“सो.. थॉमसची बॉडी अजूनही इथेच, त्याच्या खोलीत आहे?” हनुवटीवरून हात फिरवत युसुफने विचारले.

“हम्म.. आणि अजून तासाभरात त्याला इथून नाही हलवला तर तो अजून जड होईल आणि शिवाय दुर्गंधी पसरण्याची भिती आहेच..”, दिपक म्हणाला.

“फिकर नॉट, मी काढतो तुला बाहेर ह्यातुन..”, चेहऱ्यावर हास्य आणत युसुफ म्हणाला..

“खरंच?? पण कसं?”, दिपक

युसुफने खिश्यातून एक व्हिजीटींग कार्ड काढून दिपकसमोर धरले.

“ए-१ क्लिनींग सर्व्हिसेस”, कार्डवर सोनेरी अक्षरात एक नाव झळकत होते. दिपकने प्रश्नार्थक नजरेने युसुफकडे पाहीले.

“माझ्या एका अंकलची ही सर्व्हिस कंपनी आहे. जेलमधून पळाल्यावर मी त्याच्याकडेच जाऊन लपलो होतो. ही कंपनी इथल्या हॉटेल्समधून अत्यल्प दरात जुने मोडके सामान, भंगार गोळा करते. महीन्यातून एकदा आमची व्हॅन इथल्या हॉटेल्सना भेट देत असते. हे हॉटेल्स आमच्या सर्व्हिस-लिस्ट मध्ये आहे म्हणून आज मी आलो होतो.”, युसुफ म्हणाला

“आलं लक्षात…” दिपकचा चेहरा आनंदाने उजळला.. “आमच्याकडे काही जुन्या मोठ्या लाकडाच्या ट्रंक्स आहेत.. त्यातील एका ट्रंक मध्ये थॉमसला भरून आपण न्हेऊ शकतो, आणि कुणाला कळणार सुध्दा नाही..”

“करेक्ट.. आणि नंतर देऊ त्याला समुद्रात फेकुन.. फिशची पार्टी आज..”, युसुफ दिपकला टाळी देत म्हणाला.

“बिंगो.. चल तर मग, भरु त्याला ट्रंक मध्ये…”, दिपक खुर्चीतून उठत म्हणाला.. “अरे बसं यार.. जरा दारु बिरु पाज मला.. थॉमसची काळजी तू नको करु, आपली पोरं आहेत व्हॅन मध्ये, ते सगळं साफ करतील..”, युसुफ..

“पण.. “, साशंकतेच्या स्वरात दिपक म्हणाला..

“डोन्ट वरी.. आपल्या मर्जीतील पोरं आहेत.. डोळे झाकून विश्वास ठेव.. फक्त त्यांना रुम दाखव कुठली ते.. बाकीचं ते सगळं बघून घेतील…”, युसुफ

“ठिक आहे.. मी स्टेफनीला सांगतो..”, असं म्हणून दिपक उठला.. रुममधल्या छोट्याश्या फ्रिजमधून त्याने थंडगार बिअरची एक बाटली काढून युसुफसमोर ठेवली आणि तो बाहेर पडला..

---

अर्ध्या-पाउण तासांनी घामेजलेला एक पोरगा दीपकच्या रूम मध्ये आला. युसुफ कडे बघत तो म्हणाला, “माल लोड हो गया भाई”

“और बाकीकी सफाई?”, युसुफ

“एक दम चकाचक. किसीको रहने दिया तो समझेगा भी नही यहा मर्डर हुआ था। “

युसुफने बिअरची बाटली रिकामी केली आणि तो उठून उभा राहीला.. “चलो.. निकलता हु मै !!.. भेटु परत..”, हात पुढे करत तो दिपकला म्हणाला

“अरे… थांब.. स्टेफनीला भेटून तरी जा..”, दिपक

“परत कधी.. आधी आपल्या मित्राला समुद्रात पोहोचवून येतो, मग भेटुच निवांत.. खुदा हाफीज..”..

दिपक खोलीच्या बाहेर येई पर्यंत युसुफ निघून गेला होता.

दिपक काही वेळ धुळ उडवत जाणाऱ्या त्याच्या व्हॅनकडे पहात राहीला आणि मग त्याने एक मोठ्ठा सुटकेचा निश्वास सोडला.

दिपक माघारी वळला आणि तडक स्टेफनीच्या खोलीमध्ये गेला. खोली रिकामी होती. युसुफच्या पोरांनी मस्त काम केलं होतं. फ्लोरींग, कार्पेट, बेड सगळं काही स्वच्छ चकाचक होतं. रक्ताच्या थेंबाचाही लवलेश नव्हता. विखुरलेल्या वस्तु जागच्या जागी होत्या. जणु काही इथे काही घडलेच नव्हते.

बाथरुममधून शॉवरचा आवाज येत होता. दिपक पुन्हा आपल्या खोलीत आला. थंडगार पाण्याने आंघोळीची त्याला सुध्दा गरज वाटत होती. त्याने कपडे उतरवले आणि गार पाण्याच्या शॉवरखाली जाऊन तो उभा राहीला.

न जाणो कित्ती वेळ.. दिपकचे आखडलेले स्नायु गार पाण्याच्या स्पर्शाने मोकळे झाले. स्ट्रेस्ड झालेले त्याचे मन हळु हळु पुर्ववत झाले.

त्याने शॉवर बंद केला आणि तो बाहेर आला. कपडे करून तो खोलीच्या बाहेर आला तेंव्हा लाऊंजमध्ये स्टेफनी कॉफीचा गरम कप घेऊन टी.व्ही समोर बसली होती. टी.व्ही. वर नेहमीचेच काही तरी रटाळ कार्यक्रम चालु होते. स्टेफनीचेही तसे टि.व्ही.कडे फारसे लक्ष नव्हते पण मन हलके होण्यासाठी टि.व्ही नक्कीच उपयोगी होता. अर्थात पहील्यापेक्षा तिचा चेहरा बराच फ्रेश वाटत होता. दोघांची नजरानजर होताच दोघांच्याही चेहऱ्यावर एक मंद हास्य पसरले.

दिपक स्टेफनीच्या समोरच्या खुर्चीत जाऊन बसला.

“यु ओके?”, काही वेळ गेल्यावर दिपक म्हणाला..

“हम्म..”, स्टेफनी… काही वेळ गेल्यावर ती म्हणाली, “हा जो कोणी युसुफ होता.. ट्रस्टेड आहे ना?”

“डोन्ट वरी.. चांगला माणूस आहे तो…”.. दिपक..

“हा फारच योगायोग होता. थॉमसचा खुन काय होतो.. आपण त्यात अडकतो काय, सुटकेचा मार्ग दिसत नसतानाच तुझा हा मित्र.. युसुफ अचानक कुठून  तरी येतो काय.. आणि आपण क्षणार्धात सर्व संकटातून मोकळं होतो काय… आय एम टेलींग यु दिपक.. आय डोन्ट लाईक कोईन्सीडन्स…”, स्टेफनी..

“डोन्ट बी पॅरॅनॉईड.. सगळं काही ठिक होईल..”, दिपक म्हणाला

---

टाईम हिल्स एव्हरीथींग… आयुष्य पुर्वपदावर येत होते. दिपक आणि स्टेफनी जणु काही झालेच नाही अश्या अविर्भावात दिवस ढकलत होते.

एक दिवस स्टेफनीने विषय काढला, “दिपक, आपला मॅनेजर विचारत होता थॉमस सर कधी येणार आहेत? बॅंकेतून काही पेमेंट्स करायची आहेत. थॉमसचे काही चेक्स सही केलेले होते त्यामुळे आत्तापर्यंत भागले.. पण आज ना उद्या आपल्याला थॉमसबद्दल उत्तर द्यावेच लागणार आहे..”

दिपकचा हा विषय नावडता होता. शक्यतो तो हा विषय.. त्याबद्दलचा विचार तो पुढे ढकलण्याचा प्रयत्न करत होता.. पण आज ना उद्या ह्या प्रश्नाची उकल करावी लागणार हे ही त्याला माहीत होते.

“हम्म.. मला एक-दोन दिवस दे.. मी काही तरी विचार करून सांगतो..”, दिपक म्हणाला..

त्या दिवशी संध्याकाळी तो संगणकावर बसून बरीच शोधाशोध करत बसला. विवीध बातम्यांच्या संकेतस्थळं तो धुंदाळत होता. शेवटी दोन-तीन दिवसांनंतर त्याला हवी अशी एक बातमी सापडली तसे त्याने स्टेफनीला खोलीत बोलावून घेतले.

"एक मार्ग सापडला आहे..", स्टेफनीला बेडवर बसवत दिपक म्हणाला...

"काय?", स्टेफनी

"खरं तर हा प्लॅन माझा नाही, काही दिवसांपुर्वीच टि.व्ही.वर एका क्राईम-स्टोरी मध्ये एक भाग बघीतला होता. गोष्ट खुप वर्षांपुर्वीची होती. पण आपल्याला अगदी योग्य अश्शीच आहे. आपण त्या प्लॅननुसार गेलो आणि त्यात दाखवलेल्या चुका केल्या नाहीत तर सर्व काही सुरळीत पार पडेल..", दिपक

"......"

"हे बघ.. ही बातमी वाच..", दिपकने आपल्या संगणकाची स्क्रिन स्टेफनीकडे केली.. दिल्लीतील कुठल्याश्या वृत्तपत्र संस्थेच्या पेपरचे ते एक पान होते. एका कोपऱ्यातील एका बातमीवर बोट ठेवत दिपक म्हणाला...

दिल्लीजवळील कोण्या एका गावात झालेल्या एका अपघाती मृत्युची ती बातमी होती. मयत व्यक्तीची ओळख पटली नव्हती आणि पोलिसांनी नातेवाईकांना आवाहन केले होते की एका आठवड्याच्या आत ओळख पटवून मृतदेह ताब्यात घ्यावा.

स्टेफनीने बातमी पुर्ण वाचली आणि मग ती दिपकला म्हणाली..."मला नाही कळालं.. ह्याचा आपल्याशी काय संबंध...?"

"अगं असं काय करतेस.. हा फोटो पाहीलास? ही व्यक्ती बघ ना थॉमससारखीच आहे. जाड जुड.. भले मोठ्ठे पोट, टक्कल...", दिपक म्हणाला..

“असेल.. मग?”, स्टेफनी..

“मग? आपण हा मृतदेह थॉमसचा आहे म्हणून ताब्यात घ्यायचा.. तसेही थॉमस एका नविन हॉटेलच्या खरेदीसाठी नॉर्थला कुठे तरी गेला आहे असे आपण सांगीतले आहे. तिकडेच त्याचा अपघाती मृत्यु झाला म्हणून घोषीत करायचे.. हा मृतदेह घेऊन आपण तेथेच त्याचे अंत्यसंस्कार करायचे आणि थॉमसच्या नावाने आपण डेथ-सर्टीफिकेट मिळवायचे. एकदा का थॉमस ऑफीशीयली मृत्यु पावला की मग त्याचे बॅंकेचे अकाऊंट्स आणि इतर अधीकार आपल्याला घेता येतील..”, दिपक

“अरे पण.. ओळखं पटवणं इतकं का ते सोप्प आहे?”, स्टेफनी.. “आणि कश्यावरून अजूनही तो मृतदेह लावारीसच असेल. ही बातमी एक आठवडा पुर्वीची आहे.. कदाचीत त्याची ओळख पटली ही असेल..”

“असेल ना! शक्य आहे ते.. पण आपण चान्स तर घेऊन बघु.. हे बघ.. एक आठवडा ते प्रेत सरकारी शवागरात पडून आहे. त्याला काही हिरे-मोती लागले नाहीत की पोलिस आनंदाने ठेवून घेतील. आपण थोडे-फार एफर्ट्स घेतले आणि थोडेफार खोटे पुरावे सादर केले तर मला नाही वाटत पोलिस अधिक खोलात शिरतील.. उलट त्यांना बरंच आहे.. नाहीतर त्यांनाच अश्या प्रेतांचे अंत्यसंस्कार करावे लागतात..”, दिपक

“आर यु शुअर दिपक? एक गुन्हा लपवण्यासाठी दुसरा गुन्हा आणि तो लपवण्यासाठी तिसरा असे करण्याचा हा प्रकार आहे.. आपण नाहक अडकत जाऊ ह्यात..”, स्टेफनी

“डोन्ट वरी स्विटी.. मी पुर्ण प्लॅन तयार केला आहे.. ॲन्ड आय एम शुअर वुई विल सक्सीड.. आपण दोन दिवसांनी दिल्लीला जातोय....”, दिपक...

जेंव्हा दीपक आणि स्टेफनी दिल्लीला जायची तयारी करत होते तेंव्हाच युसुफ कोणाशीतरी बोलण्यात मग्न होत. युसुफचा चेहरा घामाने डबडबला होता. त्याच्या चेहऱ्यावरील भीती स्पष्ट दिसत होती. नकळत तो हाताच्या बोटांची चाळवाचाळव करत होता. त्याच्या समोर बसलेली व्यक्ती मात्र कमालीची शांत होती. डोळयावर गॉगल असला तरीही त्या व्यक्तीची रोखलेली नजर युसुफला अस्वस्थ करत होती.

“गुड वर्क युसुफ़.. “, बऱ्याच वेळाच्या शांततेनंतर ती व्यक्ती म्हणाली

“थॅंक्यू जॉनी भाय… “, युसुफ

“थोडीपण होशियारी दाखवायची नाय कळला ना? माझा नेम कधीच चूकत नाही, माहितेय तुला~..” जॉनी

“नाही भाई, तुम्ही जसे म्हणाल तसेच होईल सगले… “, युसुफ

“चल निघ आता, तुझी जरूर पडली कि परत तुला बोल्वेन…”, जॉनी

“भाई एक विचारू?”, युसुफ

“……”

“भाई, दिपकला टपकावणे काहीच अवघड नाही…. मग हा उंदीर मांजराचा खेळ कश्यासाठी?”, युसुफ

“दिपकला मारायचे तर आहेच.... पण इतक्या सहजी नाही... तडपावून मारणार त्याला.... आगे आगे देखो होता है क्या. फक्त तू मला साथ दे.... आणि एक लक्षात ठेव, जर का दीपकला सावध करायचा प्रयत्न केलास... तर परिणाम तुला ठाऊक आहेत....”, जॉनी

“हो भाई..”, उदासपणे युसुफ म्हणाला..

---

दिपक दिल्ली स्टेशन वर उतरला तश्या त्याच्या जुन्या आठवणी जाग्या झाल्या. २ वर्षांपूर्वी २६ जानेवारीच्या परेडमध्ये सहभागी होण्याची त्याला संधी मिळाली होती. राष्ट्रपतींना मानवंदना देताना, फडकणाऱ्या तिरंग्याला सलाम करताना त्याचा उर भरून आला होता

आज मात्र तो दिल्लीमध्ये परत आला होता ते कायद्याची लेखी असलेला एक गुन्हेगार म्हणून.

दिल्ली मेट्रो स्टेशन नेहमीप्रमाणे माणसांनी खचाखच भरलेले होते. कामावर जाणारी नोकरदार मंडळी, शाळा-कॉलेजसाठी धावणारा विद्यार्थी वर्ग, कंत्राटी कामगार, बिझीनेसमन्स, सेल्समन्स आणि अनेकजण त्या गर्दीचा घटक होते. तुरुंगातून पळाल्यानंतर दिपक प्रथमच असा उघड्यावर येत होता. त्याच्या मनामध्ये धाकधुक चालु होती. कोणी ओळखले तर? पोलिसांनी पकडले तर. दचकत सावकाशपणे तो एक एक पाऊल टाकत होता.

पण त्या गर्दीच्या लेखी दिपक असाच कोणी एक व्यक्ती होता. कित्येक लोक त्याला बाजुला ढकलुन पुढे गेले. समोरून येणारे अनेकजण त्याला धडकून निघून गेले. दिपकच्या अस्तीत्वाची दखल घेणारे तेथे कोणीच नव्हते.. निदान त्याच्या मताप्रमाणे तरी....

स्टेशन शेजारीच असलेल्या एका साध्याश्या हॉटेलं मध्ये त्याने मुद्दामच दोन वेगवेगळया खोल्या घेतल्या. दिपक-स्टेफनीमध्ये जे काही नातं होतं ते चार भिंतींच्या आड होते. दिपकला कोणताही धोका पत्करायचा नव्हता. समाजाच्या दृष्टीने दोघंही मालक आणि नोकर होते आणि दोघांचेही एकाच खोलीत रहाणे, ते सुध्दा मालकाचा मृत्य झाल्याची बातमी कळाल्यावर.. म्हणल्यावर अनेकांच्या भुवया उंचावल्या असत्या.

रूमवर सामान ठेऊन दिपक स्टेफनीला घेऊन तडक पोलिस स्टेशनला गेला.

गेल्या ३ दिवसात त्याने आपला प्लॅन पुन्हा पुन्हा स्टेफनीला समजावून सांगितला होता. कोठेही चूक होऊन चालणार नव्हते.

थोड्याच वेळात दिपक आणि स्टेफनी सब-इन्स्पेक्टर त्रिपाठींसमोर बसले होते. ठरल्याप्रमाणे स्टेफनीचे रडून लालसर झालेले डोळे अश्रुंनी डबडबलेले होते. केस विस्कटलेले होते.

दिपकने आपल्याजवळील ‘त्या’ बातमीचे प्रिंटाऊट त्रिपाठींसमोर धरले.

“मी.. मी ओळखतो ह्यांना…”, बातमीमधील फोटोवर बोट ठेवत दिपक म्हणाला.. त्रिपाठी मख्ख चेहऱ्याने दिपककडे बघत होते.

“ह्या स्टेफनी परेरा, थॉमससरांच्या पत्नी…”, स्टेफनीकडे बोट दाखवत दिपक पुढे म्हणाला.

त्रिपाठींनी एकवार स्टेफनीकडे कटाक्ष टाकला आणि मग ते दिपकला म्हणाले.. “आपण??”

“मी.. मी दिपक.. सरांबरोबर त्यांच्या हॉटेलमध्ये काम करतो.. ही बातमी वाचली तसे आम्ही धावत इकडे आलो…..”

“बॉडी एकदा आयडेंटीफाय करून घ्या..मग आपण बोलु.. चला माझ्याबरोबर..”, असं म्हणून त्रिपाठी उठून  बाहेर पडले.

दिपक आणि स्टेफनी मागोमाग त्यांच्या जिपमध्ये जाउन बसले. ठरल्याप्रमाणे स्टेफनी सतत नाकाला आणि डोळयाला रुमाल लावून  रडण्याचे सोंग करत होती.

काही वेळातच त्रिपाठी त्या दोघांना घेऊन सरकारी शवागरात गेले. बाहेरच्या रजिस्टरवर सह्या वगैरे करण्याचे सोपस्कार पार पडल्यावर तिघंही जण त्या अंधाऱ्या, थंडगार शवागरात शिरले.

त्रिपाठींनी एकवार हातातल्या कागदावरील क्रमांक पाहीला आणि ते जिथे बॉडी ठेवली होती तेथे गेले. एकवार त्यांनी दिपक आणि स्टेफनीकडे पाहीले आणि मग मयताच्या चेहऱ्यावरील कापड बाजुला केले. चेहरा दृष्टीस पडताच स्टेफनीने टाहो फोडला, तर दिपक भुत बघीतल्यासारखा थिजून जागच्या जागी उभा राहीला.

त्रिपाठी प्रश्नार्थक नजरेने दिपककडे पहात होते. दिपकने एकदाच होकारार्थी मान हलवली आणि तो स्टेफनीला घेउन बाहेर पडला.

त्रिपाठींनी काही जुजबी सुचना बाहेरच्या सिस्टरला दिल्या आणि ते जिपमध्ये येऊन बसले. काही वेळातच तिघेही पुन्हा पोलिस स्टेशनला पोहोचले. जिपमध्ये कोणीच कुणाशी बोलले नाही.

“नक्की काय झालं? कश्यामुळे अपघात झाला?”, दिपकने विचारले.. स्टेफनी अजूनही फुसफुसतच होती.

“एका खाजगी बसची धडक बसली. दवाखान्यात जाईपर्यंत त्यांचे निधन झाले होते..”, त्रिपाठी म्हणाले.

“….”

“नक्की कधी आले होते थॉमस दिल्लीला? त्यांच्याबरोबर आणखी कोणी होतं? आणि कुठल्या हॉटेलमध्ये उतरले होते?”, त्रिपाठी
“साधारण मागच्या सोमवारी.. ८-१० दिवस झाले त्यांना.. एकटेच आले होते.. हॉटेल!.. काही कल्पना नाही कुठल्या हॉटेलमध्ये उतरले होते..”, दिपक

“हम्म.. त्यांची काही मौल्यवान वस्तु वगैरे बरोबर होती? कारण आम्हाला आयडेंटीफाय करता येईल असे काहीच त्यांच्याकडे मिळाले नाही..”, त्रिपाठी.

“हो म्हणजे निदान मोबाईल, पाकीट, थोडेफार पैसे, घड्याळ…”, दिपक

“नाही, त्यांच्या अंगावर तसे काहीच नव्हते… पण तुम्हाला हरवलेल्या वस्तुंची तक्रार नोंदवायची असेल तर…”, त्रिपाठी.

“नाही.. त्याची काहीच आवश्यकता नाही. सरच जर आमच्यात नाही राहीले तर त्यांच्या वस्तु काय कामाच्या..”, निराशेच्या स्वरात दिपक म्हणाला.

काही क्षण शांततेत गेले…

“बरं बॉडी आम्हाला परत कधी मिळेल?”, दिपक
“मी फॉर्मालिटी कंम्प्लिट करायला सांगीतले आहे.. तो पर्यंत तुम्ही थॉमस ह्यांचे काही आयडेंटीफिकेशन प्रुफ दिलेत तर बरं होईल… नाही म्हणजे मी समजु शकतो ही योग्य वेळ नव्हे.. पण सरकारी कागदोपत्र.. तुम्हाला माहीती आहेच…”, त्रिपाठी..

“सरांचे ड्रायव्हिंग लायसन्स, ए.टी.एम. कार्ड, पॅन कार्ड वगैरे त्यांच्याबरोबरच त्यांच्या पाकीटात होते.. त्यामुळे सध्यातरी आमच्याकडे काहीच नाही…”, दिपक

“पण त्याशिवाय बॉडी देता येत नाही..”, त्रिपाठी म्हणाले.. “हो मला कल्पना आहे त्याची.. पण आमचा नाईलाज आहे.. डुप्लीकेट्स काढायचे म्हणले तरी महीना जाईल…”, दिपक म्हणाला..

“तुम्हा दोघांव्यतीरीक्त अजून कोणी बॉडीची ओळख पटवु शकेल…?”, त्रिपाठी..

“हा.. कोल्हापुर डीस्ट्रिक्टचे कमीशनर कदम सरांच्या चांगल्या ओळखीचे होते..

मच्याकडे त्यांचा नंबर असेल तर तुम्ही फोन करून सरांचे वर्णन विचारु शकता..”,दिपक म्हणाला..

“हरकत नाही…”, त्रिपाठींनी हवालदाराला कमीशनर ऑफ कोल्हापुर डिस्ट्रीक्टचा फोन नंबर लावून द्यायला सांगीतले..

कमीशनर कदम हे जसे थॉमसच्या चांगल्या ओळखीतले होते तसेच ते स्टेफनीच्याही ओळखीचे होते. मादक शरीराच्या स्टेफनीबद्दल त्यांच्या मनात नेहमीच एक सॉफ्टकॉर्नर होता.

“हॅलो?? कदम सर?”, त्रिपाठींनी विचारले..

“येस्स..”, पलीकडून एक भारदस्त आवाज आला..

“सर, मी सब इन्स्पेक्टर त्रिपाठी बोलतोय, दिल्ली पोलिस..”

“येस्स बोला…”

“सर… आपण मि.थॉमस परेरा ह्यांना ओळखता का? गोकर्ण मध्ये एक हॉटेल आहे त्यांचे..”

“येस्स.. ओळखतो.. का? काय प्रॉब्लेम झाला??”

“प्रॉब्लेम नाही सर.. अ‍ॅक्च्युअली, त्यांचा दिल्लीत एक अपघाती मृत्य झालाय..”

“व्हॉट? आर यु शुअर??”,

“सर त्यांच्या पत्नी स्टेफनी इथे बसल्या आहेत.. सर मयताच्या बॉडीवर ओळख पटवणारे आम्हाला काहीच सापडले नव्हते म्हणून आम्ही लावारिस शव म्हणून एक जाहीरात दिली होती पेपरमध्ये.. ती पाहुनच त्या इथे आल्या आहेत….”
“ओह् माय गॉड.. प्लिज त्यांना फोन द्या…”

“हॅलो सर… “, स्टेफनीने शक्य तितक्या रडवेल्या आवाजात फोन घेतला…

“आय एम सो सॉरी स्टेफनी.. फार दुर्दैवी घटना आहे ही..”, कदम..

“येस्स सर.. सर एक तुमच्याकडून फेव्हर हवी होती…”

“हो. बोला ना.. काय मदत करु शकतो मी…”

“सर.. थॉमसचे आयडी प्रुफ आत्ता आमच्याकडे काहीच नाहीये.. आणि त्या शिवाय बॉडी सुध्दा मिळणार नाही.. काय करु शकतो सर…”

“हम्म.. एक काम करा तुम्ही त्रिपाठींना फोन द्या.. मी बोलतो त्यांच्याशी….”

स्टेफनीने फोन त्रिपाठींकडे दिला..

“येस्स सर..”, त्रिपाठी

“हे बघा त्रिपाठी.. मी थॉमस ह्यांना चांगले ओळखतो. चांगलाच जाडजुड बांधा.. भले मोठ्ठे पुढे आलेले पोट, तुरळक केसांचे टक्कल असा काहीसा त्यांचा बांधा होता.. माझी

तुम्हाला विनंती आहे की तुम्ही फारसे खोलात न शिरता बॉडी त्यांच्या पत्नीच्या स्वाधीन करावीत..”

“पण सर.. कायद्यानुसार.. आपल्याला काही तरी प्रुफ असणं आवश्यक आहे नाही का?? अगदी सरकार मान्य नसले तरी त्यांचा एखादा घरगुती फोटो सुध्दा चालु शकेल मला..”

“त्रिपाठी.. आता तुमच्यासारखे सब-इन्स्पेक्टर कमीशनरना कायदा शिकवणार का? अहो डेड बॉडी घेऊन ते काय पैसे कमावणारे वाटले का तुम्हाला? तुम्हाला जमत नसेल तर तसं सांगा.. मी दिल्ली कमीशनरशी बोलुन घेतो हवं तर..”, कदम काहीश्या रागीट स्वरात म्हणाले..

“स्वॉरी सर..काही हरकत नाही.. मी बॉडी द्यायची व्यवस्था करतो..”, त्रिपाठी.. “गुड.. जरा फोन त्यांच्या पत्नीकडे द्या…”

त्रिपाठींनी फोन स्टेफनीकडे दिला..

“हे बघा स्टेफनी.. मी त्रिपाठींशी बोललो आहे.. ते बॉडी तुम्हाला देतील.. परत काही अडचण आली तर मला नक्की फोन् करा.. थॉमससाठी आणि तुमच्यासाठी मी एव्हढे नक्की करु शकेन..”

“थॅक्यु सर…”, स्टेफनी म्हणाली.. “सर थॉमसची बॉडी आम्ही परत तिकडे नाही आणत.. आधीच ८ दिवस ती शवागरात पडून होती.. इतके लांबचे अंतर मृत शरीर घेउन करायचे.. मला शक्य नाही सर…”

“ओह् येस.. बाय ऑल मिन्स.. तुमची जी इच्छा असेल ती.. काही मदत लागली तर नक्की कळवा .. ओ.के?? काळजी घ्या.. भगवान थॉमस ह्यांच्या आत्म्यास शांती देओ..”, असं म्हणून कदमांनी फोन ठेवून दिला…

दिपक आणि स्टेफनीच्या मनामध्ये आनंदाच्या उकळया फुटत होत्या. सर्व काही प्लॅननुसार घडले होते.

"सर.. ", दिपक म्हणाला... "आम्हाला पोस्ट-मार्टम रिपोर्ट आणि पोलिसांकडून एक पत्र लागेल.. त्या शिवाय इथे अंत्यसंस्कार विधी करता यायचे नाहीत.. शिवाय डेथ-सर्टीफिकेट मिळवायला सुध्दा हे पेपर्स लागतील..."

"मी अ‍ॅरेंज करतो.. तुम्ही बसा बाहेर.. तो पर्यंत अ‍ॅम्ब्युलंन्स थॉमस ह्यांचे शव घेऊन येईलच..", त्रिपाठी म्हणाले..

दिपक आणि स्टेफनी शांतपणे खुर्चीतून उठले आणि बाहेरच्या बाकड्यावर जाऊन बसले....

---

थॉमसच्या अंत्यसंस्काराच्या वेळी एक पोलिस हवालदार बरोबर होता. संध्याकाळपर्यंत डेथ-सर्टीफिकेट आणि इतर काही कागदपत्र पुर्ण करून त्रिपाठींनी ती दिपक-स्टेफनी उतरले होते त्या हॉटलवर पाठवून दिले.

दिपकने डेथ सर्टीफिकेट निट नजरेखालुन घातले आणि त्यात काहीही त्रुटी नसल्याची खात्री करून घेतली. सर्व कागदपत्र निट फाईलमध्ये ठेवून आणि डमी थॉमसचे अस्थी विसर्जन करून दुसऱ्याच दिवशी दोघं परत आपल्या हॉटेलवर परतले.

थॉमसच्या मृत्युची बातमी समजताच हॉटेलवर शोककळा पसरली. अनेकांना थॉमसचे अंत्यदर्शन न झाल्याची हुरहुर लागून राहीली. परंतु काळापुढे सर्वच हतबल होते. स्टेफनीने आठवड्यानंतर थॉमसचे डेथ सर्टीफिकेट बॅंकेत दाखवून अकाऊंट्सचे सर्व अधीकार स्वतःच्या नावावर करून घेतले. हॉटेलचे सर्व अडकलेले व्यवहार मार्गी लागत होते. महीन्याभरातच अनेकांना थॉमसचा विसर पडला.

**दोन महीन्यांनंतर -**

दिपक सकाळी जागा झाला तेंव्हा शेजारी स्टेफनी नव्हती. तो खोलीतून डोळे चोळत चोळत बाहेर आला. स्वयंपाकघरातून भांड्यांचा आवाज येत होता तसा तो स्वयंपाकघरात गेला. स्टेफनी त्याला पाठमोरी उभी होती. तो दबक्या पावलांनी तिच्या जवळ गेला आणि तिला एकदम मिठी मारली.

“स्ट्युपीड्ड..”, दचकत स्टेफनी म्हणाली.. तसा दिपक हसायला लागला.

व्हाईट शॉर्ट आणि बॉटल-ग्रीन रंगाच्या शर्टमध्ये स्टेफनी अधिकच आकर्षक दिसत होती. फिक्कट नारींगी रंगाच्या रिबीनीने तिने आपली पोनी-टेल बांधली होती.

“काय करते आहेस..?”, दिपकने विचारले..

“युअर फेव्हरेट..” असं म्हणत स्टेफनीने समोरच्या ताटामधील पिठ घेऊन दिपकच्या गालाला फासले..

“अस्सं..”, दिपक चिडून म्हणाला आणि तो पिठ घ्यायला ताटलीकडे सरसावला. परंतु आधीच स्टेफनीने जवळच्या भांड्यातील पाणी दिपकवर फेकले आणि ती किचन मधून हसत-हसत बाहेर पळाली. दिपकनेही मुठभर पिठ उचलले आणि तो तिच्या मागोमाग धावला.

दिपकला येताना बघून स्टेफनी बाहेरच्या बागेत जाण्यासाठी रिसेप्शनकडे धावली आणि तिच्या मागोमाग दिपक. परंतु दोघांची मस्ती अचानक रिसेप्शनमध्ये उभ्या असलेल्या त्या व्यक्तीला बघून थांबली.

जुन्या काळच्या सफारी प्रकारातील बदामी रंगाचा सफारी घालुन ती व्यक्ती स्टेफनी आणि दिपककडे आळीपाळीने पहात उभी होती. हडकुळी शरीरयष्टी, डोळ्यावर अतीशय जाड भिंगाचा चष्मा होता त्यामुळे त्या व्यक्तीचे पिचपीचे डोळे सुध्दा टपोरे भासत होते. हातामध्ये एक कळकट चॉकलेटी रंगाची ब्रिफकेस होती. खिश्याला निळया टोपणाचे रेनॉल्ड्सचे पेन लावलेले होते.

दिपक त्या व्यक्तीच्या जवळ गेला तसा सिगारेटचा एक उग्र दर्प त्याच्या नाकात शिरला.

“नमस्कार…”, खोल गेलेल्या आवाजात ती व्यक्ती म्हणाली.. “मी मोहीते.. केशव मोहीते…” असं म्हणून त्या व्यक्तीने आपला हात पुढे केला.

दिपकने सुध्दा आपला हात पुढे केला तेंव्हा त्याच्या लक्षात आले की आपल्या हातामध्ये पिठ आहे.. तसं काहीसं ओशाळून त्याने हाताच्या मुठी जोडून नमस्कार केला.

“मी मिसेस स्टेफनींना भेटायला आलो आहे..”, मोहीते म्हणाले…

“ह्या मिसेस स्टेफनी..”, शेजारी उभ्या असलेल्या स्टेफनीकडे हात दाखवत दिपक म्हणाला.. “काय काम होते आपले?”

त्या व्यक्तीने खिश्यातून व्हिजीटींग कार्ड काढून दिपककडे दिले आणि म्हणाले, “मी लाईफ़-लाईन इंन्शोरंन्स कंपनीकडून आलोय. स्टेफनी ह्यांचे दिवंगत पती थॉमस ह्यांच्या इंन्शोरंन्स क्लेम बद्दल काही चौकशी करण्यासाठी मी इथे आलो आहे…”

दिपकने डोळे विस्फारून स्टेफनीकडे पाहीले आणि तो मोहीत्यांना म्हणाला, “थॉमस ह्यांची इंन्शोरंन्स पॉलीसी होती? कोणी क्लेम केला त्याचा?”

“अर्थात त्यांच्या पत्नी स्टेफनी ह्यांनी..”, चेहऱ्यावरचे भाव किंचीतही न बदलता मोहीते म्हणाले…

“पण मला तर ती तसं काहीच म्हणाली नाही..”, दिपक

“आपण?”, मोहीते

“मी दिपक…इथे मॅनेजर आहे…”, दिपक..

“नवऱ्याच्या इंन्शोरंन्सबद्दल स्टेफनीने हॉटेलच्या नोकरांशी चर्चा करावी अशी तुमची अपेक्षा आहे का?”, मोहीते

दिपकला आपली चूक लक्षात आली तसा तो चपापला.

“तर मिसेस स्टेफनी.. मला काही प्रश्न विचारायचे होते…”, मोहीते

“हो जरुर.. विचारा नं..”, स्टेफनी

मोहीत्यांनी एकवार दिपक आणि मग स्टेफनीकडे पाहीले आणि मग काहीश्या कुत्सीत स्वरात ते म्हणाले, “मला वाटतं मी थोडं थांबतो इथे.. तुम्ही कामात दिसताय.. तुम्ही तुमची कामं उरकून या तो पर्यंत मी चहा ब्रेकफास्ट घेतो..” असं म्हणून मोहीते तेथीलच एका सोफ्यावर बसले.

त्यांच्या लेखी जणु दिपक आणि स्टेफनी आता तेथे नव्हतेच. त्यांनी आपली ब्रिफकेस उघडली आणि जणु काही ही आपली ब्रिफकेस नसून दुसऱ्याच कुणाचीतरी आहे अश्या आश्चर्याने ते ब्रिफकेसमधील गोष्टींमध्ये बुडून गेले.

दिपक एकवार स्टेफनीकडे पाहीले आणि त्याने डोळ्यानेच आतमध्ये चलण्याची खुण केली.

दोघेही आतमध्ये निघून गेले तसे मोहीत्यांनी एकवार ज्या दिशेने ते गेले त्यांच्याकडे पाहीले. त्यांच्या चेहऱ्यावर एक गुढ हास्य पसरले आणि मग ते परत आपल्या बॅगेतील कागदपत्रात बुडून गेले.

---

“स्टेफनी हा काय प्रकार आहे..?”, स्टेफनीच्या दंडाला जोरात धरत दिपक शक्य तितक्या दबक्या आवाजात म्हणाला

“दिपक… दुखतंय मला..”, दिपकच्या हातातून हात सोडावून घेत स्टेफनी म्हणाली..

“हा काय इंन्शोरंन्स क्लेमचा प्रकार आहे? आणि तू मला ह्याबद्दल काहीच कसं बोलली नाहीस?”, दिपक

“तुला सांगण्यासारखं काय होतं त्यात? थॉमसची पॉलीसी होती, त्याच्या मृत्युनंतर क्लेम करणं स्वाभाविकच आहे. एवढं चिडतोस कश्यासाठी?”, स्टेफनी..

“कितीची आहे पॉलीसी?”, दिपक..

स्टेफनी काहीच बोलली नाही..

“स्टेफनी, पॉलीसी कितीची आहे?”, दिपक..

“सहा करोड…”, स्टेफनी…

“व्हॉट??? सिक्स करोड????”, दिपक

“ऑफ-कोर्स.. थॉमस एक बिझीनेसमन होता.. मोठी पॉलिसी घेणं कधीही फायद्याचंच होतं.. विशेषतः बॅंकांकडून लोन घेताना…”, स्टेफनी..
“अगं पण मुर्ख आहेस का तु? निदान मला सांगायचस तरी क्लेम करताना..”, दिपक

“पण का? प्रॉब्लेम काय आहे?”, स्टेफनी..

“प्रॉब्लेम काय आहे? प्रॉब्लेम बाहेर बसला आहे.. एन्क्वायरी आलीय.. नाहक तो खोलात शिरला तर आपलं पितळ उघडं पडेल…”, दिपक..

“डोन्ट वरी.. मला नाही वाटत तो फार खोलात शिरेल.. चेहऱ्यावरून तरी बावळट वाटतोय.. फॉर्मालिटी म्हणून काही प्रश्न विचारेल आणि जाईल तो… चल बाहेर जाऊ..”, स्टेफनी..

“हो येतोच मी कपडे बदलुन.. पण मी येईपर्यंत फारसं काही बोलु नकोस.. येतोच मी लगेच..” असं म्हणून दिपक त्याच्या खोलीकडे गेला.
स्टेफनीने आपली शॉर्ट बदलुन काळया रंगाची स्लॅक घातली आणि केस एकसारखे करून ती मोहीत्यांच्या इथे गेली.

मोहीते चहा, ब्रेकफास्ट करून पुन्हा आपली बॅग उघडून बसले होते. स्टेफनी त्यांच्या समोर जाऊन बसली. मोहीतेने बॅगेतून कागदांचा एक गठ्ठा काढून टेबलावर ठेवला, नंतर एक पिवळट रंगाचा कागद घेऊन त्यांनी आपली बॅग बंद केली आणि त्याच्यावर कागद ठेवून त्याच्यावर तारीख वेळ लिहिली व मग ते स्टेफनीला म्हणाले..

“मला थॉमससर दिल्लीला गेले इथपासून पुन्हा एकवार सगळं तपशीलवार सांगाल का? म्हणजे ते केंव्हा, कसे गेले? दिल्लीला कधी पोहोचले. तेथून त्यांनी तुम्हाला केंव्हा केंव्हा फोन केला? तुमचा आणि त्यांचा संपर्क कधी तुटला? सरांच्या मृत्युची बातमी तुम्हाला कशी समजली वगैरे वगैरे.. जितके जास्त सांगाल तितके मला चांगले…”

स्टेफनी अस्वस्थपणे दिपकच्या येण्याची वाट पहात होती..

“अजून कोणी येणार आहे का??”, मोहीते म्हणाले..

तेवढ्यात दिपक तेथे आला.. दिपकला पाहून मोहीते प्रश्नर्थक स्वरात म्हणाले.. “येस्स??”

“तुम्हाला काही प्रश्न विचारायचे होते ना क्लेम बद्दल.. म्हणून..”, दिपक
“हो.. पण ते तुम्हाला नाही.. मिसेस स्टेफनी ह्यांना.. तुमची तशी काही इथे आवश्यकता नाही..”, मोहीते

“अं.. मोहीते.. असु देत त्यांना इथे.. दिपक थॉमसच्या मर्जीतले होते. ते इथले एम्प्लॉई असले तरी सरांनी त्यांना नेहमी एक घरातील असल्यासारखीच वागणुक दिली होती..”, स्टेफनी..

मोहीत्यांनी खांदे उडवले आणि मग उत्तराच्या प्रतिक्षेत ते स्टेफनीकडे पाहु लागले.

स्टेफनीने काही वेळ विचार केला आणि मग ती म्हणाली, “ॲक्च्युअली, मला माहीत नाही..”

स्टेफनीच्या त्या उत्तराने मोहीत्यांनी चमकून स्टेफनीकडे पाहीले

“..म्हणजे.. खरं तर इतक्या दूर हॉटेल घ्यायच्या मी विरोधात होते. इन्व्हेस्टच करायचे तर जवळपासच कुठे तरी करावं असं माझं मत होतं. त्यावरून थॉमस आणि माझे थोडे वाद सुध्दा झाले होते.. म्हणूनच ‘जाताना फक्त सौदा करायला चाललो आहे’ एव्हढंच थॉमस सांगून गेले.. आणि मी सुध्दा त्यांना काही विचारलं नाही..”, स्टेफनीने सांगीतले..

स्टेफनीच्या त्या अनपेक्षीत पण अगदी योग्य उत्तराने दिपक खुश झाला. त्याला चिंता होती की स्टेफनी काहीतरी सांगेल आणि त्यामुळे कुठे तरी आपण अडकु. पण ह्या उत्तराने पुढचे अनेक प्रश्न खुंटले होते..

“ओह.. पण म्हणजे थॉमससरांनी दिल्लीला पोहोचल्यावर फोन सुध्दा नाही केला तुम्हाला?”, मोहीते

स्टेफनीने आपला खालचा ओठ वाकडा करून नकारार्थी मान हलवली.

“बरं, निदान कोणती प्रॉपर्टी खरेदी करणार होते? कुठल्या भागात? एनी आयडीया? म्हणजे निदान तुम्ही विरोध करण्याआधी त्यांनी काही तरी सांगीतले असेलच ना?”, मोहीते

“नाही.. ती वेळच आली नाही.. दिल्ली म्हणल्यावरच मी विरोध केला असता.. थॉमसने माझं ऐकले असते तर कदाचीत ते आज आमच्यात असते..”, असं म्हणून स्टेफनीने तळहातांनी आपला चेहरा झाकून घेतला.

“बरं.. मिस्टर दिपक…”, दिपककडे बघत मोहीते म्हणाले.. “.. थॉमससरांच्या मृत्युची बातमी तुम्हाला कशी कळाली?”

“इंटरनेटवर..”, दिपक

“इंटरनेटवर?? पण बातमी फक्त दिल्लीच्या पेपरमध्ये होती.. बाकीच्या पेपर्समध्ये नव्हती. तुम्ही दिल्लीचे पेपर उघडून काय बघत होतात?”

“थॉमससर कोणतेतरी मोठ्ठे हॉटेल घेणार होते.. साधारण अश्या व्यवहाराच्या बातम्या पेपर्समध्ये येत असतात म्हणून उत्सुकतेपोटी मी काही दिवस पेपर्स चाळत होतो तेंव्हा मला ‘ती’ बातमी सापडली..”, दिपकने एव्हाना आपली उत्तरं तयार करून ठेवली होती.

“मोठ्ठे हॉटेल?? आर यु शुअर?”, मोहीते..

“येस्स व्हेरी मच…”, दिपक

“मी थॉमससरांचे बँक अकाऊंट चेक केले आहे.. ज्या वेळी ते दिल्लीला गेले तेंव्हा त्यांचे सेव्हींग्स आणि करंट अकाऊंट मिळून सुध्दा फार तर फार ८-१० लाख बॅलंन्स होता.. मोठ्ठे डिल करणार असते तर निदान टोकन अमाऊंट मनी तरी नक्कीच काही करोड असणार नाही का? मग ते पैसे कुठून  देणार होते?”

“आय हॅव नो आयडीया.. थॉमससर त्यांचे पैश्याचे व्यवहार आमच्या कुणाशीच डिस्कस करत नसत.. पाहीजे तर तुम्ही हॉटेलच्या इतर स्टाफशी बोलु शकता…”, दिपक

“स्ट्रेंज..मला तर हा सगळा प्रकार बनावटीचा वाटतो..”, मोहीते पुटपुटले..

“व्हॉट डु यु मिन मोहीते.??”, स्टेफनी चिडून म्हणाली…”आम्ही काय फ्रॉड वाटतो? थॉमससर जेंव्हा मरण पावले तेंव्हा आम्ही इथेच होतो.. तुम्ही कुठेही चौकशी करु शकता.. ती एक ॲक्सीडेंटची केस होती.. बसचा ड्रायव्हर सध्या दिल्लीच्या तुरुंगात आहे.. पाहीजे तर तुम्ही तिकडे जाऊन चौकशी करु शकता..”

“सॉरी मिसेस स्टेफनी तुम्ही चिडु नका.. अहो आम्ही इंन्शोरंन्स एजंट असतोच असे किचकट.. प्रत्येक क्लेममध्ये आम्हाला फ्रॉडच दिसतो.. ॲन्ड व्हेन द क्लेम अमाऊंट इज ह्युज.. आम्हाला थोडं सावध रहावंच लागतं ना…”, सारवासारव करत मोहीते म्हणाले.. पण त्याच वेळी त्यांची गिधाडासारखी नजर आळीपाळीने स्टेफनी आणि दिपकच्या चेहऱ्यावरून फिरत होती.

मोहीत्यांच्या त्या नजरेने दोघांनाही अस्वस्थ होत होतं..

“ऑल राईट मिस्टर केशव मोहीते, इफ़ नथींग एल्स इज रिक्वायर्ड.. आय हॅव टु गो.. मला कामं आहेत..”, स्टेफनी

“शुअर मिसेस स्टेफनी.. सध्या तरी काही नाही... पण मला प्रश्न कधीही आणि केंव्हाही पडतात.. सो आय विल रिक्वेस्ट की मी दोन-चार दिवस इथेच रहातो.. काय आहे मी हेड ऑफीसवरून आलोय.. सो सारखं सारखं ये-जा करणं.. फार त्रासाचं आहे..”, मोहीते..

“काय?.. इथे???”, स्टेफनी माघारी वळली..

“डोन्ट वरी मिसेस स्टेफनी.. आवर कंपनी विल पे ऑल दी एक्स्पेंन्सेस..”, मोहीते

स्टेफनीने एकवार दिपककडे पाहीले आणि मग ती म्हणाली.. “ऑलराईट.. दिपक तुम्हाला तुमची खोली दाखवेल...” असं म्हणून स्टेफनी निघून गेली..

“थॅंक्यु.. बरं मिस्टर दिपक.. मला थॉमससरांचा मोबाईल नंबर, त्यांचे इमेल अकाऊंट आणि हॉटेलचा पत्रव्यवहारांची नोंद ठेवणारे तुमचे इनवर्ड-आऊटवर्ड रजिस्टर हवे आहे.. तेवढं माझ्या रुममध्ये पाठवून  द्या..”, मोहीते

“शुअर.. मी व्यवस्था करतो.. पण हे सगळं कश्यासाठी विचारु शकतो का?”, दिपक

“मला ते हॉटेल ज्याचा व्यवहार करण्यासाठी थॉमस दिल्लीला गेले होते, ते ट्रेस करायचे आहे.. व्यवहार ठरवण्याआधी थॉमससरांचे तेथील व्यवस्थापनाशी नक्कीच कम्युनिकेशन झाले असेल ना.. फोन वरून म्हणा किंवा इमेल-द्वारे किंवा टपालाने कश्यानेतरी नक्कीच बोलणे झाले असणार.. अचानक असं थोडं ना कोणी व्यवहार करायला जातं.. नाही का?”, चेहऱ्यावर कुत्सीत हास्य आणत मोहीते म्हणाले..

दिपकने मोहीत्यांना रुम दाखवली आणि तो लाऊंजमध्ये येऊन बसला. जितका मुर्ख हा मोहीते दिसतो तितका तो नक्कीच नव्हता. हेड ऑफीसने खास चौकशीसाठी त्याला इकडे

पाठवले होते म्हणजे नक्कीच तो हुशार असणार. त्याची ती नजर.. त्याचे ते हास्य जणु सुचवत असते की..‘फक्त काही दिवस.. आणि तुम्हाला तुमच्याच जाळयात गुंडाळतो….”

नकळत दिपकच्या मानेवरून घामाचा एक ओघळ उतरला. सर्वकाही सुरळीत सुरु होत होते.. हा मोहीते कितवर खोलात शिरेल सांगत येत नव्हते.. त्याच्या ह्या तपासात दिपकचे पुर्वायुष्य तर ओढले जाणार नव्हते? दिपक तुरुंगातून पळालेला एक कैदी आहे हे तर त्या तपासात पुढे येणार नव्हते? दिल्लीला जो मेला तो थॉमस नव्हता हे तर उकरून येणार नाही ना?.. आणि थॉमसचा खुन इथेच झाला आणि दिपक-स्टेफनीने त्याच्या बॉडीची विल्हेवाट लावली.. वरती इन्शोरंन्स क्लेम केला कळाले तर त्याच्या खुन ह्या दोघांनी मिळुनच केला असाही एक तर्क लावला जाण्याची शक्यताही होती..

बाहेरची आवरा-आवर करून स्टेफनी दिपकच्या खोलीत आली तसा दीपक अचानक तिच्यावर खेकसला, “तू इथे काय करते आहेस? गेट आऊट, तुझ्या खोलीत जाउन झोप”

“अरे पण का? काय झालं?”, स्टेफनी

“का काय का? तो मोहिते बसला आहे बाहेर. त्याने तुला माझ्या खोलीत बघितले तर?” दिपक

“पण मी एकटीनेच झोपायचे? आणि मला आज तू हवा असशील तर?” स्टेफनी

“थोडे दिवस स्टेफनी.... आत्ता काहीच पर्याय नहिए.... प्लिज.... “, दीपक

स्टेफनीने काहीश्या नाराजीनेच खोलीचे दर उघडले आणि अचानक अंधारातून कुठूनतरी येउन समोर मोहिते उभा राहीला.

“तुम्ही इथे झोपता का?”, अर्धवट उघडलेल्या खोलीच्या दारातून आत पाहण्याचा प्रयत्न करत मोहिती म्हणाला.

“काय बोलता आहात मुर्खासारखं?”, काहीसे चिडून स्टेफनी म्हणाली आणि त्याला बाजूला ढकलून निघून गेली.

मोहिते स्टेफनी दिसेनाशी होईपर्यंत तेथेच थांबला आणि मग चेहऱ्यावर एक हास्य आणत तेथून निघून गेला

दुसऱ्या दिवसापासून स्टेफनी आणि दिपकचे आयुष्य बिकट होऊन बसले. एकमेकांचा सहवास सोडाच, एकमेकांकडे बघणं सुध्दा अवघड होऊन बसले होते. क्षणाक्षणाला मोहिते त्यांच्या मागावर होता. त्याची ससाण्यासारखी नजर सतत त्या दोघांवर रोखलेली असायची.

“मला एक सांगा मिसेस स्टेफनी..”, स्टेफनीला एकांतात गाठून  मोहीते म्हणाला.. “थॉमससरांना दिल्लीतील हॉटेलबद्दल माहीती कशी मिळाली होती?”

“इंटरनेटवरुन..”, स्टेफनी

“अच्छा, बर मी त्यांचा संगणक थोड्या काळासाठी वापरू शकतो?”, मोहिते

“तुम्हाला संगणक वापरता येतो’, त्याच्या चेहऱ्यावरचे बावळट भाव बघत स्टेफनी म्हणाली

“हो हो… येतो ना…. ” अस म्हणून स्टेफनीने दाखवलेल्या संगणकाच्या खोलीकडे मोहिते मार्गस्थ झाले.

“तू त्याला संगणक हाताळू द्यायला नको होतास…”, दीपक नंतर स्तेफनीला म्हणाला

“रेलैक्स, मला नाही वाटत त्या बावळटाला त्यातील काही कळत असेल…”, स्टेफनी

साधारण एक तासानंतर मोहिते बाहेर आला. दीपक आणि स्टेफनी हॉटेलची काही बिल तपासत असल्याचे नाटक करत बसले होते. नाकावर घसरणारा आपला जाड भिंगाचा चष्मा सावरत मोहिते म्हणाला, “अम्म… मी सगळा संगणक तपासला पण त्या हॉटेलची माहिती देणारे काही माझ्या हाताला लागले नाही. मला नाही वाटत थॉमससरांना इंटरनेट वरून काही माहिती मिळाली असेल.

"तपासला म्हणजे? आता थोडी न ती माहिती तेथे असणार आहे?. थॉमससरांनी डिलीट करून टाकली असेल तेंव्हाच…" स्टेफनी

"कस आहे ना बाई", मोहिते कुचकट स्वरात म्हणाले, "तुम्हाला माहित नसेल म्हणून सांगतो, संगणकावर ना कुकीज, ब्राउजर हिस्टरी, सेशन डाटा वगैरेची माहिती असते त्यावरून गेल्या वर्षी सुध्दा संगणकावर काय काम केले होते हे शोधत येते. "

"असेल ना मी कुठे नाही म्हणते, पण थॉमससरांनी ती माहिती इथल्याच संगणकावरून घेतली असे कश्यावरून?", स्टेफनी

"म्हणजे?"

"म्हणजे इथे इंटरनेट चा फार मोठ्ठा प्रोब्लेम आहे, आम्ही अनेकदा तक्रार सुद्धा केली होती. त्यामुळे थॉमससर बऱ्याचदा बाहेरगावी तेथील कॅफे मधून सुद्धा इंटरनेट वापरत असत…. "

"हम्म …. असेल कदाचित…", थोडासा नरम होत मोहिते म्हणाला

---

मोहीत्याचे प्रश्न दिवसेंदिवस वाढतच चालले होते. कधी तो थॉमसच्या बॅंकेचे डिटेल्स मागे, कधी त्याच्या मोबाईल्सचे कॉल रेकॉर्ड्स, कधी त्याचे कपाट उघडण्याचा हट्ट धरी तर कधी अजून काही.

सुरुवातीला केवळ स्टेफनी आणि क्वचीत दिपकचीच चौकशी चाले, पण हळु हळु तो सपोर्ट स्टाफमध्ये शिरला. वेळ काळ न पहाता कधीही, कोणालाही, कुठेही गाठून प्रश्नांच्या फैरी झाडत असे.

दिपक आणि स्टेफनीचे आयुष्य पुर्ण बिघडून गेले होते. एक दिवशी मोहीते बाजुला नसताना स्टेफनी दिपकला म्हणाली, “दिपक प्लिज.. मला इथून बाहेर पडायचे आहे, जेथे हा मोहीते नसेल.. फक्त तू आणि मी.. वैताग आलाय ह्याचा.. वाटतं आहे, नको ते पॉलिसीचे पैसे.. आम्हाला एकटं सोड..”

स्टेफनी दिपकच्या जवळ आली की दिपक लगेच संकोचीत होत असे, दचकत असे.. तो स्टेफनीकडे कमी, इतरत्रच कोठे मोहीते दिसतो का ते पहात बसे..

“दिपक….” जवळ जवळ ओरडतच स्टेफनी म्हणाली..

“श्श..!! हळु बोल..”, स्टेफनीला बाजुला ढकलत दिपक म्हणाला…

“तुझं लक्ष आहे का मी काय बोलते आहे ते?”, स्टेफनी

“हो आहे.. पण हा मोहीते असे पर्यंत ते शक्य नाहीये.. तू प्लिज जा इथुन..”, असं म्हणून दिपक उगाचच काही तरी काम करण्यात मग्न होऊन गेला.

स्टेफनी दिपककडे दोन मिनीटं रागाने पहात उभी राहीली आणि मग खांदे उडवून निघून गेली.

---

दुसऱ्या दिवशी दिपक लॉबीमध्ये रजिस्टर तपासण्यात मग्न होता. मोहीते तेथेच बसून उगाचच काही प्रश्न सुचत आहेत का पहात विचारात मग्न होता. इतक्यात तेथे स्टेफनी लंगडत लंगडत आली.

स्टेफनीला लंगडताना पाहून दिपक उठून  उभा राहीला पण मोहीत्याला तेथेच पहाताच तो थोडा कॉन्श्यस झाला आणि म्हणाला, “लंगडत चालायला काय झालं मॅडम? काही लागलं का?”

“नाही विशेष काही नाही.. थोडा मुरगळला आहे, मी येते जरा सिटीमध्ये दवाखान्यात जाऊन”, स्टेफनी

“पण मॅडम, दुखऱ्या पायाने तुम्हाला ड्राईव्ह नाही करता येणार, त्यापेक्षा कुणालातरी घेऊन जा..”, दिपक

“कुणाला घेऊन जाऊ? आज सगळे इन्व्हेंटरी मध्ये बिझी आहेत.. तुला वेळ असेल तर चल, नाही तर मी करते काही तरी मॅनेज…”, स्टेफनी

दिपकची काही वेळ चलबिचल झाली पण मग त्याने रजिस्टर बंद केले आणि ड्रॉवरमधून कारची किल्ली घेउन तो स्टेफनीबरोबर बाहेर आला. त्याने मोहीतेकडे पाहीले नाही, पण मोहीत्याची रोखलेली नजर त्याच्या पाठीला जाणवत होती.

दिपकने गाडी पार्कींगमधून बाहेर काढली. स्टेफनी लंगडत त्याच्या शेजारच्या सिटवर येऊन बसली. दिपकने गाडी गेअरमध्ये टाकली आणि काही क्षणातच धुरळा उडवत गाडी दिसेनाशी झाली.

काही अंतर गेल्यावर स्टेफनीने आरश्यातून मागे कोणी येत नाही ना ह्याची खात्री केली आणि मग गाडीचे सिट थोडे मागे करून ती आरामशीर बसली. आपले दोन्ही पाय तिने डॅशबोर्डवर क्रॉसकरून ताणून ठेवले आणि ती हसत दिपककडे पाहु लागली.

दिपक तिच्या सरळ पायांना पाहून आश्चर्यचकीत झाला.. “हे काय? तुझा पाय दुखत होता ना?”

“कुणी सांगीतलं..?” हसत हसत स्टेफनी म्हणाली…

“म्हणजे? मग मगाचंच ते सगळं?”, दिपक

“..नाटक होतं…”, दिपकच्या ओठांवर बोट ठेवत स्टेफनी म्हणाली..

“यु आर मॅड…”, दिपक मान हलवत म्हणाला… “खरंच??”, स्टेफनीने केसांची रिबीन काढली आणि खिडकीतून येणाऱ्या वाऱ्यात आपले केस मोकळे करत स्टेफनी म्हणाली…

“खरंच मी मॅड आहे दिपक??…माय ॲडोरेबल डार्लिंग?”, दिपककडे बघत स्टेफनी म्हणाली..

“काय बोलते आहेस तू स्टेफनी? चल मी गाडी वळवतो आहे मागे.. मोहीतेला कळलं आपण कुठल्या डॉक्टरकडे गेलो नव्हतो तर त्याला उगाच संशय येईल…”

“हेल विथ दॅट मोहीते.. सोड ना त्याला.. त्याला जे करायचं ते तो करेलच… आय लव्ह यु दिपक.. आय रियली डु…”, स्टेअरींगवरील दिपकच्या हातावर हात ठेवत स्टेफनी म्हणाली…

दिपकने गाडी कडेला घेतली आणि करकचुन ब्रेक लावला.

---

“उद्या काय होईल माहीत नाही दिपक.. लाईफ़ आपल्याला सोडून पुढे निघून गेली आहे असं वाटतं आहे.. वाटतं मी खुप एकटी राहीली आहे.. किनाऱ्यावर रेतीला सोडून समुद्राच्या लाटा जश्या माघारी वळतात तसं… होल्ड मी दिपक.. होल्ड मी…”, स्टेफनी बोलत होती..

ती दुपार दोघांसाठी खुप मस्त गेली. एका मस्त रेस्टॉरंट मध्ये दोघांनी जेवण घेतले…

“स्टेफनी.. आपण निघून जाऊ इथुन.. त्या मोहीत्याचा मला काही भरोसा वाटत नाही. उद्या त्याने जुनी प्रकरणं उकरून काढली, थॉमससर कधी दिल्लीला गेलेच नव्हते हे सिध्द केलं तर होत्याचं नव्हतं होऊन बसेल.

मी तर तुरुंगात जाईनच.. पण तू सुध्दा आत्तापर्यंत थॉमस होता म्हणून वाचलीस. एक तर तुझा इथला स्टे इल्लीगल आहे, शिवाय तुझ्या हातून झालेला तो मर्डर.. एकामागोमाग एक प्रकरणं बाहेर येत रहातील.. मरु देत ती पॉलीसी.. आपण परतच जाऊ या नको.. काय म्हणतेस??”, दिपक

“तु म्हणतोस ते बरोबर आहे दिपक.. पण आपण असं किती दिवस पळत रहाणार? जर हे पॉलीसीचे पैसे मिळाले तर आपण हा देशच सोडून जाऊ.. माझ्या देशात.. तिकडेच आपण सेटल होऊ. रिस्क आहे, पण

आपल्याला ही शेवटची रिस्क घ्यायलाच हवी. मी आपल्या पासपोर्ट, व्हिसाचं बघायला लागते. त्याला पैसे लागतात दिपक. पॉलिसी क्लेम सेटल होईपर्यंत आपलं काम होऊन जाईल… देन जस्ट यु ॲन्ड मी डिअर…”, स्टेफनी म्हणाली.

वेटरने टेबलावर बिल आणून ठेवले.

स्टेफनीने पर्समधून क्रेडीट कार्ड काढले तसा दिपक म्हणाला..”नो क्रेडीट कार्ड.. कॅश दे…”

स्टेफनीने एकवार दिपककडे पाहीले आणि मग तिने कॅश काढून बिल पे केले.

“वुई हॅव टु बी एक्स्ट्रॉ केअरफुल… काय माहीत मोहीतेचे कश्या कश्यावर लक्ष आहे. उद्या त्याला बिलामध्ये हॉटेल दिसले तर…”, दिपक

“सो व्हॉट दिपक? दवाखान्यातून येताना आपण एखाद्या हॉटेलमध्ये एकत्र जेऊ शकत नाही का?”, वैतागत स्टेफनी म्हणाली..

“आय जस्ट सेड लेट्स बी केअरफुल. तू पॉलीसीचं मला आधी कल्पना दिली असतीस तर आपण आधीच निट प्लॅन करु शकलो असतो…”, दिपक

“बरं ठिक आहे.. अजून किती वेळा मला ऐकवणार आहेस? म्हणलं ना सॉरी.. चल जाऊ आपण..”, स्टेफनी तणतणत गाडीत जाऊन बसली.

येताना गाडीत कोणीच काही बोलले नाही.

---

हॉटेल आल्यावर स्टेफनी गाडीतून उतरली आणि दिपकची वाट न पहाताच आत निघून गेली. मोहीते अजूनही तेथेच बसला होता. स्टेफनीना ताड्ताड पावलं टाकत येताना पाहून मोहीते म्हणाला, “अरे वा! मॅडमचा पाय बरा झालेला दिसतो लग्गेच.. फारच छान डॉक्टर आहे हं…”

स्टेफनीने एकदा त्याच्याकडे रागाने पाहीले आणि काही नं बोलता तेथून निघून गेली.

“मॅडम चिडल्या बहुतेक…”, दारातून येणाऱ्या दिपकला मोहीते म्हणाला… “पण मी तर काहीच नाही बोललो.. येताना गाडीत काही झालं का?”

दिपकने मोहीतेकडे पुर्ण दुर्लक्ष केलं आणि तो आपल्या रुममध्ये निघून गेला.

दुसऱ्या दिवसापासून मोहीते बऱ्याच वेळ बाहेरच राहु लागला. सकाळी लवकर उठून तो कुठेतरी निघून जाई ते दुपारी उशीरा येई. मग जेवण झाल्यावर खोलीत काही तरी करत बसे आणि मग संध्याकाळी परत कुठेतरी जाई ते रात्री फार उशीरा परतत असे.

तो काय करतो? कुठे जातो? ह्याची दिपकला आधी फार चिंता वाटे, पण नंतर त्याने मोहीतेकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. हा मोकळा वेळ तो आणि स्टेफनी पुन्हा एकदा एकत्र घालवु लागले. पण ह्या वेळेस पुर्वीसारखं बंद खोलीत बेड वर एकमेकांच्या सान्नीध्यात न घालवता पुढील आयुष्याचं प्लॅनींग करण्यात त्यांचा वेळ जाऊ लागला.

एक तर मोहीते कधी परतेल ह्याची निश्चीत वेळ ठरलेली नसे. त्यामुळे एकत्र एका खोलीत बेडवर दोघांना बघण्यापेक्षा एकत्र बोलताना बघणे हिताचे होते. आणि शिवाय पुढचा प्लॅन ठरणे आवश्यक होते. पॉलीसीचे पैसे मिळाल्यावर अधिक वेळ न दवडताच दोघांनी प्लॅन पुर्णत्वास न्हेण्याचे ठरवले होते.

सर्व काही सुरळीत चालु आहे असे वाटत होते.. पण अचानक माशी शिंकली..

एके दिवशी सकाळी मोहीत्याने दोघांना खोलीत बोलावून घेतले.

आधी दिपक आणि मग काही वेळाने स्टेफनी मोहीत्याच्या खोलीत गेले. दोघंही खोलीत आल्यावर मोहीतेने खोलीचे दार लावून  घेतले.. आज त्याच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज दोघांना भासत होते.

आपल्या चेहऱ्यावर एक विस्फारलेले हास्य आणत मोहीते दोघांकडे बघत म्हणाला.. “तुम्हाला कदाचीत आश्चर्य वाटेल, पण मला पुर्ण खात्री आहे की थॉमससर दिल्लीला कध्धीच गेले नव्हते...”

दिपक लगेच खुर्चीत सरसावून  बसला. तो काही बोलणार त्याच्या आधीच त्याला थांबवत मोहीते म्हणाला, “एक मिनीट.. आधी मला बोलु द्या....”

दिपक तोंड बंद करून पुन्हा खुर्चीत मागे सरकून बसला.

“हं.. तर माझी खात्री आहे म्हणा किंवा माझा दावा आहे म्हणा.. थॉमससर कध्धीच दिल्लीला गेले नव्हते. मी आजुबाजुचे सर्व ट्रॅव्हल्स, बस स्टॅन्ड्स, एअरपोर्ट, टुरिस्ट एजन्ट्स सर्व सर्व ठिकाणी पुन्हा पुन्हा चौकशी केली. अर्थात थॉमससर तसे बऱ्याच जणांच्या परीचयाचे होते. त्यामुळे सर्वांनीच ठामपणे थॉमससर निदान त्या कुणाबरोबर तरी गेले नव्हते ह्याची खात्री दिली. थॉमस दिल्लीला गेले होते ह्याचा कोणताही पुरावा जसं त्यांचे जाण्याचे तिकीट, तेथे कोणत्या हॉटेलमध्ये ते राहीले, कुठल्या पार्टीशी डिल करण्याकरता कॉन्टॅक्ट केला वगैरे वगैरे ह्यापैकी कोणताच पुरावा उपलब्ध नाही.

ह्या केसवर काम करणारा फक्त मी एकटा नाही मॅडम.. सर.. आमची पुर्ण फौज ह्यावर काम करत असते. ह्यापैकी इतर कुणालाही दिल्लीमध्ये थॉमससरांच्या अस्तीत्वाचा पुरावा मिळाला नाही. हं.. डोन्ट अंडरएस्टीमेट आवर टिम.. इफ़ आय मस्ट से.. मुडद्याला सुध्दा बोलती करणारी आमची लोकं आहेत.. जेंव्हा ते म्हणतात तेंव्हा ते एकशे-एक टक्के सत्य आणि फक्त सत्यच असते. त्यात कोणतीही चूक असुच शकत नाही.

पण मग तो ॲक्सीडेंट ती डेड बॉडी? ती एक मिसींग लिंक राहील कारण ती बॉडी जशी थॉमसचीच होती हे कोणी खात्रीपुर्वक सांगु शकत नाही.. तसेच ती बॉडी थॉमसची नव्हती असेही सांगणारं कोणीच नाही ना…"

मोहीते बोलत होता.

दिपकने तळहाताने चेहऱ्यावरील घाम पुसला.

"मग थॉमससर कुठे गेले? असे अचानक गडप कसे झाले? हे प्रश्न सध्यातरी अनुत्तरीतच आहेत. त्यांचा खुन झाला? का ते जाणून बुजून पॉलीसीचे पैसे मिळवण्यासाठी कुठे लपून बसले आहेत आणि तुमच्या मदतीने हा फ्रॉड प्लॅन केला आहे.. सांगु शकत नाही..", मोहीते म्हणाला..

"अहो काय बोलताय तुम्ही.. आम्ही कश्याला फ्रॉड केस करु?", स्टेफनी चिडून म्हणाली…

"बरोबर.. मलाही वाटत नाही ही केस फ्रॉड आहे. थॉमससरांचा मृत्यु झाला आहे.. ह्या मताचा मी पण आहे. फक्त तो.. तुम्ही जसं म्हणता.. तसा दिल्लीला ॲक्सीडेंटल झाला? का त्यांचा खुन…..", मोहीते

"हे बघा मोहीते.. कामाचं बोला.. हा क्लेम तुम्ही ॲक्सेप्ट केला आहे का? का अजूनही त्यावर काही बाकी आहे ते सांगा. मला वाटतं आता दिड महीना उलटून गेला. तुमच्याकडून होत नसेल तर तसं सांगा मी ही केस हेड ऑफीसला एस्कलेट करतो..", दिपक म्हणाला…

"ट्राय युवर लक.." छद्मी हास्य करत मोहीते म्हणाला.. "ईफ़ आय वेअर यु.. मी असला मुर्खपणा करणार नाही…"

“म्हणजे???”, दिपक आणि स्टेफनी एकदमच म्हणाले..

“मी तुम्हाला क्लिनचीट देण्याचं ठरवले आहे..”, काही क्षण शांततेत गेल्यावर मोहीते म्हणाला.. “येस्स.. क्लिनचीट.. यु विल गेट द फुल मनी बॅक.. फाईव्ह करोड इंडीयन रुपीज फ्रॉम आवर कंपनी...” मोहीते म्हणाला..

दिपकने नकळत एक सुस्कारा सोडला...

“पण...”, मोहीते पुढे चालुच होता.. “त्या पाच करोड मधले चार करोड पन्नास लाख रुपये तुम्ही मला द्यायचे...”

“व्हॉट??”, स्टेफनी आणि दिपक पुन्हा ओरडलेच..

“येस सर.. येस मॅम.. फ़ोर क्रोर, फिफ़्टी लॅक्स ओन्ली... तुम्ही मला द्यायचे...”, मोहीते

“पण का?”, स्टेफनी..

मोहीतेने खांदे उडवले आणि मग आपली बॅग उघडून त्यातून त्याने एक एन्व्हलोप काढले आणि ते टेबलावर फेकले...

थरथरत्या हाताने दिपकने ते एन्व्हलोप उघडले आणि त्यातील ऐवज बघून त्याच्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला...

“काय झालं दिपक?” असं म्हणत स्टेफनीने ते एन्व्हलोप दिपकच्या हातातून काढून घेतले. आतमध्ये तिचे आणि दिपकचे काही फोटो होते. कधी हॉटेलच्या कुठल्याश्या कोपऱ्यात एकमेकांच्या मिठीमध्ये विसावलेले, कधी एकमेकांकडे चोरटे कटाक्ष टाकताना, कधी कुठे तर कधी कुठे.. अगदी काल परवाच्या दुपारच्या जेवण्याच्या वेळचे फोटो सुध्दा त्यात होते...

“तुम्हाला काय म्हणायचे आहे मोहीते..”, स्टेफनी रागाने फणफणत म्हणाली.. “मला काहीच म्हणायचे नाहीये मॅम.. मी तर तुम्हाला हे सर्व माहीत असुनही क्लिन चिट दिली आहे.. शिवाय तुम्हाला पन्नास लाख रुपये मिळणार आहेतच ना. मला फक्त उरलेले पैसे द्या.. एव्हढंच माझं म्हणणं आहे..”, मोहीते..

“आणि जर नाही दिले तर???”, स्टेफनी “तर.. हे एव्हीडंन्स मी हेड ऑफीसला पाठवून देईन. तुमच्या दोघांमध्ये काय चालु आहे ते समजण्यापुरते हे फोटो पुरेसे आहेत. आणि राईचा पर्वत करण्यात आमची कंपनी एक नंबर आहेच. क्लेमचे पैसे द्यावे लागु नयेत म्हणून ते ह्या फोटोंवरून अनेक तर्कवितर्क काढतील... अनेक स्पष्ट न झालेल्या गोष्टी स्पष्ट होत जातील.. कश्याला गडे मुडदे उखडायचे.. तसा तुम्ही थॉमससरांचा खुन नसेल केलेला.. पण उगाच तपासात भलते सलते काही निघाले.. तुमच्यावर कंपनीने खोटे आरोप सिध्द केले..”, मोहीते

“अहो पण सरांचा खुन आम्ही केलेला नाहीये..”, दिपक

“मान्य आहे.. सर.. मान्य आहे.. तुम्ही चिडु नका.. पण काय आहे ना.. कंपनीकडे शेकडो वकीलांची फौज असते, अनेक गुप्तहेर संधीची वाट बघत बसून असतात... एकदा का त्यांच्या डोक्यात संशयाचा भुंगा शिरला की मग तुमचा क्लेम नक्की कोणत्या जन्मी सेटल होईल सांगु नाही शकत..”, मोहीते..

“अहो पण म्हणून एव्हढे पैसे.. निदान ५०-५०% तरी..”, स्टेफनी..

“मॅडम.. अहो नका घासाघीस करु.. पैसे घेणारा मी एकटा थोडी नं आहे. मी म्हणालो तुम्हाला ह्या केसवर माझ्याबरोबर अनेक जण काम करत होते. सगळयांचीच तोंड बंद करावी लागतील ना.. ऐका माझं, उगाच रिस्क नका घेऊ...”, मोहीते

दिपक आणि स्टेफनीची चिडचीड होत होती.

"हे बघा.. उद्या मी सकाळी थोडं बाहेर चाललो आहे, दुपारपर्यंत मी परत येईन तेंव्हा तुमचा निर्णय मला सांगा.." असं म्हणून मोहीते उठून  खोलीच्या बाहेर निघून गेला.

मोहिते निघून गेला, पण जाताना तो जे बोलला ते दोघांच्या डोक्यात घर करून गेले. मोहिते म्हणाला होता, "डोंट ट्राय टू ओव्हरस्मार्ट मी. हे सगळे फोटो आणि माझा पूर्ण रीपोर्ट मी टाईप करून ऑफिसच्या मेल-बॉक्स मध्ये ठेवला आहे. माझ काही बर वाईट झालं तर तो रिपोर्ट कुणाकडे द्यायचा ह्याच्या सुचना ही मी देऊन ठेवलेल्या आहेत. सो टेक केअर... "

---

दुसऱ्या दिवशी सकाळीच मोहिते कुठेतरी निघून गेला होता. स्टेफनी आणि दीपक रूम-मध्ये व्हिस्की घेऊन बसले होते. दोघांनाही काही सुचत नव्हते.

"सध्या तरी आपल्याला दुसरा कुठलाच मार्ग दिसत नहिए...", दीपक म्हणाला, "मोहिते जे म्हणतो आहे तेच करावे. निदान ह्या प्रकरणातून सहीसलामत बाहेर पडू शिवाय काहीच नसण्यापेक्षा ५० लाख मिळत आहेत ते हि काही कमी नाहित... "

“अरे पण तेव्हढे पैसे पुरेसे नाहीत. आपला दोघांचा पासपोर्ट, व्हिसा बनवायचा आहे. शिवाय तिकडे गेल्यावर थोडे फार पैसे नको का हातात?”, स्टेफनी

“अग हो मान्य आहे, पण दुसरा कुठला पर्याय आहे का? सांग असेल तर. “

“आणि समजा आपण मोहितेला पैसे दिले आणि तरीही त्याने सगळे पुरावे आणि त्याचा रिपोर्ट दिला तर?”

“कसा देईल? तो आपल्याला क्लीन-चिट देणार, त्यानंतर तो असं करूच नाही शकणार. त्याच्या अंगावर येईल सगळं. उलट त्याचे पैसे मिळाले कि त्याचा रिपोर्ट कुणाला चुकून सुध्दा मिळू नये ह्यासाठी तो लगेच सगळे नष्ट करून टाकेल. “

“दीपक, मी किती स्वप्न बघितली होती माहीत आहे? थॉमसबरोबरचे माझे लग्न कसे झाले तुला माहीतच आहे. खरं सांगायचे तर इथे असताना मी नरक यातनाच भोगल्यात. परत माझ्या देशात सोडाच पण दुसऱ्या कुठल्या गावी जाऊ शकेन ह्याची आशा मी सोडून दिली होती.

पण आता पुन्हा एकदा आशेचा किरण दिसू लागला होता. वाटत होतं आपण जाऊ परत, शिवाय तू असशील बरोबर. खऱ्या अर्थाने आयुष्य सुरळीत होइल. पण हा नालायक मोहिते..... ” स्टेफनी

“मला एक सांग, तुला खरंच वाटते त्याने त्याचा रिपोर्ट असा टाईप वगैरे करून ठेवला असेल ऑफिस मध्ये?”, अचानक काहीतरी आठवल्यासारखे स्टेफनी म्हणाली.

“हो अर्थात. का? तुला नाही तस वाटत?”, दीपक
“नाही म्हणजे असा त्याने गोपनीय रिपोर्ट ठेवला असेल तर तो कोणी कशावरून उघडून बघणार नाही आधीच? मग त्यात मोहितेला धोका नाही का?”

"पण त्याने त्याच्या माहितीतल्या माणसाकडेच तो रिपोर्ट देऊन ठेवला असणार. हे बघ उगाच नको त्या गोष्टींवर कश्याला विचार करायचा? उगाच फालतू रिस्क घेण्यात काहीच अर्थ नाही. मिळतात ते पैसे घ्यावे आणि गप्पा बसावे असे मला वाटत आहे. तसंही अकलेचे तारे तोडायला आपल्याकडे फार वेळ नाही. मोहिते दुपारी येईल तेंव्हा त्याला आपला निर्णय सांगायचा आहे. " दीपक

रिसेप्शनला कोणी तरी नवीन टुरिस्ट आले आणि दोघांचा तो विषय तिथेच तात्पुरता थांबला.

---

सुट्टीचा मौसम असल्याने नंतर एकामागोमाग एक अजून दोन-चार टुरिस्ट आले. स्टेफनी सगळयांची सोय पाहण्यात मग्न होऊन गेली. दोघांना पुन्हा एकत्र वेळ जेवण उरकल्यानंतर साधारणपणे ४ च्या सुमारास मिळाला.

स्टेफनीने घड्याळाकडे पाहिले आणि तिने एका प्रश्नार्थक नजरेने 'मोहीते अजून कसा आला नाही?' असं दीपकला विचारले.

दिपकनेही खांदे उडवून आश्चर्य व्यक्त केले.

संध्याकाळ उलटून रात्र उजाडली. नवीन आलेले प्रवासी समुद्रावर नाच-गाण्यात मग्न होते.

"कुठे गेला हा मोहिते? दुपारी येतो म्हणाला होता...", स्टेफनी हळूच दीपकला म्हणाली

"काय माहित कुठे गेला.", दीपक

"कुठे मेला-बिला तर नसेल ना?", स्टेफनी

"मुर्खासारखे काही बोलू नकोस..." काहीसा चिडून दीपक म्हणाला

"अरे पण ह्याला कोणी ट्रक ने वगैरे उडवले असेल तर? आपली काय चूक आहे त्यात? तो तर मरेलच पण आपण सुध्दा नाहक मरू...", स्टेफनी

"लेट्स वेट.... कदाचित येईल उशिरा.... " दीपक

रात्र उलटून दुसरा दिवस उजाडला तरीही मोहितेचा काही पत्ता नव्हता. ती रात्र दोघांनी अक्षरशः जागून काढली. उलटणारा प्रत्येक तास दोघांची घालमेल वाढवत होता.

मोहितेचे काही बरे वाईट तर नसेल ना हा एकच विचार राहून राहून दोघांच्या डोक्यात थैमान घालत होता. ज्या माणसाचा त्यांनी इतके दिवस द्वेष केला त्याच माणसाच्या जीवाची चिंता त्याना लागून राहिली होती. कारण त्याच्या जीवाला काही झाले असते तर मोहिते ने जसे सांगितले होते तसे ते इंव्हलोप उघडले गेले असते.

दुसरा दिवसही सरला पण मोहितेचा काहिच पत्ता नव्हता.

स्टेफनीचा संयम सुटत चालला होता.

"आपण त्याची रूम उघडून बघुयात का? काही तरी क्लू सापडेल, तो कुठे गेला आहे, कश्यासाठी गेला आहे। काहीतरी कळेल....", स्टेफनी दीपकला म्हणाली

"गुड आयडिया, तू हो पुढे मी एव्हढे काम संपवून येतो लगेच तिकडे", दीपक

"प्लीज लवकर ये, मला त्याच्या खोलीत एकटीला नाही जायचेय", अस म्हणून स्टेफनी निघून गेली

दिपकने हातातले काम पटकन संपवले आणि तो मोहित्याच्या रुम मध्ये गेला.

त्या गबाळया मोहित्याप्रमाणेच त्याची रूम होती. सर्व सामान अस्ताव्यस्त पसरलेले, कपडे घडी न करता तसेच कपाटात लोंबत पडलेले होते.

स्टेफनी आणि दिपकने त्याची पूर्ण खोली धुंडाळली, पण म्हणावे तसे काही हाती लागले नाही.

निराश होऊन दोघ बाहेर आले.

---

दोन दिवस उलटून गेले पण त्याचा काहीच पत्ता नव्हता.

“मला एक कळत नाही, तो असा अचानक गायब झालाच कसा? त्याने आपल्याला पूर्ण कॉर्नर केले होते. सुटण्याच्या कुठलाच मार्ग आपल्याकडे नव्हता. आपल्याला त्याला साडे-चार करोड द्यावेच लागले असते. मग असं असताना तो न सांगता गेला कुठे?”, दीपक

दोघ जण बोलत होते तेवढ्यात एक सर्व्हंट आतमध्ये आला.

“बोल, काय झाल?”, स्टेफनी

“बाहेर पोलिस आले आहेत त्यांना तुम्हाला भेटायचे आहे…. “

स्टेफनी आणि दिपकने एकमेकांकडे बघितले.

“ठीक आहे, तू जा, मी आलेच म्हणून सांग…”

सर्व्हंट निघून गेला.

“पोलिस? कश्याला आले असतील?”, स्टेफनी म्हणाली

“ते तुला बाहेर गेल्यावरच कळेल”, दीपक

“म्हणजे, तू नाही येणार बाहेर?”, स्टेफनी

“वेडी आहेस का? मी आणि पोलिसांसमोर? उगाच त्यांनी ओळखले तर? नको, तू जा, आधी बघ तर काय म्हणतात ते”

स्टेफनी नाईलाजाने एकटीच बाहेर गेली

लॉबीमध्ये एक इन्स्पेक्टर आणि एक हवालदार उभे होते

“नमस्कार इन्स्पेक्टर, मी स्टेफनी, ह्या हॉटेलची ओनर”, आपल्या चेहऱ्यावर शक्य तेव्हढे हास्य आणत स्टेफनी म्हणाली

“नमस्कार. मी तुमच्या हॉटेल मध्ये उतरलेल्या एका इसमाची चौकशी करायला आलोय”, इन्स्पेक्टर म्हणाले

“हो जरुर. बोला कुणाची माहिती हवीय?”, स्टेफनी

इन्स्पेक्टर ने हवालदार कडून एक फोटो घेतला आणि तो स्टेफनी समोर धरला.

“आपण ह्यांना ओळखता?”

स्टेफनीने तो फोटो निट पाहीला.

“नो इन्स्पेक्टर, मी ह्यांना आधी कधीच बघितले नाही. कोण आहेत हे?”, स्टेफनी

स्टेफनी च्या ह्या अनपेक्षित उत्तराने इन्स्पेक्टर काही क्षण गोंधळून गेले. मग ते म्हणाले, “आर यु शुअर? पाहिजे तर परत एकदा फोटो बघा”

“आय एम हंड्रेड पर्सेंट शुअर इन्स्पेक्टर मी खरच ह्यांना ओळखत नाही. ह्यांना कधी पाहिले पण नाही. कोण आहेत हे?” स्टेफनी

“हे मोहिते, केशव मोहिते. लाइफ़-लाइन इन्शुरन्स कंपनीचे एजंट”, इन्स्पेक्टर

“काय? हे केशव मोहिते?”, स्टेफनी जवळ जवळ ओरडलीच

“हो… का? काय झाल?”, इन्स्पेक्टर

“अहो पण हे कसे केशव मोहीते असु शकतील?”, स्टेफनी

स्टेफनी ने मागे वळून पाहिले. जवळूनच एका दार आडून दीपक त्यांचे बोलणे ऐकत होता. स्टेफनीची आणि त्याची नजरा-नजर झाली. त्याने हातानेच हळूच खूण करून तिला शांत राहायला सांगितले.

“नाही काही नाही, मी खरंच ओळखत नाही ह्यांना, का काय झाल?”, स्टेफनी शक्यतो नॉर्मल रहात म्हणाली

“ह्यांचा खून झालाय, साधारण चार दिवसांपूर्वीच, त्यांची डेड बॉडी सापडली आम्हाला. ओळख पटवताना कळले. बॉडीच्या खिश्यात ड्रायव्हींग लायसंन्स आणि कंपनीचे व्हिजीटींग कार्ड मिळाले त्या नावाचे. शिवाय कंपनीच्या हेड ऑफीसमधून आम्ही खात्री करून घेतली आहे.. म्हणून आम्ही त्यांच्या हेड ऑफिसला फोन केला तेंव्हा कळाले की केशव मोहिते तुमच्याच हॉटेलवर उतरले आहेत एका तुमच्याच एका क्लेमच्या तपासणी संदर्भात… “, इन्स्पेक्टर

"नाही इन्स्पेक्टर तुमचा काहीतरी घोटाळा होतोय. हि व्यक्ती नक्की आमच्या हॉटेल वर उरली नव्हती. पाहिजे तर तुम्ही हा फोटो सपोर्ट स्टाफला दाखवून खात्री करू शकता.", स्टेफनी

"नाही ठीक आहे, त्याची तशी काही आत्ता आवश्यकता नाही. कदाचित मोहित्यांनी ऐन वेळी विचार बदलून दुसऱ्या कुठल्या हॉटेल मध्ये खोली घेतली असेल... एनीवेज मी बाकीच्या हॉटेल्स मध्ये चौकशी करतो. काही लागले तर मात्र पुन्हा तुम्हाला थोडा त्रास द्यायला येइन...", इन्स्पेक्टर

"माय प्लेझर सर...." अस म्हणून स्टेफनी निघून गेली

---

"हा काय प्रकार आहे दीपक?" स्टेफनी म्हणाली

"तू तो फोटो नक्की निट बघितलास? नक्की तो मोहिते नव्हता?", दीपक

"अरे नक्की काय? अर्थात त्याचा चेहरा कसा विसरीन मी?", स्टेफनी

"पण मग हा मेलेला मोहिते होता, तर मग तो आपल्याकडे येउन राहिला होता तो कोण?", दीपक

"दीपक, अरे मोहिते तर मेला, मग तो रिपोर्ट आणि ते इंव्हलोप? ते जर का कोणी बघितले तर?", स्टेफनी

"अग तो मोहितेच जर फेक होता तर कसला रिपोर्ट आणि कसलं काय?", स्टेफनी

दोघ बोलत असतानाच परत एक नोकर फोन घेऊन आला

“मॅडम, बैकेतून फोन आहे तुमच्यासाठी… “, स्टेफनीला म्हणाला

“सांग त्यांना आत्ता कामात आहे, नंतर फोन करा”, स्टेफनी

“सांगितले, आधीच सांगितले मी पण त्यांना तुमच्याशी काहीतरी महत्वाचे बोलायचे आहे”, नोकर

“ठीक आहे, आण इकडे” अस म्हणून स्टेफनीने तो फोन घेतला

“बोला मैनेजर साहेब”, शक्य तितका आवाजात गोडवा आणत स्टेफनी म्हणाली

“सॉरी तुम्हाला थोडा त्रास द्यायला फोन केला, पण काम तास महत्वाचे होते”

“अरे त्रास कसला त्यात, काम महत्वाचे असल्याशिवाय तुम्ही फोन करणार नाही माहित आहे मला. बोला काय काम काढलेत?”, स्टेफनी

“तुमचा दोन लाखाचा चेक बाउन्स झालाय, आधीच करंट अकाऊंटवर झिरो बॅलन्स असल्याने हेव्ही इंटरेस्ट पडतोय, त्यात हा चेक रिटर्न. काही प्रॉब्लेम झालाय का?”, मैनजर

“आय एम सॉरी? तुम्ही कश्याबद्दल बोलत आहात?”, स्टेफनी

“अर्थात तुमच्या अकाऊंटबद्दल…. “

“अहो पण अकाऊंटला झिरो बॅलन्स होईलच कसा? आम्ही किमान १० लाख तरी ठेवतो खात्यात. आणि आज पर्यंत त्यात कधीच बदल झाला नाही. “

“हो म्हणूनच फोन केला काही प्रॉब्लेम झालाय का… “

“नाही प्रॉब्लेम काही नाही पण खाते रिकामेच असू शकत नाही “, स्टेफनी

“अहो मी काय खोट सांगतोय का? एक काम करा एकदा तुमच्या अकांऊंटंटशी बोलून बघा”

मैनेजरने फोन ठेवून दिला

“काय झालं स्टेफनी?”, स्टेफनी चा चिंतीत चेहरा बघून दीपक म्हणाला

“अरे, मैनेजर चा फोन होता, आपले करंट अकौंट रिकामे आहे म्हणे”, स्टेफनी

“कस शक्य आहे? आणि इतक्यात आपण कुठला मोठा चेक पण दिला नाहीये”

“तेच तर म्हणाले मी, मला काहीच काळात नाहीये.... “

“ओह माय गॉड..”, दिपक काही क्षणांनंतर म्हणाला

“काय झालं?”, स्टेफ़नी

“मोहीते... तु.. तू बॅंक अकांऊंट आपल्या कंप्युटरवरून ओपन करतेस ना?”, दिपक

“हो.. कित्तीवेळा.. असं अचानक पेमेंट कुणाचे करायचे असले तर ऑनलाईन ट्रान्स्फरला वापरते..”, स्टेफनी

“बरोबर.. पण पासवर्ड?”, दिपक

“पासवर्ड मला पण माहीत नाही.. पण थॉमसने सेव्ह पासवर्ड करून ठेवला होता त्यामुळे मला लॉगीन करता यायचे..”, स्टेफनी

“देअर यु गो.. त्या दिवशी मोहीते आपला कंम्प्युटर वापरत होता आठवतं.. मुर्ख आहोत आपण स्टेफनी त्याने इथुनच लॉगीन केले आणि पैसे ट्रांन्स्फर केले असणार.. चल पटकन आपण ऑनलाईन स्टेटमेंट बघु..”

दिपक आणि स्टेफनी पळत पळत खोलीत गेले.

त्याच दिवशीची सकाळची ऑनलाईन ट्रान्स्फरची एक एन्ट्री दिसत होती. भल्या सकाळीच मोहीतेने सर्व पैसे हॉटेलच्या खात्यातून दुसऱ्या कुठल्यातरी खात्यात ट्रान्स्फर केले होते...

“ओह शिट्ट...”, स्टेफनी डोक्याला हात लावत म्हणाली

“हा मोहीते नक्कीच कोणीतरी फ्रॉड आहे.. आणि अर्थात अजूनही जिवंत आहे. आज सकाळीच त्याने पैसे ट्रान्स्फर केले आहेत...”, दिपक

“आता? पोलिसांकडे जायचे?”, स्टेफनी

“वेडी आहेस का? आधीच आपण पोलिसांपासून कसं पळायचं ह्याचे मार्ग शोधतो आहो आणि तू पोलिसांकडे जायचं म्हणतेस? त्यात तू सकाळीच मोहीते इथे रहात नव्हता म्हणून सांगीतले आहेस..”, दिपक

“मग? काय चुकीचं सांगीतलं? पोलिसांनी जो फोटो दाखवला तो आपल्याकडे रहातच नव्हता.”, स्टेफनी

“मला वाटतं कोणीतरी हे जाणून बुजून करत आहे. आधी थॉमस सरांचा खुन, नंतर हा फ्रॉड केशव मोहीते, मग कळतं खरा मोहीते कोणी दुसराच होता.. त्याचा खुन होतो आणि लक्षात येईपर्यंत हा फ्रॉड मोहीते आपल्याला गंडवून आपल्या खात्यातील सर्व पैसे घेउन फरार होतो...”, दिपक

“दिपक.. आपण कंगाल झालोय... पुर्ण अडकलो आहोत आपण. पळून जायचं म्हणलं तरी आपल्याकडे पैसे नाहीत. खात्यात शुन्य पैसे आहेत. हे हॉटेल दोन दिवसांपेक्षा अधिक काळ आपण चालु ठेवु शकणार नाही...”, स्टेफनी..

“हे बघ, हायपर होऊ नकोस, आपण काढु काही तरी मार्ग..”, दिपक

“काय मार्ग काढणार आपण?”

“हे बघ.. आपण थोडं लोन काढु बॅंकेतुन, सध्या सिझन चांगला आहे, हळु का होईना, पैसे होतील रिकव्हर..”, दिपक

“वेडा आहेस तु.. आत्तापर्यंत थॉमसच्या क्रेडीबिलीटीवर चालु होते सगळे. थॉमस नाही म्हणल्यावर कोण लोन देईल आपल्याला? मागच्या महीन्यात एक तरी चेक जमा केला आहे का आपण बॅंकेत.. फक्त पैसे विड्रॉ चालु आहे...”, स्टेफनी

दोघजणं बोलत खोलीतून बाहेर आले आणि समोर उभ्या असलेल्या त्या व्यक्तीला पाहून दोघं जणं जागेवरच थबकले. दिपकच्या पायाखालची तर जमीनच सरकली.

दिपकवर पिस्तुल रोखुन दारामध्ये तो तुरुंगातला गिड्डा पोलिस इन्स्पेक्टर उभा होता.. त्याच्या भल्या मोठ्ठ्या देहाच्या पार्श्वभुमीवर ती रिव्हॉल्व्हर खेळण्यातली भासत होती.

त्याला बघताच दिपक पळून जाण्यासाठी मागे वळला तसा तो पोलिस म्हणाला, “पळून जायचा विचार सुध्दा करु नकोस.. तुला गोळी घालायला मला जरा सुध्दा कष्ट पडणार नाहीत..”

त्याच्या आवाजातली जरब दिपकला खात्री देत होती की तो इन्स्पेक्टर खरं बोलतो आहे.

दिपक शांतपणे माघारी वळला...

“बऱ्याच दिवसांनी भेटलो नाही?”, इन्स्पेक्टर..

“हे बघा इन्स्पेक्टर.. मी निर्दोष होतो आणि निर्दोष आहे. मी माझं आयुष्य नव्याने सुरु केलं आहे.. प्लिज..प्लिज मला जाऊ द्या..”

इन्स्पेक्टरने मागे उभ्या असलेल्या हवालदाराकडे एक हास्य फेकले आणि म्हणाला.. "जाऊ द्या म्हणे.. साला माझा तुरुंग फोडून पळालेला कुत्रा.. इतके दिवस कसे काढलेत मला माहीत.. शरमेने मान झुकली होती.. ह्याला असा फरफटत न्हेऊन कोंबणार परत तुरुंगात तेंव्हा कुठे माझी हरवलेली इभ्रत परत येईल.. आणि हा म्हणे.. जाऊ द्या.."

तो हवालदार सुध्दा त्याच्या हसण्यात सामील झाला.

स्टेफनीचे लक्ष शेजारच्या टेबलावर असलेल्या फ्राईंग पॅन कडे गेली. तिने हळुच तो पॅन उचलला आणि क्षणाचाही विलंब न करता त्या इन्स्पेक्टरच्या डोक्यात घातला.

थड्ड आवाज करतो तो पॅन त्या गिड्ड्याच्या वर्मी बसला. पॅनचे हॅंडल तुटून स्टेफनीच्या हातात आले. तो गिड्डा धाड्कन मागच्या हवालदारावर कोसळला पण कोसळताना त्याने आपल्या पिस्तूलातून गोळी झाडली..

"रन्न दिपक.. मागे एक स्पिड बोट आहे ती घे आणि पळ..", स्टेफनी विव्हळत म्हणाली..

इन्स्पेक्टरने झाडलेली गोळी तिच्या पोटात घुसली होती..

"नाही स्टेफनी तुला सोडून नाही.. तू चल..", दिपक स्टेफनीच्या दंडाला धरून ओढत म्हणाला..

"मुर्ख पणा करु नकोस.. ते शक्य नाही.. तू जाsssss"

दिपक क्षणाचाही वेळ न दवडता मागच्या दाराकडे धावत सुटला..

गोळीबाराचा आवाज ऐकून बाहेर जिपपाशी थांबलेले दोन हवालदार धावत आत आले.

“पकडा त्याला..” तो गिड्डा इन्स्पेक्टर सावरून उठून  बसत तो म्हणाला.. त्याच्या डोक्यातून रक्त्ाचा एक बारीक ओव्हळ गालावर आला होता. संतापाने त्याचा चेहरा लालबुंद झाला होता.

ते तीन हवालदार दिपक ज्या दिशेने पळाला होता तिकडे धावले.

स्टेफनी पोटावर हात धरून जमीनीवर कोसळली होती. त्या गिड्याने एकवार तिच्याकडे तुच्छतेने पाहीले बुटाची एक लाथ तिच्या पोटात घातली आणि तो सुध्दा त्या हवालदारांच्या मागे गेला.

वेदनेची एक सणसणीत कळ स्टेफनीच्या डोक्यात गेली. पोटातून रक्ताची धार वहात होती. क्षणार्धात तिचा चेहरा पांढरा-फटक पडला. समोरचे दृष्य तिला अंधुक दिसु लागले. त्या अंधुक प्रकाशात तिला समोर तीन व्यक्ती उभ्या असलेल्या दिसल्या.

कोण होत्या त्या व्यक्ती. पाठीमागची, डावीकडची ती व्यक्ती.. ती.. हो.. ती व्यक्ती मोहीतेच होती. अंगात तो कळकट सफारी नव्हता तर एक गडद लाल रंगाचा फुलाफुलांचा शर्ट होता. मागे उजवीकडची व्यक्ती.. तिला स्टेफनीने कुठेतरी पाहीले होते.. कुठे बरं...??

हं.. तो युसुफ.. दिपकचा मित्र.. ज्याने थॉमसची डेड बॉडी आपल्या ट्रकमधून न्हेउन त्यांची मदत केली होती.

पुढची मध्ये असलेल्या त्या व्यक्तीला मात्र स्टेफनीने कधी पाहीले नव्हते. त्या अवस्थेतही स्टेफनीला ती व्यक्ती एकदम चिकनी वाटली. एक हॅंड्सम तरुण खांद्याला एक गिटारसारखी बॅंग लावून  उभा होता.

ते तिघेही स्टेफनीकडे बघून खदा-खदा हसत होते.

तो चिकना तरुण स्टेफनीच्या जवळ आला आणि खाली बसला व मोहीतेकडे बोट दाखवत म्हणाला, “ह्याला ओळखतेस ना? मोहीते हा.. आठवला? आपलाच माणूस आहे हा.. आपला म्हणजे.. माफीया..”

स्टेफनी अंधुक होणाऱ्या नजरेतून डोळे विस्फारून बघण्याचा प्रयत्न करत होती. तिची शक्ती कमी कमी होत चालली होती.

आणि हा .. हा युसुफ..”, युसुफकडे बोट दाखवत तो म्हणाला..”ह्याला आधी आपण टपकवणारच होतो, पण ऐन वेळी हा म्हणाला की त्याला दिपक कुठे आहे ते माहीत आहे.. वाचला साला…”

“हरामखोर..”, स्टेफनी स्वतःशीच पुटपुटली. क्षणभर धावत जावं आणि दिपकला युसुफ बद्दल सांगावं असं वाटून तिने उठण्याचा प्रयत्न केला तसा पोटातून अजून एक वेदनेची तिव्र लहर तिच्या अंगभर पसरली.

“..आणि तुझा नवरा.. थॉमस.. आम्हीच मारला त्याला…”, तो चिकणा अजूनही बोलत होता.

स्टेफनीला एकावर एक धक्के बसत होते…

“आता तू बोलशील- का? का केलं असं आम्ही..? साला त्या दिपकमुळे, बॉसच्या भावाला मारलांन त्यानं.. मग त्याला जिता सोडायचा? नाय… मंग? असा डायरेक्टली मारायचा? नाय.. असा पळवून पळवून मारणार.. जो पर्यंत तो पळायचं सोडून आमच्याकडे मरणाची भिक मागत नाय तो पर्यंत पळवणार त्याला… हा ‘पाठलाग’ सुरुच रहाणार त्याच्या मृत्युपर्यंत…”

स्टेफनीला निम्मे अर्धे त्यातले कळतच नव्हते. क्षीण होऊन ती पडली होती.

त्या चिकण्या तरुणाने खिश्यातून एक मोठ्ठा सुरा काढला आणि स्टेफनीच्या नाजून गळयावरून सर्रकन फिरवला.

स्टेफनीला हा त्रास मात्र काहीच जाणवला नाही.. क्षणार्धात तिचा देह निष्प्राण झाला होता…….

# ॥ पर्व दुसरे ॥

दमणमधील ‘वुडलॅंड हॉटेल’ अनेक व्ही.आय.पी आणि व्ही.व्ही.आय.पींनी भरलेले होते. मुंबईतील गजबजलेल्या रस्त्यांवर टॅक्सी दिसाव्यात तश्या ऑडी आणि मर्सीडीज पार्कींगमध्ये लागलेल्या होत्या. पोलिसांच्या दोन सेक्युरीटी व्हॅन्स गेटवर अलर्ट होत्याच शिवाय अनेक सेलेब्रेटींचे खाजगी बॉडीगार्ड चेहऱ्यावर मख्ख भाव ठेवून उभे होतेच.

अर्थात कारणही तसंच होतं. मेहतांची पार्टी म्हणली की ही अशी अनेक बडी थेर आवर्जुन उपस्थीत असायचीच.

हॉटेलच्या बाहेर उभारलेल्या शामियान्यात एक पस्तीशीतील तरुणी (!) शैम्पेनचे घोट घेत बरोबरच्या लोकांशी चर्चा करण्यात मग्न होती. इतक्यात एक वेटर तिच्या जवळ येउन अदबीने उभा राहीला. त्या तरुणीने प्रश्नार्थक नजरेने त्या वेटरकडे पाहीले. वेटरने हातातल्या ट्रे मधील फोन त्या तरुणीच्या हातात दिला आणि तो तेथून निघून गेला.

‘माया स्पिकिंग’, ती तरुणी अत्यंत हळू आवाजात म्हणाली, परंतु तिच्या आवाजातली जरब ती मायाच आहे हे सांगण्यास पुरेशी होती.

पुढची तीस सेकंद माया फोन वर ऐकत होती. शेवटी तिच्या चेहऱ्यावर एक मंद हास्य उमटले आणि तिने फोन बंद केला.

---

दिपकला अचानक खाड्कन जाग आली तसा तो उठून बसला. घामाने त्याचे शरीर ओले-चिंब झाले होते. वेगाने होणाऱ्या श्वासोश्वासाने त्याची छाती वेगाने खाली वर होत होती.

त्याने आजूबाजूला पहिले. एका १० x १२ च्या छोट्याश्या खोलीतील बेडवर तो होता. खिडक्या बंद होत्या आणि पडदे लावलेले होते त्यामुळे वेळेचा नक्की अंदाज येत नव्हता. भिंतीवर फिक्कट पांढऱ्या रंगाचा उजेड देणारी ट्यूब-लाईट चालू होती. बेड जवळच्या टेबलावर काही औषधांच्या बाटल्या ठेवलेल्या होत्या.

आपण नक्की कुठे आहोत ह्याचा काहीच अंदाज त्याला येत नव्हता. दिपक बेड वरून खाली उतरला तसं कमरेच्या थोडे वर एक जोरदार कळ आली. दिपक ने शर्ट थोडा वर करून पहिले तेंव्हा त्याला तेथे झालेली जखम दिसली. क्षणार्धात दीपकचे मन भूतकाळात गेले. घडलेला तो सर्व घटनाक्रम त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला.

*तो गिड्डा इन्स्पेक्टर, स्टेफनी, दिपकला वाचवण्यासाठी तिने केलेला प्रयत्न, 'रन दिपक ... रन', तिची आर्त विनंती. जखमी स्टेफनीला सोडून पळताना त्याला सांगितलेल्या ठिकाणी मिळालेली स्पीड बोट. त्याच्यावर होणारा गोळ्यांचा हल्ला आणि बोट समुद्रात थोडी आत पर्यंत जाताच 'सुटलो एकदाचे' म्हणेपर्यंत लांब पल्ल्याच्या स्नायपर बंदुकीतून आलेली गोळी. गोळीचा नेम चूकला असला तरी त्याच्या शरीराला घासून ती गेली होती.*

*तलवारीचं गरमं पातं खसकन कोणी निसटतं मारावं तसा भास दिपकला झाला. अतीव वेदनेने तो कळवळून उठला. परंतु वेदना गोंजारत बसायला वेळ नव्हता. गोळ्यांचे आवाज अजूनही येतच होते. त्याने एका हाताने जखम दाबून धरली आणि दुसऱ्या हाताने स्पिडबोटचा गेअर बदलुन तिला वेग दिला.*

*किती मिनीटं, किती तास दिपक बोट चालवत होता त्यालाच माहीत. जखमेतून अजूनही भळाभळा रक्त वाहत होते. दिपकची शक्ती संपत चालली होती. दिपकने बोटीमध्ये काही खायला, किंवा जखमेला लावायला काही औषध आहे का पहाण्याचा प्रयत्न केला पण काही क्षुल्लक गोष्टी सोडल्या तर त्याच्या हाती काहीच लागले नाही.*

*दूरवर अथांग समुद्र पसरला होता. दिपकने बोटीचे स्टेअरींग सोडून दिले आणि बाकड्यावर त्याने स्वतःला झोकून दिले. कितीतरी वेळ बोट काहीच कंट्रोल नसल्याने कुठेही भरकटत होती. दिपकला स्टेफनीचा चेहरा डोळ्यासमोर दिसत होता. तिच्या पोटात घुसलेली गोळी त्याला आठवली आणि ताडकन तो उठून उभा राहीला तशी वेदनेची एक सणक त्याच्या शरीरभर पसरली.*

*विव्हळत तो पुन्हा खाली कोसळला. ग्लानीने त्याचे डोळे मिटत होते. कधीतरी तो बेशुध्द पडला.*

---

दिपकने आठवण्याचा व्यर्थ प्रयत्न केला, पण पुढचे त्याला काहीच आठवत नव्हते......

दिपकने एक आवंढा गिळला आणि मग डोळ्यावर हाताचे मनगट ठेवून तो जरावेळ पडून राहीला.

थोड्यावेळाने तो बेडवरून खाली उतरला आणि खोलीच्या दारापाशी गेला. दाराला आतून कडी नव्हती. त्याने दार उघडायचा प्रयत्न केला परंतु बहुदा दार बाहेरून बंद होते. दिपकने खोलीत इतरत्र नजर फिरवली. छोटी हॉटेल्स किंवा हॉस्पीटल्समध्ये सर्व्हंट्सला बोलवायला बेल असते तशी एक बेल तेथे होती. त्याने बेलचे बटन दाबले.

दूरवर कुठेतरी ट्रींगsss असा बेलचा आवाज आला. आणि क्षणार्धात बाहेरच्या जिन्यावर पावलांचे आवाज येउ लागले.

दिपक पुन्हा आपल्या बेडवर जाऊन बसला. बाहेरून येणारी लोक कोण असतील ह्याचा काडीमात्र अंदाज दिपकला येत नव्हता. कदाचीत.. कदाचीत ते पोलिसच असतील तर? दिपक पकडला गेला असेल तर? त्याची शुध्दीवर यायची वाटत बघत खाली दोन हवालदार उभे असतील तर??

दिपकला त्या विचाराने घाम फुटला. आपण बेल वाजवून  घाई तर नाही केली असे त्याला वाटून  गेले. पण आता पर्याय नव्हता.

दाराचे आधी कुलुप आणि मग कडी उघडल्याचा आवाज आला आणि पाठोपाठ दोन व्यक्ती आतमध्ये आल्या.

समोर दोन किरकोळ अंगलटीच्या व्यक्ती पाहुन.. आणि अर्थात त्या पोलिस नाहीत हे जाणून दिपकला हायसे वाटले. “मी कुठं आहे?”, दिपकने विचारले…

“सी-प्रिन्सेस हॉटेल..”, समोरची एक व्यक्ती म्हणाली.

त्या व्यक्तीच्या हातामध्ये एक पेन होते. बहुधा हॉटलमध्ये कारकुनी काम करणारा कोणीतरी असावा. बेलचा आवाज ऐकताच तो धावत पळत हातातले काम सोडून आला होता.

“सी-प्रिन्सेस?? कुठं आलं हे?”, गोंधळून दिपकने विचारले

“दमण..”, ती व्यक्ती

“दमण!!”, आश्चर्यचकीत होत दिपक म्हणाला.. “मी कधी आलो इथं? कुणी आणंलं मला इथे?”

“एक आठवडा झाला तुम्हाला इथं येऊन.. बेशुध्दच होता तुम्ही. मच्छीमारांना सापडलात तुम्ही समुद्रात. त्यांनी आणलं इथं…”, ती व्यक्ती

“पण इथं रहाण्याचं बिल.. औषधांचा खर्च??”, दिपक
“त्याची तुम्ही काळजी करु नका, तुमचं बिल आणि इतर औषधांचा खर्च भरण्यात आलाय आमच्याकडे..”

"पण कुणी भरले पैसे…", अधिकच गोंधळत दिपक म्हणाला..

"तुम्ही आराम करा.. आपण नंतर बोलु. मी प्रथम तुम्हाला खायला काही पाठवून देतो आणि डॉक्टरांना फोन करतो.. ते एकदा तुम्हाला येऊन तपासतील.." असं म्हणून त्या व्यक्ती जायला निघाल्या..

"गोळी लागली होती मला…", दिपक

"हो.. माहीती आहे आम्हाला…", दुसरी व्यक्ती प्रथमच बोलली..

"मग… अं.. काही पोलिस केस वगैरे???", दिपक

"नाही.. काही नाही.. तुम्ही आराम करा..", असं म्हणून त्या दोन व्यक्ती निघून गेल्या.

---

दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर येउन दीपकला तपासून गेले. दीपकला आता बरच बर वाटत होत, पण शरीरात प्रचंड अशक्तपणा होता. हॉटेल मधून त्याला वेळो-वेळी नाश्ता, जेवण येत होते. हे का? कश्यासाठी? ह्याचे पैसे कोण भरतेय अश्या गोष्टींचा फारसा विचार करण्याचा त्याने फारसा प्रयत्न केला नाही. काही दिवस त्याने खाणे आणि झोपणे ह्यातच घालवले.

हा सर्व पाहुणचार आठवडाभर चालू होता. एके दिवशी हॉटेलचा मैनेजर त्याच्या खोलीत आला. दीपक एक फिल्मी मैग्झीन वाचण्यात दंग होता.

मैनेजरला पाहताच दीपक उठून बसला.

मैनेजर म्हणाला, “सर उद्यापासून तुम्हाला इथे राहता येणार नाही”
“पण का?” अचंबित होत दीपक म्हणाला

“सर, आता तुमची तब्येत बरी आहे.. त्यामुळे रूमचे अधिक पैसे भरण्यास त्यांनी नकार दिला आहे…..”, मैनेजर

“त्यांनी? म्हणजे कोणी?”, दीपक

“माफ करा सर, ते नाही सांगू शकत….”, मैनेजर

“अरे पण अस अचानक सांगून, मी कुठे जाणार बाहेर?. मला तर इथली काहीच कल्पना नाही”, दीपक

“हो ते बरोबर आहे सर…. पण… “, मैनेजर

काही क्षण शांततेत गेले आणि मग तो मैनेजर परत म्हणाला, “एक करता येईल, जर तुमची स्पीड बोट तुम्हाला नको असेल तर एक गिऱ्हाईक आहे त्यासाठी. तुम्ही ती विकून मिळालेल्या पैश्यातून काही दिवस अजून इथे राहू शकता”

कल्पना तशी चांगली होती. दीपकला हि त्या स्पीड-बोटीचा काही उपयोग नव्हता.

“मी तयार आहे”, दीपक म्हणाला, “पण किती पैसे मिळतील?”
“साधारण १५ हजार मिळतील. तुम्हाला महिनाभरासाठी तेव्हढे पुरेसे आहेत.”, मैनेजर

दीपक तयार झाला.

फारसा प्रयत्न न करता दीपकची निदान एक महिन्याभराची तरी सोय झाली होती.

एके दिवशी दीपक खालच्या बारमध्ये ड्रिंक्स घेत बसला होता, इतक्यात बाहेर एका वेगाने जाणाऱ्या गाडीचे ब्रेक्स लागण्याचा आणि पाठोपाठ धडकण्याचा आवाज झाला.

हॉटेलचा मैनेजर, बारमधली काही लोक आणि दीपक पळत-पळत बाहेर आले.

बाहेर बरीच गर्दी जमली होती. गर्दीमध्ये एक काळया रंगाची रोल्स-रॉईस होती आणि गाडीच्या पुढच्या चाकापाशी एक माणूस पाय धरून तळमळत बसला होता. गर्दीमधल्या दोन-चार लोकांनी एव्हाना गाडीचे दार उघडून ड्रायव्हरला बाहेर खेचले होते आणि त्याची धुलाई चालू केली होती.

थोड्याच वेळात पोलिसाच्या शिट्टीचा आवाज कानावर पडला तसा दीपक हळूच गर्दीच्या मागे सरकला. पांढरा पोशाख परिधान केलेला एक पोलिस शिट्टी वाजवत गर्दीच्या दिशेने आला. त्याने लोकांना बाजूला केले आणि झोकांड्या खाणाऱ्या ड्रायव्हरला पकडले. अर्थात तो ड्रायव्हर पिलेला होता हे वेगळे सांगायची गरज नव्हती.

त्या पोलिसाने वायरलेस वरून काही संदेश दिले आणि तो तेथे उभ्या असलेल्या लोकांकडून घटनेबद्दल अधिक माहिती घेऊ लागला. थोड्याच वेळात एक जीप तेथे येउन थांबली आणि आतून दोन हवालदार उतरले. त्या पोलिसाने त्या ड्रायव्हरला आणि त्या जखमी माणसाला जीप मध्ये बसवले आणि जीप निघून गेली.

एव्हाना गर्दीही पांगली होती.

ऊन चांगलेच डोक्यावर चढले होते. त्या पोलिसाने डोक्यावरची टोपी काढून रुमालाने घाम पुसला आणि मग इकडे तिकडे बघत तो बार मध्ये घुसला.

पोलिसाला बघतच मैनेजर अदबीने पुढे धावला.

“काय घेणार सर? व्होडका, फेनी का थंडगार बिअर?”

“थंडगार पाणी दे... ड्युटीवर आहे”, हसत हसत तो पोलिस म्हणाला

“साला नसती आफत झाली...”, पाणी घेत पोलिस म्हणाला
“काय झालं सर?”, मैनेजर

“गाडी बघितली नाही का बाहेर कुणाची आहे? माया मॅडमची गाडी आहे. कशी न्हेऊ पोलिस स्टेशनला?, एफ़. आय. आर. पण नाही करता येणार”

“हम्म...”, मैनेजर मान डोलवत म्हणाला

“एक काम कर, कुणी ड्रायव्हर असेल तुझा तर गाडी पाठवून दे बंगल्यावर. मी जातो पोलिस स्टेशनला” अस म्हणून तो पोलिस निघून पण गेला

हॉटेलचा ड्रायव्हर नुकताच गाडी घेऊन बाजारात सामान आणायला गेला होता. त्याला यायला नक्कीच वेळ लागणार होता. तो पर्यंत ती गाडी अशी हॉटेलच्या दारात ठेवणे त्या मैनेजरला कठीण जात होते. त्याची चलबिचल चालु होती.

दीपक हे सगळे लपून पहात होता. ‘माया मॅडम’ हे नाव त्याने ह्यापूर्वीही त्या हॉटेल मध्ये अनेकदा ऐकले होते. तिथे येणारे अनेक लोक त्यांच्या मालकीच्या कुठल्या न कुठल्या उद्योग-धंद्यातच काम करणारे असायचे. ह्यावरून ह्या ज्या कोण माया मॅडम आहेत त्या नक्कीच कोण तेरी मोठ्या आसामी आहेत हे दिपकने ताडले होते.

थोडा विचार करून तो मुद्दाम मॅनेजरसमोर गेला.

“काय झालं? तुम्ही चिंतीत दिसताय!! काही प्रॉब्लेम झालाय का? मी काही मदत करु शकतो का?”, दिपकने विचारले.

दिपकला बघताच मॅनेजरच्या मनात एक आशा निर्माण झाली.

“हो हो.. हे बघ.. तुला गाडी येते का चालवता?”, मॅनेजरने दिपकच्या खांद्यावर हात ठेवत विचारले

“हो.. म्हणजे काय? हा काय प्रश्न झाला..”, दिपक सहजच बोलण्याच्या स्वरात म्हणाला..

“नाही म्हणजे.. ही बघ.. ही बाहेर जी गाडी आहे, ती येईल चालवता..”, बाहेरच्या रोल्स-रॉईसकडे बोट दाखवत मॅनेजर म्हणाला..

“येईल की! आहे काय त्यात. पण काम काय आहे?”, दिपक

“हे बघ.. ही गाडी माया मॅडमच्या बंगल्यावर न्हेऊन सोडायची आहे बस्स… डोन्ट वरी, तुला आत सुध्दा जायची गरज नाही. बाहेरच्या वॉचमनकडे दिलीस तरी खुप झालं. मी तसं फोन करून सांगून ठेवतो. जमेल?”, मॅनेजर

“येस्स सर.. मी फक्त जरा फ्रेश होऊन येतो.” असं म्हणून दिपक आपल्या खोलीत गेला.

दहा मिनीटांनी तो फ्रेश होऊन आला तो वर मॅनेजरने बंगल्यावर फोन करून परिस्थितीची कल्पना दिली होती आणि तो दिपकचीच वाट बघत होता.

दिपकला पहाताच तो किल्ली घेऊन दिपककडे गेला. त्याने किल्ली दिपकला दिली आणि बंगल्याचा पत्ता निट समजावून  सांगीतला.

दिपक किल्ली घेऊन बाहेर आला. त्याने कार भोवती एक चक्कर मारली. त्या धडकाधडकीत आणि लोकांच्या धक्काबुक्कीत गाडीचा पुढचा दिवा आणि त्याखाली थोडं डॅमेज झालं होतं.

दिपकने काही क्षण विचार केला आणि मग त्याने गाडी बंगल्याच्या दिशेने वळवली.

---

माया आपल्या अलिशान दिवाणखान्यात भल्या मोठ्या सोफ्यावर कसल्यातरी विचारात बुडाली होती. इतक्यात टेबलावरचा इंटरकॉम वाजला.

हॅलो वगैरे म्हणायच्या फंदात न पडता ती रिसीव्हर कानाला लावून  पलिकडील व्यक्ती बोलायची वाट पाहु लागली. फोनची रिंग बंद झाली ह्याचा अर्थ ‘माया मॅडमने’ फोन उचलला आहे असा एक अलिखीत दंडक तेथे होता. त्यासाठी ‘माया मॅडमने’ हॅलो, बोला, येस्स, कोण बोलतयं वगैरे तत्सम शब्द उच्चारायची गरज नव्हती.

फोनची रिंग बंद झाली तसा गेटवरून फोन करणारा वॉचमन म्हणाला, “मॅडम, दिपक म्हणून कोण तरी आपल्याला भेटायला आले आहेत..”

“मग मला कश्याला फोन केला? टॉक टू माय सेक्रेटरी. आणि अपॉईंटमेंट नसेल तर घरी पाठवून  द्या..”, माया

“मॅडम त्यांचं कार संबंधी काही तरी काम आहे..”, वॉचमन
“ओह् येस.. आलं लक्षात.. ठिक आहे.. कार आपल्या पार्कींगमध्ये लावून  टाक, आणि त्याला परत जायला दिवाणजींकडून १००-२०० रु. घ्यायला सांग..”, माया

“पण मॅडम, त्यांनी कार आणलीच नाहीये..”, चाचरत वॉचमन म्हणाला
“काय? कार आणली नाहीये???”, माया

“नाही मॅडम त्यासंबंधीच त्यांना तुमच्याशी बोलायचेय..”, वॉचमन
“ठिक आहे.. त्यांना बसव आत मध्ये आले मी खाली”, असं म्हणून मायाने फोन ठेवून  दिला.

बाहेरुनच तो टोलेजंग बंगला बघून दिपक हरखुन गेला होता. आतमध्ये आल्यावर तेथील ऐश्वर्य बघून त्याचे डोळे आणि तोंड उघडेच राहीले.

ती व्हिजीटींग रुमच एव्हढी लॅव्हीश होती की विचारायची सोय नाही. सारे फर्नीचर, पेंटींग्स, म्युरल्स सर्व काही उंची होते. कोठेही, कोणत्याही गोष्टीत क्वालीटीशी तडजोड केली गेली नव्हती.

दिपक ते सर्व वैभव बघण्यात गुंग होता इतक्यात त्याला मागून आवाज आला..
“येस्स..”

दिपक दचकून मागे वळला आणि समोर उभ्या असलेल्या त्या स्त्रीला बघून तो जागच्या जागी खिळून गेला. निळसर झाक असलेले डोळे, खांद्याखाली रुळणारे काळेभोर केस, गोरेपान रंग रुप. दिपकला आपलं ह्रुदय क्षणभंर बंद तर नाही झालं नं असंच वाटून  गेलं. त्याने कल्पनाही केली नव्हती की ‘माया मॅडम’ म्हणजे एखादी इतकी सुंदर, तरुण स्त्री असेल. त्याच्या

लेखी माया मॅडम म्हणजे एखादी खडुस, कजाग वाटणारी ५०-६० वर्षाची स्त्री होती. त्यामुळे तो अचंबीतच झाला होता.

“येस्स..”, पुन्हा त्याच थंड स्वरात माया म्हणाली..

“मी दिपक..”, दिपकने आपला हात पुढे केला

“कामाचं बोला..”, शेक-हॅन्ड्स न करताच माया म्हणाली..

“हम्म.. मी तुमच्या रोल्स-रॉईस कार संबंधी...”, दिपक

“माहीती आहे मला.. कार कुठे आहे..”, माया

“गॅरेजमध्ये..”, दिपक

“गॅरेज?? का? काय झालं..”, थोडेसे आश्चर्यचकीत होत माया म्हणाली

“गाडीला किरकोळ डॅमेज होते. अशी गाडी तुमच्या इथे आणणार आणि मग परत तुमच्या इथून कोण तरी गाडी गॅरेजमध्ये घेउन जाणार, त्यापेक्षा मीच गाडी गॅरेजमध्ये सोडून आलो. उद्या दुपारपर्यंत काम पुर्ण होऊन गाडी तुम्हाला मिळेल..”, दिपक

“आणि पैसे??”

“माया मॅडमची गाडी इथे कोण ओळखत नाही? आणि तुमचे पैसे कुठे पळून जाणार नाहीत हे इथे प्रत्येकजण जाणतो.. डोन्ट वरी.. उद्या गाडीची डिलिव्हरी झाल्यावरच तो पैसे घेईल...”

असं म्हणून मायाला बोलायची संधी न देताच दिपक वळून निघून गेला.

तो तेथे थांबला असता तर कदाचीत पहील्यांदाच कुणावर इंप्रेस झाल्याचे भाव मायाच्या चेहऱ्यावर त्याने पाहीले असते.

तो हॉटेलवर परत आला तेंव्हा मॅनेजर त्याच्याकडे धावतच आला आणि म्हणाला.. “अरे तू तिकडे जाऊन काय केलेस काय?”

“का? काय झालं?”, दिपक

“माया मॅडमच्या सेक्रेटरीचा फोन होता. त्यांनी आत्ताच्या त्या ड्रायव्हरला काढून टाकलं आहे आणि रिकाम्या झालेल्या जागी तुला ड्रायव्हरचा जॉब देऊ केला आहे.. तुझी तयारी असेल तर १० मिनीटांमध्ये त्यांना कळवं.. बिलीव्ह मी माय सन.. जॉब ड्रायव्हरचा असला तरी तू माझ्यापेक्षा जास्त कमावशील लक्षात ठेव..” मॅनेजर बोलत होता.

… आणि अश्या रितीने दिपक ‘माया मॅडमच्या’ सेवेत रुजु झाला होता…….

बंगल्याच्याच आवारातील एक १५ x २० ची खोली दिपकला रहायला मिळाली होती. आठवड्याभरामध्येच दिपक 'माया मॅडम'च्या स्केड्युलशी समरस होऊन गेला.

सकाळी ५.३० ते ६.३० ह्या वेळात बंगल्याच्याच क्लबहाऊसमध्ये मेडीटेशन चालु असायचे त्या वेळेत दिपक आंघोळ करून तयार व्हायचा.

६.४५ ला सोलॅरीस क्लबवर टेनीस आणि जिम

८ वाजता बंगल्यावर परत.

८-९ बंगल्यातील स्विमींग पुलमध्ये स्विमींग

१० वाजता ऑफीस

सकाळी ऑफीसला निघतानाच बंगल्यातील सेक्रेटरी मायाच्या दिवसभरातील बाहेरील मिटींग्सची प्रिंटआऊट दिपकला देत असे. त्यात वेळ, ठिकाण, मॅप आणि फोन नंबर दिलेला असे. ठरल्यावेळी दिपक ऑफीसच्या गेटपाशी गाडी घेऊन थांबे.

संध्याकाळी ८ वाजता बंगल्यावर परत

९ वाजता आधीच ठरलेल्या कुठल्याश्या हॉटेल्समध्ये पार्टीज, अन-ऑफीशीअल मिटींग्स

रात्री १२ पर्यंत बंगल्यावर परत

सगळं कसं अगदी आखीव-रेखीव, इकडची गोष्ट तिकडं नाही, कधीही कश्यातही अचानक बदल नाहीत. यांत्रीक...

दिवसाचे १२ तासांपैकी दिपक ६-७ तास तरी किमान माया बरोबरच असायचा. पण दोघांमध्ये कधीच कसलाच संवाद नसे. गाडीत असताना बहुतांश वेळी माया फोनवरच असे. दिपक तिचं बोलणं कान देऊन ऐके. तिची लोकांना सुचना देण्याची पध्दत.. क्लायंट्सशी बोलतानाचा टिपीकल टोन, कामात चुका करणाऱ्यांची खरडपट्टी.. क्वचीत अचानक उद्भवलेल्या अडचणींवर तिने शिताफीने काढलेले तोडगे.. सगळं दिपक ऐकत असे. बऱ्याच वेळा त्याला तिचा अभिमानच वाटे.

एके दिवशी लेट नाईट पार्टी आटपून दोघं जण परतत होते. चंद्राचे स्वच्छ चांदणं पडलं होतं. पार्टीचं ठिकाण तसं जरा आडबाजुलाच होतं. त्यामुळे परतताना रस्ता अगदी सामसुम होता. दोन्ही बाजुला दाट झाडी होती. दिपक व्हाईट रंगाची जॅग्वार १३० च्या वेगाने पळवत होता. अचानक डावीकडच्या झाडीतून काहीतरी पळत रस्त्याच्या मध्ये आलं. गाडीच्या झिनॉन दिव्यांचा पांढराशुभ्र प्रकाशात समोर कोण आहे समजेपर्यंत गाडीची जोरदार धडक बसली होती.

दिपकने करकचुन ब्रेक्स दाबले. गाडीचे ‘एबीएस’ क्षणार्धात ॲक्टीव्हेट झाले आणि गाडी क्षणार्धात जागेवर उभी राहीली.

‘व्हॉट हॅपन्ड?”, मायाने विचारले...

दिपक आणि माया दोघंही गाडीतून खाली उतरले. रस्त्याच्या मधोमध एक कुत्र्यासारखा दिसणारा पण काहीसा आकाराने मोठा प्राणी मरून पडला होता. दिपक आणि माया दोघही तेथे जाऊन उभे राहीले. मध्ये एक मोठ्ठा लांडगा मरून पडला होता. तोंडाला गाडीची धडक बसली होती आणि जबडा जवळ जवळ तुटून  निघाला होता. वाकडं झालेल्या तोंडातून रक्ताची धार वहात होती.

‘ओह माय गॉड’.. त्या अजस्त्र देहाकडे बघत माया म्हणाली.

‘मॅडम तुम्ही गाडीत बसा.. मी हे.. जरा कडेला टाकून देतो नाहीतर एखादा गाडीवाला अचानक ब्रेक मारायचा आणि अपघात व्हायचा…’, दिपक

माया माघारी वळणार तोच मागून गुरगुरण्याचा आवाज आला.

दिपक आणि माया दोघंही सावकाश वळले. दोघांपासून काही पावलांवरच अजून एक लांडगा उभा होता. त्याचे हिंस्त्र डोळे दिव्याच्या प्रकाशात लुकलुकत होते.

माया गाडीकडे पळायचा प्रयत्न करणार हे लक्षात येताच दिपक म्हणाला.. ‘डोन्ट मुव्ह.. यु वोंट बी एबल टु रिच टु द कार, हि विल कॅच यु..’

‘गाडीत पर्स मध्ये रिव्हॉल्व्हर आहे…’ माया

पण दिपकच मायाच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. त्याची नजर अजूनही लांडग्याच्या नजरेला भिडलेली होती, पण तो हळु हळु खाली वाकत होता.

त्या लांडग्याचेही दिपकच्या हालचालीवर लक्ष होते. दिपकला खाली वाकताना पाहून त्याच्या गुरगुरण्याचा आवाज वाढत होता. आपलं तोंड फेंदारून त्याने आपले अणुकुचीदार दात बाहेर काढले होते.

दिपकने आपल्या उजव्या पायाची पॅन्ट हळुवार वर केली आणि मोज्यामध्ये लपवलेला एक मिलीटरी नाईफ बाहेर काढला.

मायाकडे कामाला लागल्यावर सुरुवातीला खर्चासाठी जे काही थोडेफार पैसे त्याला मिळाले होते त्यातून त्याने पहील्यांदा हा मिलीटरी नाईफ खरेदी केला होता. चंद्राच्या प्रकाशात त्याच धारदार पात चकाकलं तसं त्या लांडग्याने दिपकडे धाव घेतली.

माया ‘आ’ वासून जमीनीवरच खिळून होती.

दिपकने तिला पटकन बाजुला ढकलले आणि गुडघ्यावर खाली वाकून अंगावर झेपावलेल्या लांडग्यावर त्याने सपकन वार केला.

मागे बघायचीही गरज नव्हती.

लांडगा काही पावलं पुढे गेला आणि खाली कोसळला. फाटलेल्या पोटातून त्याची आतडी लोंबत होती.

माया अजूनही विस्फारलेल्या डोळयांनी दिपककडे आणि रस्त्यात मरून पडलेल्या त्या दोन लांडग्यांकडे बघत होती.

दिपकने ते दोन्ही लांडगे ओढत रस्त्याच्या कडेला न्हेऊन टाकले. मग गाडीतून पाण्याची बाटली काढली आणि रक्ताळलेला तो सुरा निट धुऊन परत मोज्यामध्ये ठेउन दिला. मग गाडीच्या ग्लोव्हज कंपार्टमेंटमधून व्हिस्कीची एक बॉट्ल काढून त्याने दोन पेग बनवले. एक त्याने मायाला दिला आणि दुसरा एका घोटात पिऊन टाकला.

माया अजूनही थोडीशी भेदरलेलीच होती. पण मग तिनेही टॉप-टू-बॉटम पेग संपवला.

दिपक गाडीत जाऊन बसला. त्याने गाडी सुरु केली आणि वळवून  परत रस्त्यावर सरळ घेतली. माया जेंव्हा नेहमीप्रमाणे मागच्या सिटवर न बसता, पुढे, ड्रायव्हरच्या शेजारच्या सिटवर येऊन बसली तेंव्हा त्याला आश्चर्यच वाटले. पण काही न बोलता त्याने गाडी गेअरमध्ये टाकली.

थोडे अंतर गेल्यावर माया म्हणाली, “हु आर यु?”

दिपकने एकवार तिच्याकडे पाहीले आणि तो म्हणाला, “दिपक.. दिपक कपूर..”

"अं हं.. नॉट दॅट.. ज्या शिताफीने तू त्या लांडग्याला मारलेस.. तू ड्रायव्हर तर नक्कीच असु शकत नाहीस. टेल मी युअर पास्ट...."

दिपकने काही क्षण विचार केला.

"डोन्ट वरी, यु कॅन ट्रस्ट मी... तू इथे तुझ्या मोटरबोटने आलास.. तुला गोळी लागली होती.. माहीती आहे मला. ह्या गावात माझ्यापासून काही लपून रहात नाही.. सो टेल मी.."

"मॅडम.. फार मोठी गोष्ट आहे.. आपण उद्या बोलु.. उशीर झाला आहे..", दिपक आढेवेढे घेत म्हणाला

"इट्स ओके, आय डोन्ट माईंड, मी उद्याच्या मिटींग्स शिफ्ट करु शकते, बट आय मस्ट नो.. हु आर यु???", माया

दिपकने नेहमीचा रस्ता सोडून गाडी आडमार्गाने एका वळणावर वळवली. गाडी बऱ्याच वेळ खाचखळग्यातुन, खराब रस्त्याने चढावर जात होती. आजुबाजुला बऱ्यापैकी दाट झाडी होती. झाडांच्या फांद्या गाडीच्या काचांवर आपटत होत्या.

काही मिनीटांनी गाडी एका पठारावर येउन थांबली. थोड्याच अंतरावर दिपस्तंभ प्रकाशाचा झोत काळ्याकुट्ट अंधारात बुडालेल्या समुद्रावर फेकत होता. दूरवर गावातील रस्त्यावरचे दिवे लुकलुकत होते. समुद्राच्या लाटांचा धिरगंभीर आवाज येत होता.

दिपक गाडीतून खाली उतरला. पाठोपाठ माया सुध्दा उतरली.

दिपकने गाडीच्या ग्लोव्हज बॉक्स मधून स्कॉचची एक बॉटल काढली आणि त्याचे दोन पेग बनवले.

स्कॉचचा जळजळता घोट घश्याखाली उतरल्यावर तो काहीसा कंफर्टेबल झाला आणि मग जेनी पासून त्याने आपली हकीकत सांगायला सुरुवात केली..

---

त्याचवेळी दूरवर मुंबईतील आडवस्तीतील एका जुनाट इमारतीमध्ये पत्याचा डाव रंगला होता. सिगारेटच्या धुराने खोली पुर्ण भरून गेली होती. धुराच्या त्या उग्र वासातच दारुचा कडवट वास पसरला होता. उंची मद्यापासून ते देशीदारुपर्यंत सर्व प्रकारची मदीरा तेथे वाहत होती.

इमारतीपर्यंत पोहोचणाऱ्या एका चिंचोळया रस्त्यावरून सफेद रंगाची एक ऑडी येत होती. एखाद्या तिसऱ्या नविन माणसाला त्या जुनाट, गरीबीने गांजलेल्या भागात ऑडी पाहून डोळे विस्फारले असते. पण तेथील जाणकारांना मात्र ती गाडी आणि त्या गाडीत बसलेली व्यक्ती पुर्णपणे माहीती होती.

गाडी इमारतीपाशी थांबताच सुस्तावलेली इमारत खाड्कन जागी झाली..

भाई आले…

सर्वत्र एकच कुजबुज. लोकांनी हातातील पत्ते, दारुचे ग्लास ठेवून  दिले आणि सर्वजण उभे राहीले.

भाई, अर्थात माफीया जगताचा बादशहा ताड्ताड पावलं टाकत त्या इमारतीमध्ये शिरत होता. तोच नेहमीचा ट्रेडमार्क फुलाफुलांचा ‘हुला’ शर्ट, फिक्क्ट काळा कोट, दिवस असो वा रात्र डोळयावर चढवलेला गॉगल आणि हातामध्ये उंची सिगार.

भाई सरळ आतल्या खोलीत शिरले.

टेबलावर पैश्याने भरलेल्या ३ मोठ्या सुटकेस होत्या. भाईने त्याकडे दुर्लक्ष केले आणि म्हणाला, “चिकना ला पाठव..”

जॉनी चिकना, भाईचा भरवश्याचा शुटर बाहेर स्टुलावर पाय ठेवून  बसला होता. एक पाय गुडघ्यात मुडपून त्यावर आपली स्नायपर बंदुक ठेवून  तो ती स्वच्छ करत होता.

भाईने बोलावल्याचे कळताच तो बंदुक कडेला ठेवून  उठला आणि सरळ आतल्या खोलीत शिरला.

“एनी लक?”, भाईने विचारले

“नो भाई.. पण मी सांगतो ना, त्याला गोळी नक्की बसली आहे.. जगणं शक्यच नाही..”

“शो मी हिज बॉडी..”, सिगारेटच्या धुराचे हवेल गोल सोडत भाई म्हणाला

भाई महीना होऊन गेला, आत्तापर्यंत समुद्रातील माश्यांनं गटकावला असेल त्याला.

“मग त्याला माश्यांच्या पोटातून बाहेर काढा.. पण एक तर त्याला शोधा.. आणि मेला असेल तर त्याची बॉडी आणा.. माझ्या भावाला मारणारा जिवंत असेल तर ते मी सहन करु शकत नाही. मला पुरावा हवा…”, भाई

“भाई.. एवढ्या मोठ्या समुद्रात त्याला शोधायचा…”

“त्याची मोटर-बोट.. ती तर सापडेल?”

“पण..”

“हेलिकॉप्टर घे.. सगळा परीसर पिंजून काढ...”

“पण भाई.. बॉर्डर एरीया आहे.. हेलिकॉप्टरला परमिशन...”

भाईने खिश्यातून बंदुक काढली आणि जॉनी चिकनावर रोखली..

“सो यु आर सेईंग.. इट्स नॉट पॉसिबल बाय यु???”

जॉनी चिकनाच्या कपाळावर घर्मबिंदु जमा झाले. आजपर्यंत भाईला इतकं चिडलेले त्यानी कध्धीच पाहीलं नव्हतं. जॉनीवर आजपर्यंत त्याने कध्धीच आपली गन रोखली नव्हती.

“मी शोधतो भाई..”

जॉनी खोलीतून निघून गेला

जॉनी गेल्यावर भाईच्या कामाची सुत्र संभाळणारा बाबु आत आला.

जॉनी प्रमाणेच बाबुचे नाव सुध्दा नक्की कुणाला माहीत नव्हते. भाईचे काम सांभाळणारा मॅनेजर आणि मॅनेजरचा बाबु झाला आणि तेंव्हापासून सगळे त्याला बाबुच म्हणत..

बाबुने सगळ्या डिलीव्हरीजचे स्टेट्स भाईला सांगीतले.. तो बोलत असतानाच भाईने त्याला थांबवले आणि म्हणाला, “मायाचा फोन आला होता?”

“हो भाई”, बाबु.. “माल उतरलाय सगळा पोर्टवर.. नॉट टु वरी...”

भाईच्या चेहऱ्यावर हास्य पसरले...

“आय लव्ह दॅट गर्ल..”.. भाई स्वतःशीच पुटपुटला..

“सो… हे अस आहे सगळं.!!” गाडीच्या बॉनेटवरून उतरत दीपक म्हणाला.

माया अजूनही गाडीच्या बॉनेटवरच बसून होती.

दिपकने घड्याळात वेळ बघितली. ३.३० वाजून गेले होते. गावातील रस्त्यावर तुरळक वाहतूक सुरु झाली होती. दुधाच्या व्हैंस, दैनिक पेपर वाहतूक करणारे टेम्पो रस्त्यावरून धावत होते. शहराला हळू हळू जाग येत होती.

“आय गेस, वुई शुड लिव्ह नाऊ. साडे तीन वाजून गेले आहेत. उद्या ऑफिसला काही महत्वाच्या मिटींग्स आहेत न?”

“लिव्ह द मिटींग्स.. “, माया थंड स्वरात म्हणाली

मायाच्या त्या अनपेक्षित उत्तराने दीपक चमकला आणि त्याने मागे वळून पहिले.

माया एकदा त्याच्याकडे बघून हसली आणि उजव्या हाताने तिने आपला काळया रंगाचा पार्टी गाऊन वरती घ्यायला सुरुवात केली. काय होतेय हे न समजून दीपक स्तंभित होऊन तिच्याकडे बघत उभा होता.

मायाने तिचा पार्टी गाऊन मांडीपर्यंत वर घेतला आणि दीपकला तिचा उद्देश लक्षात आला. तिच्या गोऱ्यापान मांडीवर काळया स्ट्रापमध्ये पॉइन्ट थर्टी टू चे रिव्होल्व्हर लटकवलेले होते. दिपकने काही हालचाल करायच्या आत तिने ते पिस्तोल काढून दीपकवर रोखले.

“फुल्ली लोडेड आहे... “, माया

“व्हाय?” आपले हात हवेत उंचावत दीपक म्हणाला .... “मला पोलिसांकडे देऊन तुला काय मिळेल?”

“पोलिस?”...... मायाला पोलिसांचे नाव ऐकून हसू आले “पोलिसांची कोण गोष्ट करतेय?”

“मग ?”, दीपक

“माफिया ..... माफियाकडे देईन मी तुला “, माया

“पण का?” दीपक

“कदाचित तुझ्या बदल्यात मी माझ्या मुलीच्या सुखरुपतेची हमी घेऊ शकेन?” माया

“तुला .... तुला मुलगी आहे?”, आश्चर्यचकित होऊन दीपक म्हणाला

“हो आणि माफियापासून तिच्या जीवाला धोका आहे. कदाचित मी तुला पकडून दिले तर माझी मुलगी सुरक्षित राहील”, माया

दिपक स्वतःशीच हसला.

“का? काय झालं हसायला?”, माया

“नाही तू पकडून देणार म्हणालीस म्हणून हसू आल”, दीपक, “मला वाटते तू विसरती आहेस माझ्या सॉक्स मध्ये एक सुरा आहे”, दिपक

“देन ट्राय इट, टेक इट आउट. त्याआधी बंदुकीतून सुटलेल्या गोळीने तू ठार झाला असशील”, माया

“कुणाला मूर्ख बनवतेस? मला? मी मिलिटरी मध्ये होतो, हे जे काही तुझ्या हातात खेळण आहे ना, तसलं फार पूर्वीपासून मी वापरतोय. पॉइंट थर्टी टू , सेमी-ऑटोमैटिक, १९९५ एट शॉट मॉडेल. सगळयात पहिले तुला त्याचे सेफ्टी लॉक काढावे लागेल आणि समजा तू ते आधीच काढून ठेवले असशील तरी, ट्रिगर ओढण्यापूर्वी तुला त्याची स्प्रिंग एकदा मागे ओढून घ्यावी लागते. मे बी एक सेकंद पण सॉक्स मधला सुरा काढायला मला तेवढा पुरेसा आहे”, दीपक

मायाने एकदा त्याच्याकडे निरखून पहिले आणि म्हणाली, “यु आर राईट. बस मला तुझ्याशी बोलायचे आहे”

तिने आपले रिव्होल्व्हर पुन्हा मांडीवरच्या स्ट्रीप मध्ये अडकवून ठेवले.

“इट्स लॉंग नाईट, इजंट इट?”, मायाने व्हिस्कीचे दोन पेग बनवले आणि एक दिपककडे देत म्हणाली

“येस इट इज”, दिपकने मान डोलावून होकार दिला

“टू इयर्स बँक, दे किल्ड माय हजबंड... “, मायाने ग्लास एका घोटात फिनिश केला.

“दे?”, दीपक

“दे ! आय मीन.. माफिया. “, माया

“पण का?”

“माय हजबंड रिफुस्ड टू डू देअर वर्क. दमण एक पोर्ट बंदर आहे. मुंबई पासून काही तासाच्या अंतरावर, पण तरीही इथे फारशी सेक्युरिटी नाही. माल स्मगल करून इझिली इथे आणता येतो. माझ्या नवऱ्याने त्यांचा माल आमच्या कंपनीचा भासवून उतरवून घ्यायला नकार दिला”, माया

“नवऱ्याच्या मृत्युनंतर कंपनीचे काम मी बघायला लागले. दे थ्रेटण्ड टू किल माय डॉटर. मी घाबरून तिला शिक्षणासाठी युके. ला पाठवून दिले. पण यु नो, आज नाही तर उद्या ते तिच्यापर्यंत पोचलेच असते. सो आय ऐग्रीड.

आज इथल्या बंदरावर आमच्या कंपनीचा जो माल बंदरावर येतो त्यातला निम्म्याहून अधिक माफियाचा स्मगल्ड माल असतो. “

“पण मग तू पोलिसांकडे का नाही जात?”, दिपक
“हम्म.. पोलिस..!! तू हे बोलतो आहेस दिपक? तु? मला वाटतं पोलिस किती बायस्ड असतात आणि पोलिसांचं वागणं कसं असते हे तू सुध्दा जाणतोस. म्हणूनच तर पळून आलास ना पोलिसांच्या तुरुंगातुन?”, माया

……..

“बरं मग आता काय? तू हे सगळं मला का सांगते आहेस?”, दिपक

“मला तुझी मदत हवी आहे…”

“कश्यासाठी?”

“माफियाला संपवायला…”

दिपक स्वतःशीच हसला.

“का? हसायला काय झालं?”, माया

“तु आणि मी… दोघं मिळून माफियाला संपवणार??? काहीतरी काय? स्टेट पोलिसांना जे शक्य असुनही जमलं नाही ते तू आणि मी.. कसं करु शकणार?”

“तुला माहीते दिपक.. आमच्या बोटी फिशींगसाठी समुद्रात जातात ना… भलामोठ्ठा शार्क सुध्दा एका गळाला बांधलेल्या फुटकळ बेट ला बळी पडून अडकतो…”

मायाने काही क्षण थांबून दिपककडे पाहीले आणि म्हणाली.. “तुच आहेस ती बेट.. तुला पकडायला ते येतील आणि आपल्या जाळयात अडकतील..”

“पण मीच का? आणि मी का तुझ्या भानगडीत पडु?”, दिपक

“का? तुला तुझा जीव प्रिय नाही? तुला स्टेफनी प्रिय नव्हती?”, माया

स्टेफनीचे नाव ऐकल्यावर दिपक चमकून मायाकडे बघायला लागला.

“स्टेफनीचा इथे काय संबंध..?”, दिपक

“स्टेफनीला कुणी मारलं दिपक?”

“अर्थात पोलिसांनी.. तो साला गिड्डा…”, हाताच्या मुठी आवळत दिपक म्हणाला

“वेडा आहेस.. पोलिसांची तर केवळ एक गोळी तिला लागली होती. वाचु शकली असती ती. पण जॉनी चिकनाने तिला मारला.. जॉनी चिकना, माफीया भाईचा शार्प शुटर..”

दिपक ऐकत होता

“जॉनीनेच स्टेफनीचा नवरा, थॉमसला संपवला.. त्यानेच त्या इंन्शोरन्स एजंट मोहित्याला खल्लास केला आणि त्यानेच पोलिसांना तुझा पत्ता दिला…”.. माया..

“पण का?”, दिपक

“कारण तू भाईच्या भावाला मारलास..”. माया

“नाही.. ते खोटं आहे.. पोलिसांच्या हातून तो मेला…”, दिपक

“हे तुला माहीती आहे, त्यांना नाही..”, माया

“पण मग हा सगळा खटाटोप का? जर तो त्या हॉटेलमध्ये येऊन थॉमसला मारु शकत होता तर मला ही मारु शकत होता. मग त्याने तसं का… हा..हा सगळा पाठलाग कश्यासाठी?”, दिपक

“तु भाईच्या भावाला मारलंस दिपक. इतक्या सहजी ते तुला मारणार नव्हते. पळवून  पळवुन, दमवून  मारणार होते तुला..”, माया

स्टेफनीचा चेहरा दिपकच्या समोर उभा राहीला. काय चूक होती तिची? इतका निर्घुणपणे गळा कापून मारायची काय गरज होती??

दिपक संतापाने थरथरत होता. त्याच्या कपाळावरच्या शिरा ताणल्या गेल्या होत्या.

मायाने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

“डोन्ट गेट ॲन्ग्री. डोन्ट लुज युअर पेशन्स. दॅट इज द लास्ट थिंग यु शुड डु. तुला.. आपल्याला जिंकायचे असेल तर, शांत राहून सगळा प्लॅन केला पाहीजे…”, माया

“काय आहे तुझ्या डोक्यात?”, दिपक

“आपण तुझ्या लाडक्या गिड्या पोलिसापासून सुरुवात करु. आत्ता परिस्थीती अशी आहे की पोलिस आणि माफिय़ा दोघंही तुझ्या मागावर आहेत. आपण त्या पोलिसाला संपवला की नविन पोलिस त्याच्या जागी रुजु होऊन, केस समजून घेऊन पुन्हा नव्या जोमाने तुझ्या मागावर येईपर्यंत मध्ये वेळ जाईल. निदान काही काळापुरता तरी पोलिसांचा ससेमिरा मागे पडेल तो वर आपण मग माफियाकडे वळु”, माया

दिपक स्तंभीत होऊन मायाकडे बघत होता. मायाचा हा प्लॅन जबरदस्त होता आणि योग्यही.

“ॲग्रीड.. कसं करायचं?”, दिपक

“मला एक दिवस दे, परवा आपण ह्यावर बोलु. आय एम टु टायर्ड टु थिंक एनीथिंग नाऊ..”, माया

“यु बेटर प्लॅन फ़ास्ट, त्या गिड्याच्या नरडीचा घोट घ्यायला माझ्या हाताची बोटं शिवशिवत आहेत”, दिपक

“येस्स.. लेट्स स्टार्ट दॅट पाठलाग अगेन.. पण ह्यावेळेस शिकार ते असतील…”, माया बॉनेटवरून खाली उतरून आपला पार्टी गाऊन सरळ करत म्हणाली.

रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रकच्या प्रकाशात दिपकचा चेहरा काही काळ उजळून निघाला.

“ॲन्ड येस, वन मोअर थिंग. डोन्ट फॉल इन लव्ह विथ मी. आय हॅव सीन ईट इन युअर आईज बिफ़ोर. आय एम विदाऊट अ मॅन फ़ॉर लॉग टाईम नाऊ, आय विल इझीली फॉल फॉर यु…”, माया गाडीच्या मागच्या सिटवर जाऊन बसली.

दिपकने गाडी वळवली आणि तो माघारी बंगल्याकडे वळला.

“माझा प्लॅन रेडी आहे..”, दोन दिवसांनी सकाळी ऑफीसला जाताना माया दिपकला म्हणाली.

“दुपारची कॉन्फरंन्स मी गार्डन-कोर्ट ला हलवली आहे, ऑफीसपासून दूर आहे, जायला निदान तासभरतरी लागेल, तेंव्हा डिटेल मध्ये बोलु. बाहेर कुठे भेटून बोलण्यापेक्षा गाडीतच बोललेले बरं..”

दिपकने मान डोलावून संमती दर्शवली.

ठरल्यावेळी माया ऑफीसमधून निघाली. बरोबर ऑफीसमधील दोन-तीन डायरेक्टर्स होते, पण ते नशीबाने दुसऱ्या गाडीत बसले. दिपकने गाडी सुरु केली. सुरुवातीचे काही फोन कॉल्स झाल्यावर माया म्हणाली, “आपल्या मित्राचं नाव इन्स्पेक्टर शेखावत आहे. तुम्ही लोकं जेल मधून पळून गेल्यानंतर, त्या जेल मधून त्याची आता बदली झाली आहे. परंतु त्याचा राग अजूनही धुमसतो आहे. तुम्हाला पकडून त्याला त्याची गेलेली इज्जत परत मिळवायची आहे.

मी त्याला टीप द्यायची व्यवस्था करणार की तू जिवंत आहेस आणि इकडेच कुठेतरी दमण मध्ये लपून बसला आहेस. तुला शोधत तो इथे येईल. शक्यता आहे की कदाचीत तो कुणालातरी तो कुठे चालला आहे हे सांगून येईल. त्यामुळे सरळ-सरळ आपण त्याचा खुन करु शकणार नाही. तसं झालं तर तू नक्कीच जिवंत आहेस, आणि हा खुन तुच केला आहेस हे समजायला पोलिसांना वेळ लागणार नाही. सो त्याचा मृत्यु हा प्लॅन्ड मर्डर वाटता कामा नये.. ओके?”

दिपकने आरशात पाहीले. मायाची आणि त्याची नजरानजर झाली. दिपकने एकवार मान हलवली तसं माया पुढे सांगु लागली.

“एखाद्या संध्याकाळी त्याला आपण पुन्हा टीप द्यायची की त सी-मरीना बार मध्ये येणार आहेस. हा बार बऱ्यापैकी गावाबाहेर आहे. आणि बहुतेक वेळेस तेथे जुगारी, दारुडे लोकंच जास्त असतात. तू सुध्दा तेथे जायचंस, पण वेश बदलुन. शेखावत ने तुला अज्जीब्बात ओळखता कामा नये.

इतरांच्या लेखी तू सुध्दा एक दारुडाच वाटला पाहीजेस. तुझी शेखावतशी तेथे भेट घडेल. काही तरी किरकोळ कारणावरून तुमच्यात बाचाबाची होयला हवी. साध्या वर्दीत असला तरी शेवटी तो दुसऱ्या स्टेटचा पोलिस आहे, तो तुझ्यावर चार-चौघात हात नाही उचलु शकणार. पण तू त्याला इतकं चिडवं की तो अगदी हमरातुमरीवर यायच्या तयारीत आला पाहीजे. दोघांमध्ये ढकलाढकली, शिवीगाळ व्हायला हवी.

दारुच्या नशेतच त्याला जिवे मारण्याची धमकी देऊन तू बाहेर पड. तुझी बऱ्याचवेळ वाट बघून शेवटी शेखावत पण तेथून बाहेर पडेल. पार्कींगमध्ये तू त्याची वाट पहात बसशील आणि संधी मिळताच डोक्यात एखादी सळई किंवा तशीच एखादी वजनदार वस्तु घालुन तू त्याचा खुन करशील. ओके?”

“ओके.. आलं लक्षात..”, दिपक म्हणाला

“काम सफाईदारपणे व्हायला हवं. दुसर्‍या स्टेटच्या पोलिसाचा मृत्यु झालाय म्हणल्यावर.. आणि ते सुध्दा एका फडतुस दारुड्याकडून म्ह्णल्यावर इथली पोलिस खवळून उठेल. त्याचा शोध जोरदार सुरु होईल. सो आपल्याकडून कुठलाही, कसलाही पुरावा मागे रहाता कामा नये.

तो दारुडा जसा अचानक उगवला तसाच तो गायब व्हायला हवा...”

"प्लॅन ओके आहे, पण एक शंका आहे." काही क्षणांनी दिपक म्हणाला.."म्हणजे, कितीही कसाही मेक-अप केला तरी चेहरा बदलु शकतो, शरीराची ठेवण, उंची बदलणं अवघड आहे. समजा, चुकून माकून पोलिस माझ्यापर्यंत येऊन पोहोचलेच, तर माझ्यासाठी काहीतरी सेफ ॲलबाय असणं गरजेचं आहे. आय मीन, खुन झाला त्यावेळी मी तेथे नव्हतो, तर दुसरीकडे कुठेतरी होतो हे सांगायला साक्षीदार हवा..", दिपक

"गुड पॉईंट. शक्यतो पोलिस आपल्यापर्यंत नाहीच पोहोचणार.. पण ऑन-अ-सेफर साईड आपल्याला ती काळजी सुध्दा घ्यायला हरकत नाही. एक काम करु. तो दमणला आला की, जो दिवस आपण प्लॅन करु त्या दिवशी मी एखाद्या हॉटेलमध्ये किटी पार्टी ठेवेन. तू मला सोडायला बरोबर येशील. तुला बंगल्यातून माझ्याबरोबर बाहेर पडताना वॉचमन पाहील. तू मला हॉटेलला सोडशील. हॉटेलचा पार्कींग स्टाफ तुला माझ्याबरोबर पाहील. तू गाडी पार्क करशील आणि तुझं काम करायला गुपचुप निघून जाशील.

मायाचा ड्रायव्हर गाडी सोडून कधीच कुठे जात नाही.. अख्या गावाला माहीती आहे. तू त्याला कसा अपवाद असशील? त्यामुळे तू माझ्या पार्टीच्या ठिकाणीच होतास हा पुरावा राहील.

अर्थात सी-मरीना हॉटेल थोडं दूर आहे. रिक्षा, टॅक्सी, बस करून जाणं परवडणारं नाही. त्यापेक्षा आपण एक काम करु, बंगल्याच्या मागे गॅरेजमध्ये एक जुनी स्विफ्ट पडून आहे. थोडी रिपेअर करून ती चालु करून ठेव. आपण ती किटी-पार्टीच्या हॉटेलपासून जवळच कुठेतरी लावून  ठेवु. मला सोडल्यावर तू ती कार घेउन जा आणि काम झाल्यावर परत तिकडे लावून  ठेव…ओके?

"डन.. ", दिपक म्हणाला.. "मी प्लॅनवर अजून थोडा विचार करतो आणि काही राहीलं आहे असं वाटलं तर सांगतो…"

थोड्या वेळातच मायाचं कॉन्फरंन्सचं ठिकाण आलं तसं माया गाडीतून उतरून निघून गेली.

दिपक मायाने सांगीतलेल्या प्लॅनवर पुन्हा पुन्हा विचार करण्यात गढून गेला.

---

टेबलावरची फोनची रिंग वाजली तेंव्हा इन्स्पेक्टर शेखावत एका नामी गुंडाचे जमानत पेपर्स सह्या करण्यात मग्न होता. त्याच्या अंगाची आग-आग झाली होती.

“कश्याला ह्या लोकांना पकडून तुरुंगात टाकायचं, आणि मग जमानत देऊन सोडायचं? आधीच गोळया घालुन उडवला पाहीजे साल्यांना.. ना रहेगा बास.. ना बजेगी बासुरी”, तो स्वतःशीच विचार करण्यात गुंगून गेला होता. फोनची रिंग वाजली तसा तो भानावर आला.

“हॅलो? इन्स्पेक्टर शेखावत हीअर...”

“तुझ्या तुरुंगातुन, तुझ्या नाकावर पाय देऊन पळालेला कैदी दिपक कुमार, जिवंत आहे आणि दमण मध्ये लपून बसला आहे..”

“कोण बोलतंय?”

“ते महत्वाचं नाही. दिपक अजून किती दिवस इथे असेल माहीत नाही. वेळ घालवु नकोस. दमणच्या हॉटेल पर्लमध्ये उतर.. दमणला पोहोचलास की त्याला कुठं पकडायचं ते सांगायला मी तिथे परत फोन करेन..”

शेखावत पुढे काही बोलायच्या आतच फोन बंद झाला होता.

दिपकचं नाव ऐकल्यावर शेखावतंचं मन पुन्हा त्या कटु भुतकाळात गेलं. आधी तुरुंगातून पळाला आणि नंतर गोकर्णातून हाता-तोंडाशी आलेला पुन्हा निसटला होता.

“ह्यावेळेस जिवंत सोडनार नाही…”, टेबलावर हाताची मुठ आपटत शेखावत ओरडला.

---

शेखावत दमणच्या रेल्वे स्टेशनवर उतरला तेंव्हा तो घामाने ओलाचिंब झाला होता. आधीच शरीराचे मोठ्ठ धुड आणि त्यात समुद्रामुळे हवेत आलेला दमटपणा त्यामुळे तो पुर्ण घामेजुन् गेला होता.

बरोबर आणलेली एक छोटीशी बॅग घेउन तो स्टेशनवर उतरला. खिश्याला हात लावून आपली सर्व्हीस रिव्हॉल्व्हर व्यवस्थीत असल्याची त्याने खात्री करून घेतली आणि मग तो हॉटेल पर्लच्या दिशेने चालु लागला.

---

“बर्ड इज इन केज”, ऑफीसवरून परतताना गाडीत माया दिपकला म्हणाली

"यु मिन शेखावत आला दमण मध्ये??", आश्चर्यचकीत होत दिपक म्हणाला

"येस्स, आपल्याला आपलं काम आजचं संध्याकाळी उरकायला हवं, उद्या मला ४ दिवसांसाठी मुंबईला जायचं आहे, उशीर करून चालणार नाही.", माया

"पण माया.. अजून आपला प्लॅन फुल्ल प्रुफ झालेला नाही. निटसा त्याच्यावर विचार करून झाला नाहीये. काही गडबड झाली तर?", दिपक

"डोन्ट वरी. मी केलाय विचार निट. एव्हरीथींग इज ऑल-राईट. ४ दिवसांनी खुप लेट होईल. तो पर्यंत तो निघून गेला तर आपल्याला नविन प्लॅन आखावा लागेल. बिसाईड्स... मी ऑलरेडी त्याला सी-मरीनाची टीप दिली आहे. ८.३० ला तो तेथे पोहोचेल.. सो बेटर हरी अप.. तू पटकन तुझं मेक-अपचं सामान घेउन तयार रहा, मी फ्रेश होऊन येते...."

दिपक खरं तर पुर्णपणे कन्व्हींन्स नव्हता. पण त्याच्या हातात दुसरा कुठला ऑप्शन पण नव्हता. माया म्हणते त्यात तथ्य होते. चार दिवसांनी कदाचीत खुप उशीर झाला असता. शेखावत दिपकला शोधत चार दिवस नक्कीच थांबला नसता. त्यामुळे जे होईल ते होईल, बघु असं म्हणून दिपकसुध्दा तयार झाला. शिवाय जेलमध्ये त्याच्यावर झालेले अत्याचार आणि स्टेफनीचा खुनाचा बदला घ्यायला त्याचे हात शिवशिवत होते.

गाडी बंगल्याच्या पोर्चमध्ये लावून  तो जवळ जवळ धावतच खोलीत शिरला. कपाटातून गेल्या दोन दिवसांत जमा केलेले सामान त्याने बाहेर काढले. एक कुरळया, मानेपर्यंतच्या केसांचा विग, अर्धा कापून दोन तुकडे केलेला टेबल-टेनिसचा चेंडु. एक मळकट ओव्हरकोट, लो-क्वॉलीटीचा एक काळा गॉगल वगैरे.

टेनिसचे अर्धा कापलेल्या बॉलचे तुकडे त्याने तोंडात दोन्ही बाजुला गालाला चिकटउन लावले. त्यामुळे त्याचं तोंड थोंड गोलाकार आणि फुगलेलं वाटु लागलं. केसांचा विग, दाढी, ओव्हरकोट आणि आतमध्ये एकावर एक घातलेले ५-६ जाड शर्ट ह्यामुळे तो पहील्यापेक्षा

कित्येक पटीने जाड दिसु लागला. त्याने आपलं बदलेलं रुप आरश्यात एकवार न्याहाळलं. आणि मग केलेला बदल योग्य आहे ह्याची जाणिव झाल्यावर पुन्हा सर्व सामान उतरवून  त्याने एका बॅगेत भरलं आणि मायाची वाट बघत खाली जाऊन थांबला.

माया येईपर्यंत दिपकने उगाचच वॉचमनशी गप्पा मारल्या. मॅडमनी कशी ऐन वेळी किटी-पार्टी ठरवली, आणि आपली आराम करायची इच्छा असून सुध्दा कसं तिच्यासाठी पुन्हा जावं लागणार आहे त्याची दर्दभरी हकीकत त्याने वॉचमनला ऐकवली आणि शेवटी ‘मॅडम पार्टीको गया तो फिर मै मस्त गाडी मै दो-तीन घंटा सोनेवाला हु’ वगैरे ऐकवून  त्याचा निरोप घेतला.

माया गाडीत बसल्यावर बाहेर पडताना एकवार पुन्हा एकदा गाडीची काच खाली करून त्याने वॉचमनकडे बघून हात हलवला आणि मग त्याने गाडी हॉटेलच्या दिशेने वळवली.

“ऑल सेट?”, मायाने विचारले

“हम्म..”, दिपक

“प्लॅन सगळा लक्षात आहे ना? कोणतीही चूक होता कामा नये…”, माया
“हम्म.. आणि स्विफ्ट मी आज सकाळीच एम.जी.रोडला न्हेऊन ठेवली आहे.. सो नो प्रॉब्लेम..”, दिपक म्हणाला

“आपल्याकडे तीन तास आहेत, त्या वेळेत तू काम पुर्ण करून परत गाडीत येऊन बसं. सगळं काही फ्ल्युएंटली व्हायला हवं. तरच आपला प्लॅन व्यवस्थीत पार पडेल.. ऑल द बेस्ट….”,माया

दिपकने गाडी हॉटेलच्या पोर्चमध्ये थांबवली. काही न बोलता माया उतरून निघून गेली. दिपकने गाडी वळवून  हॉटेल पार्कींगच्या गेटमधून आत आणली.

“व्हॅले पार्कींग?”, दारात उभ्या असणाऱ्या कर्मचाऱ्याने दिपकला विचारले

“नो.. थॅंक्यु.. माया मॅडमना त्यांच्या गाडीला दुसऱ्या कुणी हात लावलेला आवडणार नाही. डोन्ट वरी, आय विल फाईंड माय प्लेस टु पार्क. बिसाईड्स मी कारमध्येच आहे..”

माया मॅडमची गाडी आहे म्हणल्यावर त्या कर्मचाऱ्याने नकळत ड्रायव्हर असलेल्या दिपकलाच सलाम ठोकला.

दिपक त्याच्याकडे बघून हसला आणि त्याने गाडी पार्कींगच्या एका कोपऱ्यात न्हेऊन उभी केली. साधारणपणे पाच-एक मिनीटं आजुबाजुचा अंदाज घेत त्याने थोडा वेळ जाऊ दिला आणि नंतर गाडीच्या काळया काचा वर करून खिडक्या बंद करून टाकल्या. मग त्याने आपली बॅग सिटवर रिकामी केली आणि बॅगेतून आणलेले सामान अंगावर चढवायला सुरुवात केली.

पार्कींगमध्ये बऱ्यापैकी वर्दळ होती. अनेक अलिशान गाड्या जा-ये करत होत्या. त्यामुळे दिपकला बाहेर पडता येत नव्हते. घड्याळाचे काटे जणु वेगाने पुढे पुढे धावत होते. वेळ फार कमी होता. मायाची पार्टी संपायच्या आत दिपकला परतायचे होते.

थोडीशी संधी मिळताच दिपक पट्कन गाडीतून बाहेर पडला. जाताना त्याने गाडीतील म्युझीक सिस्टीम ऑन केली आणि व्हॉल्युम मोठ्ठा केला जेणेकरून गाणी बाहेर ऐकु येतील आणि गाडीत कोणीतरी बसलेलं आहे ह्याची खात्री पटेल.

गाडी लॉक करून पार्कींगच्या मागच्या बाजुच्या भिंतीवरून उडी टाकून तो बाहेर पडला एम.जी.रोडच्या दिशेने जेथे त्याने सी.मरीना बारमध्ये जाण्यासाठी स्विफ्ट पार्क केली होती.

दिपक गाडीपाशी पोहोचला तेंव्हा तो घामाने पुर्णपणे निथळत होता. आधीच अंगावर चढवलेले ५-६ शर्ट, त्याच्यावर तो जाड मोठ्ठा ओव्हरकोट आणि त्यात झपझप चालल्याने तो पुर्णपणे घामाघुम झाला होता. त्याने पार्कींगमधून गाडी बाहेर काढली आणि सी.मरीनाकडे वळवली त्याच वेळी संतापाने बेभान झालेला शेखावत सी.मरीनाचे दार उघडून बारमध्ये प्रवेश करत होता.

दीपक बारमध्ये पोहोचला तेंव्हा बार गर्दीने भरून गेला होता. हवश्या-नवश्यांपासून ते पट्टीचे पिणाऱ्यांपर्यंत झाडून सर्वजण हजर होते. बारच्या एका कोपऱ्यात जुगारांचा डाव रंगला होता. पूर्ण बार सिगारेटच्या धुराने भरून गेला होता.

दीपकची नजर शेखावतचा शोध घेत होती. त्याला शोधायला दीपकला फार वेळ लागला नाही. बारच्या काउंटरला लागून असलेल्या एका स्टुलावर तो आपला देह विसाउन बसला होता. हातामध्ये एक बिअरचा मोठ्ठा ग्लास होता. डोळयावर गॉगल होता, पण त्याची शोधक नजर बारमधून सर्वत्र फिरत होती. बारच्या दारात उभ्या असलेल्या दीपक वर काही क्षण त्याची नजर स्थिरावली. दोघांची नजरा-नजर झाली आणि मग परत तो इतरत्र बघु लागला.

अर्थातच त्याने दीपकला ह्या वेशात ओळखले नव्हते.

शेखावतला पाहताच दीपकच्या मस्तकावरच्या शिरा ताणल्या गेल्या.

“अपनी गली मै कुत्ता भी शेर होता है, आज दाखवतो तुला”, असाच काहीसा विचार दीपकच्या मनात तरळून गेला.

परंतु घाई करून चालणार नव्हती. सर्व काही प्लैन मध्ये ठरवल्याप्रमाणे व्हायला हवे होते.

शेखावतच्या शेजारची जागा रिकामी होईपर्यंत दीपक वाट बघत थांबला. व्हिस्किचा एक लार्ज ऑन-द-रॉक्स पेग त्याने मागवला आणि मग जागा रिकामी झाल्यावर दीपक त्याच्या शेजारी जाऊन बसला.

दोन तीन पेग त्याने गटागट पिउन टाकले आणि मग तो शेखावतकडे वळला

“हायलो शर”, व्हिस्की रिचवता रिचवता दीपक म्हणाला

शेखावतने एकवार त्याच्याकडे बघितले आणि मग काही न बोलता परत तो बारच्या दाराकडे पाहू लागला.

“हायलो शर, कश काय,बर हाय न?” पुन्हा दीपक म्हणाला.

शेखावतला बारच्या दरवाज्यावरून नजर हलवायची नव्हती त्यामुळे त्याने वळून न बघताच नुसता हात केला.

दिपकने अजून एक लार्ज पेग बनवला.

“शाला, इतना क्या भाव खानेका? निट बघत पण नाही.”, दीपक

शेखावत अजूनही त्याच्याकडे दुर्लक्षच करत होता.

“श्चुई श्चुई, मी तुझ्याशी बोलतोय गेंड्या”, खोट्या खोट्या झोकांड्या खात दीपक बोलला

शेखावत ने चिडून एकदा मागे वळून पहिले. काही क्षण तो चिडून पाहत राहिला आणि पुन्हा त्याने नजर दाराकडे वळवली.

“ओ तेरी… चिडला का काय?”, दीपक

“मी सांगतो… “, दीपक आता समोरच्च्या बारटेण्डरशी बोलू लागला, “ह्याच्यासारखी ढोली लोक जगातून कमी झाली ना, तर जागेचा सगळा प्रश्न सुटून जाइल. काल बस मधून येताना, नेमका शेजारी असच एक चिरमुऱ्याच पोत. इतकी जागा अडवली होती ना”

“नाही तर काय, आमच्या इथली स्टोर मैनेजर अशीच आहे. काम तर काही करत नाही, बडबड मात्र ऐकावी”, एव्हाना बारटेण्डर पण दीपक बरोबर चालू झाला होता.

“हो आणि असल्या लोकांना पोलिस बनवतात. तुरुंगातले कैदी पळून जाणार नाहीत तर काय? हे बसतील दोन पावला चालल्यावर हाश हुशः करत”, दिपकने मर्मावरच घाव घातला.

तुरुंगातून पळण्याचा विषय निघाल्यावर मात्र शेखावतचा पेशन्स संपला. लाथेने त्याने स्टूल मागे ढकलले आणि तो उठून उभा राहिला व दिपकने काही करायच्या आत हाताचा एक ठोसा त्याच्या चेहऱ्यावर लगावला. शेखावत कडून इतक्या चपळाईची दीपकला अपेक्षा नव्हती. त्या अनपेक्षित हल्ल्याने तो कोलमडून खाली पडला. तोंडात ठेवलेले चेंडूचे तुकडे बाहेर पडता पडता वाचले.

बार मधला गोंधळ, आवाज अचानक बंद झाला. सगळे थांबून दीपक आणि शेखावत कडे पाहू लागले.

दीपक गाल चोळत उभा राहिला. शेखावतला तेथल्या तिथे बुकलून काढायची दीपकला फार इच्छा झाली होती. पण आत्ता हातापाई वाढवून चालणार नव्हते. त्याने बिलाचे पैसे दिले आणि शेखावतकडे बघत सगळयांना ऐकू जाईल श्या स्वरात तो म्हणाला,

“बघून घेईन तुला, भेट बाहेर… “

चरफडत दीपक तेथून बाहेर पडला आणि पार्किंग मध्ये लपून बसला.

शेखावत सुद्धा बसून बसून कंटाळा होता. त्याने हातातल्या घड्याळात वेळ बघितली. सांगितलेल्या वेळेपेक्षा तासभर अधिक शेखावत तेथे थांबला होता. पण दीपकचा काहीच पत्ता नव्हता.

बिअरचा ग्लास त्याने रिकामा केला आणि पैसे चूकते करून तो सुध्दा थोड्या वेळाने बाहेर पडला.

एका गाडीच्या आड लपलेल्या दिपकने शेखावतला बाहेर पडताना पहिले. त्याने आजूबाजूचा अंदाज घेतला. रस्ता बऱ्यापैकी सुनसान होता. लपत छपत तो शेखावतच्या मागे जाऊन थांबला.

शेखावत चरफडत स्वतःशीच पुटपुटत चालला होता.

“शेखवत…”, दिपकने मागून आवाज दिला

शेखावतने चमकून मागे वळून पहिले. मागे मगाच्याच त्या दारुड्याला बघून त्याला आश्चर्य वाटले.

पण त्याला जास्त आश्चर्य ह्याचे वाटले कि दोन मिनिटांपूर्वी भेटलेल्या ह्या दारुड्याला आपले नाव कसे ठाऊक?

“कोण आहेस तू? मला कसा ओळखतोस?”, शेखावत ने विचारले

दीपक छद्मी हसला. “ओळखले नाहीस?” अस म्हणून त्याने आपली खोटी दाढी आणि केसांचा विग काढून शेजारच्या गाडीवर घडी करून ठेवला. गॉगल आणि टोपी काढून शेजारी ठेवली.

दीपकला बघताच शेखावतचा संताप पुन्हा उफाळून आला. त्याने आपले सर्विस रिव्हॉल्वर काढायला हात खिश्याकडे न्हेला. परंतु दीपक तयार होता. त्याने चपळाइने शेखावतच्या अंगावर झेप घेतली. शेखावत आपले रिव्हॉल्वर काढण्यात मग्न होता. वेगाने अंगावर येणाऱ्या दिपकला पाहीलेच नाही. दिपकने सर्व शक्ती एकटवून शेखावतच्या हनुवटीखाली एक फाईट मारली. त्याची तिव्रता इतकी जोरात होती की शेखावतसारखा जाडजुड माणूस सुध्दा जमीनीपासून काही इंच उंच उडून मागे पडला.

त्याला सावरायची संधी न देता दिपकने बुटाच्या दोन चार लाथा शेखावतच्या गुबगुबीत पोटात लगावल्या आणि कसे बसे उठु पहात असणाऱ्या शेखावतच्या तोंडावर गुडघ्याने जोरात वार केला त्याबरोबर त्याचा घोळणा फुटला आणि नाकातून रक्त वाहु लागले.

परंतु दिपक थांबण्याच्या विचारात नव्हता. सर्व संताप त्याच्या अंगात संचारला होता. लाथा, बुक्या, गुडघा, ढोपर, डोकं जे सुचेल त्याने तो शेखावतला तुडवत होता. तुरुंगातील प्रत्येक क्षण, ती अंधारी खोली, रात्रभर उंदरांचा वावर, बेचव खाणं, मनात येईल तेंव्हा पोलिसांचं येऊन तुडवून जाणं आणि नंतर स्टेफनीची हत्या.. सर्व काही.

१०-१५ मिनीटं चांगलं बुकलुन काढल्यावर कुठे दिपक थोडा शांत झाला. शेखावत तळमळत जमीनीवर लोळत होता. अधिक मारहाण करणं उचीत ठरलं नसतं. एक दारुड्या शेखावतसारख्या बलदंड माणसाला इतकं मारु शकेल असा उगाच कुणाला संशय यायला नको. त्याने कोपऱ्यात लपवून ठेवलेली लोखंडी सळई बाहेर काढली. सुडाने पेटलेल्या त्याच्या चेहऱ्यावर आपला मृत्यु स्पष्ट दिसत होता. आपलं पोट हाताने दाबून धरत तो कसा बसा उठून बसला. त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता.

दिपकने त्याच्या डोक्यात एकच जोराचा प्रहार करून खेळ संपवायचं ठरवलं. त्याने आपली सळई हवेत उंच उगारली आणि…

“थांब..प्लिज.. एक मिनीट..”, शेखावत तडफडत म्हणाला…

....

“मला.. फक्त मला माहीती आहे तू निर्दोष आहेस. इस्माईलचा खुन तू केला नाहीस.. मला माहीती आहे.. पोलिसांची गोळी लागून तो मेला..”

दिपकने उगारलेली सळई खाली केली.

“मी.. एकमेव पुरावा आहे दिपक.. मला संपवलस तर तू कधीच वाचु शकणार नाही. मला जिवदान दिलस तर मी वचन देतो मी कोर्टात पुरावा देईन की इस्माईल एन्काऊंटर मध्ये मारला गेला. तुझी चूक नव्हती....”

“पण त्याने मला काय फायदा.. मला पुन्हा तुरुंगात जायची इच्छा नाही. त्या दिवशी.. जेनीला वाचवताना तो माझ्या हातून मारला गेला आणि त्याची शिक्षा भोगायला मी कदापी येणार नाही..”, दिपक

“नको येऊस.. पण निदान माफियाचा ससेमिरा तुझ्या मागून जाईल... एक वेळ पोलिस तुझ्यापर्यंत पोहोचणार नाहीत, पण माफिया इस्माईलच्या खुनासाठी तुला कधीच सोडणार नाहीत. आज नाहीतर उद्या ते तुझ्यापर्यंत पोहोचु शकतात. तू कधीच सुखाचं आयुष्य जगु शकणार नाहीस हे लक्षात ठेव..”, शेखावत

शेखावतच्या बोलण्यात तथ्य होते आणि दिपकलाही ते मान्य होते. माफिया त्याला कध्धीच सोडणार नव्हते. पोलिसांना चकवणं एकवेळ शक्य, पण माफिया सारखे चिकट लोकं.. जेंव्हा सर्व काही सुरळीत चालु आहे, सर्वजण विसरून गेलं आहेत म्हणून बेसावध होऊन, मस्त जेवणखाण करून पोटावरून हात फिरवत झोपावं तर कुठुनतरी कुणी तरी येऊन भोसकून जाईल ह्याचा नेम नाही.

दिपक गोंधळून गेला. शेखावतला उठून  उभं रहाण्यासाठी त्याने हात पुढे केला... आणि...

....

---

कुठुनतरी एक बंदुकीची गोळी सुss करत आली आणि तिने शेखावतच्या छातीचा वेध घेतला. काय होतेय कळेपर्यंत अजून एक गोळी आली ती थेट शेखावतच्या डोक्यात घुसली.

शेखावत धाड्कन जमीनीवर कोसळला.

दिपकने आश्चर्याने मागे पाहीले. त्याच्यापासून काही फुटांवर अंधारात हातात पिस्तोल घेऊन माया उभी होती.

---

दिपकने पुन्हा एकदा शेखावतकडे बघीतले. शेखावतचा निष्प्राण देह जमीनीवर निश्चेत पडला होता.

तो मायाकडे धावत गेला.. “हे.. हे सर्व...! तू इथे कशी?”

“मला वाटलंच होत शेखावत तुला फसवायचा प्रयत्न करेल आणि तू सहज त्याच्या भुलथापांना बळी पडशील... आपला प्लॅन त्याला मारण्याचा होता. त्यात कोणतीही चूक होता कामा नये...”, माया

“पण.. तो जे म्हणाला ते खरं होतं. जर त्याने साक्ष दिली असती तर निदान माफियाचा ससेमिरा तरी…”

“साक्ष !! कुणाची शेखावतची? तू त्याच्यावर विश्वास ठेवलास ह्याचंच मला आश्चर्य वाटतं दिपक. एक नंबरचा करप्ट माणूस तो. साक्ष सोडाच, इथुनच त्याने तुला जिवंत जाऊन दिलं नसतं. विसरलास, त्याच्या कमरेला भरलेली सर्व्हिस रिव्हॉल्व्हर आहे. इथेच तुझं लक्ष नाही असं पाहून काटा काढला असता…”

“नाही माया.. मला वाटतं तो खरं बोलत होता…”, दिपक

“बरं ठिक आहे.. मानलं एक वेळ तो खरं बोलत होता.. पण त्याने साध्य काय होणार? तुझा लॉ अ‍ॅन्ड ऑर्डरवर अजूनही विश्वास आहे? इस्माईलच्या खुनाचा आरोप पोलिस खातं स्वतःवर कधीच घेणार नाहीत. एक तर तेच शेखावतला संपवतील नाही तर पैसे चारून त्याची साक्ष खोटी पाडण्याचा प्रयत्न करतील.

आणि पुढे काय होईल.. आज एक दिपक निर्माण झालाय, अजून असे अनेक दिपक निर्माण होतील. ही सिस्टीमच आपल्याला उखडून टाकायची आहे दिपक.. विसरु नकोस…”, माया

“पण माया… ह्याचा मृत्यु.. म्हणजे आपल्याला त्याचा मृत्य हा असा.. खुन नक्कीच नव्हता भासवायचा. एक दारुड्या सेमी अ‍ॅटोमॅटीक पिस्तोल तर घेऊन फिरणार नाही. आणि फिरतच असता तर त्याने ह्याला डायरेक्टलीच उडवला असता. त्याच्याशी हाणामारी कश्याला केली असती?”

“दिपक…सगळं इथंच बोललं पाहीजे का दिपक? आपल्याला इथं कोणी पाहीलं तर पंचाइत होईल.. चल निघु इथुन..”

दिपकला अधिक बोलायची संधी न देता माया तेथून निघून गेली. दिपककडेही दुसरा पर्याय नव्हता. काही न बोलता तो ही तिच्या मागून तेथून निघून गेला.

---

दुसऱ्या दिवशी सकाळी पेपर बघितल्यावर दिपकला पहिला धक्का बसला. आदल्या रात्री ज्याचा खून झाला होता तो शेखावत साधा सुधा इन्स्पेक्टर नव्हता तर तो होता डी.सी.पी.शेखावत – डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिस. मधल्या काळात त्याचे प्रमोशन झाले होते. साधा सुधा कोणी इन्स्पेक्टर असता तर कदाचित इतकी हवा झाली नसती, पण मुंबई सारख्या शहराचा डीसीपी आणि त्याच्या आपल्या इथे झालेला खून, त्यामुळेच ही बातमी मिडीयाने उचलून धरली होती.

आणि दीपकच्या दृष्टीने मजेशीर गोष्ट म्हणजे अख्या बातमीत कुठेही एका दाढीवाल्या दारुड्याचा आणि शेखावतशी झालेल्या त्याच्या हातापाईचा उल्लेख नव्हता. उलटपक्षी त्याला झालेल्या मारहाणी वरून आणि नंतर गोळी झाडून झालेल्या म्रुत्युवरून हा एखादा नियोजीत कट होता आणि कश्याचा तरी बदला घ्यायला हा खून घडवला गेलेला आहे असा निष्कर्ष पोलिस आणि मिडीयाने काढला होता.

ज्यासाठी त्याने इतका आटापिटा केला, वेषांतर करून धावत पळत तो त्या बारपाशी पोचला त्याच्या काहीच उपयोग झाला नव्हता. शेखावतचा झालेला मृत्यू हा नियोजित खून वाटू नये म्हणून केलेले प्लॅनिंग व्यर्थ ठरले होते. थोडक्यात म्हणजे जे व्हायला नको होते, तेच घडले होते .

दीपक कश्याचीही पर्वा न करता सरळ मायाच्या बेडरूममध्ये घुसला आणि हातातला पेपर तिच्यासमोर आपटत म्हणाला,

“तू मला आधी सांगितले का नाहीस शेखावत डी.सी.पी आहे ते ? आपण काहीतरी वेगळा प्लॅन केला असता.”

“मला पण हि न्यूज आहे दिपक. मला पण माहीत नव्हते!! “, माया

“डॅम माया, पण पहिल्यांदा तुला गोळी मारायची आवश्यकताच काय होती? आपल्या प्लॅनची पूर्ण वाट लागलीय. कुणालाही वाटत नाहीये कि हा चुकून झालेला मृत्यू आहे. सगळे जण ह्याला पूर्वनियोजित खुनच म्हणत आहेत “, दीपक वैतागून म्हणाला

“मी नसते मारले तर तू त्याला जिवंत सोडलं असतंस आणि कदाचित त्याच वेळी त्याने तुला मारले असते. मी आधीच सांगितलेय तुला दीपक, परत परत तू मला तेंतेच काय विचारतो आहेस?”, माया

“नो माया, देअर इज समथिंग एल्स, तू आधी पासूनच तेथे असतीस आणि मग तू गोळी झाडली असतीस तर गोष्ट वेगळी होती. आपल्या प्लॅन मध्ये तू तेथेच काय, जवळपास कुठेच असण्याचा प्रश्न नव्हता. मग सगळ्यात प्रथम तू तेथे आलीसच का?”, दिपक

“बिकॉज आय केअर्ड फॉर यु दिपक.”, जवळ जवळ ओरडतच माया म्हणाला “मला तुझी काळजी वाटली. तो शेखावत किती क्रूर आहे हे मला माहिते. आय जस्ट वॉन्टेड यु टु बी सेफ.... ऐण्ड शेखावत टू बी डेड”

मायाच्या डोळयातून अश्रू वाहू लागले.

“तू तुझ्या आयुष्यात खूप सहन केले आहेस, खूप भोगले आहेस, आणि मी सुद्धा. आपले दोघांचेही पार्टनर्स ह्या निर्दयी लोकांनी आपल्या पासून हिरावून घेतले आहेत. तुला काही झालं असत तर मी तो धक्का सहन नसते करू शकले”, हताश होऊन माया बोलत होती.

नेहमी कठोर भासणाऱ्या मायाचे हे रूप दीपक प्रथमच पाहत होता.

काही क्षण शांततेत गेले.

“यु लव्ह मी दीपक, डोन्ट यु?”, अचानक माया म्हणाली

मायाच्या ह्या अनपेक्षित प्रश्नाने दीपक गोंधळून गेला.

माया दीपकच्या जवळ आली आणि तिने आपले ओठ दीपकच्या ओठांवर टेकवले.

काही क्षण ... काही क्षण दीपक सर्व काही विसरून गेला. अनंत पसरलेल्या आसमंतात तरंगल्यासारखे त्याचे मन मुक्त विहार करत राहिले

“देव मयत शेखावतच्या आत्म्यास शांती देओ!!” दीपकच्या मानेभोवतीचा हातांचा विळखा काढत माया म्हणाली ..

“लेट्स सेलेब्रेट हिज डेथ !!” अस म्हणून मायाने दीपकच्या शर्टची बटण काढायला सुरुवात केली.

मुंबईच्या पोलिस हेड-क्वार्टरमध्ये पोलिस-डिपार्टमेंटची एक मिटींग भरली होती. स्वतः कमीशनर साहेब जातीने हजर होते.

“तुमच्यापैकी जर कुणालाच माहीत नाही शेखावत दमणला कश्यासाठी गेला होता.. म्हणजे ऑफीसच्या कामासाठी तो नक्कीच तिकडे गेला नसणार. पण मग असं अचानक तडकाफडकी एका रात्रीत उठून  तो तिकडं जाण्याचं कारणंच काय???”, कमीशनर .....

“एकेकाळी अख्खं गुन्हेगारी जगं आपल्या डिपार्टमेंटला घाबरून होतं. एन्कॉन्टर स्पेशालिस्टची फौज आपल्या ए.टी.एस कडे होती आणि आज आपलेच ऑफीसर्स कुत्र्यासारखे मारले जात आहेत! जनतेने कसा विश्वास ठेवायचा आपल्यावर..”

एवढ्यात टेबलावरचा इंटरकॉम वाजतो..

“हम्म.. हम्म.. हो…, द्या त्यांना पाठवून आत…”, कमीशनर रिसीव्हर खाली ठेवतात, तोच कॉन्फर्रन्स रुमचे दार उघडून साधारण चाळीशीतील एक माणूस आत येतो.

थोडासा घट्टच झालेला राखाडी रंगाचा कोट, एक काळया रंगाचा टाय, चेहऱ्यावर खवल्या-खवल्यांचे जाळं आणि कपाळावर आठ्या..

“या ऑफीसर डिसुझा.. प्लिज कम इन…”, कमीशनर साहेब त्या इसमाला शेजारच्या खुर्चीकडे बोट दाखवत म्हणतात.

“टीम.. मिट सि.आय.डी. ऑफीसर डिसुझा.. शेखावतच्या केसवर हेच काम पहातील…”, कमीशनर

रेग्युलर पोलिस सोडून ही केस कमीशनर साहेबांनी सरळ सि.आय.डी. कडे दिलेली पाहून थोडी चुळबुळ चालु होते..

“पण सर…”

“आय नो.. आय नो..”, कमीशनर मध्येच वाक्य तोडत म्हणतात.. “हे बघा.. मला ह्या केस मध्ये कोणतीही दिरंगाई नको आहे.. वरून प्रेशर आहे.. आय वॉन्ट फास्ट रिझल्ट्स म्हणून ही केस सि.आय.डीच हॅन्डल करेल.

मि. डिसुझा, तुम्ही ही केस स्टडी केलीच असेल.. तुमचं काही मत, काही फाईंडींग्स?”

डीसुझा हातातली फाईल टेबलावर ठेवतो आणि उठून  उभा रहातो. एकवार कॉन्फरंन्स रुममधील सर्वांवरून नजर फिरवून  तो म्हणतो, “धिस इज श्युअरली ए प्लॅन्ड मर्डर.. सर!

शेखावतला नक्कीच कसलीतरी टिप मिळाली होती. तो दमणला जाण्याच्या तीन दिवस आधी त्याला दमणवरून एक फोन कॉल येऊन गेला होता. तो तेथे जायच्या आधीच त्याच्या नावाचं एका हॉटेलमध्ये बुकींग झालं होतं.. हे त्याचे फोन चे रेकॉर्ड्स आणि हि त्या हॉटेलच्या बुकिंगची स्कॅन कॉपी.”

डिसुझा आपल्या फाईलमधून काही पेपर्स काढून कमीशनर साहेबांच्या समोर ठेवतो.

“दमण मध्ये …”

“तो फोन कॉल ज्या नंबरवरून आला होता तो कुणाचा होता? त्याचे काही डीटेल्स?”, एक पोलिस डिसुझाचं वाक्य मध्येच तोडत विचारतो..

डिसुझा काही क्षण त्याच्याकडे रागानं बघतो..

“ऑफकोर्स.. तुम्ही ते तपासलं असेलच आणि नेहमीप्रमाणे ते सिम फर्जी असणार.. ऑफकोर्स..”, खजील होत तो इन्स्पेक्टर म्हणतो..

“दमण मध्ये नक्की कोणीतरी आहे ज्याने शेखावतला बोलावून  घेतलं आणि त्याचा खुन केला. मला वाटतं शेखावतच्या खुनामध्ये कमीत कमी दोन व्यक्तींचा सहभाग आहे. किंवा स्पष्टच बोलायचं झालं, तर त्याचा खुन झाला तेंव्हा तेथे दोन व्यक्ती हजर होत्या.

हे शेखावतचे पोस्ट-मार्टम रिपोर्ट्स आणि बॉडीचे फोटो..", डिसुझा पुन्हा आपल्या फाईलमधून अजून काही पेपर्स काढून कमीशनर साहेबांच्या समोर ठेवतो.

"त्याच्या संपुर्ण अंगावर मारहाणीचे निशाण आहेत.. कुणीतरी त्याला चांगला बदडून काढला आहे. आणि नुसतंच मारलं नाही तर जिवे-मारण्याचीच त्याची तयारी होती. हा फोटो बघा.. ", फोटोच्या गठ्यांमधील एका फोटोकडे बोट दाखवत डिसुझा म्हणतो..

"पंचनामा झाला तेंव्हा शेखावतच्या बॉडी शेजारी ही लोखंडी सळई सापडली. परंतु त्यावर शेखावतला मारल्याचे.. किंवा इव्हन शेखावतच्या बॉडीवर सळईच्या मारहाणीच्या खुणा नाहीत. ह्याचा अर्थ बहुदा शेवटी ही सळई त्याच्या डोक्यात घालुन त्याला मारण्याचा प्लॅन होता.. पण..."

एव्हाना सगळे पोलिस मती गुंग झाल्याप्रमाणे डिसुझाचं बोलणं कान देऊन ऐकत असतात..

डिसुझा पुन्हा एकदा सर्वांवरून नजर फिरवून पुढे म्हणतो.. "...पण काही तरी नक्की घडलं त्यावेळेस आणि नंतर कुणीतरी दुसऱ्या व्यक्तीने गोळी झाडून शेखावतचा खुन केला. फायरींग रेंज साधारण १५-२० फुटांची असावी."

"पण कश्यावरुन, मारहाण करणाऱ्या त्याच व्यक्तीने लांब जाऊन शेखावतला गोळी मारली नसेल?" पुन्हा एक शंका उपस्थीत झाली.

"शक्य आहे.. पण हे स्केच बघा..", डिसुझा अजून एक पेपर सर्वांसमोर धरतो.. "ज्या पध्दतीने .. किंवा ज्या कोनातून गोळी शेखावतच्या डोक्यात शिरली ती पहाता शेखावतच्या शरीराची स्थितिती साधारण अशी असावी"

स्केचप्रमाणे डिसुझा पोज करून दाखवतो.

“म्हणजे.. ना उभा, ना बसलेला.. जणु काही कोणीतरी त्याला उठून  उभं करत होतं.. शिवाय असं लांब जाऊन गोळी मारण्याचं प्रयोजन काय? आणि ती सळई?”

सर्वत्र शांतता पसरते. सर्व जण विचार करू लागतात

“..तुम्ही म्हणता तेही शक्य असेल, पण एकुण परिस्थीतीजन्य पुरावे बघता, माझं तरी हेच मत आहे.. सो कमीशनर सर.. मला अधिक तपास करायला दमणला जावं लागेल. तेथे तपास केल्यावरच मी अधिक माहीती देऊ शकेन…”

“गुड वर्क डिसुझा…”, अभिमानाने कमीशनर म्हणाले..”प्लिज गो अहेड अ‍ॅन्ड फाईंड दॅट बास्टर्ड…”

“येस सर..”, डिसुझाने कमीशनरला एक खणखणीत सलाम ठोकला आणि तो बाहेर पडला..

“व्हॉट नेक्स्ट?”, बेड मध्ये पड्ल्या पडल्या दिपकने विचारले.. “नेक्स्ट?, नेक्स्ट इज जॉनी चिकना, दी शार्प शुटर ऑफ माफीया.”, माया बेडमधून उठून बसली.

“पण काही म्हण माया, त्या दिवशी माझ्या हातात सळई बघीतल्यावर भितीचे जे भाव शेखावतच्या चेहर्‍यावर उमटले होते ना!! युसुफ पाहीजे होता त्या वेळी…”, दिपक

“युसुफ??? कोण? तो जो तुझ्याबरोबर तुरुंगातून पळाला होता???”, हसत हसत माया म्हणाली..

“हो तोच.. का? हसायला काय झालं???”, दिपक

“ओह माय गॉड.. मी तुला सांगीतचं नाही का? अरे त्यानेच तर तुझ्या हॉटेलचा पत्ता माफियाला दिला होता. तुझा आणि स्टेफनीचा. नाही तर तू कुठे आहेस इतक्या सहजी माफीयाला कळलंच नसतं…”, माया

“व्हॉट?? आर यु मॅड..”, दिपक

“ऑफकोर्स नॉट माय डिअर.. अरे इथं कोणी कोणासाठी नसतं. तुझ्या पत्याच्या मोबदल्यात लाख्खो रुपये त्याने कमावले असतील..”, माया

“नाही, शक्यच नाही. युसुफ असं करणारच नाही.. काहीतरी गडबड होतं असेल.. गैरसमज झाला असेल तुझा..”, अविश्वासाने दिपक म्हणाला..

“ओके.. ॲज यु विश..”, माया बेडमधून उठली आणि ड्रेसिंग टेबलाच्या आरश्यासमोर जाऊन उभी राहीली…

“जरं तसं असेल तर मग युसुफ माझं टार्गेट आहे.. त्यालाच आधी संपवायचं..”, दिपक

“ओह..डोन्ट बी सिली… ही इज जस्ट अ स्मॉल फिश.. तो असला काय आणि नसला काय.. आपल्याला हे मोठ्ठे फिश उडवायचे आहेत..”, माया

“नाही.. युसुफने जर गद्दारी केली असेल तर तो मेलाच पाहीजे..”, संतापून दिपक म्हणाला..

“ठिक आहे.. पण तू त्याची काळजी करु नकोस.. युसुफला संपवायची जबाबदारी माझी. तू जॉनी वर लक्ष केंद्रीत कर. साप आहे तो.. भयानक चपळ आणि तितकाच हुशार. त्याला मारणं इतकं सोप्प नाही. निट प्लॅन करावा लागेल.. युसुफ इज माय बेबी, आय विल टेक केअर ऑफ हीम. ओके??”

दीपक काही न बोलता नुसती मन हलवली.

टेबलावरच्या एका महागड्या परफ्युमचा मोठ्ठा स्प्रे केअरलेस्ली मायाने सर्वांगावर मारला आणि मग ती अंघोळ करायला बाथरुममध्ये निघून गेली.

जॉनी चिकना.. एक अंधुक असा चेहरा दिपकसमोर तरळत होता. त्या दिवशी हॉटेलमध्ये पोलिसांच्या मागोमाग घुसलेला तो हडकुळा पण तरीही नावाप्रमाणेच चिकना दिसणारा एक तरुण.. जॉनी चिकना…!!! पुन्हा एकदा स्टेफनीची प्रबळतेने दिपकला आठवण झाली आणि त्याने आवेगाने आपले डोळे घट्ट मिटून  घेतले..

थोड्या वेळाने त्याने डोळे उघडले तेंव्हा डोळयातील दुःखाची जागा संतापाने घेतली होती. त्याच्या हाताच्या मुठी वळल्या होत्या.

“स्टेफनीच्या खुनाचा बदला मी घेतल्याशिवाय राहणार नाही जॉनी, तू कुठेही लपलेला असशील, तुला शोधून काढीन आणि स्टेफनीकडे पाठवून देईन. यु गो देअर एन्ड से सॉरी टू हर!!!”

डिसुझा जेंव्हा दमणला यायला निघाला तेंव्हा अनेकांनी त्याला अंडरकव्हर रहायला सांगीतले होते. अनेक जण त्याला म्हणाले होते की तेथील स्टेट पोलिस तपास करत असताना सि.आय.डी. ऑफीसर तपास करायला आला म्हणल्यावर खरे गुन्हेगार सतर्क होतील. कदाचीत त्याच्या जिवाला सुध्दा धोका पोहोचवु पहातील.

पण डिसुझाला खरं तर तेच हवं होतं. गुन्हेगारांनी सतर्क व्हावं, त्याच्या हालचालींवर नजर ठेवावी किंवा त्याच्या हल्ला करण्याची सुध्दा हिंमत करावी. कारण तसं केलं तरच गुन्हेगार समोर येऊ शकतील.. अती सावधानतेच्या प्रयत्नात ते एखादी चूक करून बसतील हे डिसुझा पुर्ण ओळखुन होता आणि म्हणूनच जेंव्हा दमणला तो हॉटेलमध्ये चेक-ईन करत होता तेंव्हा त्याने तेथील रजिस्टरमध्ये आपल्या नावाच्या प्रोफ़ेशनमध्ये सि.आय.डी इन्स्पेक्टर अशी नोंद केली होती.

डिसुझाने सामान रुममध्ये फेकले, पट्कन एक शॉवर घेतला आणि कपडे करून त्याने तडक पोलिस-स्टेशन गाठले.

इन्स्पेक्टर राणा तेथील इन्चार्ज होते. डिसुझाने आपले आय.डी. कार्ड पुढे करताच राणा अदबीने उठून  उभे राहीले.

“एनी प्रोग्रेस इन्स्पेक्टर?”, डिसुझाने त्यांना बसायची खुण केली आणि समोरच्या खुर्चीवर बसत म्हणाला

“येस्स सर, एक महत्वाची माहीती हाती लागली आहे..”, राणा म्हणाले.. त्याच बरोबर त्यांनी सब-इन्स्पेक्टर पटेलला खुण करून एक फाईल मागवून घेतली.

फाईल येताच ती उघडून डिसुझा समोर ठेवली आणि राणा म्हणाले, “सर, आपल्याला त्या रॉडवर काही फिंगर प्रिंट्स मिळाल्या आहेत.. रस्त्यावरचाच एक रॉड असल्याने तश्या बऱ्याच प्रिंट्स आहेत.. पण काही प्रिंट्स अगदी ठळक आहेत.”

डिसुझा शांतपणे ऐकत होता.

“आम्हाला वाटतं त्याच प्रिंट्स खुन्याच्या असतील.. परंतु तरीही शंका नको म्हणून आम्ही शक्यतो सर्व प्रिंट्स फॉरेन्सिक टिमला पाठवून दिल्या..”, राणा

“मला नाही वाटत त्यापैकीच कुणी खुनी असेल. कारण इतकी ढोबळ चूक कुठलाही खुनी करणार नाही. आणि केलीच तरी त्या प्रिंट्सवरून लगेच तपासाला दिशा मिळणं कठीण आहे..”, डिसुझा

“नाही सर, उलट आम्हाला वाटतं आपल्या तपासाला दिशा मिळेल…”, राणा

“ते कसं?”, डिसुझा

“सर.. त्या प्रिंट्सपैकी एक प्रिंट्सचे मॅचींग रेकॉर्ड्स आपल्याला सापडले आहेत..”, राणा..

“काय?”, जवळ जवळ आश्चर्याने ओरडतच डिसुझा म्हणाला

“येस्स सर.. आम्ही सर्वप्रथम फॉर्मालिटीनुसार ह्या प्रिंट्स मॅचींगसाठी सर्व पोलिसरेकॉर्डला पाठवल्या होत्या.. त्यातील एक प्रिंट्स आपल्या रेकॉर्ड्सला आहेत. हे त्याचे डिटेल्स..”, असं म्हणून राणाने ती फाईल डिसुझाकडे दिली.

डिसुझा ती फाईल उघडून वाचु लागला.

“गोकर्ण-महाबळेश्वर जवळ जो कारागृह आहे.. तेथील एका कैद्याचे निशाण मिळते-जुळते आहेत सर..”, राणा म्हणत होता..

“दीपक कुमार??”, डिसुझा फाईल वाचता वाचता म्हणाला.. “कोण आहे हा दिपक कुमार? काय चार्जेस होते त्याच्यावर? काही माहीती केली?”,

“येस्स सर.. दिपक कुमार काही साथीदारांसमवेत त्या तुरुंगातून पळाला आहे सर, आणि सगळयात मुख्य गोष्ट म्हणजे त्या जेलचा जेलर हा मयत इन्स्पेक्टर शेखावतच होता..”, राणा

“आय सी.. म्हणजे नक्कीच काही तरी लिंक आहे तर..”, डिसुझा.. “कदाचीत जो बदल्याचा अंदाज आपण वर्तवला होता तेच कारण असु शकतंय..”
“येस्स.. सर आम्हाला पण तसंच वाटतंय..”, राणा

“गुड वर्क राणा.. अजून काही माहीती मिळाली? हा दिपक कुमार सध्या कुठे आहे? काही थांगपत्ता.. जेलमधून पळाल्यावर पुढे त्याचं काय झालं वगैरे?”, डिसुझा

“नो सर.. पण आम्ही त्या अनुषंगानेच तपास करतो आहोत. अधिक डिटेल्स मिळाले की लगेच कळवतो..”, राणा

“ओके देन..हे माझे कॉन्टॅक्ट डिटेल्स..”, असं म्हणून डिसुझाने आपल्या लॉजचा पत्ता राणाला दिला… “काहीही माहीती मिळाली तरी लगेच मला कळवा.. तो पर्यंत मी जरा इथे अजून काही तपास करून हाती काही लागतंय का ते पहातो..”

“येस्स सर..”, राणाने उठून  डिसुझाला हस्तांदोलन केले आणि डिसुझा तेथून बाहेर पडला.

तासाभरानंतर डिसुझा आपल्या रुममध्ये खुर्चीवर पाय टाकून आरामशीर बसला होता. थोडावेळ विचार करून मग त्याने कमीशनरला फोन लावला, हाती लागलेली सर्व माहीती पुरवली आणि म्हणाला, “सर ‘दिपक कुमारची’ माहीती आम्ही मागवली आहे, ती इथे मिळेलच, पण मला ह्या शेखावतची सुध्दा पुर्ण माहीती पाहीजे. पोलिस-फोर्स जॉईन केल्यापासून ते तो मरेपर्यंतची सर्व.”

“दिपक, जॉनी चिकनाचा पत्ता सापडला आहे. तो सध्या मुंबईतच आहे. तुला मुंबईला जावं लागेल..”, माया दिपकला सांगत होती.

“मुंबईला? पण का? आपलं तर ठरलं होतं की एकेकाला इकडे फसवून  आणायचे आणि मग मारायचे?”, दिपक

“येस्स.. तसंच ठरलं होतं.. पण आपल्याकडून प्लॅनमध्ये काही चुका झाल्या.. शेखावतचा मृत्यु हा खुन आहे हे आता सर्वांना ठाऊक झालेलं आहे आणि अश्यात आपल्याला इथे अजून एक खुन होणं परवडणारं नाही..”, माया

“आपल्याकडून नाही माया, तुझ्याकडुन..”, दिपक

“ओके.. ओके.. माझ्याकडुन.. बट स्टिल.. इथं नको.. मी तुझी मुंबईला जायची व्यवस्था करते.. तू दोन-तीन दिवसांतच निघ, मी सगळी व्यवस्था करते. .”, माया

“पण माया, उगाच घाई कश्याला करायची? आपण अजून निट प्लैन पण केला नाहीये, उगाच पुन्हा काही चुका नको व्हायला अस नाही का वाटत आहे?”, दीपक

"नो दीपक, आपल्याकडे वेळ नाहीये, लेट द मोमेंटम कंटीन्यु...", दिपकला बोलायची संधी न देता माया निघून गेली

मुंबईला कमीशनर-ऑफ-पोलिसचे पुर्ण ऑफीस कामाला लागले होते. एका दिवसात त्यांना शेखावतची पुर्ण माहीती गोळा करून डिसुझाला पुरवायची होती. फक्त पोलिस स्टाफच नाही तर सर्व खबरी सुध्दा कामाला लागले होते. कुठलाही दुवा, कुठलीही बारीक-सारीक माहीती सुटता कामा नये असे डिसुझाने जाताना सर्वांना बजावले होते.

डिसुझा आपल्या खोलीमध्ये दिपकची फाईल घेऊन बसला होता. त्याआधी त्याने रिसेप्शनला फोन लावला होता आणि आपल्याला कोणीही कुठल्याही गोष्टीसाठी डिस्टर्ब करु नये म्हणून बजावले होते. 'लॉन्ड्री सर्व्हिस', 'रुम सर्व्हिस', 'टेलीफोन कॉल्स' कुठल्याही गोष्टीसाठी खोलीमध्ये कुणालाही पाठवायचे नाही हे निक्षुन सांगीतले होते.

प्रॉन्स, खारवलेल्या काजुंचे दोन पुडे आणि सोडा व व्हिस्की घेऊन तो खुर्चीत रेलुन बसला आणि त्याने दिपकची फाइल उघडली.

पहील्याच पानावर दिपकचा ८x१०" चा आर्मी युनीफॉर्ममधला फोटो होता. तेजस्वी चेहरा, आर्मीच्या युनिफॉर्मच्या कॉन्फ़ीडन्सने अधिकच मोहक भासत होता.

डिसुझा खुप वेळ त्या फोटोकडे पहात बसला होता. त्याला कुठल्याही प्रकारे दिपक हा निर्ढावलेला, खुनावर खुन पाडणारा गुन्हेगार भासत नव्हता. बऱ्याच वेळ निरीक्षण केल्यावर त्याने तो फोटो कडेला ठेवून  दिला आणि फाईल वाचायला सुरुवात केली.

दिपक आपल्या रुममधील सेटीवर आरामात पहुडून टि.व्ही पहात होता. मायाने त्याला आज सुट्टी दिली होती आणि ती एकटीच गाडी घेऊन कुठेतरी गेली होती. दिपकने कंटाळवाणा पिक्चर बदलुन न्युज चॅनल लावला. न्युजमध्ये शेखावतच्या खुनाची बातमी चालु होती.

“दमण पोलिसने आज एक संदिग्धका रेखाचित्र जारी किया है ...जिसके साथ डि.सी.पी. शेखावतकी हातापायी होने की खबर बताई जाती है. पोलिस को लगता है, की ये आदमी इस कतल के बारेमै कुछ जानकारी दे सकता है.

अगर आपमेसे कोई इस शख्स को पहेचानता है, या इसे कही देखा गया है, तो तुरंत पोलिस को जानकारी दे.

जानकारी देने के लिए निचे दिए गए नंबर्स पर संपर्क करे...”

बातमीच्या बरोबरीनेच एका दाढीवाल्या, गाल फुगऱ्या, फेल्ट हॅट घातलेल्या व्यक्तीचं रेखाचित्र प्रसारीत केलं जात होतं. मिळालेल्या माहीतीच्या आधारे, पोलिसांनी ‘त्या’ दारुड्याला मॅच करेल असे रेखाचित्र बनवले होते आणि डिसुझाच्या सांगण्यावरुनच ते नॅशनल चॅनल्सवर दाखवले जात होते.

दिपकने स्वतःला शेजारच्या आरश्यात निरखुन पाहीले. कुणीसुध्दा त्या रेखाचित्रातील व्यक्ती दिपकच आहे हे छातीठोक म्हणु शकला नसता.

दिपक स्वतःशीच हसला. घड्याळात फक्त साडेसातच वाजले होते. मायाने त्याला संध्याकाळी कुठलीही वेळ दिलेली नव्हती, त्यामुळे तो पुर्ण संध्याकाळ मोकळाच होता. शेवटी कंटाळून तो उठला. उगाचच ह्या बंद खोलीत लोळत पडण्यापेक्षा गावात एखादा फेरफटका मारण्याचा त्याने निश्चय केला. तसंही दमणला आल्यापासून एकटा असा तो कुठे बाहेर पडलाच नव्हता. एक तर सतत तो मायाच्या कामावर बिझी असायचा नाहीतर घरी येईपर्यंत इतका

उशीर झालेला असायचा की बाहेर तो पर्यंत सगळी सामसुम झालेली असायची. त्यामुळे बाहेर कधी फिरायला निघण्याचा त्याला योगच आला नव्हता.

त्याने टी.व्ही. बंद केला, कपडे केले आणि खोली बंद करून तो बाहेर पडला.

डिसुझाने फाईल पुर्ण वाचुन बंद केली. काही क्षण तो डोळे बंद करून खुर्चीत बसून राहीला. फाईलमध्ये लिहील्याप्रमाणे पहील्या खुनाची तर शिक्षा झाली होतीच, पण त्यानंतर तो तुरुंगातून पळाला हे खरं होतं.. त्यानंतर पुन्हा शेखावतकडून पकडला जाताना तो स्टेफनीचासुध्दा खुन करून पळाल्याचं निमुद केलं होतं. शिवाय स्टेफनीचा पती थॉमस ह्याच्या मृत्युबद्दल साशंकता निर्माण होत होती, कारण त्याचा इंन्शोरंन्स क्लेम केल्यानंतर त्या केसवर काम करणाऱ्या इंन्शोरन्स एजंटचा सुध्दा मृतदेह सापडला होता. आणि पर्यायाने दिपक आणि मोहीतेनेच तर थॉमसचा काटा काढला नसेल ना? खरी माहीती उघड होते आहे म्हणल्यावर त्यांनीच तर त्या इंन्शोरन्स एजंटला मारलं नसेल नं? आणि शेवटी स्टेफनीचा मृत्यु.

सगळाच प्रकार अशक्य, पण तरीही घडलेला होता. दिपकसारखा एखादा बाणेदार आर्मीतील उच्च पदावर असणारा अधिकारी असं करु शकतो ह्यावर डिसुझाचं मन विश्वास ठेवायला तयार होत नव्हतं. परंतु त्याच वेळेला घडलेल्या घटना तो डोळयाआड सुध्दा करु शकत नव्हता.

डिसुझाने फाईल कपाटात ठेवून  दिली आणि रिसेप्शनला फोन केला.

“डिसुझा बोलतोय.. मला कुणाचे निरोप? कुणाचे फोन कॉल्स?”
“तसं दिवसभर नाही सर, पण आत्ताच एक तासाभरापुर्वी इन्स्पेक्टर राणा तुम्हाला भेटायला आलेत..”

“ओके..आत्ता कुठे आहेत ते?”

“इथेच आहे, लॉबीमध्ये. त्यांना पाठवून देऊ रुम मध्ये?”

“नाही नको. मीच खाली येतोय म्हणून सांगा. दिवसभर खोलीत बसून कंटाळा आला.. बाहेरच जातो आता.” असं म्हणून डिसुझाने फोन ठेवून दिला.

तोंडावर पाणी मारून तो फ्रेश झाला आणि पटकन कपडे करून तो खोलीच्या बाहेर पडला.

लॉबीमध्ये राणा न्युजपेपर आणि पेन घेउन कश्यात तरी मग्न होते. डिसुझाला पहाताच ते उठून उभे राहीले.

“गुड इव्हनींग सर..”, राणा

“गुड इव्हनींग राणा,.. सॉरी तुम्हाला ताट्कळत रहावं लागलं.. काय कोडी सोडवत होतात की काय?”, पेन आणि पेपरकडे बघत डिसुझा हसत म्हणाला..

“नाही सर.. दिवसभर डोकं चालवून बधीर होऊन जातं. तेथील कोडी सोडवता सोडवता नाकी नऊ येतं आता कुठं परत कोडी सोडवायची. मी आपलां असाच टाईमपास करत बसलो होतो. बाकी काही नाही, घरात दोन लहान मुलं आहेत ना, त्यांच्याच सवयी लागल्यात…”, असं म्हणून डिसुझाने हातातला पेपर डिसुझापुढे धरला

राणाने पेपरमधील निधन झालेल्या जाहीरांतींमधील चेहरे, खेळांच्या बातम्या, जाहीरांतींमधील मॉडेल्स सगळयांना पार रंगवून  टाकले होते. कुणाला जटा काढून साधु, कुणाला पागोटं, दाढी मिश्या, कुंकु, बंदुका काढून डाकु तर कुणाला काय...

डिसुझा त्या कलाकृती बघून हसत राहीला आणि म्हणाला.. “काय राणा तुम्ही पण..” आणि हसता हसता अचानक थांबला व म्हणाला..

“बाहेर आपणं थोड्यावेळाने जाऊ, चला पट्कन माझ्या खोलीत..”

राणा काही बोलेपर्यंत डिसुझा दोन दोन पायऱ्या एका दमात चढत खोलीकडे गेला होता. राणासुध्दा त्याच्या मागोमाग पळत गेला.

खोलीत पोहोचेपर्यंत डिसुझाने दिपकची फाईल बाहेर काढली होती. पट्कन त्याने दिपकचा फोटो बाहेर काढला, आणि पेनने त्यावर गिरगोट्यामारायला सुरुवात केली.

दोन क्षणातच राणाच्याही सगळा प्रकार लक्षात आला.

काही वेळातच डिसुझाच्या चेहऱ्यावर हास्य पसरले. त्याने संशयीत दारुड्याचे ते रेखाचित्र आणि दिपकचा तो रंगवलेला.. अर्थात त्याच्या फोटोवर दाढीमिश्या आणि इतर कारागीरी करून बनवलेला चेहरा राणासमोर धरला आणि म्हणाला...

“चला राणा, लेफ्ट्नंट दिपक कुमार दमणच्या पाहुणचाराला उतरलेले दिसतात, आपल्याला त्यांचा शोध घ्यायला हवा...”

“सर, लगेच न्युज चॅनलवर दिपकचा सुध्दा फोटो झळकवायचा का?”, जिना उतरता उतरता राणा म्हणाला

“नो !! झुंडीने ओरडा-आरडी करुन, हाकाट्या पिटत कोंडीत धरत सिंहाला पकडण्यात काय मजा? त्याला पकडायचे तर तो बेसावध असताना त्याच्या समोर जाऊन. स्वतःच्या बेडरपणाची लाज वाटतानाचा त्याचा झालेला चेहरा प्राईसलेस असतो राणा.. चला”, असं म्हणून डिसुझा आणि राणा लॉजच्या बाहेर पडले.

“राणा एक काम करा, आपल्या कंप्युटर ग्राफिक्स डिझायनरला दीपकचा फोटो स्कॅन करून पाठवा. त्याला म्हणाव ह्याचा सर्व तऱ्हेने बदलाव करून त्याचे फोटो करून पाठवा. म्हणजे खूप दाढी वाढवलेला, खूप केस वाढवलेला, पूर्ण टक्कल केलेला, मिश्या आणि लांब केस असलेला…

दीपकने नक्कीच आपल्या चेहऱ्यात दिसण्यात बदल केले असतील त्यामुळे त्याला लगेच ओळखण कठीण जाईल. म्हणून शक्य तितके वेगळे लुक्सचे फोटो करून पाठवायला सांग. दीपक कुमार नक्कीच दमण मध्येच आहे आणि त्याने शेखावतला कट करून बोलावून घेतले ह्यामागे त्याची नक्कीच काहीतरी योजना असणार, नाहीतर तोच मुंबईला नसता का गेला. “, डिसुझा बोलत होता.

राणाने मान डोलावून सहमती दर्शवली

“येस सर, लगेच कामाला लागतो”, राणा

“मला काय वाटत्ते माहिते का? समहाऊ अस वाटते आहे कि दमण दीपकचा कम्फर्ट झोन आहे. तो इथे सुरक्षित आहे म्हनुनच इथून कुठ न जाता त्याने शेखावतला इकडे बोलावून घेतले. “

“पण का? इथे त्याला कुणाचा सपोर्ट आहे म्हणून त्याला इथे सेफ वाटतेय. मी दीपकची फाईल वाचलीय. माझ्या वाचण्यात तरी त्याचा आणि दमणचा आधी कधी संबंध आला नव्हता. त्याचा कोणी नातेवाईकही इथे असण्याचे कारण नाही. मग दमण का?”

दोघही काही वेळ विचारात गढून गेले

“मला वाटते राणा आपण त्याचा शोध लावला, तर कदाचित दीपक आपोआप आपल्या ताब्यात येईल”

“येस , आय ऐग्री”, राणा

“तुम्ही शेखावतच सामान तपासले होते? काही आढळले त्याच्या सामानात?”, डिसुझा

“नो सर, तसं विशेष काही नाही आढळले”, राणा

“त्याचं बुकिंग कस झालं होत?, चेक, क्रेडीट कार्ड, कॅश?”

“कॅश सर”

“म्हणजे, कुणी तरी लॉज मध्ये येउन पैसे देऊन बुकिंग केले असणार. चला लॉजच्या मैनेजर ला भेटू”

दोघही लगबगीने शेखावत उतरला होता त्या लॉजकडे निघाले.

“डी.सी.पी. शेखावतच्या बुकिंगची चौकशी करायची आहे”, राणा लॉजच्या मालकाला म्हणाला

“सर, कश्याला पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारताय? एकदा सांगितले ना, बुकिंग कॅश ने झालं होते. आणि तुम्ही पुन्हा पुन्हा लॉजवर येऊ नका, पोलिसांना इथे बघून कस्टमर येत नाही सर”, राणाला पुन्हा लॉजवर बघून मालक वैतागला होता

“बुकिंग करायला कोण आल होत? काही आठवते आहे का?”, राणाने त्याच्याकडे दुर्लक्ष करत विचारले

“नाही आठवत सर. शेकडो लोक जा ये करतात. प्रत्येकाची ओळख पटवायची म्हणल तर होईल सर?”, मालक

डीसुझाची नजर इतरत्र भिरभिरत होती. लॉजमधल्या एका गोष्टीने त्याचे लक्ष वेधून घेतले.

“ते चालू असते का?”, कोपऱ्यात लावलेल्या एका सी.सी.टीव्ही कॅमेराकडे बोट दाखवत डिसुझा म्हणाला

“हा सर, चालू आहे ते”, मालक

“चला, मला ज्या दिवशी बुकिंग झालं त्या दिवशीचे व्हीडीओ दाखवा”, मालकाच्या हो नाही ची वाट न बघता डिसुझा त्याला घेऊन त्याच्या ऑफिसमध्ये गेला.

काहीश्या नाराजीनेच मालकाने आपला कॅम्प्यूटर चालू केला.

रजिस्टर मध्ये शेखावतच्या बुकिंगची तारीख बघितली आणि त्या तारखेचा फोल्डर कम्प्युटरवर ओपन केला.

डिसुझाने दोघांना बाजूला केले आणि तो स्वतः व्हिडीओ चालू करून बसला.

मध्येच तो मालकाला विचारायचा, “निट बघा, ह्यापैकी कोणी होतं का?” आणि मालक नकारार्थी मान हलवायचा.

अख्खा दिवस संपत आला, साधारण संध्याकाळच्या ८.३०च वगैरे रेकोर्डिंग चालू होते तेंव्हा अचानक तो मालक म्हणाला, “एक मिनिट, एक मिनिट बहुतेक ह्या बाई आल्या होत्या बुकिंगसाठी”

डिसुझाने लगेच रेकोर्डिंग थांबवले.

“कोण? ह्या?”, संगणकाच्या पडद्याकडे बोट दाखवत डिसुझा म्हणाला

“हो, नक्कीच, ह्याच होत्या”, मालक

“कश्यावरून”, राणा

“अहो बघा न रेकोर्डिंग बघा, मला नक्की आठवतंय, त्यांनी सवयीप्रमाणे बुकिंगसाठी आधी क्रेडीट कार्ड पुढे केले होते. आणि मग एकदम त्यांना काय आठवल माहित नाही, त्यांनी कार्ड काढून कॅश दिली. “

डिसुझाने रेकोर्डिंग थोडे मागे घेतले आणि पुन्हा चालू केले. काळ्या बुरख्यामध्ये आलेल्या एका स्त्रीने जसं त्या मालकाने सांगितले होते तसेच आधी दिलेले क्रेडीट कार्ड काढून कॅश दिली होती.

“तुम्ही त्या कार्ड वरच नाव, नंबर काही पहिले”, डिसुझा

“नो सर. मी काही करायच्या आधीच त्यांनी लगेच कार्ड घेतले न”, मालक

“तुम्हाला नक्की खात्री आहे, हीच ती बाई होती?”, डिसुझा

“एक दम सौ टक्का”, मालक खात्रीने छातीवर हात आपटत म्हणाला

“ठीक आहे, जा तुम्ही. आम्ही थोड्यावेळ थांबतो इथेच”, डिसुझा

मालक निघून गेल्यावर डिसुझा आणि राणा दोघही जण ते रेकोर्डिंग काळजीपूर्वक बघत होते. त्या स्त्रीने क्रेडीट कार्ड बाहेर काढल्यावर डिसुझाने रेकोर्डिंग थांबवले आणि अधिक झूम करून तो कार्ड वरील काही डीटेल्स दिसतात का ते पाहू लागला. परंतु स्पष्ट अस काहीच दिसत नव्हते.

शेवटी डिसुझा तो नाद सोडून दिला आणि तो त्या स्त्रीकडे निट पाहू लागला.

ज्या वेळी ती स्त्री पर्स मधून पैसे काढत होती, त्या क्षणी त्याने अचानक रेकोर्डिंग पॉज केले.

“हे बघा राणा…”, डिसुझा

“काय बघू सर? ती स्त्री तर पूर्ण बुरख्यात आहे. काहीच तर दिसत नाहीये”, राणा चक्रावून  म्हणाला

“अहो, स्त्री नाही, हि पर्स बघा. लेपर्ड स्किनची पर्स आहे राणा. फार महाग असतात अश्या पर्स. सर्व सामान्य माणसांना नाही परवडू शकत”, डिसुझा

“हम्म. पण सर डुप्लीकेट असेल तर?”, राणाने शंका उपस्थीत केली

“असू शकते. पण एक नक्की ह्या स्त्रीचा आणि दीपकचा नक्की काहीतरी संबंध आहे. कदाचित शेखावतवर गोळी चालवणारी स्त्री पण हीच असावी”, डिसुझा

"मग आता आपण काय करायचं सर?", राणा
"सगळयात आधी तो दीपकचा फोटो आपल्या ग्राफिक्स डिझायनरकडे पाठवून द्या. आणि हे रेकोर्डिंगपण लॅब ला पाठवून द्या. बघा तो क्रेडीट कार्ड नंबर मिळतोय का. आणि .... ", डिसुझा

"आणि काय सर?", राणा

"सापाला बिळातून बाहेर काढायचे असेल तर त्याला हुसकाउनच काढावे लागते.",डिसुझा

"पण म्हणजे नक्की काय करायचं सर?", राणा

"पाण्यात खडा टाकायचा. माश्याला तो लागेल कि नाही.. माहित नाही? पण पाण्याच्या पृष्ठभागावर तरंग मात्र नक्की निर्माण होतील. मी सांगतो ती बातमी आज लगेच टीव्ही वर द्या, चला" अस म्हणून डिसुझा आणि राणा बाहेर पडले.

"डी. सी. पी. शेखावत ह्यांच्या खुनासबंधी आज अजून एक महत्वाचा पुरावा पोलिसांच्या हाती लागला. ज्या बारच्या पार्किंग मध्ये खून झाला होता, त्या पार्किंगमध्ये लावलेल्या सी.सी.टीव्ही कॅमेरामध्ये खुनाचे पूर्ण फुटेज मिळाले आहे. ह्या खुनामध्ये एक नाही तर दोन व्यक्तींचा हात असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

पोलिसांच्या हाती अधिक काही पक्के पुरावे मिळाले आहेत आणि लवकरच शेखवतचा खुनी गजाआड होईल असा दावा सी.आय.डी इन्स्पेक्टर डिसुझा ह्यांनी केला आहे "

संध्याकाळच्या न्यूज फ़्लैश मध्ये हि बातमी वारंवार दाखवली जात होती.

“हा काय प्रकार आहे? तिथे कुठे सि.सि.टीव्ही होता?”, माया दिपकला म्हणत होती

“हो.. माझ्या माहितीमध्ये तरी नव्हता. एक तर पार्किंग ओपनच होते आणि आजुबाजुला तरी मला कुठेही कॅमेरा दिसला नव्हता.”, दिपक

“पण मग ही बातमी? आणि इतक्या खात्रीने दोन लोकं होती सांगत आहेत ह्याचा अर्थ नक्कीच त्यांच्याकडे हा पुरावा असणार”, माया

“डोन्ट बी पॅरॅनॉईड माया, मे बी त्यांनी अंधारात बाण मारला असेल. बघु अजून दोन दिवस काय होतं ते.”, दिपक

“नो दिपक.. हे बघ, सि.आय.डी. पण केस मध्ये इन्व्हॉल्ड आहे. अश्या बेजबाबदार, बिनबुडाच्या बातम्या ते लोकं नाही देणार. वुई मस्ट ॲक्ट. आय कान्ट रिस्क इट”, माया

“मग आपण काय करावं असं तुला वाटतं आहे?”, दिपक

“आपण तो पुरावा नष्ट करायचा.”, माया

“पण कसा?”, दिपक

“हे बघ, मला माहीती आहे. हे असे गोळा केलेले पुरावे वगैरे कुठे ठेवतात ते. एम.जी.रोड वर पोलिसांचे हेड-क्वार्टर्स आहे. तिसऱ्या मजल्यावर एक रुम आहे जिथे ह्या असल्या गोष्टी ठेवल्या जातात.”, माया

“ओह.. आणि तुला वाटतं आपण तेथे जाऊन आपला पुरावा शोधायचा हजारो गोष्टींमधून आणि तो नष्ट करायचा.. बरोबर?”, दिपक

“हो”, माया

“आणि तुला वाटतं पोलिस आपल्याला सन्मानाने आपल्याला आत जाऊ देतील, आपल्याला पुरावा शोधायला मदत करतील आणि जमलच तर नष्ट ही करु देतील.. असंच ना?”, दिपक कुचेष्टेने म्हणाला

“हे बघ, रिस्क आहे, पण आपल्याला करायलाच हवं. नाहीतर नाहक आपण त्यात अडकु”, माया

“अरे?? पण तुला काय खायची गोष्ट वाटली का? इट्स पोलिस हेडक्वॉर्टर्स बेबी..”, दिपक

“तिथल्या सेक्युरीटी एजन्सीचे हेड माझ्या चांगल्या ओळखीचे आहेत. १०-१५ मिनीटांसाठी तिथले सेक्युरीटी एजन्ट्स इकडे तिकडे होऊ शकतात ना? हे बघ दिपक, पैश्याने सगळया गोष्टी साध्य होतात. एकदा का ती टेप फॉरेन्सीक लॅबला गेली आणि त्यातील फोटो प्रिन्ट्स करून जागो जागी लागले की मग आपण काही करु शकणार नाही..”, माया

“मुर्खपणा आहे हा माया. एक तर मला वाटतं की त्या टेप मधून काही साध्य होणार नाही. पोलिसांचा हा नक्कीच काहीतरी डाव आहे.. किंवा अगदीच टेप असली तरी ते आपल्या पर्यंत लगेच दोन दिवसांत पोहोचु शकणार नाहीत. मला वाटतं आपण घाई नको करायला. दोन दिवस वाट बघु काय होतं आहे आणि त्याप्रमाणे ठरवु..”, दिपक

“तुला जमणार नसेल तर तसं सांग, मी जाते.. मला माझ्या कॉन्टॅक्ट्सवर पुर्ण विश्वास आहे. आतमध्ये जायला आपल्याला कुठलीही अडचण होणार नाही…”, माया

माया वैतागून आपल्या मोबाईलमध्ये नंबर डायल करायला लागते…

“ऑलराईट.. इफ़ यु से सो.. पण लक्षात ठेव धिस इज द लास्ट टाईम. पुढच्या वेळेपासून सगळं प्लॅनींग माझ्या म्हणण्यानुसार होईल. तू ऑलरेडी खुप मेस करून ठेवली आहेस..”, दिपक

माया धावत येऊन दिपकला बिलगली आणि तिने त्याचे एक दीर्घ चुंबन घेतले.

“आय नो यु विल डु ईट. डोन्ट वरी..”, असं म्हणून तिने सेक्युरीटी एजन्सीच्या हेडला फोन लावला

अर्ध्या तासानंतर दिपक रेडी होऊन आला.

“माझं बोलणं झालं आहे दिपक.. खुप पैसे द्यावे लागले, बट ॲज आय सेड, पैश्याने काहीही विकत घेता येतं. ११.३०-११.३५ ह्या वेळात मेन गेट वर कोणी नसेल. तुला तिसऱ्या मजल्यावर जायला दहा मिनीटं आहेत. ११.५० – ११.५५, वरचा मजला रिकामा असेल. तू आत घुसून ती खोली शोध. तेथे काय सेक्युरीटी आहे.. आय हॅव नो आयडीया. पण पोलिस नक्कीच कोणी नसतील. कुलुप कसं आहे, काय आहे ते बघून तू डिसिजन घे आणि काम तमाम करं. बाहेर येताना बॅटरीचा एक झोत व्हरांड्यात टाक. त्यानंतर पुढची पाच मिनीटं आणि १५ मिनीटांनंतर मुख्य गेट रिकामं असेल.”

“आय एम नॉट हॅप्पी अबाऊट धिस माया. हा सगळा तुझा मुर्खपणा आहे. त्या दिवशी तू तेथे आली नसतीस तर…”, दिपक

“दिपक, वेळ कमी आहे.. ते तेच बोलुन काही फ़ायदा नाही.. जा पट्कन…”, माया

दिपकने एक दीर्घ कटाक्ष मायाकडे टाकला आणि तेथून तो बाहेर पडला.

११.१५ ला दिपक पोलिस हेडक्कार्टसपाशी पोहोचला. आजुबाजुला बऱ्यापैकी सामसुम होती. इमारत बऱ्यापैकी अंधारातच होती. कुठल्या मजल्यावरही फ़ारसे दिवे चालु नव्हते. मुख्य गेटपाशी दोन रायफल घेतलेले सेक्युरीटी गार्डस फेऱ्या मारत होते.

दिपक तेथेच अंधारात दबा धरून बसला.

बरोब्बर ११.३०ला दोन मिनीटं कमी असताना ते दोन गार्ड्स एकमेकांशी काहीतरी बोलले आणि गप्पा मारत कुठेतरी निघून गेले.

दिपकने एक मिनीटं तेथेच थांबून अंदाज घेतला. वेळ कमी होता. ठरल्याप्रमाणे बरोब्बर ११.३० ला ते दोन गार्ड्स तेथून निघून गेले होते.. आणि पाचच मिनीटांमध्ये ते परतण्याची शक्यता होती.

दिपक अंधारातून भिंतीला चिकटत चिकटत मुख्य गेटमधून आत शिरला.

पहीला अडथळा तरी अगदी सहजच पार पडला होता...

दिपकची छाती धडधडत होती. त्याच्या सिक्स्थ सेन्स, पुढे धोका आहे.. असं सतत बजावत होता. परंतु मायाने सांगीतल्याप्रमाणे खरोखरचं ११.३० ला मुख्य गेट रिकामे होते. आणि तिच्या सांगण्याप्रमाणेच पुढेही काही अडथळा न येण्याची खात्री बाळगण्यातही काही गैर नव्हते.

शिवाय खरंच तसा काही पुरावा असेलच तर तो नष्ट करणं गरजेचे होते. नाही तर, इतक्या दिवस लपून राहील्याचे कष्ट वाया गेले असते.

दिपक दबक्या पावलांनी इमारतीमध्ये शिरला. वरच्या मजल्यांवरून काही गार्डसचा फिरण्याचा आवाज येत होता. दिपक कसलाही आवाज न करता दुसऱ्या मजल्यावर जाऊन थांबला.

त्याने घड्याळात नजर टाकली. ११.५० झाले आणि वरची गार्डसची हालचाल पण शांत झाली. दिपक हळु हळु पायऱ्या चढत तिसऱ्या मजल्यावर आला. त्याने अंधारलेल्या व्हरांड्यात चाहुल घ्यायचा प्रयत्न केला. परंतु सर्वत्र शांतताच होती.

घड्याळाचे काटे वेगाने फिरत होते. दिपक झपझप पावलं टाकत रेकॉर्ड्सरुमपाशी आला. हीच ती खोली होती ज्यामध्ये गोळा केलेले पुरावे ठेवले जात होते. आणि आश्चर्य म्हणजे खोलीला कोणतेही कुलुप नव्हते.

दिपकला हे अनपेक्षीत होते. परंतु कदाचीत सेक्युरीटी गार्डसचा पहारा असताना, तसंही कड्या कुलुपं लावायची गरज नसावी असाही एक विचार त्याच्या डोक्यात येऊन गेला.

खोलीचं दार उघडून तो आत आला. सर्वत्र विचीत्र शांतता होती.

दिपकने खोलीचं दार लोटून  घेतले आणि तो अंधारात चाचपडत पुढे सरकु लागला.

इतक्यात खोलीतले सगळे दिवे चालु झाले. दिव्याच्या प्रखंर प्रकाश्याने अंधारातून आलेल्या दिपकचे डोळे दिपले गेले. क्षणभर त्याला काही होतं आहे ते कळेना.

मग त्याने सावकाश डोळे उघडले.....

खोलीमध्ये सर्वत्र हातामध्ये रिव्हॉल्व्हर्स धरून पोलिस उभे होते आणि समोरच्या टेबलावर पाय टाकून दिपककडे हसत हसत बघत एक चेहऱ्यावर खवले खवले असलेला इसम बसला होता.

“अर्रे व्वा! खुद्द दिपक कुमार हजर झालेत…”, डिसुझा हसत हसत म्हणाला.. “हे तर म्हणजे असं झालं अंधा मांगे एक, भगवान दे दो!, काय राणा??”

“येस्स सर.. खरं आहे…”, राणा हसण्यात सामील झाला

“बसा.. दिपक कुमार.. बसा.. खुप पळापळ झाली ना.. दमला असाल बसा..”, समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवत डिसुझा म्हणाला..

दिपककडे दुसरा कुठलाच मार्ग नव्हता. तो शांतपणे खुर्चीत जाऊन बसला.

“राणा, बेड्या घाला त्यांना आधी.. काय आहे ना, फौजी तालीम आहे.. आपल्याला उगाच कॅज्युलिटीज नकोत..”, डिसुझा

राणाने दिपकचे दोन्ही हात खुर्चीच्या मागे ओढले आणि त्याला बेड्या ठोकल्या.

“राणा.. तुझ्या माणसांना बाहेर थांबायला सांग.. आपल्याला जरा महत्वाचं बोलायचं आहे..”, डिसुझा

राणाने बाकीच्या पोलिसांना बाहेर थांबायची खुण केली तसे सर्वजण बाहेर निघून गेले. खोलीत फक्त दिपक, राणा आणि डिसुझा..

“आम्हाला वाटलं नव्हतं सरळं तूच आमच्या हाती लागशील. वाटलं होतं कोणीतरी सोम्या गोम्या येईल.. त्याला तरी ताब्यात घेऊन चौकशी करावी. पण हे तर डायरेक्ट मोठ्ठा मासाच गळाला लागला..”, डिसुझा

दिपक काहीच न बोलता शांत बसून होता..

“ओह.. बाय द वे, मी माझी ओळखच करून नाही दिली.. मी सि.आय.डी. इन्स्पेक्टर डिसुझा, मुंबई ब्रॅन्च.. आणि हे इन्स्पेक्टर राणा, दमण स्टेशन..”, डिसुझाने शेक-हॅन्ड्साठी हात पुढे केला आणि मग दिपकच्या हातातल्या बेड्या बघून हसत हसत परत खुर्चीत बसला.

“सो? दिपक कुमार? पुरावा नष्ट करायला आला होता? हम्म?..”.. डिसुझा अजूनही हसतच होता..

दिपकच्या कपाळावरच्या शिरा संतापाने ताणल्या गेल्या होत्या..

“आम्हाला तर वाटलं होतं तुम्हाला शोधायला फार शोधा शोध करावी लागेल. तुमच्यासाठी कित्ती कष्ट घेतले आम्ही.. राणा दाखवा जरा ते आपलं एन्व्हलोप..”, डिसुझा

राणाने ब्राऊनपेपरच्या एन्व्हलोपमधले दिपक कुमारचे विवीध रुपातील फोटो काढून टेबलावर पसरले.

“बघा.. तुम्ही कुठल्या रुपात असाल.. माहीत नव्हतं आम्हाला.. म्हणून हा प्रपंच..”, डिसुझा फोटोंकडे हात दाखवत म्हणाला..

“बरं बोला.. गुन्हा इथेच कबुल करणार? का राण्यांच्या स्टेशनात जायचं?”, डिसुझा

“मी तो पुरावा आणि बाकीची माहीती विकत घ्यायला तयार आहे..”, बराच वेळ शांततेत गेल्यावर दिपक म्हणाला

“काय?” राणा जवळ जवळ ओरडलाच, पण दिपकने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं.

“प्रत्येक गोष्टीला किंमत असते..नाही का सि.आय.डी. इन्स्पेक्टर डिसुझा.. तुमची किंमत बोला…”, दिपक शांतपणे म्हणाला

“ए.. काय बोलतोय तू कळतं का तुला??”, राणा

“किती देऊ शकशील..?”, राणाला शांत करत डीसुझा म्हणाला..

“पण सर..”, राणा

“बोल दिपक, किती देऊ शकशील? आपण सिग्नल तोडला म्हणून चिरीमीरीची भाषा करत नाहीये.. कळतय ना तुला? फार मोठ्ठी किंमत लागेल ह्याला..”, डिसुझा

“तुम्ही फक्त किंमत बोला.. बाकीचं मी बघून घेइन..”, दिपक

“राणे.. बेड्या काढा त्याच्या..”, डिसुझा आरामशीर खुर्चीत रेलुन बसत म्हणाला..

“सर.. तुम्ही विकले जाताय!!”, राणा

“राणा.. अहो काय हरकत आहे त्यात? कित्ती दिवस तो फालतु पगार सांभाळत बसायचा. संधी मिळत असेल तर मस्त रिटायर होऊन आयुष्य जगण्यात काय वाईट आहे.. तुम्ही काळजी करु नका, तुमचा कट मिळेल तुम्हाला..”, डिसुझा

नाईलाजाने इ.राणाने दिपकच्या हातकड्या काढल्या.

“पन्नास लाख..”,डिसुझा म्हणाला. “मला बाहेर थांबलेल्या लोकांची तोंड बंद करावी लागतील.. शिवाय ही केस दाबून टाकायची झाली तर.. माझ्यावर सुध्दा काही लोकं आहेतच की.. सो..”

“ओके.. मला एक दिवस द्या.. मी पैश्याची व्यवस्था करतो…”, डिसुझाचं वाक्य मध्येच तोडत दिपक म्हणाला

“पळून जायचा प्रयत्न केलास तर??”, डिसुझा

“जर सरळ मार्गी तोडगा निघत असेल, तर कश्याला पळून जाऊन पुन्हा पोलिसांचा ससेमिरा मागे लावून  घेऊ?”, दिपक

“ठिक आहे, उद्या संध्याकाळी हार्बरलाईनवर तो बार आहे एक..राणा काय नाव त्याचं?”, डिसुझा

“सर.. मेनका बार..”, राणा

“हम्म.. उद्या संध्याकाळी ८.३० ला मेनका बार, पैश्याची व्यवस्था करुनच ये..”, डिसुझा

“पैसे तयार रहातील..”, दिपक

“गुड.. राणा, तुमच्च्या माणसांना सांगा ह्याला जाऊ द्या..”, डिसुझा राणाला बघून म्हणाला

दिपकने आणि डिसुझाने काही क्षण एकमेकांकडे पाहीले आणि दिपक तेथून निघून गेला

“सर..काही कळलं नाही मला.. ह्याला सोडून का दिलंत?” राणा

“राणा.. मी म्हणालो ना.. ह्याला कुणाचा तरी नक्कीच पाठींबा आहे. मला वाटतं हा छोटा मासा आहे, आपल्याला मोठ्ठा मासा पकडायचा आहे..”, डिसुझा

“तुम्ही बघीतलंत, पन्नास लाखासाठी किती सहज तयार झाला. ह्याच्याकडे कुठून असणारेत इतके पैसे?”, डिसुझा

“हो बरोबर सर..”, राणा

“राणा एक काम करा.. ह्याच्यामागे एक माणूस चौविस तास लावून  द्या. हा कुठे जातो? कुणाला भेटतो? काय करतो.. मला पुर्ण रिपोर्ट हवाय..”, डिसुझा

“येस्स सर..”, असं म्हणून राणा लगेच बाहेर पडला.

---

दिपक लगबगीने तेथून बाहेर पडला. दिपक पण इतका दुधखुळा नव्हता. डिसुझाचा प्लॅन त्याच्या तेंव्हाच लक्षात आला होता. परंतु तेथून बाहेर पडणं आवश्यक होतं आणि म्हणून खोटं का होईना त्याने नाटकं केलं होतं आणि तो बाहेर पडला होता.

“काहीही झालं तरी आत्ता मायाला कॉन्टॅक्ट करायचा नाही..”, त्याने मनोमन ठरवले होते. एकदा का डिसुझाला दिपकबरोबर कोण आहे हे कळलं असतं की त्याने क्षणाचाही विलंब न करता दोघांनाही अटक केली असती.

दिपक सहजच म्हणून बुटाची नाडी बांधायला खाली वाकला आणि त्याने पट्कन मागे बघून घेतलं.

दूरवरून एक काळी आकृती दिपकच्या मागे मागे येत होती. दिपक थांबलेला बघताच ती आकृती पट्कन एका झाडामागे लपली.

दिपक स्वतःशीच हसला आणि पुन्हा झपझप चालु लागला.

काही अंतर चालुन गेल्यावर कॉर्नरला एक बस-स्टॉप होता तेथे तो जाऊन थांबला. त्याचा पाठलाग करणारी आकृती पण काही अंतर चालुन थांबली. बहुदा दिपकशेजारी बसस्टॉपवर थांबावे का दुरुनच त्याचे निरीक्षण करावे अश्या द्विधा मनस्थीतीमधे ती व्यक्ती होती.

दिपकला बसस्टॉपला थांबलेलं पहाताच त्या व्यक्तीने एक वॉकीटॉकी सदृश्य वस्तु काढून बोलत असल्याचे दिपकने हळुच पाहीले. बहुदा पुढील इन्स्ट्रक्शन्सची ती व्यक्ती वाट पहात असावी.

थोड्यावेळाने दुरून एक मोटर कार येऊन त्या व्यक्तीपाशी येऊन थांबली आणि ती व्यक्ती त्या कारमध्ये जाऊन बसली. परंतु कार मात्र दिवे बंद करून जागेवरच उभी होती.

आपला पाठलाग केला जात आहे ह्यावर एव्हाना दिपकने शिक्कामोर्तब केले होते. परंतु अश्या लोकांना चकवणे दिपकच्या डाव्या हाताचा मळ होता.

तो शांतपणे बसस्टॉपवर बसची वाट बघत उभा राहीला. बराच वेळ वाट पाहील्यावर एक बस धुळ उडवत येऊन स्टॉपला थांबली तसा दिपक बसमध्ये चढला. त्याबरोबर लांब थांबलेली ती मोटरकार सुध्दा सुरु झाली आणि बसच्या मागोमाग येऊ लागली.

दिपकला आता थोडा विचार करायला वेळ मिळाला होता. कसंही करून मायाशी कॉन्टॅक्ट होणं महत्वाचं होतं. पण कसा? त्याने बरोबर मोबाईलवगैरे आणला नव्हता. केवळ मोबाईलच्या लोकेशन्सवरून कित्येक गुन्हे पकडले गेल्याचं त्याला माहीत होतं आणि म्हणूनच त्याने असले कोणतेही गॅजेट बरोबर आणले नव्हते.

गावाबाहेरच्या इंडस्ट्रीयल इस्टेटला जाणारी बस एव्हाना चांदनी चौक उतरून घाट चढत होती. दिपकने हळुच मागे बघीतले. ती मोटरकार अजूनही काही अंतर राखुन बसच्या मागोमाग येत होती.

दिपकने बाहेर पाहीले. वस्ती बऱ्यापैकी मागे पडली होती आणि बाहेरचा भागही दिव्यांच्या अभावी बऱ्यापैकी अंधारातच बुडालेला होता.

तो सावकाश उठला आणि बसच्या दरवाज्यापाशी जाऊन उभा राहीला.

एका वळणदार चढावर बसचा वेग किंचीत कमी झाल्याचं पाहून त्याने चित्याच्या वेगाने उडी मारली आणि क्षणाचाही विलंब न करता तो जेथे पडला तेथेच जमीनीला लागून झोपून राहीला.

हे सर्व इतक्या विलक्षण वेगाने घडले की त्या मोटरकारमधील इसमांना सोडा, बसमधील अर्धवट पेंगलेल्या प्रवाश्यांनासुध्दा कळले नाही.

दिपक निपचीत जमीनीला लगत पडून राहीला. त्याने आपला चेहरा शक्य तितका जमिनीत खुपसला होता.

बस वळण पार करून धुरळीचा एक मोठ्ठा लोट निर्माण करत पुढे निघून गेली. पाठोपाठ ती मोटरकारही काही क्षणात दिपकच्या इथून पुढे निघून गेली. दिपकने कार पुढे गेल्यावर हळुच पाहीले तेंव्हा शेजारी बसलेली व्यक्ती सतत वॉकी-टॉकीवर बोलण्यात मग्न होती.

गाड्यांचे आवाज नाहीसे होईपर्यंत दिपक पडून राहीला आणि मग पट्कन उठून  तो शेजारच्या झाडीत शिरला.

“अहो काय बोलताय तुम्ही कळतंय का तुम्हाला?”, डिसुझा जवळ जवळ ओरडतचं म्हणाला.. “तुम्हाला कश्याला पाठवले होते मागावर? रिकामी बस बघायला? दिपक जर मध्ये कुठे उतरला नाही, जर बस कुठे थांबली नाही, तर मग शेवटच्या स्टॉपवर दिपक नव्हताच ह्याचा अर्थ काय???”

“सर.. जर दिपक आपल्या हातातून निसटला कळलं तर..आपल्याला हे प्रकरण फ़ार महागात पडु शकतं.. “, राणा डिसुझाला म्हणाला

“हम्म. पण मला वाटतं लगेच पॅरॅनॉईड होण्यात अर्थ नाही. कदाचीत तो उद्या पैसे घेउन येईल सुध्दा.. आपण थोडी वाट बघुयात. पण त्याच वेळी सगळी लोकं दिपकच्या मागावर लावा. त्याला पकडु नका.. फक्त लक्ष ठेवा त्याच्यावर.. आणि दुसरी गोष्ट…सगळया बॅंकांमध्ये फोन करून कळवा. पन्नास लाखाची रोकंड कुठुनही, कोणीही विड्रॉ करत असेल तर पोलिसांना लगेच खबर करायची तंबी देउन ठेवा..”, डिसुझा एकावर एक सुचना सोडत होता इतक्यात एक कॉन्स्टेबल मुंबई कमीशनरचा फोन असल्याचा निरोप घेऊन आला.

“येस्स सर… हो सर.. ओके सर..बघतो लगेच..”, असं म्हणून डिसुझा राणाकडे वळले, “राणा, लॅपटॉप आणा तुमचा, कमीशनर साहेबांनी शेखावतची फाईल पाठवली आहे..”

राणा लगेच जाऊन लॅपटॉप घेउन आले. डिसुझाने आपले इ-मेल अकाऊंट उघडले आणि शेखावतची फ़ाईल डाऊनलोड करून तो वाचु लागला.

माया आपल्या लिव्हींग रुममध्ये अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होती. दिपकला जाऊन पाच तासांहुनही अधिक काळ लोटला होता. बाहेर सकाळ व्हायला लागली होती, परंतु त्याचा अजूनही काहीच पत्ता नव्हता.

तासभर होऊन गेला असेल आणि अचानक मागचे दार उघडून दिपक आतमध्ये आला. तो पुर्ण धुळीने माखुन गेला होता. चेहऱ्यावर आणि हातावर बारीक-सारीक खरचटल्याच्या खुणा होत्या.

“दिपक??”, त्याला पहाताच आनंदाने माया म्हणाली… “कुठे होतास तु?? काय झालं नक्की? पुरावा नष्ट झाला का?”

“एक मिनीटं.. मला जरा बसु देत… “, दिपक खुर्चीत रेलत म्हणाला..शेजारचा पाण्याचा जग त्याने तोंडाला लावला आणि मग काही वेळ तो डोळे मिटून बसून राहीला..

“काय झालं आहे, सांगशील का? पुराव्याचं काय झालं?”, माया

“ईट वॉज ट्रॅप माया…”, दिपक बोलु लागला..”मी म्हणालो होतो ना, मला नाही वाटतं पोलिसांकडे काही पुरावा आहे.. तो एक सापळा होता. त्यांना खात्री होती की पुरावा नष्ट करायला नक्की कोणी तरी येईल आणि त्यांच्या तावडीत सापडेल..”

“म्हणजे.. तेथे पोलिस होते?”, माया

“हो..मी त्या रेकॉर्डरुममध्ये शिरलो आणि पोलिसांच्या हातात सापडलो..”, दिपक

“मग? सुटलास कसा काय?”, माया

मग दिपकने एक एक करत सर्व हकीकत मायाला सांगीतली. माया डोळे विस्फारून त्याचं बोलणं ऐकत होती.

“पोलिसांना काही संशय की तुझ्याबरोबर मी सुध्दा इन्व्हॉलव्ह आहे?”, दिपकचं बोलण झाल्यावर मायाने विचारले

“मला नाही वाटत की त्यांना तुझ्याबद्दल काही संशय आहे, पण माझ्याबरोबर अजून कोणीतरी आहे ह्याची त्यांना खात्री आहे..”, दिपक

“हम्म, पण तुला शंभर टक्के खात्री आहे का की त्यांच्याकडे पुरावा नाही”, माया

“हो.. कारण त्यांच्याकडे पुरावा असता तर त्यांनी सापळाच रचला नसता. आज नाही तर उद्या ते आपल्या पर्यंत येऊन पोहोचलेच असते. इनफ़ॅक्ट मला पहाताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला होता. सो येस.. मला खात्री आहे की त्यांच्याकडे पुरावा नाही..”

“हम्म.. मग ठिक आहे..”, थोडं रिलॅक्स होत माया म्हणाली.

“पण मग आता काय करायचं”, दिपक

“म्ह्णजे??”, माया

“म्हणजे.. पोलिसांना हे तर कळलं आहे की मी जिवंत आहे आणि इथे दमणमध्ये आहे. पोलिस पुर्ण तपास चालु करतील आणि आज नाही तर उद्या ते माझ्यापर्यंत येऊन पोहोचतीलच..”, दिपक.. “आज पर्यंत मी पिक्चरमध्येच नव्हतो त्यामुळे माझी केस जवळ जवळ बंदच झाली होती. पुन्हा पोलिस.. पुन्हा माफिया माझ्या मागे कुत्र्यासारखे लागतील..”

“हम्म.. आणि एकदा का तू पोलिसांना सापडलास की त्यांना माझ्यापर्यंत पोह्चायला असा कितीसा वेळ लागणार आहे..”, माया

“पण मग आता आपण करायचं काय?”, दिपक

“आपण नाही.. तु!!”, माया

“मी? मी काय करायचं?”, दिपक

“तु….. तू मरायचंस दिपक.. तुला मरायलचा हवं.. नाही तर तुझ्या नादाने मी सुध्दा पकडले जाईन”, माया

“काय मुर्खासारखं बोलते आहेस तू माया, कळतयं का तुला?”, दिपक

“मला व्यवस्थीत कळतंय दिपक.. तुला मरायलाच हवं..”, हातात व्हिस्कीचा एक ग्लास घेत माया म्हणाली.

“मला वाटतं तू विसरती आहेस माया, त्या दिवसासारखं आज तुझ्या हातात पिस्तोल नाही. पण माझा नाईफ़ माझ्यापासून फक्त काही सेकंद दूर आहे..”, हसत दिपक म्हणाला..

“तुला मारायला मला रिव्हॉल्व्हर घ्यायची गरजच काय दिपक?”, माया सुध्दा हसत म्हणाली..

“म्हणजे..??”, गोंधळून दिपक म्हणाला…

मायाने दिपकच्या मागे बोट दाखवलं आणि म्हणाली, “मागे बघ दिपक…”

दिपक सावकाश मागे वळला.

त्याच्यापासून काही फुट अंतरावर दिपकवर पिस्तोल रोखुन **युसुफ** उभा होता.......

"हम्म सांगा.. परत कधी वेळ मिळेल सांगता येत नाही", डिसुझा हसत हसत म्हणाला

राणा रेकॉर्ड्स तपासायला लगबगीने निघून गेला

"युसुफ???", युसुफला मायाच्या घरात बघताच दिपक स्तंभीत झाला होता. त्याचं इथे असणं दिपकच्या दृष्टीने अगदीच अनपेक्षीत होते.

"हॅल्लो फ़्रेंड", युसुफ छमी हसत म्हणाला

"तु?? तू इथे कसा?", दिपक अजूनही आश्चर्याच्या धक्यातून सावरला नव्हता.

दिपकच्या ह्या प्रश्नाने माया आणि युसुफ दोघंही हसायला लागले.

"मित्रा, मी इथेच आहे.. पहील्यापासुनच.. तुला भेटायच्याही आधीपासुन...", युसुफ

“म्हणजे? मी समजलो नाही”, दिपक

“बसं बसं.. फार मोठ्ठी कहाणी आहे ती”, माया त्याला सोफ्याकडे बोट दाखवत म्हणाली.

“युसुफ.. त्याचा तो बुटांमध्ये लपवलेला सुरा आधी काढून घे बरं..”, माया

दिपकवर रोखलेली बंदुक तशीच धरून ठेवत युसुफ पुढे आला आणि त्याने दिपकच्या सॉक्समधला तो सुरा काढून घेतला. लगोलग त्याचा शर्ट आणि पॅन्ट एकदा अजून काही हत्यार लपवलेलं नाही ना पहाण्यासाठी तपासून घेतली. आणि मग त्याने 'ऑल ओके' असल्याची मायाला खुण केली.

“युसुफ माफीयाचा माणूस आहे”, माया म्हणाली

“व्हॉट??”, दिपक

“हम्म.. माफीयाचाच एक सदस्य.. पण माझ्यासाठी काम करणारा”, माया सांगु लागली.. “तुला काय वाटतं तुझी आणि युसुफची भेट.. त्या जेलमध्ये.. योगायोगाने झाली?.

नाही दिपक.. मला त्यावेळी एका मोहऱ्याची गरज होती.. जो माझं काम करु शकेल असा. युसुफ नेमका त्यावेळी तुरुंगात होता. आणि तसंही युसुफला मला ह्या कामात अडकवायचे नव्हते. मला कोणीतरी नवीन माणूस हवा होता. युसुफ त्याच तुरुंगात जेथे तू होतास. तुझी दर्दभरी कहाणी मी टि.व्ही.वर ऐकली होती. शेखावतकडून तुझा होणारा छळ मला ठाऊक होता. मला असं वाटलं.. कदाचीत मला हवा असलेला मोहरा तू बनु शकशील. मी त्या दृष्टीने युसुफला तुझ्याशी संपर्क वाढवायला सांगीतले. आणि मग तुझी आणि युसुफची भेट झाली.

मग आम्ही तुला घेऊन तुरुंगातून पळून जायचा प्लॅन करायचं ठरवलं. माफीया भाईचा छोटा भाऊ, इस्माईलसुध्दा त्याच तुरुंगात होता. मग त्याला सुध्दा प्लॅनमध्ये सामील करून घेतलं..

परंतु त्या जेलमधून सुटणं शक्य नव्हतं. तू ते शक्य करून दाखवलंस.. दॅट वॉज अ गुड प्लॅन, एक्झीक्युटेड सस्केसफुली...", माया टाळया वाजवत म्हणाली.

"तुरुंगातून पळतानाच इस्माईलला टपकवायचं आम्ही ठरवलं..", माया पुढे म्हणाली..

"पण का? तो तर माफीयाचाच माणूस होता ना? भाईचा छोटा भाई. मान्य तुझी आणि त्याची दुष्मनी आहे.. तुझ्या मुलीच्या जिवाला धोका..."

दिपकच वाक्य पुर्ण व्हायच्या आधीच माया आणि युसुफ खदाखदा हसायला लागले...

"मुलगी?? माझी???", माया हसत हसत म्हणाली आणि मग एकदम गंभीर झाली.. "मला मुलगी कशी असु शकते दिपक.. त्या शेखावतने माझ्या नवऱ्याला अपंग करून टाकलं होतं. त्याच्या एका फडतुस गोळीने माझ्या नवऱ्याच्या मणक्याची वाट लावून टाकली.. कमरेपासून खालपर्यंत तो पुर्ण क्रिपल्ड होऊन गेला दिपक..." माया

"म्हणजे.. तू मला जे तुझ्या मुलीबद्दल सांगीतलेस ते..", दिपक

"साफ खोटं होतं.. साफ खोटं...", मायाने हातातली व्हिस्की बॉटम्स अप केली. तो जळजळीत घोट घश्याखाली उतरताना तिचा चेहरा वाकडा तिकडा झाला

जी आपल्या मनात भरु लागली होती.. जिच्याशी आपण शरीरसंबंध ठेवले.. हीच का ती माया? असा काहीसा प्रश्न दिपकच्या मनात येऊन गेला.

दमणच्या पोर्टवर आमचं पुर्ण राज्य होतं. माफीयाने आम्हाला दडपायचा अनेकदा प्रयत्न केला. इथून बिनबोभाट होणारं स्मगलिंग आणि त्याद्वारे मिळणारा नफा त्यांना आकर्षीत करत होता. परंतु आम्ही त्यांना दाद देत नव्हतो.

एके दिवशी त्यांनी स्मगलिंगद्वारे होणाऱ्या एका शिपमेंटची पोलिसांना टिप दिली. आणि पोलिसांने ऐनवेळी धाड टाकली.

माझ्या नवऱ्याने लाच देण्याचे. सरेंडर होणाचे सगळे प्रयत्न करून पाहीले. परंतु माफियाकडून मिळालेल्या ‘टिप’ नुसार सर्व मामु लोकं मारायलाच.. एन्काऊंटर करायलाच आले होते.

माझा नवरा तेथून पळून जात असताना शेखावतने गोळी झाडली ती त्याच्या पाठीत घुसली आणि आमचे वर्चस्व संपल्यातच जमा झाले. गेली कित्येक वर्ष माझा नवरा बेडवरच खिळून आहे…आजही तो वरच्या खोलीत निपचीत पडला असेल…”, माया

“यु मीन.. तुझा नवरा.. इथे.. ह्या बंगल्यातच आहे?”, दिपक

“हम्म..”, व्हिस्कीचा दुसरा पेग भरत माया म्हणाली

“आणि तरीही.. इथे.. तू माझ्याशी…..”, दिपक…

“काय फरक पडतो दिपक.. इट वॉज ऑल पार्ट ऑफ़ द गेम..”, माया पुढे बोलत होती.

“सो.. इट वॉज नॉट लव्ह???”, दिपक.

“लव्ह… ओह माय गॉड.. कमॉन दिपक.. ग्रो अप..”, हसत हसत माया म्हणाली… “एनीवेज.. तर मला त्या शेखावतचा बदला घ्यायचा होताच आणि माफियाचा सुध्दा. मला

वाटलं, ती वेळ योग्य होती. तू सुध्दा तुरुंगातून पळून जायला, सिस्टीम विरुध्द बंड करायला उत्सुक होतास. आमच्या दृष्टीने तू योग्य होताच. तुझ्यात ते पोटॅन्शिअल होते जे आम्हाला हवं होतं.... त्यानुसार आम्ही प्लॅन तयार केला.

तेथून बाहेर पडताना झालेल्या गडबडीचा फ़ायदा घेऊन युसुफने इस्माईलचा काटा काढला. आणि ते योग्यही होतं. त्या गडबडीत इस्माईल नक्की कसा मेला, त्याला कोणी मारला कुणालाच कळले नसते. अर्थात त्याचा आळ तुझ्यावर यावा असं आम्हाला वाटतं नव्हतं.. पण जे झालं ते अधिक चांगलं झालं..", माया

"इस्माईलला युसुफने मारलं? शक्यच नाही. मी बघीतलं, एका पोलिसाच्या गोळीने त्याचा वेध घेतलेला.", दिपक

"असं तुला वाटलं दिपक.. पोलिसांनाही तेच वाटलं.. पण इस्माईलला संपवलं युसुफने. तुम्ही तुरुंगातून पळायच्या एक दिवस आधीच एक रिव्हॉल्व्हर युसुफला पोहोचवण्यात आली होती..", माया

दिपक संतापून युसुफकडे बघत होता.

"आमच्या प्लॅननुसार, इस्माइलला मारून तुला माझ्याकडे घेउन यायचं असं ठरलं होतं. पण ऐनवेळेस गडबड झाली, तुझी आणि युसुफची चुकामुक झाली.

पोळ फुटलेल्या मधमाश्यांसारखे पोलिस सर्वत्र पसरले होते. त्यामुळे युसुफ ने तुला शोधण्यात जास्त वेळ नाही घालवला आणि तो तडक तेथून पळून गेल्यावर माझ्याकडे आला. त्याच दिवशी इस्माईलला तू मारल्याची बातमी न्युज मध्ये आली आणि त्यामुळे आम्हाला आमचा प्लॅन थोडा चेंज करावा लागला. जे झालं ते आमच्या पथ्यावरच पडलं. माफीया हात धुऊन तुझ्या मागे लागली. युसुफही माफीयाला जाऊन मिळाला.

पोलिसांच्या बरोबरीने माफियाची लोक सुध्दा तुला शोधत होती. तुझ्याबद्दल माफियाला मिळणारी प्रत्येक माहीती युसुफला, आणि पर्यायाने मला मिळत होती.

तुझं नशीब बलवत्तर आणि तुला थॉमस भेटला. वाटलं होतं तू काही दिवसांनी तेथून बाहेर पडशील. पण झालं उलटंच, तू तेथे स्टेफनीच्या घरट्यात जाऊन लपलास आणि तेथे चांगलाच रमलास.

युसुफ तुझ्यावर नजर ठेवून होता. परंतु तुझी तेथून बाहेर पडायची काहीच चिन्ह दिसेनात. तुला तेथून हुसकाऊन बाहेर काढणं आवश्यक होतं. आणि त्यामुळेच नाईलाजाने युसुफला तुझा ठावठिकाणा माफियाला कळवावा लागला.

जॉनी चिकनाने तुला तडफडून मारायचा प्लॅन केला. तुला तर माहितीच आहे माफिया तरसासारखे असतात. आपली शिकार ते कध्धीच मारून खात नाहीत. तडपवून तडपवून मारतात. त्यांचे अणकुचीदार जबडे तुमच्या शरीरात घुसलेले तुम्हाला जाणवतात.. तुमच्या शरीरातील हाडं मोडल्याचा आवाज तुम्ही ऐकता आणि अतीव वेदनेत आपला मृत्यु जवळ येताना पहात रहाता.

---

**दुसरीकडे पोलिस स्टेशन मध्ये....**

“सर.. इन्स्पेक्टर पटेल म्हणून इथे इन्चार्ज होते त्यांच्या हाताखाली शेखावत कामाला होता..”, राणाने डिसुझाला माहीती दिली

“हम्म.. काही कॉन्टॅक्ट डिटेल्स?’, डिसुझा

“हो सर.. इथेच असतात ते.. आता ते रिटायर्ड झालेत, पण त्यांचा फोन नंबर आहे.. लावु फोन..”, राणा

“लग्गेच..”, असं म्हणून डिसुझा खुर्चीतून उठला आणि तो आणि राणा दोघंही इन्स्पेक्टर पटेलांना फोन लावायला गेले.

पुढचा अर्धा तास डिसुझा फोनवर विवीध प्रश्न विचारून इन्स्पेक्टर पटेलांकडून माहीती गोळा करत होता. मध्येच काही गोष्टी तो लिहून घेत होता.

सर्व प्रश्न विचारून झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरले. त्याने फोन ठेऊन दिला आणि बऱ्याच वेळ तो हातातील कागदावर पहात बसला. त्यावरील माहितीची जुळवाजुळव झाल्यावर तो म्हणाला,

“राणा, मला बहुतेक लक्षात आलं आहे, दिपक कुठे आहे.. पुर्ण फोर्स बरोबर घ्या.. चला”.

राणाला प्रश्न विचारायची संधी न देता डिसुझा लगबगीने खोलीच्या बाहेर पडला.

ज्यावेळी डिसुझा त्याचा पुर्ण फौज फ़ाटा घेऊन मायाच्या बंगल्याकडे निघाला होता त्यावेळी माया आपलं प्लॅनींग दिपकला सांगण्यात मग्न होती.

" थॉमसला जॉनीनेच मारले हे आत्तापर्यंत तू ओळखलं असशीलच. त्यानुसार प्रथम थॉमसला मारून त्याने तुम्हाला कोंडीत पकडले. तुमची होणारी तडफड, तगमग त्याला सुखावत होती. स्टेफनीने मुर्खपणा किंबहुना हावरटपणा करून थॉमसचा इन्शोरन्स क्लेम फ़ाईल केला. इतक्या मोठ्या रकमेसाठी पुर्ण पडताळणी होतेच आणि त्यामुळे त्यांनी त्यांचा एजंट एन्क्वायरीसाठी पाठवून  दिला. आज नाही तर उद्या तपासात थॉमसचा मृत्यु हा बनाव होता हे लक्षात आले असते आणि पोलिस तुझ्यापर्यंत पोहोचले असते. त्यामुळे जॉनीने इन्शोरन्स एजंटला संपवून  माफीयाच्याच एका माणसाला मोहीते बनवून  तुमच्या घरात घुसवले.

शक्य असते तर जॉनीने तुला अजून तडपवले असते. परंतु भाईला तुझा लांबलेला मृत्यु बघवत नव्हता. त्याने तुला लगेच मारून टाकण्याचे जॉनीला फर्मावले. त्यानुसार त्या दिवशीच तुला मारण्याचा जॉनीने प्लॅन बनवला होता. परंतु इथपर्यंत आल्यावर तुला मरून चालणार नव्हते. तुझी कसंही करून जॉनीच्या तावडीतून सुटका होणं भाग होती. म्हणून मग मीच शेखावतला तुझ्या ठिकाणाची टिप दिली. शेखावत आणि जॉनी एकाचवेळी तेथे पोहोचले आणि त्यामुळे झालेल्या गडबडीत तुला पळून जाता आले.", माया

"परंतु त्यावेळी जॉनी त्याच्या प्लॅनमध्ये यशस्वी झाला असता तर?", दिपक
"नसता झाला.. युसुफ त्याच्याबरोबरच होता. जर अशी वेळ आली असतीच की तो तुला मारणार.. तर त्या आधीच युसुफने जॉनीला मारले असते..", माया

“पण मला एक कळतं नाही, मीच का? शेखावतला मारायला तुला दुसरा कुठलाही भाडोत्री मारेकरी चालला असता. कोणीही पैश्यासाठी शेखावतला संपवले असते..”, दिपक

“बरोबर.. पण हे भाडोत्री मारेकरी सांगकाम्या असतात. मला फक्त शेखावतलाच नाही तर माफीया टोळीच उध्वस्त करायची होती. आणि त्यासाठी फक्त हिंमत नाही तर मला डोकं असणारा कोणीतरी पाहीजे होता. ज्याप्रकारे तू त्या तुरुंगातून शेखावतच्या हातातून निसटलास त्यावरून ह्या कामी तुच योग्य आहेस ह्याची मला खात्री होती..”, माया

“आणि माफियाला उध्वस्त करण्याचं कारणं?”, दिपक

“तेच.. जे मी तुला सांगीतलं.. आमच्या कामात त्यांचा हस्तक्षेप वाढला होता. दमणचं होणारं स्मगलिंग त्यांना आपल्या छत्राखाली हवं होतं आणि म्हणूनच त्यांनी पोलिसांना टिप दिली ज्यामुळे माझा नवरा कायमचा अपंग झाला… सगळं प्लॅननुसार व्यवस्थीत चाललं होतं, पण कुठून  कसा.. पोलिसांना तुझा संशय आला.. आणि आता तू माझ्यासाठी धोकादायक झालास. पोलिस तुझ्यापर्यंत पोहोचले, तर त्यांना माझ्यापर्यंत पोहोचायला वेळ लागणार नाही.. सो.. विथ हेवी हार्ट, गुड बाय दिपक..”, माया

“नाही.. इतक्या लवकर नाही माया…”, दरवाजा खाड्कन उघडून डिसुझा आतमध्ये शिरला आणि त्याने युसुफवर झेप घेतली. युसुफ बेसावध होता. डिसुझाच्या हल्ल्याने तो हेलपांडला आणि त्याच्या हातातून बंदुक निसटून  खाली पडली.

डिसुझाबरोबरच्या दोन शिपायांनी लगेच त्याला पकडले.

“हॅल्लो वन्स अगेन दिपक..”, डिसुझा दिपककडे बघून हसत म्हणाला..

“सो! माया मॅडम! कधी वाटलं होतं, पोलिस तुमच्या दारात येऊन पोहोचतील?”, डिसुझा

“काय पुरावा आहे तुमच्याकडे इन्स्पेक्टर? तुम्ही काही सिध्द करु शकणार नाही माझ्या विरुध्द. कोणाची साक्ष ग्राह्य धरणार न्यायालय? ह्या दोघांची? तुरुंगातून पसार झालेल्या ह्या दोघांची?”, दिपक आणि युसुफकडे बोट दाखवत माया म्हणाली.

युसुफ अविश्वासाने मायाकडे बघत होता.

“मी एक फोन फिरवला ना इन्स्पेक्टर, दहा मिनिटांमध्ये तुम्ही ह्या राज्यातून बाहेर पडायचा रस्ता धराल, नाहक माझ्या नादी लागु नका तुम्ही.”, माया दटावणीच्या सुरात म्हणाली.

“बरोब्बर.. अगदी बरोब्बर.. पण तुम्ही फोन फिरवायचे कष्ट घेताच कश्याला? मी काही तुम्हाला पकडायला आलोच नाहीये.”, डिसुझा आरामात हसत म्हणाला..

“म्हणजे?”, माया

“म्हणजे? म्हणजे मी तुम्हाला कश्याला अटक करु? तुमच्यावर खटला भरण्यासाठी, पुराव्यांसाठी धावाधाव करु? वरिष्ठांची नाराजगी ओढवून घेउ? तुम्ही तुमच्याच मौतीने मरणारच आहात की. मग उलट तुम्हाला प्रोटेक्शन द्या..”, डिसुझा बोलत होता.

“नाही.. मला समजलं नाही. काय बोलताय तुम्ही??”, माया

“म्हणजे असं बघा. आज नाही तर उद्या.. माफियाला खबरं लागणारच की दिपक कुमारला तुमच्या घरातून पकडलं.. तेथेच माफियाचा माणूस युसुफ सुध्दा होता.. मग ते अधिक शोधाशोध करतील.. थोडी आम्ही त्यांना मदत करु तुमचा प्लॅन काय होता हे कळवण्याची.. झालं तर मग.. माफिया आपल्या गोटातील गद्दारांशी कसं वागते.. हे काय तुम्हाला सांगायला हवं का? ते ठरवतील तुमचं काय करायचं..

चला.. राणे.. दोघांना ताब्यात घ्या.. आपल्याला निघायला हवं..", असं म्हणून डिसुझा माघारी वळला…

"थांबा..", जरबीच्या सुरात माया म्हणाली..

राणा आणि डिसुझा माघारी वळले.. मायाच्या हातात तिचं पिस्तोल होतं.

"कुणा कुणाला मारणार तुम्ही माया मॅडम.. इथल्या इथेच १० पोलिस असतील..खालच्या गेटवर २०-२५ आणि लागलंच तर आपण अजूनही मागवून घेउ. तुमच्या पिस्तोलात फक्त आठ गोळ्या.. बघा म्हणजे.. उगाच आत्ता काही पुरावा तरी नाही तुमच्या विरुध्द. नाहक पकडल्या जाल..", डिसुझा

"बरोबर आहे तुमचं..", रोखलेले पिस्तोल खाली करत माया म्हणाली.."देअर इज नो पॉईंट इन लिव्हींग.. आज नाही तर उद्या माफिया मला संपवेलच.. ते तसं मरण पत्करण्यापेक्षा हे असं..", असं म्हणून मायाने पिस्तोल स्वतःच्या पोटाला लावली आणि चाप ओढला..

क्षणार्धात धाड़ आवाज आला आणि माया खाली कोसळली. जमीनीवरचं महागडं क्रिम कलरच कार्पेट क्षणार्धात रक्ताने लालभडक झालं.

कुणीच जागचं हाललं नाही. मायाच्या तोंडातून उचक्यांवाटे रक्तं बाहेर येऊ लागलं. काही क्षण तिने गचके खाल्ले आणि मग तिचा देह निष्प्राण झाला.

अचानक घडलेल्या त्या प्रकाराने सारेच स्तंभीत झाले होते. त्याच्या फायदा घेऊन दिपकने अचानक राणांच्या हातातून पिस्तोल हिसकावली आणि त्याच्या कपाळाला लावली.

"डिसुझा.. तुमचं काम झालं असेल.. माझं नाही.. जॉनी चिकना अजूनही बाहेर मोकाट आहे.. स्टेफनीचा खुनी.. त्याचा बदला घेतल्याशिवाय मला शांत बसवणार नाही..", दिपक

“दिपक.. मुर्खपणा करु नकोस..जॉनी चिकनाला आपण पकडु.. हे बघ तू निर्दोष आहेस.. स्टेफनी, थॉमस, मोहीते कुणाचाच खुन तू केला नाहीस. हा युसुफ ते सर्व कबुल करेल. शेखावतला तसंही तू मारलं नव्हतंस.. मायाने मारलं होतं.. हो ना?”, दिपक

“हम्म”, दिपक म्हणाला..

“मग.. तुझ्यावर पहीले आरोप सोडले तर काहीच आरोप नाहीत.. मग कश्याला स्वतःचं आयुष्य उध्वस्त करतोस? तुझ्यावर झालेला अन्यायाविरुध्द आपण आवाज उठवु.. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत…”, डिसुझा

“नाही डिसुझा.. जॉनी माझी शिकार आहे.. तुम्ही पोलिस त्याचं काहीच वाकडं करु शकणार नाही..”, दिपक

“हे तू बोलतोस दिपक? अरे तू सैन्यातला एक जबाबदार अधिकारी ना? एकदा चूक घडली.. मान्य. पण आपण ती सुधारु शकतो..”, डिसुझा

“मान्य.. मान्य एकवेळ तुम्ही ते आरोप मागे घ्याल सुध्दा.. पण माफियाचं काय? आणि तो मंत्री.. ज्याच्या दबावामुळे पोलिस माझ्या मागे शिकारी कुत्र्याप्रमाणे लागले होते.. तो मला निर्दोष होऊ देईल..?”, दिपक

“अरे वेड्या.. झालं गेले ते दिवस.. तो मंत्रीच स्ट्रींग ऑपरेशनमध्ये अडकलाय. मंत्रीपदाचा राजीनामा तर केंव्हाच दिला त्याने उलट आज तुरुंगात जातो का उद्या अशी त्याची अवस्था आहे..आणि माफीयाचं म्हणशील तर इस्माईलला तू मारलंच नाहीस.. तर ते कश्याला तुला मारण्यासाठी दिवस-रात्र एक करतील..? त्यांना बाकीची कामं काय कमी आहेत का?”, डोळे मिचकावत डिसुझा म्हणाला.

दिपकच्या मनाची चलबिचल सुरु झाली.

"दिपक.. ऐक माझं.. तुला ह्यातून मी बाहेर काढीन, माझ्यावर विश्वास ठेव..उगाच वेडेपणा करायला जाशील आणि पुन्हा आयुष्याशी खेळ होऊन बसेल.. आण ते पिस्तोल इकडे", डिसुझाने हात पुढे केला

दिपकने बराचवेळ विचार केला आणि आपले पिस्तोल राणाला परत केले..

---

**एक महीन्यांनंतर..**

डिसुझा आणि दिपक एका बारमध्ये बसून बिअर पित होते. डिसुझाने आपला शब्द खरा करून दाखवला. त्याने कोर्टाला, सरकारला अपिल करून दिपकसाठी माफी मिळवली. झालेला प्रकारात तो अडकवला गेला होता आणि केवळ व्यक्तीगत सुडाच्या भावनेतून मंत्र्याने दिपकला अडकवले होते हे पटवून  दिले.

झाली तेवढी शिक्षा दिपकला पुरेशी आहे हे न्यायालयाने मान्य करून त्याला माफी दिली. सैन्यातील अधीकाऱ्यांनीही दिपकला मानाने आहे त्या हुद्यावर परत घ्यायची तयारी दर्शवली. युसुफने दिलेल्या टिपवर पोलिसांनी जॉनी चिकनाला पकडण्यासाठी धाड टाकली.. परंतु तो पोलिसांच्या बरोबर झालेल्या चकमाकीत मारला गेला

"मला एक कळालं नाही डिसुझा..", बिअरचे घोट घेता घेता दिपक म्हणाला…"त्या दिवशी तुम्ही माया मॅडमच्या घरी कसे काय पोहोचलात?"

"मी इन्स्पेक्टर शेखावतची फाईल मागवली होती..",डिसुझा म्हणाला.."तेंव्हा तो इथे दमणला पोस्टींगला होता हे लक्षात आले.. मग आम्ही स्टेशन इन्चार्ज पटेल साहेबांशी बोललो.. त्यांनी त्यावेळी झालेला सगळा प्रकार सांगीतला. मायाच्या नवऱ्याला शेखावतने जाणून बुजून मारण्याचा प्रयत्न केला होता आणि म्हणूनच त्याची दमणमधून बदली करण्यात आली.. हेही लक्षात आले. आणि त्याचवेळी शेखावतचे आणि मायाचे कनेक्शनही.

एका दमात पन्नास लाख उभे करु शकेल अशी दमणमध्ये तरी काहीच व्यक्ती आहेत आणि माया त्यापैकीच एक होती. तुझ्याबरोबर तुरुंगातून पळालेला दुसरा कैदी युसुफ.. माफियाचा माणूस होता.. आणि त्यालासुध्दा अनेकवेळा ह्या आधी दमणमध्ये पाहीले गेलेले होते. यु नो.. अफ़्टरऑल पोलिसांचे अंदाज.. त्यांची निरीक्षणं कधी चूकत नाहीत. आम्ही पण मायाच्या बाबतीत असाच अंदाज बांधला आणि तिकडे येऊन धडकलो..”

दिपकने आपला बिअरचा ग्लास संपवून टाकला

“सो.. आता पुढे काय?”, डिसुझा..

“पुढे?? पुढे रिपोर्टींग टु कारगिल..”, दिपक उठून उभा राहीला.

डिसुझा आणि दिपकने एकमेकांशी हातमिळवणी केली आणि एकमेकांना सलाम ठोकले..

“ठिक तर मग…”, दिपक

“गुडबाय.. दिपक. ॲन्ड ऑल द बेस्ट”, डिसुझा

दोघांनी एकमेकांकडे काही क्षण पाहीले आणि दोघंही आपल्या आपल्या रस्त्याला जाण्यासाठी बाहेर पडले…………………………..

[समाप्त]

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत . महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. " ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी" ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!